म. ग्रं. सं. ठाणें.
विषय
सं. क्र.



REFBK-0026519

# स्तबक

डॉ. मो. दि. पराडकर

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

12 FEB 1992
15 FEB 1992
7/3/92
19 MAY 1992
6 JUN 1992
15 JUL 1992
18 JUL 1992
26 AUG 1992

(क्र. मा. पहा)
२०००-१२-८८

संदर्भ निबंध
३७५७
२६५१८
१५१।८२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
३७५७
२६५१८ निबंध
१५१।८२

# स्तबक

डॉ. मो. दि. पराडकर

REFBK-0026519

इतिहास पत्रिका प्रकाशन
ठाणे ४०० ६०२.

**प्रकाशक**
सौ. सुमेधा विजय बेडेकर
इतिहास पत्रिका प्रकाशन
डॉ. बेडेकर हॉस्पिटल, 'शिवशक्ती'
महर्षी कर्वे रोड, ठाणे ४०० ६०२.
दूरध्वनी ५९ १४ ३८

© प्रकाशकाच्या स्वाधीन

प्रथमावृत्ती
२० ऑक्टोबर १९९१

मूल्य ८५ रूपये

**मुद्रक**
विलास रा. सांगुर्डेकर
परफेक्ट प्रिन्टस्
२२, ज्योती इंडस्ट्रीयल इस्टेट,
नुरीबाबा दर्गा रोड, मखमली तलावाजवळ,
ठाणे (प) ४०० ६०२.
दूरध्वनी ५३४ १२ ९१

# प्ररोचना

संस्कृत साहित्यशास्त्रकारांनी साहित्याचे तीन प्रकार वर्णन केले आहेत. वेदादि शास्त्रे ही शब्दप्रधान असून स्वामी-राजा-प्रमाणे होत. तर इतिहास-पुराणे ही अर्थप्रधान असून मित्राप्रमाणे होत. या दोहोहून वेगळा, विलक्षण तिसरा प्रकार म्हणजे ललित साहित्याचाा, काव्याचा, सर्जनशील वाङ्मयाचा. या तिसऱ्या प्रकारात शब्दार्थ हे दोन्ही अप्रधान, गौण असून त्यातून प्रतीयमान होणारा, सूचित होणारा, रसादि अर्थ प्रधान असतो आणि हा तिसरा प्रकार कान्तेप्रमाणे असतो. प्रिया वल्लभाला प्रेमाने गोडी निर्माण करून, वश करते व रामासारखे वागावे रावणासारखे नव्हे असा त्याला उपदेश करते. शास्त्रनिर्मितीचे प्रधान कारण प्रज्ञा तर साहित्यनिर्मितीचे प्रधान कारण प्रतिभा :

द्वे वर्त्मनी गिरां देव्याः शास्त्रं च कविकर्म च ।
प्रज्ञोपज्ञं तयोराद्यं, प्रतिभोद्भवमन्तिमम् ।।

प्रतिभा ही शक्ति द्विविध आहे. कारयित्री आणि भावयित्री. पहिली ही कविगत तर दुसरी ही सहृदय-अर्थात् रसिक-गत असते. कारयित्री प्रतिभेच्या सामर्थ्याने कवि आपले काव्य निर्माण करतो तर भावयित्री प्रतिभेच्या बळावर सहृदय-रसिक त्या काव्याचा आस्वाद घेतो. सहृदयतेचा-रसिकतेचा-अभाव असलेल्या शास्त्राभ्यासजड विद्वान् प्रेक्षकाचा, साहित्यशास्त्रकार नाट्य अथवा प्रेक्षा-गृहाच्या भिंतीतील एक दगड म्हणून उपहास करतात :

सवासनानां नाट्यादौ रसस्यानुभवो भवेत् ।
निर्वासनास्तु रङ्गान्तर्वेश्मकुड्याश्मसंनिभाः ।।

भारतातील सर्वश्रेष्ठ सौंदर्यमीमांसक आचार्य अभिनवगुप्त होत. ध्वन्यालोकावरील आपल्या लोचन टीकेच्या प्रारंभीच्या मंगलश्लोकात त्यांनी कवि आणि सहृदय टीकाकार यांचा एकत्र गौरवपूर्ण उल्लेख केला आहे :

''सरस्वत्यास्तत्त्वं कविसहृदयाख्यं विजयते ।।

''कवि व सहृदय यांच्या रूपाने असणारे देवी सरस्वतीचे खरेखुरे, पारमार्थिक चैतन्यस्वरूप सर्वश्रेष्ठ होय'' असे त्यांनी म्हटले आहे.

माझे सन्मित्र डॉ. मो. दि. पराडकर हे आचार्य अभिनवगुप्ताला अभिप्रेत असलेल्या सहृदय टीकाकारांपैकी एक होत. ते परिणतप्रज्ञ, विदग्ध, प्रतिभासंपन्न आणि समृद्ध व्यक्तिमत्व असलेले संवेदनाशील सौंदर्यरसिक आहेत. त्यांनी संस्कृत, मराठी, इंग्रजी व हिंदी भाषेतून अनेकानेक टीकात्मक लेख लिहिले आहेत. भारतीय संस्कृतीच्या अनेक पैलूवर त्यांचे लेख प्रकाश पाडतात. गेल्या वीस वर्षात मराठीमधील अनेक नियतकालिकातून प्रकाशित झालेल्या अनेक लेखांपैकी निवडक तीस स्फुट लेख त्यांनी या पुस्तकात संग्रहीत केले आहेत, आणि या लेखसंग्रहाला **स्तबक** असे अन्वर्थक नाव दिले आहे. ह्या सर्वच लेखांची भाषा प्रौढ तरी हि प्रसन्न आणि मनोहर आहे.

ह्या तीस लेखांपैकी काही अगदी लहान आहेत, काही मोठे आहेत तर थोडे मध्यम आहेत. हे सर्वच लेख निःसंशय वाचनीय आहेत. तथापि स्थलाभावी सर्वांचा परामर्श करणे केवळ अशक्य आहे. '**स्तबका**'तील काही लेख वेदांविषयी आहेत, काही कालिदास-भवभूती आणि त्यांच्या काव्य-नाट्यासंबंधी, संस्कृतातील शृङ्गार रस आणि संस्कृत नाटकांतील विनोदासंबंधी आहेत, काही संस्कृत भाषेच्या अध्ययन आणि संवर्धनासंबंधी आहेत, दोन लेख 'हिंदी भाषेतील भक्ति वाङ्मयाचे स्वरूप' व 'श्रीवल्लभाचार्यांचा पुष्टिमार्ग व त्यांचा हिंदी कवींवरील प्रभाव' याविषयी आहेत, दोन लेख म. म. काशीनाथशास्त्री अभ्यंकर व डॉ. राधाकृष्णन् यांच्या कार्याचे मूल्यमापन करणारे आहेत म. म. काशीनाथ शास्त्री अभ्यंकर यांच्यावरील लेख वाचताना त्यांनी माझ्यासंबंधी दाखविलेल्या अकृत्रिम आत्मीयतेच्या मधुर स्मृती जागृत झाल्या. गुजरातमध्ये संस्कृतच्या अध्ययन आणि अध्यापन क्षेत्रांत त्यानी केलेल्या बहुमोल कार्याचा एक साक्षीदार या नात्याने मला डॉ. पराडकरांचा हा लेख पुनःप्रत्ययाचा आनंद आणून देणारा वाटावा यात नवल नाही. मुंबईत सर्व अध्ययन आणि अध्यापन केलेल्या डॉ. पराडकरांनी कै. बापूसाहेबांबद्दल (आम्ही याच नांवाने त्यांना संबोधित असू) इतक्या जिव्हाळ्याने लिहावे याचं विशेष कौतुक. आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या आमच्या बापूसाहेबांना प्रत्यक्ष चर्चेत निर्माण होणाऱ्या विनोदाचे वावडे नव्हते, हा माझा हि अनुभव. या दृष्टीने डॉ. पराडकर आणि मी ''समानधर्मा''. 'अमुष्य विद्या रसनाग्रर्नतकी' हे जसं त्यांच्या बाबतीत अक्षरशः खरं होतं तसेच आधुनिक चिकित्सक प्रवृत्तीचेहि दर्शन त्यानी घडवलं. या त्यांच्या वैशिष्ट्यावर डॉ. पराडकरांनी अचूक बोट ठेवलं आहे. डॉ. राधाकृष्णन् यांच्यावरील त्यांचा लेख हि एक शिक्षक या नात्याने त्यांचे मोठेपण स्पष्ट करणारा आहे आणि बाकीचे स्त्री शिक्षण, धर्म आणि शिक्षण, मराठी अमदानीतील संस्कृत सारस्वताची साधना, बुद्धिबळावरील एक संस्कृत ग्रंथ इत्यादी लेख माहितीपूर्ण आहेत. तेजस्वी अपौरूषेय वाङ्मयाचा आपला वारसा' या लेखाच्या शेवटी ''समर्थ भारताच्या निर्मितीसाठी वेदकालीन आर्यांचा जीवनासंबंधीचा युयुत्सु, जयिष्णू आणि वर्धिष्णू दृष्टिकोण स्वीकारणे आज अत्यंत आवश्यक आहे असा ते उद्घोष करतात. ''नेतृत्वाचा कालिदासप्रणीत आदर्श'' या लेखात रघुवंशातील राजांच्या गुणांचे वर्णन करताना कालिदासाने नेतृत्वाचा सार्वकालीन व सार्वदेशीय आदर्श प्रस्थापित केला आहे. तो आदर्श समोर ठेवून तसे आचरण करण्याचा प्रयत्न आजच्या नेत्यांनी केल्यास देशाचे कल्याण होईल असे डॉ. पराडकर निक्षून सांगतात. कालिदासाच्या स्त्री-सृष्टीतील यक्षाची अनामिक कान्ता, कुमारसंभवातील पार्वती, रघुवंशातील सुदक्षिणा, इन्दुमती आणि सीता - नायिकांची डॉ. पराडकरांनी रेखाटलेली चित्रे विलोभनीय आहेत. श्रेष्ठ साहित्यशास्त्रकार आनंदवर्धनाने सर्वश्रेष्ठ महाकवि म्हणून कविकुलगुरू कालिदासाचा गौरव केला आहे. हे सर्वथैव मान्य करून हि - कालिदासाच्या

व्यक्तिचित्रणात मानवी जीवनातील सर्व भावनाना स्पर्श न झाल्याने त्याने घडवलेले स्त्रीजीवन दर्शन काहीसे एकाङ्गी ठरते असे आपले प्रांजळ मत नमूद करतात. ''संस्कृत साहित्यातील शृङ्गार'' या लेखाच्या प्रारंभी ''मानवाचे हृदय म्हणजे विविध भावनांचे अक्षय भांडारच आहे. या भावना ज्यावेळी प्रमाथी ठरतात किंवा पराकोटीला पोचतात त्यावेळी त्यांची कुठल्या तरी रूपात अभिव्यक्ती होणेच हितावह ठरते'' - असे म्हणून ते Home They Brought Tha Warrior Dead ह्या इंग्रजी कवितेचा दृष्टान्त देतात. लेखाच्या शेवटी ते लिहितात :- ''संस्कृत कवींच्या शृङ्गार वर्णनात रतिभावनेचे निःसंकोच चित्रण आहे हे जरी निर्विवाद असले तरी त्यानी काव्याला आवश्यक असणारा संयम चांगलाच पाळलेला असल्यामुळे त्यांच्या बाबतीत 'जयन्ति ते रससिध्दाः' कवीश्वराः, असेच म्हणणे योग्य ठरेल''.

''संस्कृत साहित्यातील वसंततिलका'' हा लेख आगळा असून त्यातील विवेचन मार्मिक आहे. एका लेखात भाष्यकार शंकराचार्यांच्या शैलीच्या वैशिष्ट्यांची तोंडओळख करून देताना ते म्हणतात : ''श्रीशंकराचार्यांची भाषाशैली हा संस्कृत गद्याचा अलंकार आहे... वैचारिक संस्कृत गद्याचा एक आदर्श त्यांनी घालून दिला..... प्रसाव व ओज या काव्यगुणांबरोबर दैनिक व्यवहारातील समर्पक दृष्टान्त व विवादाला आवश्यक असणारी उपरोध, उपहास वगैरे साधने यांचा भरपूर उपयोग करून घेऊन श्रीशंकराचार्यांनी आपल्या भाष्यांना एक वेगळेच सामर्थ्य प्राप्त करून दिले.'' डॉ. पराडकरांनी दुसऱ्या एका लेखात भगवद्गीतेत ज्ञानमार्ग, कर्ममार्ग व भक्तिमार्ग यांचा समन्वय कसा साधला आहे याचे थोडक्यात सुंदर विवेचन केले आहे. संस्कृत भाषेसंबंधीच्या लेखांत त्यांनी संस्कृत भाषेच्या अध्ययन-अध्यापन व संवधर्नाचा हिरिरीने पुरस्कार केला आहे. आणि असा पुरस्कार करताना त्यानी 'संस्कृतने भूतकाळात कशी भरीव कामगिरी केली आहे, राष्ट्रीय एकात्मतेसाठी ती कशी उपयोगी आहे, नवीन नवीन शब्द निर्माण करण्यास आणि मराठी, गुजराती, हिंदी सारख्या भाषांचे शब्दभांडार समृद्ध करायला ती कशी समर्थ आहे' इत्यादी गोष्टी वाचकांच्या निदर्शनास आणल्या आहेत. ''हिंदी भाषेतील भक्तिवाङ्मयाचे स्वरूप'' आणि ''श्री वल्लभाचार्यांचा पुष्टिमार्ग व त्यांचा हिंदी कवींवरील प्रभाव'' या दोन लेखांतील माहिती बहुतेक मराठी वाचकाना एकदम नवीन च वाटेल. एका लेखात कालिदासाचा, संस्कृत कवींवर आणि रवीन्द्रनाथांसारख्या आधुनिक भारतीय तसेच जर्मन कवि शिलरसारख्या पाश्चात्य कवींवर प्रभाव कसा पडला आहे याचे त्यांनी उदाहरणांसह विवेचन केले आहे. हे विवेचन हि पुष्कळाना नवीन च वाटेल. ''संस्कृत नाटकांतील विनोद'' हा त्यांचा लेख विस्तृत असून ''संस्कृत नाटकातील सर्व विनोद विदूषकाभोवती फिरतो असे म्हणता येणार नाही' हे अनेक उदाहरणे देऊन त्यांनी सिद्ध केले आहे. ''भवभूतीः व्यक्ति आणि वाङ्मय'' हा या स्तबकातील सर्वात मोठा लेख आहे. भवभूती

विषयीची उपलब्ध असलेली सर्व माहिती चिकित्सकपणे तपासून मिराशीचे निष्कर्ष सयुक्तिक व स्वीकारार्ह आहेत असे ते म्हणतात. विवेचनाच्या सोयीसाठी भवभूतीच्या नाटकरचनेचा क्रम बदलून ते प्रथम मालतीमाधवाचा गुणदोषविवेचनासह परामर्श करतात आणि मग रामचरित्रावर आधारित असलेल्या महावीरचरित व उत्तररामचरित या नाटकांचे विस्ताराने आणि सहृदयतेने रसग्रहण करतात. स्तबकात समाविष्ट केलेल्या काव्यनाट्यविषयक लेखातील हा लेख सर्वात उठून दिसणारा - सर्वोत्तम आहे. रामचरित्राला भवभूतीने नवा अर्थ दिला आणि संस्कृतातील निसर्ग वर्णनाला व्यापकता आणून दिली हे सांगणाऱ्या डॉ. पराडकरांनी या कवीने योजलेल्या प्रतिमानांचा हि स्वतंत्र पणे विचार केलेला आहे. डॉ. पराडकरांचे सर्व लेख वाचताना 'नामूलं लिख्यते किञ्चित्' ह्या दण्डकाचे त्यांनी पालन केल्याचे प्रत्ययास येतेच. शिवाय भारतीय संस्कृती आणि संस्कृत वाङ्मय यांच्याबद्दल मराठी वाचकाच्या मनात आस्था निर्माण करण्याच्या कार्याला या स्तबकाने गति निश्चितच मिळेल. ही कामगिरी माझ्या दृष्टीने अधिक मोलाची आहे.

सुगंधाने दरवळणाऱ्या अनेक सुमनांचा हा मनोहर **स्तबक** मराठी वाचकांना सादर केल्याबद्दल लेखक डॉ. मो. दि. पराडकर व प्रकाशक सौ. सुमेधा बेडेकर या दोघांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो आणि डॉ. पराडकरांच्या हातून उत्तरोत्तर संस्कृत भाषा व साहित्य आणि भारतीय संस्कृति विषयी ज्ञानात भर घालणारे भरघोस लेखन होवो आणि अर्थातच ते प्रकाशित होवो, अशी सदिच्छा प्रकट करतो.

५, सुरूचि सोसायटी, दीक्षित रोड एक्सटेन्शन, वा. म. कुळकर्णी
विलेपार्ले (पूर्व) मुंबई ४०० ०५७

# मनोगत

सुश्लोक वामनाचा अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची
ओवी ज्ञानेशाची किंवा आर्या मयूरपंतांची

ही उक्ती मराठीत प्रसिद्ध च आहे. यात आर्येवर ज्या कविवर्य मोरोपंत पराडकर यांनी आपला ठसा उमटविला त्यांच्या कुळात जन्म झाल्यामुळे वाङ्मयाच्या प्रेमाचा वारसा मला मिळावा हे स्वाभाविक. माझे लालन-पाठन ज्यांनी केले ते माझे आजोबा (आईचे चुलते) स्व. गोविंदराव नानल हे मराठवाड्यातील परभणीतले नाणावलेले वकील तर होते च परंतु शिवाय संस्कृत, मराठी, पर्शियन आणि उर्दू (त्या काळच्या मोगलाईतली राजभाषा) यांचे उत्तम जाणकार आणि हैद्राबाद चे संत स्व. बापू भटजी यांचे शिष्य. त्यामुळे वाङमयावरच्या आणि आमच्या संस्कृतीबद्दलच्या आस्थेचे रंग अधिक पक्के झाले. सुदैवाने मुंबईतील परळच्या सुप्रसिद्ध आर्. एम्. भट हायस्कूलमध्ये मुख्याध्यापक कै. मो. वा. दोंदे यांच्या समृद्ध व्यक्तित्वाचा व त्या शाळेतील संस्कृत शिक्षक कै. वाय्. बी. जोशी यांच्या डोळस संस्कृत अध्यापनाचा संस्कार माझ्यावर झाला. रूइया महाविद्यालयातल्या उच्च शिक्षणात हि गुरुवर्य प्रा. न. र. फाटक, द. के. केळकर, रं. रा. देशपांडे, गोवर्धन पारीख यांसारख्यांचे मार्गदर्शन व सहवास लाभला. त्या काळी संस्कृत विषय निवडणाऱ्याला हि मान होता आणि मुळात माझ्यावर संस्कृत वाङमयाचे संस्कार हि झालेले होते. यामुळे मी संस्कृत हा विषय निवडला. या निवडीत आणि याच विषयांचे अध्ययन व अध्यापन करण्यात आजच्या वैद्यकीय परिभाषेनुसार Genotype आणि Fenotype या दोन्हीचा हि भाग होता असे वाटते.

वाङमयावरल्या आणि भाषेवरल्या अभिजात प्रेमामुळे सन् १९४७ मध्ये अध्यापनाचा व्यवसाय पतकरल्यानंतर मी गेली चाळीस वर्षे संस्कृतचा शिक्षक आणि हिन्दीचा प्रचारक या भूमिकांतून वाङमयाचे अनुशीलन करीत आलो. शिक्षकांप्रमाणे च सुदैवाने मला विद्यार्थी हि चांगले मिळाले आणि त्यांच्या अपेक्षांचा भंग होऊ नये म्हणून अध्यापनात आणि चिन्तनात गतिशील राहणे भाग च होते. त्यांच्या आग्रहामुळे मी लेखनाला सुरवात केली. त्याला आता जवळ जवळ चार दशकांचा काळ लोटला.

माझ्या अध्ययन-अध्यापनाच्या या अनुभवांतून माझ्या लक्षांत आले की आमच्या संस्कृतीब्रद्दल आणि पर्यायाने संस्कृत साहित्य आणि संस्कृत भाषा यांबद्दल गैरसमज बरेच आहेत. आमची संस्कृती प्राचीन असली तरी त्यात सुरवातीपासूनच ऐहिक जीवनाबद्दल वैराग्याची च नव्हे तर तुच्छतेची भावना आहे आणि त्यामुळे आम्ही भारतीय अभ्युदयासाठी झटण्याऐवजी परलोकांतील ऐश्वर्याचा च विचार करीत असतो. सहाजिकच याचा परिणाम आजच्या

ज्ञानशाखांकडे, विज्ञानाकडे दुर्लक्ष करण्यात होतो; स्वतंत्र विचारांची देवाण घेवाण खुंटवून टाकण्यात होतो. विशेषतः यात संस्कृत वाङ्मयाचा आणि संस्कृत भाषेचा हि वांटा आहे असे मानण्याचा प्रघात पडत चालल्याचे मला दिसले. स्वातंत्र्योतर काळात हि हे गैरसमज दूर होण्याऐवजी वाढत चाललेले दिसले. हे दूर करणे आणि प्राचीन भारतीयांच्या जीवन-दृष्टी संबंधाने योग्य तो अभिमान बाळगून नवीन समाजाच्या निर्मितीसाठी प्रयत्न करणे हितावह ठरेल याची खात्री पटल्यामुळे गेल्या ३०-३५ वर्षात जे लेख मी लिहिले त्यापैकी तीस लेख या पुस्तकात एकत्र केलेले आहेत.

हे सर्व लहान-मोठे लेख तसे नैमित्तिकच आहेत. उदाहरणार्थ 'वेदकालीन आर्य विजयशाली जीवनाचे उद्‌गाते हा लेख 'वसंत' मासिकाचे त्या काळचे सहायक सम्पादक श्री. मोरेश्वर पटवर्धन (यांची आजची सहधर्मचारिणी त्यावेळी एम्. ए. च्या वर्गात होती. ) यांनी दिवाळी अंकासाठी माझ्याकडून लिहून घेतला नंतर मी 'वसंत' मध्ये मधून मधून लिहीत राहिलो. 'भगवदगीतेची समन्वयवादी विचारसरणी' हे मुळात आकाशवाणीवरचे पांच मिनिटांचे भाषण, नंतर ते नागपूरच्या जीवन-विकासात प्रसिद्ध झाले.

हे लेख लहान-मोठे असण्याचे हि कारण त्यांच्या नैमित्तिकपणातच आहे. वेळोवेळी 'वसंत', 'जीवनविकास', 'साप्ताहिक विवेक', 'धर्मभास्कर', 'अमृत', 'स्वामिन् तव शरणम्', 'लोकराज्य', 'सुधन्वा', 'भारतीय शिक्षण', 'लोकप्रभा', यासारख्या मासिकात, पाक्षिकात, साप्ताहिकात हे प्रकाशित झालेले आहेत. त्यामुळे या सर्वांच्या संपादकांचे आभार मानणे योग्यच आहे. लेखाच्या शेवटी मी त्यांचा उल्लेख हि केलेला आहे. त्यामुळेच त्यांच्या लहान-मोठे पणाची संगती लागते. उदाहरणार्थ 'भगवद्‌गीतेची समन्वयवादी विचार सरणी' हे मुळात आकाशवाणीरील पांच मिनिटांचे भाषण असल्यामुळे नंतर जीवन-विकासांत प्रकाशित झालेला हा लेख लहान असावा यात नवल नाही. ऋग्वेदांतील इन्द्र, परोपकारी आश्विनीकुमार, सरस्वती यांसारखे लेख 'स्वामिन् तव शरणम्' या धार्मिक मासिकासाठी लिहिले गेले. त्यामुळे त्यात माहिती देण्यावर भर आहे. ही माहिती शक्य तितकी अद्यावत् करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्या मानाने 'मराठा अमदानीतील संस्कृत सारस्वताची साधना' हा लेख विषयाच्या माहितीच्या दृष्टीने थोडा मोठा आहे. 'वसंत', 'धर्मभास्कर' या मासिकांच्या विशेषाङ्कासाठी लिहिलेले लेख अधिक मोठे असावे याचे आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. या मासिकांच्या संपादकांनी त्या त्या वेळी हे लेख लिहिण्यास सांगितले व त्यांनी माझ्यावर पृष्ठसंख्येचे बंधन घातले नाही हे त्यांचे सौजन्य. संस्कृत आणि महाविद्यालयीन अभ्यासक्रमात संस्कृतची गेल्या काही वर्षात जी उपेक्षा झाली त्यामुळे या भाषेच्या अध्ययनाचा वैज्ञानिक युगाशी विरोध नाही, किंबहुना तिच्या डोळस अध्ययनामुळे आणि संवर्धनामुळे विकसनशील भारतीय भाषांचा

फायदा होईल हे दाखवून देण्याच्या उद्देशाने लिहिलेले लेख मुद्दाम यात समाविष्ट केले. संस्कृत नाट्यनिर्मिती संबंधीचा लेख हि मुख्यत्वे याकडेच बोट दाखविणारा. 'भवभूती व्यक्ती आणि वाङ्मय' हा मुंबई विद्यापीठातल्या विभागांतर्फे झालेल्या विश्वकवींच्या भाषणमालेत वाचलेला निबंध असल्यामुळे सहाजिकच विषयाचे विस्तृत विवेचन करणारा आहे. वैयाकरण महामहोध्याय काशीनाथशास्त्री यांच्या खुनामुळे महाराष्ट्र हादरून गेला होता. त्यावेळी माझे मित्र नेने यांनी त्यांना आदरांजली वाहण्यास सांगितली व म्हणून त्यांच्यावरचा लेख तयार केला, तो या ग्रंथाच्या प्ररोचनेचे विद्वान् लेखक प्रा. डॉ. वा. म. कुलकर्णी, माझे वरिष्ठ स्नेही यांना आत्मीयतेचा पुनःप्रत्यय आणून देणारा ठरला ही माझ्या दृष्टीने भाग्याची गोष्ट. सर्व लेखात प्रसंगानुसार आजच्या संदर्भात संस्कृत वाङमयातील विचारसरणीचा कसा उपयोग करून घेता येईल यावर भर देण्याचा प्रयत्न केलेला आहे. शेवटचे दोन्ही लेख आज योग्य प्रेरणा घेण्यावरच जोर देतात.

या सर्व लेखांचा संग्रह मी केलेला नाही. या बाबतीत माझा कारभार अगदीच वेंधळा होता. पालघरला प्राचार्य (सन् १९७०) म्हणून गेल्यावर सुदैवाने तेथील इंग्रजी विभागातली तरूण प्राध्यापिका कु. सांगता लिमये, [आता सौ. सांगता अ. पोळ, सहाय्यक संचालिका, दूरशिक्षण विभाग श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ - जूहू सांताक्रूझ (पश्चिम)] हिने या सर्व लेखांची सूची करण्याचे काम माझ्याविषयींच्या आस्थेमुळे आपणहून अंगावर घेतले. तोपर्यंत इंग्रजी, मराठी, हिन्दी व संस्कृत यांत लिहिलेल्या पुस्तकांची क्रमवार सूची करून दिली. हे तिचे माझ्यावर मोठे ऋण आहे. नंतर प्रकाशित झालेल्या लेखांचा त्या सूचीत समावेश करण्याचे च काम मला करावे लागले आणि ते हि तिचाबद्दलच्या स्नेहाने च मी केले हे मान्य करतो. त्यामुळे हे पुस्तक संदर्भांसह प्रकाशित होऊ शकले.

माझे वरिष्ठ स्नेही व Studies in Sahitya Shastra प्रमाणेच संस्कृत अलंकार ग्रंथातील प्राकृत श्लोकांचे चिकित्सक पद्धतीने संपादन करून संशोधन क्षेत्रात नांव मिळवणारे व एशियाटिक सोसायटीचे पारितोषिक विजेते डॉ. वा. म. कुळकर्णी यानी माझ्या या लेखसंग्रहाला संक्षिप्त पण सारगर्भित प्ररोचना लिहून दिली याबद्दल त्यांचा मी अगदी ऋणी आहे. ह्या **स्तबका** चा सुगंध दरवळण्यासाठी त्यांच्या प्ररोचनेची बहुमोल मदत होईल यात शंका नाही.

माझ्या सर्व लेखनामागे माझी पत्नी सौ. मंगला हिचे प्रोत्साहन आहे. तिचा विषय हि संस्कृतच असल्यामुळे तीच माझ्या लेखांची पहिली वाचक आणि समीक्षक आहे. शेवटी सर्वात महत्त्वाचे म्हणजे इतिहास पत्रिका प्रकाशनाच्या सौ. सुमेधा बेडेकर यांचे आभार. त्यांनी व प्राच्य विद्या परिषद, ठाणे चे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी या लेखसंग्रहाकडे आपुलकीने बघितले; एवढेच नव्हे तर त्यांचे पुस्तकरूपाने प्रकाशन व्हावे असा आग्रह धरला म्हणून च हे होऊ शकले. त्यांच्या माझ्या स्नेह-संबंधात औपचारिकपणाचा भाग कधीच येऊ नये हीच इच्छा

या निमित्ताने मी व्यक्त करतो.

पुस्तकाच्या प्रकाशनात मुद्रकाचा वांटा महत्त्वाचा असतो. ती कामगिरी स्नेहाखातर श्री. विलास रा. सांगुर्डेकर आणि त्यांचे सर्व सहकारी, मुख्यत्वे श्री. संतोष ह. शिलकर यांनी समर्थपणे संभाळली याबद्दल त्यांचे हार्दिक आभार मानतो. शेवटी मराठी वाचक या पुस्तकाचे स्वागत करतील आणि भारतीय संस्कृती व संस्कृत यांच्याबद्दलचे त्यांचे कुतूहल थोड्या प्रमाणात का होईना या पुस्तकाच्या वाचनाने जागृत होवो ही ,उमेद बाळगतो आणि संस्कृतिनिष्ठांची 'मांदियाळी' तयार होण्याच्या कार्यात गती येवो ही नम्र आकांक्षा व्यक्त करतो.

१४ ऑक्टोबर १९९१

मो. दि. पराडकर

३५९८ २६५१ १५।१०।८२

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | तेजस्वी अपौरुषेय वाङ्मयाचा आपला वारसा | ११ |
| २ | वेदकालीन आर्य - विजयशाली जीवनाचे उद्गाते | १९ |
| ३ | ऋग्वेदातील पराक्रमी इंद्र | ३१ |
| ४ | ऋग्वेदातील परोपकारी आश्विनीकुमार | ३५ |
| ५ | ऋग्वेदातील सरस्वती | ४० |
| ६ | भगवद्गीतेची समन्वयवादी विचारसरणी | ४२ |
| ७ | कविकुलगुरु कालिदास व त्याचा प्रभाव | ४५ |
| ८ | चतुर व गुणशालिनी इंदुमती | ५२ |
| ९ | कालिदासाच्या काव्यातील स्त्री-सृष्टी | ५८ |
| १० | नेतृत्वाचा कालिदासप्रणीत आदर्श | ६६ |
| ११ | भवभूती : व्यक्ती आणि वाङ्मय | ७८ |
| १२ | संस्कृत नाटकांतील विनोद | १०१ |
| १३ | संस्कृत साहित्यातील शृङ्गार | ११५ |
| १४ | संस्कृत साहित्यातील वसन्ततिलका | १२३ |
| १५ | भाष्यकार श्रीशंकराचार्यांची शैली | १२८ |
| १६ | श्री वल्लभचार्यांचा पुष्टिमार्ग व त्याचा हिन्दी कवींवरील प्रभाव | १३२ |
| १७ | हिन्दी भाषेतील भक्तिवाङ्मयाचे स्वरुप | १३७ |
| १८ | मराठा अमदानीतील संस्कृत सारस्वताची साधना | १४९ |
| १९ | विलासमणिमञ्जरी,बुद्धिबळावरील संस्कृत ग्रंथ | १५५ |

२० धर्म आणि शिक्षण १५९
२१ प्राचीन भारतातील मंदिर-विद्यापीठे १६२
२२ प्राचीन भारतातील स्त्री-शिक्षण १६६
२३ संस्कृत आणि विज्ञान १७२
२४ वैज्ञानिक युगात संस्कृतची उपयुक्तता १७६
२५ संस्कृतच्या अध्ययनाची आवश्यकता १८२
२६ संस्कृत नाट्यनिर्मितीच्या प्रयत्नाचे शैक्षणिक व सांस्कृतिक मूल्यमापन १८९
२७ महान वैयाकरणी कै. म. म. काशीनाथशास्त्री अभ्यंकर १९२
२८ एक तत्त्वज्ञ राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन १९८
२९ आजच्या संदर्भात वानप्रस्थाश्रम २०४
३० प्राचीन भारतातील संस्कृती आणि जीवन-समन्वय २०९

# १. तेजस्वी अपौरुषेय वाङ्मयाचा आपला वारसा

भारतीय संस्कृती शाश्वत मूल्यांच्या जपणुकीसाठी जगात प्रसिद्ध आहे. या संस्कृतीची गंगोत्री म्हणजे वेद आणि वैदिक वाङ्मय. 'मानवाचा अथवा आर्य जातीचा अभ्यास करावयचा असेल तर वेदांच्या तोडीचे अन्य साधन नाही असे माझे ठाम मत आहे.' या शब्दांत मॅक्स मुल्लरने वेदांच्या महत्त्वाचे वर्णन केलेले आहे.

वेद हा शब्द विद् म्हणजे जाणणे या धातूपासून तयार झाला, म्हणून याचा धात्वर्थ ज्ञान असा आहे. परंतु भारतीय परंपरेनुसार हे ज्ञान ऋषींना पुस्तके वाचून झालेले नसून प्रतिभेच्या जोरावर त्यांना स्फुरलेले आहे. यात व्यावहारिक ज्ञानापेक्षा साक्षात्काराचा अंश प्रधान असल्यामुळे या वेदांना अपौरुषेय व नित्य मानण्याची परंपरा रूढ झाली. वेद म्हणजे विशिष्ट काळात रचलेला ग्रंथ किंवा ग्रंथसमूह नाही, वस्तुतः ज्याची वाढ होण्यास अनेक शतके लागली असे हे ग्रंथभांडारच आहे. हे ज्ञान पिढ्यानुपिढ्या मौखिक परंपरेने कानामात्रेचा हि फरक न पडता चालत आलेले असल्यामुळे याला 'आगम' किंवा 'श्रुती' असे नांव पडलेले आहे. वेदांच्या उत्पत्तीची हि आठवण बुजल्यामुळे वेद अपौरुषेय म्हणजे ईश्वरनिर्मित आहेत अशी हिंदूंची श्रद्धा आहे. या पवित्र ज्ञानाचे उद्गाते ऋषी या दृष्टीने मंत्रद्रष्टे; व यांच्या चिंतनातून निर्माण झालेल्या सूक्तांना 'मंत्र' असे म्हणतात. ही सूक्ते कवनात्मक असल्यामुळे यांना 'छन्दस्' असे हि नांव आहे.

वैदिक वाङ्मयात ज्या चार प्रकारच्या ग्रंथांचा अंतर्भाव होते ते ग्रंथ म्हणजे १) संहिता - ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद व अथर्ववेद, २) ब्राह्मणे-यांत प्राधान्याने प्रार्थना व यज्ञविधींचा अंतर्भाव होतो, ३) आरण्यके-यांत अरण्यात राहणाऱ्या मुनींचे जीव, ईश्वर व विश्व या संबंधीचे विचार ग्रथित झालेले आहेत व ४) उपनिषदे-यांत भारतीयांचे प्राचीनतम तत्त्वज्ञान संग्रहीत केलेले आढळते. यापैकी बरेचसे ग्रंथ कालोदरांत नष्ट झालेले आहेत; फार थोडे आजमितीस उपलब्ध आहेत.

**ऋग्वेद**

ऋग्वेदसंहिता हा वैदिक वाङ्मयातील प्राचीनतम अंश. यात वैदिक देवतांना उद्देशून म्हटलेल्या १०५२२ ऋचांचा १०२८ सूक्तांत संग्रह केलेला आहे. ही सूक्ते एकूण १० मंडलात विभागलेली आहेत. या मंडलापैकी दोन ते सात मंडले सगळ्यात जुनी असून प्रत्येक मंडल एकेका ऋषि परंपरेतील आहे. गृत्समद, विश्वामित्र, वामदेव, अत्री, भारद्वाज व वसिष्ठ हे ऋषि किंवा त्याच्या परंपरेतील व्यक्तींना या सूक्तांचे द्रष्टे म्हटले पाहिजे. ही गोत्रमंडले म्हणून ओळखली जातात.

आठव्या मंडलात कण्व व आंगिरस कुळांतील लोकांना स्फुरलेली सूक्ते आहेत व नववे 'सोम' देवतेला उद्देशून मंडल 'पवमान' या नावाने प्रसिद्ध आहे. पहिले व दहावे मंडल ही दोन्ही भाषा व कल्पना यांच्या दृष्टीने नंतरच्या काळातील असावीत असे दिसते. ऋग्वेदातील सूक्तांच्या विषयांची विविधता वाखाणण्यासारखी आहे. पर्जन्यसूक्तांतील निसर्गवर्णन, उषासूक्तांतील भावपूर्ण काव्य, संवादसूक्तांतील यम-यमी व पुरूरवा-उर्वशी यांची संभाषणे, अक्षसूक्तातील जुगाऱ्याचे आत्मनिवेदन, वरूणसूक्तांत व्यक्त झालेली आदरयुक्त भीति वगैरे लक्षणीय गोष्टींबरोबर पहिल्या मंडलातील विश्वेदेव सूक्त (१-१६४), पुरुषसूक्त (१०-९०) हिरण्यगर्भसूक्त (१०-१२१) यांसारख्या सूक्तांत वैदिक तत्त्वज्ञानाचे मनोज्ञ दर्शन होते.

**सामवेद**

सामवेदात यज्ञाच्या वेळी गावयाच्या ऋचांचा संग्रह केलेला आहे. या वेदाच्या सुमारे ७५ ऋचा वगळून बाकीच्या सर्व ऋचा ऋग्वेदांतल्या च आहेत. सामवेदांतील अर्चिकात ४८५ रागांचा व उत्तरार्चिकांत ४०० गानांचा संग्रह आहे. गाण्याचे राग शिकवणे हा सामवेदाचा हेतू असल्यामुळे हा वेद म्हणजे भारतीयांच्या सप्तसुरात्मक संगीताची गंगोत्री आहे. हा वेद गाताना हाताच्या व बोटांच्या चलनाने निरनिराळ्या स्वरांवर जोर देण्याची पद्धती आहे. अभिचारकर्मात हि सामांचा उपयोग करीत असत त्यामुळे स्मृतिग्रंथ सामघोषाला कमी दर्जाचा मानतात.

**यजुर्वेद**

यजुर्वेद म्हणजे यज्ञाच्या वेळी म्हणावयाच्या मंत्रांचा (यजुस्) संग्रह. शुक्ल यजुर्वेदात फक्त मंत्रांचा संग्रह आहे. परंतु कृष्ण यजुर्वेदांत मंत्र व गद्यात्मक विवेचन यांचे मिश्रण झालेले दिसते. शुक्ल यजुर्वेदाच्या चाळीस अध्यायात दर्शापूर्णमासासारखे यज्ञ, सूत्ररूप प्रार्थना, अभिचार मंत्र, ब्रह्मोद्ये, रुद्राची व अक्षराची उपासना हे विषय आलेले आहेत. यांतच शेवटी ईशोपनिषदाचा समावेश होतो. कृष्ण यजुर्वेदात यज्ञविधीला व पुरोहितवर्गाला फार महत्त्व आल्याचे स्पष्ट दिसते. राजूसय, अश्वमेध यांसारख्या राजकीय जीवनावर प्रकाश टाकणाऱ्या यज्ञांबरोबर पुरुषमेधासारख्या रानटी प्रथेचे दर्शन घडवणाऱ्या यज्ञाचे हि वर्णन आढळते. यजुर्वेद आजच्या वाङमयाच्या विद्यार्थ्याला नीरस वाटेल हे खरे. परंतु प्रार्थना पद्धतीचा आरंभ व विकास, धर्म व त्याची वाढ आणि संस्कृत गद्याचा प्रारंभ या दृष्टीने यजुर्वेदाचे महत्त्व डावलता येणार नाही.

**अथर्ववेद**

अथर्ववेदात दोन प्रकारचे मंत्र आहेत - आथवर्ण व आंगिरस. आथर्वण शुभप्रद आहेत तर आंगिरस घोर व पीडादायक म्हणजेच जारणमारणासारख्या अभिचारकर्मात उपयोगी ठरणारे. या गुणांमुळे च की काय, अथर्ववेदाचा १/३ भाग ऋग्वेदातून घेतलेला असला तरी या वेदाला पवित्र धर्मग्रंथांत लवकर स्थान मिळू शकले नाही. इष्टपूर्तीबरोबरच अनिष्ट-निवारण व शत्रुपीडा हे हि अथर्ववेदातील मंत्राचे विषय. ऋग्वेद हा सुसंस्कृत व उच्चभ्रू लोकांचा वेद मानला तर तुलनेने अथर्ववेद अशिक्षित व निम्न वर्गात मोडणाऱ्या लोकांचा वेद म्हणावा लागेल. असंस्कृत समाजातील भोळ्या समजुती व अंधश्रद्धा, त्यांच्यात आढळणारा शत्रूबद्दलचा प्रखर द्वेष, सुखाचे जबरदस्त आकर्षण यांचे सुंदर चित्रण करणारा हा वेद सामान्य माणसाला अधिक आकर्षक वाटेल यात शंका नाही. या वेदांतील रोगनिवारक सूक्तांत आयुर्वेदाचे, काम, स्मर यांसारख्या देवतांना उद्देशून लिहिलेल्या मंत्रात कामशास्त्राचे व राजाच्या निवडीच्या, राज्यभिषेकाच्या विधीत आणि युद्धांत जय मिळविण्याच्या मंत्रात अर्थशास्त्राचे मूळ आढळते.

**ब्राह्मण ग्रंथ - प्राचीन गद्य वाङ्मय**

संहितांच्या या काळानंतर हळूहळू वेदांतील मंत्राचा अर्थ अस्पष्ट होत चालला , यज्ञाची परंपरा खंडित होण्याची भीति निर्माण झाली. म्हणूनच मंत्र व त्यांचा यज्ञकर्मातील विनियोग स्पष्ट करण्याच्या गरजेतून विविध ऋषीनी जे ग्रंथ निर्माण केले त्यांना च ब्राह्मणग्रंथ म्हणतात. यांना यज्ञशास्त्रावरील ग्रंथ म्हणण्यास हरकत नाही. व्युत्पत्तीच करावयाची झाली तर ब्रह्म म्हणजे प्रार्थनेचे मंत्र व या मंत्रांच्या विनियोगाविषयी तज्ज मंडळींनी केलेले विवेचन किंवा दिलेले निर्णय म्हणजे 'ब्राह्मण' (नपुं) असे म्हटले पाहिजे. प्रत्येक वेदाच्या 'ब्राह्मणां' त त्या उद्गात्याने, यजुर्वेदाच्या अध्वर्यूने व अथर्ववेदाच्या ब्रह्म्याने आपल्याला कर्मकांडातील कर्तव्यांचा उहापोह केलेला आहे. ऋग्वेदाच्या चार शाखा - शाकल, ऐतरेय, बाष्कल व कौषीतकि, कृष्ण यजुर्वेदाच्या पांच शाखा काठक, तैत्तिरीय, मैत्रायणी, कपिष्ठलकठ, श्वेताश्वतर व शुक्लयजुर्वेदाच्या दोन - माध्यन्दिन व शुक्ल. सामवेदाच्या शाखा तीन - कौथुम (किंवा ताण्डिन्), राणायनीय व जैमिनीय (तलवकार) आणि अथर्ववेदाच्या दोन - शौनक व पिप्पलाद. या सर्व शाखांची ब्राह्मणे पूर्वी अस्तित्वात असली पाहिजेत. परंतु ब्राह्मणांचेच अंश. हे बृहदारण्यकोपनिषद् या नावावरून दिसून येते. बृहदारण्यक हा शुक्ल यजुर्वेदान्या माध्यन्दिन शाखेच्या शतपथ ब्राह्मणाचा भाग व याच्याच शेवटी बृहदारण्यकोपनिषद जोडलेले आहे. आज उपलब्ध असलेल्या ब्राह्मणग्रंथात ऋग्वेदाचे ऐतरेय व कौषीतकि (शाङ्खायन), सामवेदाचे तांड्य षड्विंश व

जैमिनीय, कृष्णयजुर्वेदाचे तैत्तिरीय, शुक्लयजुर्वेदाचे शतपथ व अथर्ववेदाचे गोभिल हे ब्राह्मणग्रंथ प्रसिद्ध आहेत. या सर्वात यज्ञविधी सांगून स्तुती व निंदा यांच्या साहाय्याने यांची प्ररोचना केलेली असते. यांना अर्थवाद असे नाव आहे. अर्थवादामध्ये इतिहास, आख्यान पुराण, गाथा वगैरेंचा भरपूर उपयोग केलेला असतो.

यज्ञाशी च संबंध असल्यामुळे या ग्रंथांची विचारसारणी प्रतीकात्मक, काहीशी गूढ व म्हणून च आजच्या अभ्यासकाला रूक्ष व कंटाळवाणी वाटावी यात नवल नाही. वरवर पहाता अत्यंत भिन्न असलेल्या वस्तूंचा बादरायण (?) संबंध लावून त्यांतून विचाराची सुसूत्रता व तत्त्वज्ञान निर्माण करण्याचा ब्राह्मणग्रंथातील प्रयत्न हास्यास्पद वाटला तरी यांतच विश्वाच्या मूलभूत ऐक्याचा महान विचार दडलेला आहे हे जर्मन तत्त्वज्ञ लायबेनिझच्या There are no two things in this Universe that are not connected या उद्‌गारांवरून दिसून येते. सर्व ब्राह्मणे बह्वंशी गद्यात्मक असल्यामुळे प्राचीनतम गद्य वाङ्मयाची म्हणजे संस्कृत गद्यलेखनाच्या शैलीची निदर्शक म्हणून या ब्राह्मणांचे महत्त्व आहेच.

**प्राचीन कथा**

शिवाय यज्ञनियमांच्या समर्थनार्थ का होईना, या ग्रंथांत काही ठिकाणी जगाच्या उत्पतीसंबंधी ज्या कथा आलेल्या आहेत. त्यावरून तत्कालीन मानसशास्त्राचे, नीतिशास्त्राचे व तत्त्वज्ञानाचे विचार कळतात. इतकेच नव्हे तर या ग्रंथात मधूनमधून आलेल्या देवासुरांच्या कथा, पुरूरवा-उर्वशी यांच्या प्रेमाची पौराणिक कथा, मनू आणि प्रलय, प्रजापतीचे मत्स्य व वराह अवतार यांची शतपथ ब्राह्मणांत आलेली कथा पाहिल्या म्हणजे या कथा मुळात कशा होत्या, नंतरच्या पुराण, रामायण, महाभारत व संस्कृत काव्य-नाटके यांच्यात या कशा विकसित होत गेल्या हे पाहणे पुराणकथांच्या चिकित्सक अभ्यासकाला फार मोलाचे ठरल्यावाचून रहात नाही. ऐतरेय ब्राह्मणांत आलेली शुनःशेपाची कथा त्यांतील नरबलीच्या उल्लेखामुळे समाजेतिहासाच्या तपशीलावर महत्त्वाचा प्रकाश टाकणारी ठरते. या कथेत यूपाला बांधलेल्या शुनःशेपाला मारण्यास कोणीच पुढे येईना यावरून नरबलीची प्रथा वेदकाळात त्याज्य मानली गेली असे अनुमान करता येते. यज्ञाचे नियम का केले हे सांगताना या ग्रंथाचे लेखक उच्चारशास्त्र, व्याकरण, ज्योतिष इत्यादि शास्त्रांचे मूलभूत सिद्धांत सांगतात व आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ शब्दांच्या काही शास्त्रीय व्युत्पत्त्या देऊन व्युत्पत्तिशास्त्राचा हि पाया घालतात हे विसरून चालणार नाही. शेवटी वेदसंहितांवरील सर्वात जुने टीकाग्रंथ म्हणून भाषाशास्त्राच्या (Philology) दृष्टीने यांचे महत्व नाकारता येणार नाही.

३५५८
२६५१० नि.वह
१७।७।८०

## चिंतनपर आरण्यके

ब्राह्मणग्रंथात यज्ञविषयक गूढरंजनाने कळस गाठला. याची परिणती तत्त्वचिंतनात व्हावी हे स्वाभाविक च नव्हे का ? प्रत्येक गोष्टीचा, प्राधान्याने, यज्ञांतील प्रत्येक क्रियेचा विचार आधिदैविक, आधिभौतिक व आध्यामिक पातळीवरून करण्याची जी प्रवृत्ती ब्राह्मणग्रंथात आढळते त्यामधून अध्यात्मविद्येचा म्हणजेच तत्त्वान्वेषणाचा जन्म झाला. सहाजिकच यज्ञांचे मूलस्वरूप, त्यांचा गूढ अर्थ व त्यांच्या मुळाशी असलेले तत्त्वज्ञान यांचा विचार यज्ञसंस्थेच्या व्यापापासून दूर म्हणजे प्रशान्त अशा अरण्यात करणे सोयीचे होते. असा बुद्धिनिष्ठ व तर्कप्रधान विचार मांडणारे ग्रंथ म्हणजेच आरण्यके. यज्ञसंस्थेच्या विकासाच्या पार्श्वभूमीवर च आरण्यकांची निर्मिती होऊ शकली व आध्यात्मिक विचारमंथनाचा आरंभ झाला. प्रत्येक शाखेचे आरण्यक असले पाहिजे परंतु यांपैकी ऋग्वेदाच्या दोन शाखांची ऐतरेय व शाङ्खायन व शुक्ल यजुर्वेदाच्या दोन्ही शाखांच्या शतपथ ब्राह्मणाचे बृहदारण्यक एवढीच आरण्यके आज उपलब्ध आहेत.

## उपनिषदांतील विचारधन

आरण्यकांनी सुरू केलेल्या विचारमंथनाचे, मननिदिध्यासाचे अपूर्व फळ म्हणजे च उपनिषदांतील आध्यात्मिक ज्ञान. उप+नि+सद् या धातूचा अर्थ 'जवळ बसणे' असा आहे. गूढ ज्ञानाची दीक्षा घेण्यासाठी जिज्ञासू छात्रांनी गुरूंजवळ बसून ज्ञानाचा जो संग्रह केला तोच उपनिषदांत ग्रथित झाला. वेदांचे स्पष्टीकरण करणाऱ्या ब्राह्मणग्रंथांच्या शेवटी उपनिषदे येतात म्हणून त्यांना 'वेदांत' ही अन्वर्थक संज्ञा. वैदिक ज्ञानाचा अंतिम निष्कर्ष या उपनिषदांत आढळतो म्हणून हि 'वेदान्त' हे नांव सार्थ म्हणण्यास हरकत नाही. औपनिषद ज्ञानाने जन्ममृत्यूच्या बंधनातून सुटका होते म्हणून 'उपनिषद्' हे नांव योग्य असे शंकराचार्यांचे मत आहे. उपनिषदांच्या संख्येसंबंधाने मतभेद बरेच आहेत. वेबरने २३५ उपनिषदे असावीत असे म्हटले तर पं. साधल्येशास्त्र्यांनी संपादित केलेल्या उपनिषद्-महावाक्य कोशाच्या दोन भागात २३९ उपनिषदांतील अवतरणे आलेली आहेत. मुक्तिकोपनिषदांत १०८ उपनिषदांची नावे आलेली आहेत. शहाजहांचा वडील मुलगा दारा शिकोह याने सन १६५६-५७ मध्ये ५० उपनिषदांचा अरेबिक भाषेत अनुवाद करवला होता. कोलब्रुक या पाश्चिमात्य पंडिताच्या संग्रहात ५२ उपनिषदे होती. श्रीशंकराचार्यांनी ईश, केन, कठ, प्रश्न, मुण्ड, मण्डूक्य, तैत्तिरीय, ऐतरेय, छान्दोग्य व बृहदारण्यक या परंपरागत १० उपनिषदांशिवाय श्वेताश्वतरावर भाष्य लिहिले व महानारायण ईश, बैंगल व केन उपनिषदांतली अवतरणे आपल्या शारीरकभाष्यात घेतली. भारताचे राष्ट्रपती डॉ.

राधाकृष्णन् यांनी उपर्युक्त चौदा उपनिषदांत मैत्री, सुबाल, कैवल्य व वज्रसूचिका या चारांची भर घालून १८ प्रमुख उपनिषदांची आवृत्ती मूळ इंग्रजी अनुवाद, टीपा व विवेचक प्रस्तावना यांसह छापली. या उपनिषदांखेरीज राहिलेली सर्व उपनिषदे वस्तुतः अर्वाचीन म्हणजे पंधराव्या-सोळाव्या शतकांत तयार झालेली असून त्यांत तत्त्वचिंतनापेक्षा विशिष्ट संप्रदायाच्या आचार-विचारांचे विवेचन आहे. यापैकी काही भक्त्युपनिषदे तर काही योग, सन्यास व वेदांत पर उपनिषदे आहेत.

प्राचीन उपनिषदांचा काळ विद्वानांच्या मते ख्रिस्तपूर्व १२०० ते ६०० असा ठरतो. या उपनिषदांचे आरुणि, याज्ञवल्क्य, सुयुग्वा रैक्क, प्रवाहण जैवलि, श्वेतकेतू, बालाकि, शाण्डिल्य, जनक वगैरे प्रक्त्ते 'ब्रह्मविद्येचा सुकाळु' करणारे तत्त्वज्ञ द्रष्टे होते. यांनी विश्व व जीव यांच्या अंतिम स्वरूपाचे अन्वेषण करून ब्रह्मन् व आत्मन् या दोन तत्त्वांचे मुलभूत ऐक्य प्रतिपादले व हा साक्षात्कार म्हणजेच मानवी जीवनाचे परमोच्च ध्येय Summum Bonum हा सिध्दांत हिरीरीने मांडला. 'तत्त्वमसि' हा औपनिषद तत्त्वज्ञानाचा गाभा आहे. या शिवाय नीतिशाास्त्र, मानसशास्त्र, कर्मसिद्धांत, पुनर्जन्म, एकत्व, नानात्व या विषयांबरोबर सत्य, ब्रह्मचर्य, दान वगैरे आवश्यक असणाऱ्या गुणांचे साधार, सोपपत्तिक व सोदाहरण विवेचन करून भारतीय तत्त्वज्ञानाची बैठक घालून दिली व ती हि साध्या, सुबोध परंतु काव्यमय व जिव्हाळ्याच्या भाषेत ! छान्दोग्योपषिदा (३.१.२) मधील मूळ संस्कृतचा मराठी अनुवाद देखील गद्य काव्याचा उत्कृष्ट नमुना आहे. त्याचा काही अंश असा 'अंतरिक्ष हे मधमाशांचे मोहोळ असून ते स्वर्गाच्या भरभक्कम तुळईच्या आधाराने लोंबकळत आहे. सूर्य हा मोहोळातील देवांसाठी साठवलेला मध होय. पूर्वपश्चिम, दक्षिणोत्तर, वरखाली वगैरे सर्व दिशोपदिशांत फाकणारे सूर्याचे किरण हे या मोहोळाच्या निरनिराळ्या दिशांस असलेल्या मधुनाड्या आहेत. चार वेद ही फुले असून त्यांतील ऋगादि मंत्र म्हणजे जागोजागी खपणाऱ्या मधुमाशा होत.' (संस्कृत वेचे - संपादक डॉ. द. गं. कोपरकर व प्रा. रा. ना. गद्रे पृ. ४९). शुद्ध व मत्सरापासून सर्वस्वी अलिप्त अशा ज्ञानोपासनेचे व्रत औपनिषद ऋषींनी स्वीकारले असल्याची साक्ष पटल्यामुळे सुप्रसिद्ध जर्मन तत्त्वज्ञ शौपेनहोवरने उपनिषदांबद्दल मोठ्या कृतज्ञतेने "In the whole world, there is no study, except that of the originals, so beneficial and so elevating as that of the Oupanishat. It has been the solace of my life, it will be the solace of my death."

**भारतीयांचे जीवनविषयक तत्त्वज्ञान**

भारतीयांच्या अपौरुषेय वाङ्मयाचा हा संक्षिप्त आढावा. या वाङ्मयात व्यक्त

होणाऱ्या युयुत्सू आर्यांच्या तेजस्वी दृष्टिकोणाची यथार्थ कल्पना दिल्यावाचून पूर्ण होऊ शकत नाही. भारतीय संस्कृती परलोकाची चिंता करते, ऐहिक उत्कर्षाची तिला परवा नाही, 'सर्वंकषा भगवती भवितव्यतैव' असे मानून प्रयत्नवादाकडे ती पाठ फिरवते वगैरे आक्षेपांना चपखल उत्तर देण्याची शक्ती या वाङ्‌मयात आहे हे लक्षात घेणे आवश्यक आहे. पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे या अपौरुषेय साहित्यांत नैराश्यवादाला मुळीच स्थान नाही. उलट रसरशीत जीवन जगण्याची दुर्दम्य आकांक्षा आहे. जगाला क्रियाभिमुख करणाऱ्या सूर्यनारायणाकडे पाहून वैदिक ऋषि 'पश्येम शरदः शतम् । जीवेम शरदः शतम् । प्रब्रवाम शरदः शतम् । अदीनाः स्याम शरदः शतम् । भूयश्च शरदः शतात् ।' अशी प्रार्थना करतो. हे जगणे 'काकोऽपि जीवति चिराय बलिं च भुङ्क्ते' या चालीवर नाही; 'ऊर्वोरोजो जंघयोर्जवः पादयोः प्रतिष्ठा अरिष्टानि मे सर्वात्मा निभृष्टः' या पद्धतीचे आहे हे अथर्ववेदाच्या दहाव्या कांडातील या सूक्तांवरून स्पष्ट होते. 'विश्वानि द्रविणानि धेहि, (सर्व प्रकारची संपत्ती दे) 'नित्यस्य रायः पतयः स्याम' (आम्ही नित्य संपत्तीचे अधिकारी व्हावे), 'बृहद् वदेम विदथे सुवीराः (आमचे पुत्र वाणीने यज्ञ गाजवोत) अशी प्रार्थना करणाऱ्या आर्यांनी रोगराई, कवडीचुंबकपणा व दारिद्र्य यांना वैरी मानावे हे स्वाभाविक च आहे. 'याचि देही याचि डोळा' स्वर्गीय सुखे मिळू शकतात अशी त्यांची श्रद्धा असल्यामुळे त्यांना कवीच्या वाणीत सर्व देवतांच्या निवासाचे विलोभनीय चित्र रंगविता आले.

पराक्रमाच्या जोरावर सुखप्राप्तीची आकांक्षा हे त्यांचे दुसरे वैशिष्ट्य च. 'न ऋते श्रान्तस्य सख्याय देवाः' हा त्यांचा आवडता सिद्धांत. ऐतरेय ब्राह्मणांत इंद्र रोहिताला-

चरन् वै मधु विंदति चरन् स्वादुमदुम्बरम् ।
सूर्यस्य पश्य श्रेमाणं यो न तंद्रयते चरन् ।।

या शब्दांत अविश्रांत श्रमाची च महती सांगतो. असा दृष्टिकोण असणाऱ्या वैदिकांनी समृद्धीचे सुवर्णयुग त्या काळी निर्माण केले होते हे दानस्तुतीतील अपार समृद्धीच्या खाजगी संपत्तीच्या व 'दशो हिरण्यपिण्डान् दिवोदासादसानिषम् ।' या सारख्या नाण्यांचे दान करण्याच्या उल्लेखांवरून दिसून येते.

भौतिक साधने प्राप्त करून हे विजयी वीर थांबले नव्हते. त्यांची मोजण्याची कला व गणित या शास्त्रांत शून्य व आनन्त्य या कल्पना हि शोधून काढल्या होत्या याची प्रमाणे गोपथ ब्राह्मणात व बृहदारण्यकोपनिषदांत आढळतात. ऋग्वेदापासून अथर्ववेदापर्यंत वैद्यकशास्त्राची परंपरा अविच्छिन्नपणे चालू असलेली आढळते. ब्राह्मणग्रंथातील विकसित यज्ञसंस्थेच्या परिसरात निरनिराळ्या शास्त्रांची कशी उभारणी झाली हे स्पष्ट झालेले च आहे. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात

उपनिषदांनी जी प्रगती केली ती वैदिक आर्यांनी साधलेल्या ऐहिक उत्कर्षाच्या पार्श्वभूमीवर च खुलून दिसते. वेद व ब्राह्मण यांच्या काळात वैदिकांनी शत्रूंवर व आपत्तींवर पराक्रमाने मात केली. अपार धनसंचय केला; हे करता करता 'नार्यमणं पुष्यति नो सखायं केवलाघो भवति केवलादी' याची जाणीव ठेवली व उपनिषदांच्या काळात विश्वाला कवेत सामावू पहाणारे 'एकेन विज्ञातेन सर्वमिदं विज्ञातं भवति' हे तत्त्वज्ञानाचे शिखर गाठले. सामर्थ्याची निष्ठेने जोपासना करून त्यावर विवेकाचा अंकुश ठेवण्याची सुसंस्कृत मानवाला शोभणारी जिद्द बाळगली हे प्रशंसनीय नाही असे कोण म्हणू शकेल ? अशा तेजस्वी अपौरुषेय वाङमयाचा वारसा आम्हाला लाभला असताना 'भूगोल हा उलथिता मज नाहि वेळू' या श्रद्धेने प्रेरित होऊन 'सर्वाः प्रदिशः जयेम' ही आकांक्षा बाळगणे हेच आमचे कर्तव्य नव्हे का ?

[ संस्कृत भाषा प्रसारिणी सभा, ठाणे विशेषाङ्क १९७४ ]

# २. वेदकालीन आर्य- विजयशाली जीवनाचे उद्‌गाते

भारतीय संस्कृति भोगापेक्षा त्यागाला च महत्त्व देणारी आहे; इहलोकांतील सुखापेक्षा परलोकांत प्राप्त होणाऱ्या कल्पित ऐश्वर्याचीच तिला जास्त काळजी वाटते. भारतीय संस्कृतीच्या छत्रछायेखाली वावरणारा हिन्दुधर्म हि साहजिकच नैराश्यवादाने पछाडलेला आहे; जगाकडे व जीवनाकडे पहाण्याची त्याची दृष्टी 'सर्वं दुःखं सर्वं क्षणिकं' या स्वरूपाची असल्यामुळे ऐहिक सुखोपभोग किंवा भौतिक उत्कर्ष यांना या देशात हिणकस ठरवण्याची परंपरा निर्माण झाली व त्यामुळे आम्ही भारतीय मागासलो; आमची अवनती झाली व आज हि आम्ही प्राधान्याने परलोकाचाच विचार करीत असल्यामुळे आमचा अत्कर्ष होत नाही अशी बहुसंख्य लोकांची धारणा आहे. यांतील सत्यांश जरी मान्य केला तरी त्यागवादी संस्कृति हे त्याचे कारण नसून त्यात शिरलेल्या विकृती च या दृष्टिकोणाला जबाबदार आहेत हे ध्यानात ठेवणे योग्य होईल.

स्वातंत्र्याच्या प्राप्तीबरोबर आज आमच्यापुढे राष्ट्रनिर्मितीचा प्रश्न उभा आहे. भारताची सर्वाङ्गीण प्रगति हेच आमचे ध्येय आहे. या दृष्टीने वेदकालीन भारतीय संस्कृतीच्या विकासांत पुढे निर्माण झालेल्या विकृती काढून टाकून तिचे मूळ, शुद्ध रूप लक्षांत घेणे लाभदायी ठरेल.

**वेदकालाची व्याप्ति**

वेदांचा काल म्हणजे फक्त चार वेदांच्या संहिता ज्या काळांत निर्माण झाल्या तो नव्हे. वेदकालीन या शब्दसंहतीचा अर्थ समजण्यासाठी संहितांच्या कालाबरोबर च ब्राह्मणे, आरण्यके व उपनिषदे यांचा हि अन्तर्भाव करणे आवश्यक आहे. वेदापासून उपनिषदांच्या निर्मितीपर्यंतचा काळ म्हणजे वैदिक काल असे समीकरण मांडले व मग वेदकालीन आर्यांच्या जीवनाचा साकल्याने शोध घेतला म्हणजे त्यांच्या समग्र जीवनाचे व दृष्टिकोणाचे रहस्य उलगडणे सोपे जाईल; त्यांच्या 'अस्मिते'ची खरी ओळख करून घेता येईल. या अस्मितेच्या प्रकाशात भारताच्या नव्या जीवन-मंदिराची उभारणी करणे सहज शक्य आहे; किंबहुना तसे करणेच औचित्याला धरून होईल असा विश्वास वाटतो.

**नैराश्यवादाचा पूर्ण अभाव**

वेदवाङ्मयांत सहज डोकावून पाहिले तरी वैदिकांच्या तेजस्वी जीवनदानाचा साक्षात्कार होतो. हिंदुधर्माची ज्या नैराश्यवादाशी सांगड घालण्यात येते त्याचा मागमूस हि वेदांत आढळत नाही. वैदिकांना रसरशीत जीवन जगण्याची अनिवार इच्छा आहे; दीर्घायुष्याची ते प्रार्थना करीत असतात. 'मरणं प्रकृतिः शरीरिणां विकृतिर्जीवितमुच्यते बुधैः' अशा स्वरूपाचे तत्त्वज्ञान त्यांनी कधीच बाळगले

नाही. संपूर्ण जगाला जागृत करणाऱ्या सूर्यनारायणाकडे पाहून ऋग्वेदीय ऋषि म्हणतो -

**''तच्चक्षुर्देवहितं शुक्रमुच्चरत् ।**
**पश्येम शरदः शतम्,**
**जीवेम शरदः शतम् ।।**

'देवाचे हित करणारे हे तेज आमच्यासमोर प्रगट झालेले आहे; आम्ही हे शंभर वर्षे पाहावे; आम्ही शंभर वर्षे जगावे.'' हीच कल्पना शुक्ल यजुर्वेदांत हि (३६-२४) एका ठिकाणी अत्यंत जोरदार शब्दांत व्यक्त झालेली आहे.

या उताऱ्यातील 'प्रब्रवाम शरदः शतम्' व 'अदीनाः स्याम शरदः शतम्' या ओळींकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. पहिल्या ओळीतील आशय लोकशाहीच्या जमान्यात फारच महत्त्वाचा आहे. वाणीवरील प्रभुत्व, आर्जवीपणा, स्वतःची बाजू प्रभावीपणे मांडणे वगैरे सर्व गुणांचा अंतर्भाव 'प्रकर्षेण ब्रवाम' किंवा 'प्रकृष्टं तथा स्यात् तथा ब्रवाम' या शब्दांत होतो. भारताचे राजदूत भारताची बाजू व्यवस्थितपणे व परिणामकारकपणे मांडू शकत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. यामुळेच ऐनवेळी भारताला मित्र उरत नाहीत याचा अनुभव आम्हाला आलेला नाही का ?

'अदीनाः स्याम' मध्ये कसे जगावे याला उत्तर आहे. कसे तरी, कण्हत कुंथत शंभर वर्षे जगण्याची त्यांना इच्छा नाही. दीनवाणे जिणे त्यांना नको; समर्थपणे जगण्याची त्यांची अभिलाषा आहे. हाच विचार अधिक स्पष्टपणे मांडताना अथर्ववेदाच्या १९ व्या कांडांतील ६० ते ६३ या सूत्रात 'वाङ्मे आसन्नसोः प्राणश्चक्षुरक्ष्णोः श्रोत्रं कर्णयोः ! अपलिताः केशाः अशोणा दन्ता बहु बाह्वोबर्लम् । '' व ''ऊर्वोरोजो जंघयोर्जवः पादयोः प्रतिष्ठा अरिष्टानी मे सर्वात्मा निभृष्टः ।।'' म्हणजे 'आमच्या तोंडात वाक्शक्ती, श्वासोच्छ्वासांत प्राणशक्ती, डोळ्यात नेत्रशक्ती व कानाच्या ठिकाणी श्रीत्रन्द्रिय अखंड कार्यकारी असावे, केस कधी हि पिकू नयेत, दांत कधी हलू नयेत. बाहूंच्या ठिकाणी अपार सामर्थ्य असावे. हृदयात उत्साहपूर्वक तेज असावे; मांड्यांत वेग व पावलात स्थिरता असावी. आमचे सर्व अवयव सुदृढ असावेत व कोणत्या हि प्रकारच्या दुर्बलतेचा आम्हाला स्पर्श न व्हावा' अशी मनोमन प्रार्थना केलेली आहे. तैत्तिरीयारण्यकांत 'आम्ही विजयी म्हणूनच शंभर वर्षे जगावे' अशी वीरत्वाला साजेशी अभिलाषा व्यक्त झालेली आहे. चाळिशी उलटल्याबरोबर आमचे पन्नास गेले पांच राहिले असे म्हणणाऱ्या आधुनिक भारतीयांनी वेदकालीन आर्यांचे हे उद्गार ठेवण्यासारखे आहेत.

ज्या वैदिक आर्यांनी दैन्याला हद्दपार करण्याची आकांक्षा धरली त्यांनी ऐश्वर्यसंपन्न व सुखी संसाराची मागणी करावी यात नवल कसले ? सर्वात प्राचीन गणल्या गेलेल्या ऋग्वेदात देवतांची स्तुती करणाऱ्या ऋचाच जास्त आहेत व त्या सर्वात आर्यांचे यासंबंधीचे उद्गार लक्षणीय आहेत. वैदिक ऋषी म्हणतात, 'अस्मभ्यं शर्म यच्छतम्' 'आम्हाला सुख द्या' 'विश्वानि द्रविणानि धेहि' म्हणजे 'सर्व प्रकारची संपत्ति द्या.' अग्नीची प्रार्थना करताना एक ऋषी म्हणतो, ''आ नो अग्ने सुचेतुना रयि विश्वायुपोषसम् । मार्डीकं धेहि जीवसे ।'' ''आमची जीवन यात्रा सुव्यस्थित चालावी म्हणून आम्हाला आयुष्यभर पुरेल अशी संपत्ति दे.'' ''उरू क्षयाय नः कृधि'' (आमच्या घरादाराची भरभराट कर), 'अस्मे धेहि श्रवो बृहत्' (आम्हाला मोठी कीर्ति मिळू दे), 'नित्यस्य रायः पतयः स्याम' (आम्ही नित्य संपत्तीचे धनी व्हावे असे तू कर), 'प्रजाभिरग्नेरमृतत्वमश्याम्' (प्रजेच्या म्हणजे संततीच्या रूपाने आम्ही अमर व्हावे) 'नः पशुमान् अस्तु गातुः' (आमचा मार्ग पशू म्हणजे खिल्लारांनी युक्त असावा), ''रयिं देहि सहस्त्रिणं अग्ने वीरवती मिषम्' हजारांनी संपत्ती आणि बलवर्धक अन्न आम्हाला दे) सारख्या प्रार्थना ऋग्वेदात पानापानावर आढळून येतात. 'बृहद् वदेम विदथे सुवीराः' ही प्रार्थना मरगळलेल्या, निराश झालेल्या लोकांना स्फुरणे शक्य नाही. 'वीरपुत्रांनी युक्त होऊन आम्ही यज्ञ गाजवावे' असा या तेजस्वी प्रार्थनेचा आशय आहे. यज्ञ म्हणजे तत्कालीन समाजाचे मिलन-स्थान होते. आज विदथ म्हणजे विधानसभा, लोकसभा, राज्यसभा किंवा यूनोच्या बैठकी असे का समजू नये ? या सभा गाजविण्यासाठी आम्हाला भारताचे सुपुत्र हवेत हा या प्रार्थनेचा कालानुरूप आशय सर्वथैव योग्य आहे यात शंका नाही.

## रोगराई व दारिद्य यांपासून संरक्षण

अशा प्रकारे सर्वार्थाने संपन्न जीवन जगू इच्छिणाऱ्या वैदिकांनी आपल्याला काय नको हे हि स्पष्ट केलेले आहे. ऋग्वेदातील एक ऋषी कावीळ व हृद्रोग यांपासून वाचविण्याची प्रार्थना करताना म्हणतो, 'हृद्रोगं मम सूर्य हरिमाणं च नाशय ।' तर दुसरा ऋषि 'अपत्यं परिपन्थिनं मुषीवाणं हुरश्चितम्' असे उद्गार काढून वाटमारे, चोर व कपटी लोकांपासून संरक्षण मागतो. दरिद्रतेचा तर वैदिक आर्यांना मनस्वी तिटकारा वाटत होता असे दिसते. दरिद्र्याला ते अत्यंत कुरूप समजतात व तिला मुकाट्याने दूर पर्वतावर निघून जा असे सांगतात. 'अरायि काणे विकटे गिरिं गच्छ सदान्वे' हेच त्यांचे म्हणणे आणि जर तसे न झाले तर आम्ही तुझा पराक्रमाने बीमोड करू हा विश्वास हि त्यांच्याजवळ आहे. दरिद्री माणसाप्रमाणेच धूर्त कवडीचुंबक हा हि त्यांचा वैरी. म्हणून 'पाहि धूर्तेरराव्णः' म्हणजे आमचे कवडीचुंबकापासून रक्षण कर अशी देवतेला त्यांनी विनंती केली

आहे.

## पृथ्वीवरच स्वर्गाचा साक्षात्कार

वरील सर्व उद्‌गारांवरून ऐहिक संपत्ति, ऐश्वर्य व समृद्ध जीवन जगण्याची दुर्दम्य आकांक्षा वेदकालीन आर्यांनी बाळगली होती हे सहज सिध्द होते. नद्यांच्या निर्मळ जलात त्याना पावनतेचा साक्षात्कार होत होता. रोज सकाळी नियमितपणे आकाशावर आपली रक्तवर्ण पदचिन्हे उमटवणारी उषा त्यांना सुंदर नर्तकीप्रमाणे व हास्यवदना युवतीप्रमाणे रिझवीत होती. शेतांत उगवणारी धान्ये व गाईच्या कांसेतून स्त्रवणाऱ्या दुधाच्या धारा या दोन्हीत ते अमृताचा स्वाद घेऊ शकत होते. कवीच्या प्रतिभामय वाणीत स्वर्गीय संसाराचे व सर्व देवतांच्या निवासाचे विलोभनीय चित्र त्यांना दिसत असल्यामुळे त्यांच्या तोंडून -

ऋचो अक्षरे परमे व्योमन् यस्मिन् देवा अधि विश्वे निषेदुः ।
यस्तन्न वेद किमृचा करिष्यती य इत् यद् विदुस्त इमे समासत ।।

असे उस्फूर्त उद्‌गार निघू शकले. 'याचि देही याचि डोळा' स्वर्गीय सुखांचा अनुभव घेता येतो अशी त्यांची धारणा होती.

## पराक्रमाच्या जोरावर सुखप्राप्ती

स्वाधीनतेने जगातील सर्व सुखांचा उपभोग घेण्याची उत्कट इच्छा बाळगणे वैदिक आर्यांच्या निकोप व उमद्या मनाचे लक्षण आहे. परंतु हे सुखोपभोग किंवा हे ऐश्वर्य स्वकष्टाने, स्वतःच्या पुरुषार्थाच्या किंवा उद्योगाच्या जोरावर मिळवण्याचा राजमार्ग त्यांनी पत्करला होता. आयते मिळालेले धन तिरस्कारार्ह आहे अशी त्यांची भावना. ऋग्वेदात ऋभूंनी आपल्या पुरुषार्थाच्या जोरावर देवापासून हविर्भाग मिळवण्यात यश संपादन केले. 'न ऋते श्रान्तस्य सख्याय देवाः' हा त्यांचा महामंत्र. जो स्वतः घाम गाळतो, परिश्रम करतो त्याला च देवांचे सख्य प्राप्त होते ही त्यांची मनोमन श्रद्धा. ऐतरेय ब्राह्मणात इक्ष्वाकुवंशीय हरिश्चंद्र व त्याचा मुलगा रोहित यांच्या कथेत पुरुषार्थाचा किंवा परिश्रमाचा महिमा वर्णन केलेला आहे. इंद्राने "अविश्रांतपणे उद्योग करीत रहा म्हणजे तुझी आपत्तीपासून सुटका होईल" हे तत्त्व रोहिताच्या मनावर बिम्बवण्याचा प्रयत्न केला. इंद्राचे शब्द आज हि भारतीयांनी आपल्या मनावर कोरून ठेवण्यासारखे आहेत. 'आराम हराम है' ही घोषणा आमच्या देशात नवी आहे असे म्हणण्याचे कारण नाही. इंद्र रोहिताला काय म्हणतो ते पहा :-

**नानाश्रान्ताय श्रीरस्तीत्यनुशुश्रुम ।**
**पापो नृषद्वरो इंद्र इच्चरतः सखा ।। चरैवेती ।।**
**कलिः शयानो भवति संजिहानस्तु द्वापरः ।**

**उत्तिष्ठंस्त्रेता भवति कृतं संपद्यते चरन् ।। चरैवेति ।।**
**चरन् वै मधु विन्दन्ति चरनस्वादुमुदुम्बरम् ।**
**सूयस्य पश्य श्रेमाणं यो न तन्द्रयते चरन् ।। चरैवेति ।।**

[अर्थ - श्रमावाचून श्री प्राप्त होत नाही हेच आम्ही ऐकत आलो. आळशी मनुष्य हा पापी च होय. इंद्र (म्हणजे परमेश्वर) उद्योगी माणसाशी सख्य जोडतो. म्हणून उद्योग करीत रहा. झोपून रहाणारा माणूस म्हणजे कलि (फांश्यातील एक गुण), झोपेचा त्याग करणारा माणूस म्हणजे द्वापर (फांश्यांतील दोन गुण), ती टाकून उठणारा माणून म्हणजे त्रेता (तीन गुण) व प्रत्यक्ष कार्यरत असणारा माणूस हा कृत (फांश्यांतले चार गुण; सर्वात जास्त) होय. निरंतर काम करणाऱ्या व्यक्तीला च आनंद व गोड फळे चाखायला मिळतात. सूर्याकडे बघ. तो निरसलपणे भ्रमण करीत असतो म्हणूनच त्याचे तेज प्रखर आहे.] या ओळी वाचताना Work, work be it for the infinitesimalest part, but work ! For night cometh when no man would work" या रस्किनच्या उद्गारांची आठवण झाल्याशिवाय रहात नाही. अविश्रांत परिश्रम करण्याची ज्या आर्यांची तयारी होती त्यांना आपत्तींची व संकटांची मातब्बरी वाटत नव्हती. आम्ही आमच्या धनुष्याच्या व आयुधांच्या जोरावर जग जिंकू शकूं असा त्यांना विश्वास वाटत होता. देवांकडून तेज व कृपा यांचीच मागणी करावयाची व या दोन्ही वस्तू मिळाल्यानंतर "धन्वना गाः धन्वनाजिं जयेम धन्वना तीव्रा समदाः जयेम । धनुः शत्रोरपकामं करोति धन्वना सर्वाः प्रदिशो जयेम ।।" याबद्दल त्यांना यत्किंचित् ही शंका वाटत नव्हती. संकटे आली तरी घाबरून न जाता त्यांच्यावर मात करावयास लागणारी निर्भयता त्यांनी संपादन केली होती. धैर्याने व निर्भयपणे पाऊल पुढे टाकत राहण्यासाठी अथर्ववेदांत एके ठिकाणी मोठे बहारीचे उद्गार आढळतात. अथर्ववेदांतील ऋषि म्हणतो :-

**यथा द्यौश्च पृथिवी च न बिभीतो न रिष्यतः ।**
**एवा मे प्राण मा बिभेः ।।**
**यथाहश्च रात्री च न बिभीतो न रिष्यतः ।।**
**एवा मे प्राण मा बिभेः ।।**
**यथा सूर्यश्च चंद्रश्च न बिभीतो न रिष्यतः ।**
**एवा मे प्राण मा बिभेः ।।**

"ज्याप्रमाणे द्युलोक व पृथ्वी, दिवस व रात्र, सूर्य व चंद्र ही द्वंद्वे कोणाला हि न भिता अखंडितपणे पुढेच चाललेली असतात त्याप्रमाणेच माझ्या प्राणा, तू कधीहि भय न बाळगता निरंतर प्रगमनशील रहा."

# समृद्धीचे सुवर्णयुग

जीवनासंबंधी असा तेजस्वी दृष्टिकोण असणाऱ्या वैदिक आर्यांनी समृद्धीचे सुवर्णयुग निर्माण केले होते. तत्कालीन संपत्तीत प्राधान्याने पशूंचा अंतर्भाव होत असे. गाय, बैल, मेंढ्या, म्हैस आदि पशू देवघेवीची साधने म्हणून उपयोगात आणली जात असत. सोमयाग करावयाच्या वेळी सोमवल्लीची किंमत म्हणून अध्वर्यू नुकतीच व्यालेली गाय, कालवड, खोंड, गाडीला चालणारा बैल, गाईबैलाचे जोडपे, वस्त्र, सोने व शेळी या वस्तु देत असे. दानस्तुतीतील उल्लेखांवरून पशूंच्या अपार समृद्धीची अभिलाषा स्पष्ट होते. कक्षीवान् ऋषि राजाकडून मिळालेल्या देणगीचा उल्लेख करतांना अभिमानाने म्हणतो :-

**शतं राज्ञो नाधमानस्य निष्कान् शतमश्वान् प्रयताम् सद्य आदम्।**
**शतं कक्षीवाँ असुरस्य गोनां । दिवि श्रवोऽजरमा ततान ।।**

(राजाने आग्रहाने दिलेले शंभर अश्व मी एकदम घेतले. मला राजाने दिलेले शंभर बैल घेऊन मी त्याची अक्षय कीर्ति स्वर्गात पसरवली.) वृश्य ऋषि म्हणतो -''शंभर वळू, शंभर कुत्री, शंभर कमावलेली कातडी, शंभर गवताच्या पेंढ्या आणि चारशे तेजस्वी अश्व हे आता माझे झाले.'' पुरोहितांच्या भिक्षुकी दानांतील संपत्तीचे हे स्वरूप खरोखर विस्मयजनक आहे. गुरांना चरण्यासाठी शेकडो कोस पसरलेली वने व निर्मळ जलाने भरुन वहाणाऱ्या नद्या तत्कालीन पशुपालनला सर्वस्वी अनुकूल होत्या.

सोन्याचा मुबलक सांठा हे या सुवर्णयुगाचे दुसरे वैशिष्ट्य. सोमयागात सोम पिळण्यासाठी 'हिरण्यय कोशा'चा म्हणजे सोन्याच्या पात्राचा उपयोग करीत असत. तत्कालीन पुरूष व स्त्रिया सोन्याचे अलंकार घालीत असत. घोड्यांना देखील सोन्याचे अलंकार घालून सजविण्याची पध्दत होती असे 'अश्वो न स्वे दम आ हेम्यावान् तमंहसः पीपरो दाश्वांसम्' या शब्दावरून दिसते. इंद्राच्या गळ्यात निष्कांचा (नाण्यांचा) हार असल्याचे वर्णन 'हिरण्यपिण्डान् दिवोदासादसानिषम्' म्हणजे मला दिवोदासाकडून दहा हिरण्यपिंड मिळाले असे म्हटले आहे. सोन्याच्या नाण्याचे 'मना' हे बाबिलोनियन नांव हि ऋग्वेदात एका ठिकाणी आलेले आहे. यावरून नाण्याची किंमत देऊन देवघेव करण्याची पद्धत त्याकाळी रूढ झालेली होती असे म्हणण्यास हरकत नाही. दूर देशांशी व्यापार करण्यासाठी प्रत्यक्ष वस्तूंची देवघेव अशक्य असल्यामुळे नाण्यांचा च उपयोग करावा लागतो.

जलमार्ग व स्थलमार्ग ही दोन्ही वाहतुकीची साधने हि ऋग्वेदकाळात उपलब्ध होती असे दिसते. ऋग्वेदात एके ठिकाणी समुद्रात शंभर वल्ह्यांनी चालवायच्या नौकेचे वर्णन आढळते. अश्विनीकुमारांनी भुज्यूला अशा नौकेतून सुरक्षित ठिकाणी

पोहोचवल्याचा उल्लेख सापडतो. वरुणदेव आकाशांत उडणाऱ्या पक्ष्यांचा मार्ग व समुद्रात प्रवास करणाऱ्या नौकांचा मार्ग जाणतो असे 'वेद यो वीनां पदमन्तरिक्षेण पततां । वेद नावः समुद्रियः ॥' या ऋचेवरून स्पष्ट दिसते. वरुणाच्या कृपेने वसिष्ठाने समुद्रांत नौका हाकारली व मग त्यांना झोपाळ्यावर बसल्याप्रमाणे झोके मिळू लागले हा अनुभव व्यक्त करताना आनंदी वसिष्ठ ऋषि म्हणतो :-

**आ यद् रुहाव व वरुणश्च नावं प्र यत् समुद्रमीरयाव मध्यम् ।**
**अधि यदपां स्नुभिश्चराव प्र प्रेङ्ख ईङ्खयावहै शुभे कम् ॥**
**वसिष्ठं ह वरुणो नाव्याधादृषिं चकार स्वपा महोभिः ।**
**स्तोतारं विप्र सुदिनत्वे अह्नां यान्नु द्यावस्ततनन्यादुषासः ॥**

जलमार्गाने प्रवास करण्याची अशी तयारी असणाऱ्या आर्यांच्या आधुनिक वंशजांना इंग्लंडला जाऊन आल्यानंतर १९ व्या शतकांत प्रायश्चित्त घेण्याची पाळी यावी हा दैवदुर्विलास नव्हे का ? स्थलमार्गावरील वाहतुकीकरिता दुचाकी बैलांच्या गाड्या आणि घोड्यांचे रथ वापरीत असत असे ऋग्वेदावरून दिसते. रथाला जरूरीप्रमाणे एक, दोन, तीन किंवा त्यापेक्षा हि जास्त घोडे असत. प्रवासाबरोबरच युद्ध किंवा शर्यती यांच्या करता हि अश्वरथांचा भरपूर उपयोग होत असे. भक्कम अश्वरथांच्या जोरावर वैदिक आर्यांनी नेत्रदीपक विजय मिळवले यात शंका नाही.

वैदिक आर्यांनी लोहयुगांत हि प्रवेश केला होता असे दिसते. लोखंडाची हत्यारे (शिरस्त्राण, तलवार, परशु, धनुष्यबाण इत्यादि) बनवण्याची कला वेदकालापासून च प्रचलित होती. ऋग्वेदांतील 'अयस्' शब्दाचा अर्थ तांबे किंवा सामान्य धातू हाच मानावा लागेल परंतु अथर्ववेदांत 'श्यामं अयः' चा म्हणजे लोखंडाचा स्पष्ट उल्लेख सांपडतो. तैतिरीय संहितेत 'श्यामं च मे लोहं च मे' या शब्दांत धातूंमध्ये लोखंडाची गणना केलेली आहे. छान्दोग्योनिषदांत तर 'एकेन नखनिकृन्तनेन सर्वं कार्ष्णायसं विज्ञातं स्यात् । वाचाऽरम्भणं विकारो नामधेयं कृष्णायसमित्येव सत्यम् ।' असे म्हणून लोखंडाचा दृष्टांत च दिलेला आहे. शस्त्रांकरता लोखंडाचा व जलद हालचालीसाठी घोड्यांचा कौशल्याने उपयोग करून वैदिकांनीं तत्कालीन अन्य संस्कृतीवर विजय मिळवला व आपले राज्य स्थापन केले हे त्यांना भूषणावह आहे.

खाजगी संपत्ति हा वेदकालीन संस्थेचा पाया होता. पितृपरंपरेचा वारसा हक्क ऋग्वेदकाळी च रूढ झाला होता असे मानण्यास पुष्कळ प्रमाणे आहेत. 'ईशानासः पितृवित्तस्य रायः' म्हणजे आम्ही पितृपरंपरागत वित्ताचे मालक व्हावे अशी इच्छा ऋग्वेदात व्यक्त केलेली आहे. तैत्तिरीय संहितेत मनूने आपल्या पुत्रांना वारसा वाटून दिल्याचे वर्णन आहे. ऋणाची कल्पना हि ऋग्वेदकालांत च निर्माण झाली.

मी केलेली ऋणे नाहीशी कर; दुसऱ्याच्या श्रमावर जगणे मला योग्य दिसणार नाही.' अशी वरुणाची प्रार्थना एका ऋषीने केलेली आहे. 'जायमानो ह वै ब्राह्मणस्त्रिभिर्ऋणवा जायते' सारख्या वाक्यांवरून ऋषिऋण, पितृऋण व देवऋण यांची कल्पना हि त्या काळी आर्यांना आलेली होती हे स्पष्ट आहे. तैत्तिरीय संहितेत ..... ''अनृणः सुवर्गं लोकमेति'' म्हणजे अनृण होऊन स्वर्ग लोकी जाण्याच्या कल्पनेचा हि उल्लेख सापडतो. ऋणापासून मुक्त होणाऱ्या या कल्पनेत मानवी जीवनांतील सर्व कर्तव्ये पार पाडण्याची भावना आहे ती मुळात नीतिशास्त्रावर आधारलेली आहे. वैदिकांची दानसंस्था ही खाजगी संपत्तीच्या संचयाकडे बोट दाखवते. ऋग्वेदात दानस्तुतीच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या ऋचा पुष्कळ आहेत. यज्ञांतील दक्षिणांचे प्रमाण हि दानाचे च महत्त्व विशद करते. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडळातील दानसूक्त नीतिमत्तेच्या दृष्टीने अत्यंत वाचनीय आहे. धनसंचय जरी प्रचंड असला तरी त्याचा उपयोग केवळ स्वतःसाठी न करता गरीबांसाठी, नाडलेल्यांसाठी व मित्रांसाठी करावा, अतिथीला विमुख पाठवूं नये असा औदार्यपूर्ण उपदेश या सूक्तात केलेला आहे.

'न स सखा यो न ददाति नो सख्ये सचाभुवे सचमानाय पित्वः ।' किंवा 'मोघमन्नं विन्दते अप्रचेताः सत्यं ब्रवीमि वध इत्स तस्य ।

'नार्यमणं पुष्यति नो सखायं केवलाघो भवति केवलादी ।।'
या ओळीतील आशयाचा अनुवाद पुढे ईशावास्योपनिषदांत -

**ईशावास्यमिदं सर्वं यत्किञ्च जगत्यां जगत् ।**
**तेन त्यक्तेन भुञ्जीथाः मा गृधः कस्य स्विद्धनम् ।।**

या तात्त्विक कल्पनेत व 'भुञ्जते तो त्वघं पापा ये पचन्त्यात्मकारणात्' या भगवद्गीतेतील भगवंताच्या वचनांत केलेला आहे.

**वैदिकांची शास्त्रीय प्रगति**

आर्थिक व्यवस्था व भौतिक साधने म्हणजे संपूर्ण संस्कृती नव्हे. संस्कृतीत मानसिक साधनांचा हि विचार करणे आवश्यक आहे. व्यवहाराच्या मानसिक साधनांत भाषा व गणित यांचा अंतर्भाव होतो. भाषेपेक्षा गणिताचे माहात्म्य जास्त. भाषा ही लेखनिविष्ट झालेली असेल तर ते हि प्रगतीचे द्योतक. 'सात छंद अक्षरांनी मोजतात' हा ऋग्वेदातील उल्लेख गणनाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरेल. ऋग्वेदात पुष्कळ सूक्तांच्या शेवटी 'नव्यमतक्षद् ब्रह्म हरियोजनाय' म्हणजे सूक्त नवीन तासून तयार केले अशा अर्थाचे शब्द वापरलेले आढळतात. तक्ष् धातूचा संबंध तासण्याशी किंवा कोरण्याशी आहे. यावरून अक्षरे त्याकाळी कोरून काढीत असावेत असे अनुमान करणे चुकीचे ठरणार नाही. 'त्रैष्टुभं निरतक्षत्' सारख्या

वाक्यांत उपमार्थ विवक्षित नसताना देखील तक्ष् धातू च वापरलेला आहे हे या संदर्भात लक्षांत ठेवणे योग्य. मोजण्याची कला व गणित यांत तर वेदकालीन आर्यांनी विस्मयकारक प्रगति केली होती. गोपथ ब्राह्मणातील अङ्क शब्द संख्यावाचक आहे. 'तद्वाप्युपलक्षयेद्वर्णाक्षरपदाङ्क्रशः' सारखे या ब्राह्मणातील उल्लेख हि वर्ण, अक्षरे व पद मोजण्याची पद्धती दर्शवितात. दशाङ्क पद्धतीचा आविष्कार करून वैदिक आर्यांनी गणितात प्रावीण्याचा अग्रक्रम मिळवलेला होता. गणितशास्त्रांत शून्याची कल्पना वैदिकांना च स्फुरली. शतपथ ब्राह्मणांत 'शून्यमावसथम्' किंवा तैत्तिरीय ब्राह्मणात 'शून्यायावसथाय' हे शब्द येतात 'शून्य' चा अर्थ रिकामे किंवा पोकळ असा आहे. गणितांतील अनन्त (Infinity) ही कल्पना हि शपतथ ब्राह्मणांतील 'पूर्ण' या शब्दात व्यक्त होते. बृहदारण्यकोपनिषदांत एके ठिकाणी अनंताची बेरीज-वजाबाकी रूपकाच्या साहाय्याने मांडलेली आहे. हा प्रसिद्ध श्लोक म्हणजे :-

**पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ।**
**पूर्णस्य पूर्णामादाय पूर्णमेवावशिष्यते ।।**

वैद्यकशास्त्राची वेदकालांत अविच्छिन्न परंपरा निर्माण झालेली होती असे वेदांतील उल्लेखांवरून स्पष्ट दिसते. वैद्यांची, शल्यशास्त्रविशारदांची व औषधांची संख्या हि बरीच मोठी होती. ऋग्वेदातील पहिल्या मंडळात 'शतं ते राजन् भिषजः सहस्त्रमुर्वी गभीरा सुमतिष्टेऽस्तु' असे स्पष्ट म्हटलेले आहे. खरा भिषज कोण हे सांगताना ऋग्वेदीय ऋषि म्हणतो :-

**यत्रौषधीः समग्मत राजानः समिताविव ।**
**विप्रःस उच्यते भिषक् रक्षोहामीवचातनः ।।**

''राक्षसांचा व रोगांचा विध्वंस करणारा विप्र म्हणजे वैद्यराज. ज्याच्यासमोर समितीत जमणाऱ्या राजांप्रमाणे सर्व औषधे एकत्र येतात तो विप्र खरा वैद्य.'' ऋग्वेदातील आश्विनीकुमार हे शल्यक्रियाविशारद होते. ''पक्ष्यांचा पंखा तुटला त्याप्रमाणे खेळाच्या प्राणघातक युद्धात रात्री त्याच्या पत्नीचा, विश्यलेचा पाय तुटला. पण दिवसा लढाई सुरू झाल्याबरोबर तिला रणांगणात सर्वत्र संचार करता यावा म्हणून तुम्ही तिला ताबडतोब लोखंडाचा पाय बसवला'' असे म्हणून अश्विनीकुमारांच्या कार्याची प्रशंसा ऋग्वेदातील पहिल्या मंडळात केलेली आहे. वर एके ठिकाणी उपयोग कसा करावा यासंबंधीचा विचार अथर्ववेदांत केलेला आहे. रोगांबरोबरच रोगांची लक्षणे (Symptom) व रोग निर्माण होण्याची कारणे हि अथर्ववेदात सापडतात. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे आयुर्वेदाची मूलतत्त्वे अथर्ववेदात सांगितलेली आहेत व भारतीय वैद्यकशास्त्राच्या इतिहासाच्या दृष्टीने अथर्ववेदाचे महत्त्व असाधारण आहे याबद्दल विचारवंतात दुमत होण्याचे कारण नाही.

राज्यसंस्थेला ही लोकानुवर्ती रूप देण्याची कल्पना वेदवाङ्मयात आढळते. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडळातील १७३ व्या सूक्तांत राजाला राज्यपदावर बसवताना 'विशस्त्वा सर्वा वाच्छन्तु' म्हणजे 'सगळे प्रजानन तू राज्यपदावर बसावे अशी इच्छा करोत' असे म्हटले आहे. अथर्ववेदात सभा व समिती अशा दोन प्रकारच्या सभांचा उल्लेख आहे. या सभांतून राजाची निवड केली जात असे. अथर्ववेदांतील उल्लेखांच्या आधाराने समिती ही सर्व लोकांची असे व सभेत न्याय देण्यास पात्र असलेले विचारवंत व सल्लागार असत असे दिसते. या लोकसंस्थांचे नियंत्रण मान्य करून वैदिक आर्यांनी लोकमताची बूज राखली होती हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. अथर्ववेदांतील -

**त्वां विशो वृणती सज्याम त्वामिनाः प्रदिशः पञ्चदेवीः ।**
**वर्ष्मन् राष्ट्रस्य ककुदि श्रमस्य ततो न उग्रा विभजा वसूनि ।।**

या मंत्रात लोकांनी बहुमताने पुन्हा निवडून दिलेल्या राजावरील जबाबदारीचा उल्लेख केलेला आहे. ब्राह्मणग्रंथांतून राज्यभिषेकाच्या संस्काराचे जे विस्तृत वर्णन केलेले आहे त्यावरून वैदिकांची राज्यसंस्था लोकमताला लाथाडणारी नव्हती; त्याचा मान राखणारी होती; किंबहुना राजपदाचा स्वीकार म्हणजे त्यांच्या मताने संस्कार होता; कर्तव्यपालनाचा करार होता असेच म्हणावे लागेल. या संस्कारित पार्श्वभूमीवरच कविकुलगुरू कालिदासाने गौरविलेल्या -

'त्यागाय संभृतार्थानां सत्याय मितभाषिणां यशसे विजिगीषूणां' चा आदर्श लोकांपुढे ठेवणाऱ्या रघुवंशातील राजांच्या वागणुकीची उपपत्ति लागते.

**यज्ञ हा शक्तींचा संचय; शास्त्रांचे उगमस्थान**

वैदिकांच्या जीवनाचे तत्त्वज्ञान यज्ञकल्पनेत सामावलेले आहे. यज्ञ म्हणजे त्यांच्या सामाजिक जीवनाचे हि सार होते. पापांचा व शत्रूंचा विध्वंस, रोगांचा परिहार, समृद्धी व अमरत्व यांची प्राप्ति सर्व काही यज्ञांतून निर्माण होते. सर्व ऐश्वर्य यज्ञमंडपात एकत्र होते. दहा गायीबैलांचे शंभर गायी-बैल होईपर्यंत किंवा शंभर गायी-बैलांची संख्या हजार होईपर्यंत यज्ञांचे सत्र चालवावे असे तैत्तिरीय संहितेत म्हटलेले आहे. ब्राह्मणग्रंथांच्या काळात यज्ञाला जादूचे स्वरूप आले व एका अर्थाने यज्ञसंस्थेची अधोगती झाली हे खरे; परंतु यज्ञसंस्थेच्या परिसरात च भारतीयांच्या समाजव्यवस्थेचा, त्यांच्या धर्माचा व तत्त्वज्ञानाचा इतिहास निर्माण झाला हे विसरून चालणार नाही. कांटेकोरपणे वेदि निर्माण करण्याच्या प्रयत्नांतून भूमितिशास्त्राचा उगम झाला व त्याची परिणति शुल्वसूत्रांत झाली. यज्ञाला योग्य मुहूर्त शोधून काढण्यासाठी वैदिकांनी खगोलशास्त्र व ज्योतिर्गणित यांची बाराखडी तयार केली. शब्दांची यज्ञप्रक्रियेला अनुकूल उपपत्ति लावण्याचा

वैदिकांनी जो प्रयत्न केला त्यांतूनच व्याकरण-शास्त्राचा जन्म झाला. उपनिषदांतील परमपुरूषाच्या कल्पनेचे मूळ हि अग्निचयनांत म्हणजे यज्ञप्रक्रियेत आढळते. सर्वधर्मसमन्वयाचे महान् तत्त्व हि भारतीयांना वेदकाळात च पटले होते याची हि साक्ष शतपथ ब्राह्मणांतील अग्निरहस्यावरून पटते. 'आत्मा' हे विश्वसत्य आहे हा साक्षात्कार मात्र उपनिषद्कालीन ऋषीना च झाला हे जरी मान्य केले तरी आत्मतत्त्वाची महत्त्वपूर्ण कल्पना सूत्ररूपाने अथर्ववेदातील ब्रह्मसूक्तांत मांडलेली आहे हे कबूल करावे च लागेल. ब्राह्मणग्रंथात यज्ञसंस्थेच्या परिसरांत निर्माण झालेल्या बंधुतेच्या काहीशा स्थूल कल्पनेत विश्वात्मभावाच्या भव्य कल्पनेची बीजे आहेत. जर्मन तत्त्वज्ञ लायबेनिझ याने 'There are no two things in this world that are not connected'' असे उद्‌गार काढले हे या संदर्भात लक्षांत ठेवण्यासारखे आहेत.

जीवनासंबंधी जयिष्णू व वर्धिष्णू दृष्टिकोण बाळगणाऱ्या वैदिक आर्यांना 'ऋत' या विश्वव्यापी तत्त्वाचा साक्षात्कार झाला, ऋतूंतील परिवर्तन, आकाशांतील असंख्य तारे, आनंददायिनी उषेचे आगमन, नद्यांचे अगाध व निर्मळ जल, मेघांचा गडगडाट, सौदामिनीचा लखलखाट या सर्वामध्ये एक नियमन व नियंत्रण आहे; त्यांत गोंधळ किंवा अव्यवस्था नाही या सत्याचे प्रतिभेच्या जोरावर वैदिकांना भान झाले व त्याला त्यानी 'ऋत' हे नांव दिले. या ऋताचे पालन मनुष्याबरोबर देवांना हि करावे लागते कारण तेहि 'ऋतज' म्हणजे ऋतांतूनच निर्माण झालेले आहेत. 'एकं सद् विप्रा बहुधा वदन्ति' या ऋग्वेदातल्या कल्पनेने हिंदुधर्माच्या इतिहासाला सहिष्णुतेची, सर्व धर्मांना मान्यता देण्याची प्रवृत्ती कायम देऊन टाकली असे म्हणण्यास हरकत नाही.

तात्पर्य, इहलोक व परलोक यांचा सांधा वेदकालीन आर्यानी सांधलेला होता. ते वैभवशाली, विजयशाली जीवनाचे उद्‌गाते होते; वर्धिष्णू प्रवृत्तीचे पुरस्कर्ते होते. त्यांनी प्रथम भौतिक उत्कर्ष प्राप्त करून घेतला; शत्रूंवर व आपत्तींवर विजय मिळवला व नंतर उपनिषदांच्या काळात साधनांची समृद्धी म्हणजे सर्वस्व नव्हे; ही साधने प्राप्त करणाऱ्यांच्या मनाची मशागत करणे आवश्यक आहे या तत्त्वाचा उद्‌घोष केला. जगाला गवसणी घालण्याचे, 'मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति' किंवा उपनिषदांच्या भाषेत बोलावयाचे म्हणजे 'एकेन विज्ञातेन सर्वमिदं विज्ञातं भवति' सारखे तत्त्वज्ञान समर्थतेच्या व संपन्नतेच्या पार्श्वभूमीवर च उठून दिसते; दुबळ्या व म्हणूनच खुरटलेल्या माणसांच्या तोंडी ही भाषा कशी शोभणार ? जे लोक भोग घेऊ शकत नाहीत त्यांना त्यागाची भाषा बोलण्याचा काय अधिकार ? ज्यांच्या मनगटांत सामर्थ्य नाही त्यांनी इतराना शांतीचे पाठ देणे ही केव्हा हि हास्यास्पद च ठरणार. वेदकालीन आर्यानी ही चूक केली नाही.

सामर्थ्याची व पराक्रमाची त्यानी निष्ठेने जोपासना केली व त्यानंतर त्यावर विवेकाचा अंकुश ठेवणारे प्रभावी तत्त्वज्ञान निर्माण केले.

वेदकालीन आर्यांच्या उपर्युक्त युयुत्सू दृष्टिकोणाचा अंगीकार करणे आज अत्यावश्यक आहे. समर्थ भारताच्या निर्मितीचे सुंदर स्वप्न साकार करावयाचे असेल तर ज्ञानाच्या उपासनेबरोबरच 'सर्वाः प्रदिशो जयेम' ही आकांक्षा ठेवून 'सह नौ भुनक्तु सह वीर्यं करवावहै' ह्या मंत्राचा जप केला पाहिजे, ऋग्वेदीय ऋषीच्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे -

**समानी व आकूतिः समाना हृदयानि वः ।**
**समानमस्तु वो मनो यथा वः सुसहासति: ।।**

हे आमचे ब्रीदवाक्य झाले पाहिजे.

[ वसन्त - दिवाळी अंक नोव्हेंबर १९६६ ]

# ३. ऋग्वेदातील पराक्रमी इंद्र

ऋग्वेदीय दैवतशास्त्रात इंद्राचे स्थान असाधारण आहे. किंबहुना हे दैवतशास्त्र इंद्रप्रधान च आहे यात शंका नाही. इंद्र ही ऋग्वेदातील सर्वात लोकप्रिय देवता. या वेदातील एक पंचमांश सूक्ते इंद्रस्तुतीने व इंद्रवर्णनाने व्यापलेली आढळतात. इंद्र या युयुत्सू वैदिक आर्यांचा नेता होता. त्याच्यामध्ये प्रचंड वैश्विक शक्ती साठवलेली आहे अशी त्यांची धारणा होती. त्याच्या व्यक्तिमत्वाचे आणि वीरकर्माचे वर्णन करताना वैदिक आर्यांच्या शब्दांना गती येते; त्यात चित्रमयता निर्माण होते व भावनेला ही भरते येते याची अभ्यासकाला जाणीव होते. ऋग्वेदाच्या दुसऱ्या मंडलातील बाराव्या सूक्ताच्या तिसऱ्या मंत्रात वैदिक कवी म्हणतो :-

'ज्याने सर्पाला ठार मारून सात नद्यांचे प्रवाह मुक्त केले, वलाने दडवून ठेवलेल्या गाई ज्याने सोडविल्या, ज्याने मेघांमध्ये अग्नि उत्पन्न केला, जो युद्धात शत्रूंना समूळ उपटून टाकतो तो, लोकहो, इंद्र होय.' या मंत्रात इंद्राचे वैशिष्ट्य दाखविणाऱ्या सर्व गोष्टी व्यक्त झाल्या असे म्हणता येणार नाही हे खरे, परंतु सर्व ठळक वैशिष्ट्ये यात आली असे म्हणण्यास हरकत नाही. या वर्णनातील सर्प म्हणजे काही विद्वानांच्या मते आकाशाला वेढणारे मेघ. वृत्र हा शब्द हि काही विद्वानांना मेघवाचक वाटतो. इंद्राने मेघ फोडल्यामुळे त्यातील पाणी वाहू लागले व भूलोकावरील नद्यांचे प्रवाह मोकळे झाले. वलाने दडवून ठेवलेल्या गाई इंद्राने सोडवल्या म्हणजे मेघाच्छादित आकाश मोकळे होऊन सूर्याचे किरण जमिनीवर येऊन पोहोचले. मेघांमध्ये अग्नि निर्माण करणे म्हणजे विजांचे चमकणे. वैदिक ऋषींनी आकाशात दिसणाऱ्या निरनिराळ्या रंगांच्या मेघांना कधी गाईची उपमा दिली तर काहीना पावसातील जलधारा गायीच्या कासेतून स्त्रवणाऱ्या दुधाच्या धारा वाटल्या. एखाद्या ऋषीला आकाशातून पडणाऱ्या जलधारा पाहून आकाशात पाण्याचा प्रचंड साठा आहे असे वाटले व या पाण्यामुळे सृष्टी 'सस्यश्यामल' होते असे अनुभवाला आल्यामुळे या जलधारा निर्माण करणाऱ्या इंद्राला त्याने सृष्टीचा उपकारकर्ता मानले व त्याला स्तुतीचे अर्घ्य त्याने अर्पण केले.

इंद्राच्या सर्व वीरकृत्यांचा केंद्रबिंदू आहे त्याने केलेला वृत्रवध. वृत्राला वज्राने मारून त्याने अडवलेले पाणी मोकळे करणे हे इंद्राच्या बलकृत्यांपैकी प्रमुख कृत्य. निरुक्तकार यास्काने हि इंद्राच्या या कृत्याचा स्वतंत्र उल्लेख केलेला आहे. या वधात इंद्राने वज्र म्हणजे चमकणारी वीज हे हत्यार वापरले, म्हणून इंद्र हा वज्री ठरला. वज्र हे इंद्राचे विशेष आयुध; हा संकेत नंतरच्या काळात ही प्रसिद्ध आहे.

इंद्र हा सोमपान करणारा आहे. वस्तुतः सोम हे सर्वच वैदिक देवतांचे पेय, परंतु इंद्राला ते विशेष प्रिय. युद्धात आपल्या भक्तांना मदत करण्यासाठी याला भरपूर सोनपानाची गरज भासते व भक्त हि त्याला ते भरपूर प्रमाणात देतात. यागात सोमाचे अनेक ग्रह इंद्राला अर्पण केले जातात. सोमाची तळी पिऊन कधी कधी इंद्र आपल्या भक्तांना विचारतो, 'मी तुमच्यावर प्रसन्न आहे. आता ही पृथ्वी येथे उचलून ठेवू की तिथे ते सांगा.' उघडपणे हा वाजवीपेक्षा जास्त सोम प्याल्याचा परिणाम. अर्थात इंद्राच्या सामर्थ्याबद्दल वैदिक आर्यांना शंका नाही. तो 'शतक्रतु' म्हणजे १०० शक्तींनी युक्त आहे. वेदांत 'शत' म्हणजे हिशेबाने १०० किंवा ९९ + १ नव्हे, अनंत हाच या 'शत' चा अर्थ. याचा अर्थ मुळातच यज्ञ केल्यामुळे निर्माण होणारे मानसिक सामर्थ्य. पुढे 'क्रतू' हा यज्ञवाचक शब्द बनला व नंतरच्या काळात 'शत' हा संख्याबोधक झाल्यानंतर 'शतक्रतु' म्हणजे 'शंभर यज्ञ करणारा' हा अर्थ रूढ झाला व इंद्रपद शंभर यज्ञ केल्याने मिळते ही कल्पना पुढे आली आणि यातूनच १०० यज्ञ करू इच्छिणाऱ्या व्यक्तीला इंद्राने विरोध करून स्वतःच्या पदासाठी त्या व्यक्तीचा प्रयत्न हाणून पाडणारा इंद्र पौराणिक वाङ्मयात दिसू लागला. सोमयागातील माध्यन्दिन सवनात सगळे सोमग्रह या 'शतक्रतु' इंद्राला च दिले जावे व त्या जोरावर त्याने आपल्या भक्तांच्या सर्व शत्रूंचा पाडाव करावा यात नवल वाटण्याचे कारण नाही. इंद्राच्या शस्त्राचे हि शंसन करताना होता परिणामकारक निविद् मंत्राचा उपयोग करतो व डोळ्यापुढे महापराक्रमी इंद्राची मूर्ती आणतो व त्याला आवाहन करतो. मग इंद्राने त्या आवाहनाला साद द्यावी हे स्वाभाविक च. ऋग्वेदकाळी पंजाबच्या प्रदेशात दाशराज्ञ युद्ध झाले या युद्धात इंद्राने सुदास राजाची बाजू घेऊन त्याला जय मिळवून दिला. दास आणि दस्यु यांच्याशी होणाऱ्या आर्यांच्या संघर्षात इंद्रावर आर्यांचा भरवसा असे. कधी कधी आर्यांच्यामधील परस्पर वैमनस्यात ही इंद्राला एखाद्या गटाच्या बाजूने भाग घ्यावा लागे हे हि खरेच. मग अर्थातच इंद्रावर पक्षपाताचा आरोप येई. परंतु प्राधान्याने अनार्यांवर किंवा दस्यूंवर आक्रमण करण्याच्यावेळी इंद्र हा आर्यांचा मार्गदर्शक व रक्षक होता.

इंद्राचे प्रमुख कृत्य म्हणजे वृत्रवध. हे आधीच सांगितले. पण हा वृत्र कोण हे ठरवणे सोपे नाही. यास्काच्या काळी ऐतिहासिकांनी वृत्र हा त्वष्ट्र्याचाच मुलगा (त्वाष्ट्रोऽसुर इत्यैतिहासिकाः) व या असुराचा इंद्राने वध केला असे मत मांडले. नैरुक्तिकांना वृत्र म्हणजे मेघच भासला व त्यांच्या मते इंद्राने वृत्राला मारून पाणी मोकळे केले म्हणजे इंद्राने मेघ फोडून पाऊस पाडला हे स्पष्ट केले. अपां च ज्योतिषश्च मिश्रीभावकर्मणः वर्षकर्म जायते । तत्रोपमार्थेन युद्धवर्णाः भवन्ति (नि. २।१६). ब्राह्मणात वृत्र हा मोठा सर्प असल्याची कल्पना आहे ती ही यास्काने च

उलगडून दाखविली.

पाश्चात्य अभ्यासकांनी तीन उपपत्ती मांडल्या, ओल्डेनबर्ग यांनी वृत्रकथेचा असा अर्थ न लावता इंद्राने पृथ्वीवरील पर्वत फोडून नद्यांना वाट करून दिली. हा अर्थ योग्य मानला कारण वृत्रवधाच्या वर्णनात पावसाचे चित्र कुठे हि आढळत नाही असे त्यांचे म्हणणे. हिलेब्रांट यांच्या मते मुळात वृत्र हा हिवाळारूप असुर होता. तो पाण्याचा बर्फ करून ते खिळवून टाकत असे. ही कथा काश्मीरच्या परिसरात निर्माण झाली असावी. भारतीय ऋषी जोपर्यंत हिमालयात उगम पावणाऱ्या मोठ्या नद्यांच्या प्रांतात रहात होते तोपर्यंत या कथेचा खरा अर्थ त्यांना ठाऊक होता. यामुळे या वृत्ररूपी असुराचा शास्ता इंद्र हा सूर्य च ठरतो. वसंत ऋतूनंतर सूर्याचे तेज प्रखर होऊन त्यामुळे हिवाळ्यात कोंडून ठेवलेल्या नद्यांचे प्रवाह मोकळे होतात. प्रो.. ल्यूडर्सनी ही दुसरी उपपत्ती मान्य केली नाही. त्यांच्या मते वृत्रयुद्ध ही ऋग्वेदकालीन सृष्टीच्या उत्पत्तीची कथा आहे. आदिसर्पाच्या रूपाने वृत्राने सारे जग वेढले होते. सर्वत्र अंधार झाला. ज्या पर्वतावर तो सर्प आडवा पसरला त्या पर्वतात सारे पाणी अडवले गेले. इंद्राने या सर्पाचा नाश केला व पाणी मोकळे होऊन पृथ्वीवर मानवांचे जीवन सुरू झाले. पृथ्वीला ही इंद्राने रुंद केले, वर भूलोकाची स्थापना केली आणि सूर्य, उषा इत्यादि तेजोगोल पुन्हा प्रकाश देऊ लागतील अशी व्यवस्था केली. लोकमान्य टिळकांच्या मते वृत्र व इंद्र या अनुक्रमे अंधार व प्रकाश यांच्या शक्ती आहेत. इंद्राने वृत्राला मारले की पाण्याचा पर्वतातून वर येण्याचा मार्ग मोकळा होतो आणि या प्रवाहाबरोबरच सूर्याचा मार्ग पुन्हा चालू होतो. सूर्याचे पुन्हा प्रकाशणे म्हणजे उत्तर ध्रुवाजवळील प्रदेशात दीर्घ रात्र संपून सूर्याचे एक वर्षानंतर क्षितिजावर येणे म्हणजेच मोठा दिवस सुरू होणे. वृत्राने वैश्विक पाण्याचा प्रवाह अडवला की मोठ्या रात्रीला सुरूवात होते आणि इंद्रवृत्रयुद्ध हि पुन्हा सुरू होते. ते संपून इंद्राचा विजय झाला की पुन्हा दिवस सुरू होतो कारण पाण्याची व सूर्याची वर येण्याची वाट मोकळी होते. हा दिवस हि मोठाच असतो. प्रा. ल्यूडर्स यांच्या मते वृत्रवध ही सृष्टीचा आरंभ होण्याविषयीची कथा आहे तर लोकमान्यांच्या मताप्रमाणे वर्षातून एकदा उत्तर ध्रुवाकडील प्रदेशात घडणारी ही सूर्योदयाची घटना आहे.

डॉ. रा. ना. दांडेकर यांच्या मते वृत्रवधाच्या वर्णनात मानवी रंग बरेच आहेत. निसर्गशक्तीवर मानवी स्वरूपाचा तो आरोप आहे असे वाटत नाही. इंद्राचे सुशिप्रत्व (ऋ. २.१२.६), त्याचे सोनेरी केस व सोनेरी दाढी (१०.९६.५;२३.४), त्याची वज्रासारखी आयुधे, त्याच्या लकबींचे वर्णन (२-११.१७,३.२१ १) यावरून इंद्र हा तत्कालीन आर्यांचा खराखुरा जिवंत नेता

झालेला आहे. या सर्वांकडे पाहिले म्हणजे इंद्र हा 'अतिमानव' होता, Hero होता. डॉ. दांडेकरांनी 'वृत्र' याचे 'वृत्राणि' हे नपुसकलिंगी रूप हि ऋग्वेदात येते हे दाखवून याचा अर्थ 'प्रतिबंध' असा केला. मुळातील अमूर्त कल्पना मूर्त झाली आणि तो इंद्राचा प्रमुख विरोधक बनला. यातूनच 'वृत्र- हा (वृत्रहन्ता) इंद्र' साकार झाला. इंद्र या शब्दाचा भाषाशास्त्रीय विचार केला तर त्याचा संबंध 'इंदू' शी पोहोचतो व हे दोन्ही शब्द यूरोभारतीय oid शी संबद्ध आहेत. याचा विकसित अर्थ आहे 'वर्धमानपौरुष' किंवा 'वर्धमान पुरुषवीर्यबिंदु.' ही उपपत्ती विकासाच्या काळात मूलतः इंद्र या पराक्रमी मानवी वीराची राष्ट्रदेवता बनली. या देवतेला वैश्विक रूप देतांना पर्जन्य देवतेचे काही अंश त्याच्याशी जोडले गेले. मग या देवतेचा प्राचीन पुराणशास्त्रातील कल्पनांशी समन्वय करण्यात आला व ऋग्वेदीय दैवतशास्त्र इंद्रप्रधान बनले.

इंद्राच्या या सामर्थ्याला पुराणकाळात ओहोटी लागली हे खरे परंतु वेदांतील इंद्राची दुर्दम्य उत्साहमूर्ती फारच विलोभनीय आहे यात शंका नाही.

[ 'स्वामिन् तव शरमण्' - मार्च-एप्रिल १९८६ ]

# ४. ऋग्वेदातील परोपकारी अश्विनीकुमार

अश्विना किंवा नासत्यौ हे ऋग्वेदातील जुळे देव-वैद्य. ते पुरोजा (७.७३.१) किंवा प्रत्न (६२.५) जरी असले तरी उपासकांच्या किंवा त्यांची पूजा करणाऱ्यांच्या दृष्टीने ते नेहमी युवाना (३.५८.७) गहणजे चिरतरूण म्हणजे अजरौ (१.११२.९) कधीही वृद्ध न होणारे आहेत. त्यांच्या शरीराचे वर्णन करताना वैदिक आर्यानी 'सुपाणी' म्हणजे चांगले भुज असणारे किंवा 'भद्रहस्ता' म्हणजे शुभकारक हात असणारे व 'वीळूपाणी' म्हणजे समर्थ बाहू असणारे असे शब्द वापरले. 'आम्ही दिलेले हव्य स्वीकारण्यासाठी आणि आम्ही दिलेला सोमरस पिण्यासाठी तुम्ही या' अशी त्यांची प्रार्थना ऋग्वेदात बऱ्याच ठिकाणी आढळते. आश्विनांच्या सामर्थ्याबद्दल मात्र त्यांना शंका नव्हती. त्यांना 'रथ्येव वीराः' किंवा 'इंद्रतमा' म्हणून आर्यांनी त्यांच्या शक्तीची कल्पना आणून देण्याचा प्रयत्न केला आणि शुभ्रा, हिरण्यापेशसा, आर्चिष्मन्ता यासारखी विशेषणे वापरून त्यांच्या जोतिष्मान् व प्रभावी आकृतीचा वारंवार उल्लेख केला. 'स्पार्हया श्रिया तन्वा शुभाना' या शब्दांत हि याच गुणाचा प्रत्यय होतो. त्यांच्या पोषाखाचा उल्लेख ऋग्वेदात कुठे येत नाही. ऋग्वेदाच्या १०० व्या मंडळात पुष्करस्त्रजा हा शब्द वापरून (१८४.२) एकदाच ऋषींनी त्यांच्या कमलपुष्पांनी बनविलेल्या हाराचा उल्लेख केलेला आहे.

यज्ञांतील आहुती हेच या देवद्वयाचे भोजन. 'आम्ही त्याना उद्देशून जी आहुती देतो ती हे अग्ने, तू यांना पोचीव' अशी प्रार्थना अनेकवेळा केलेली आढळते. यज्ञांतील आहुतीपेक्षा सोमरसाचे पान करण्यासाठी अश्विनाना बोलावण्यात आर्यांची स्पर्धा चालत असे. हा सोम सोमवल्ली पिळवून तापवला जात असे, त्यात माधुर्य आणण्याची काळजी घेतली जात असे (स्वदाभि धर्मम्). किंबहुना तो एक दोन दिवस चांगला उकळून आश्विना येण्याच्या वेळी त्याच्यासाठी तयार ठेवला जात असे (तिरोअह्न्यम् सोमम्) 'आयातं सोमपीतये' किंवा एह 'गच्छतामस्य सोमस्यपीतये' ही नेहमीची प्रार्थना. 'दोन हरिणांप्रमाणे किंवा गवताकडे जाणाऱ्या दोन गायींप्रमाणे किंवा जलाकडे जाणाऱ्या दोन हंसांप्रमाणे तुम्ही आम्ही दिलेल्या सोमाचे पान करण्यासाठी वेगाने या' अशा आशयाची त्यांची विनवणी केलेली आहे. हा सोम साहजिकच मधुत्तमः म्हणजे चवीला अतिशय गोड करून ठेवलेला आहे, यात दूध मिसळलेले आहे (गोऋजिका मधूनि). तुम्हाला प्रेरणा देण्याची शक्ती आहे, हा तुम्ही चवीने प्राशन करा व आमचे आपत्तीपासून रक्षण करा ही आर्यांची या देवाना प्रार्थना. हे आश्विनांचे आवडते पेय ही त्यांची धारणा; म्हणूनच त्यांना 'मधुयुवा' 'मधुपातमा' आणि

म्हणजे मध हे खरे परंतु ओल्डेनबर्गसारख्या काही पंडितांच्या मते मधु म्हणजे सकाळचे ओसकण (पहा ओल्डेनबर्गकृत Religion des veda पृ. २०७ वरील टीप) परंतु सोमाबरोबरच 'मधु' चा उल्लेख येत असल्यामुळे ते हि मधासारखे गोड पेय असावे, हेच म्हणणे सयुक्तिक वाटते. किंबहुना पिबंतं सोम्यं मधुमन्तमश्विना 'पिबतं सौम्यं मधु' ऋग्वेदातील ऋचांवरून सोम म्हणजे च मधु असावा व मधु शब्दाने त्या पेयांतल्या गोडपणाचा उल्लेख अभिप्रेत असावा. आश्विनांच्या बाबतीत तर 'सुरापान' हेही मधुर सोमाचे च पान असावे असे मानण्यास जागा आहे.

आश्विनाच्या बाबतीत ऋभूंनी त्यांच्यासाठी तयार केलेल्या रथाचा ऋग्वेदातील उल्लेख विसरता येणार नाही (रथं ये चक्रुः सुवृतं सुचेत सोऽ विह्वरंत मनसस्परिध्यया ४.३६.२) हा रथ हि 'मधुवर्ण' 'हिरण्मय' आणि 'चित्र' असावा हे स्वाभाविक च म्हटले पाहिजे. या रथाला 'द्युमान्' 'पुरूश्चंद्र' अशी विशेषणे वापरून यांचे तेज सूर्यासारखे आहे असे म्हटलेले आहे. 'स्वर्ग व पृथ्वी यांना अवरुद्ध' करणाऱ्या या रथाची विशालता लक्षात घेण्यासारखी आहे. यातल्या बसायच्या तीन जागा हि सोनेरी रंगाच्या आणि तिसरे घट्ट बसवलेले. तरी हि या रथाची गति पृथीवर काय, समुद्रात काय, अप्रतिहत. याचे तीन खांब, सोनेरी आस, किंबहुना याचे सर्व च भाग भक्कम. कारण या रथात दोन अश्विना (नृवाहण) तर असतात च शिवाय धांवा करणाऱ्यांना द्यावयाच्या अनेक देणग्यांमुळे हा वजनदार झालेला दिसतो. या देणग्यांत अन्न, मधु, घृत, द्रव्य इत्यादींचा भरपूर सांठा असे. हा रथ मालकाप्रमाणे सतत गतिमान असतो, याची तुलना वायूशी किंवा मनाशी च होऊ शकते. सकाळच्या वेळी हा रथ सुसज्ज होतो व त्याच वेळी स्वर्दुहिता उषेचा जन्म होतो. या रथाला जुंपलेले घोडे वेगवान असतात च. कधी कधी या रथाला जोडलेल्या रासभाचा म्हणजे गाढवाचा, त्याच्या साहाय्याने शर्यतीत विजय मिळविल्याचा उल्लेख हि येतो (१.११६.२) दिवोदासाला जेव्हा आश्विनांनी भेट दिली तेव्हा त्याच्या रथाला बैल जोडलेले होते (१-११६-१८). रथाचा म्हणजे रथाच्या वाहनांचा वेग हा लवकरात लवकर भक्तांना, अडचणीत सापडलेल्या व्यक्तीना सोडविण्यासाठी असतो हे महत्त्वाचे.

आश्विनांची उपकारकता हा सर्वात मोठा गुण. 'गन्तारा दाशुषो गृहम्' किंवा 'विशं विशं हि गच्छतः' असेच त्यांचे वर्णन प्राधान्याने केलेले आहे. ते लवकर प्रसन्न होणारे आहेत म्हणूनच त्यांची प्रार्थना करेण आर्यांना सोपे वाटले. पिता ज्याप्रमाणे आपल्या मुलांना योग्य शिक्षण देतो त्याप्रमाणे ते आम्हाला शिक्षण देतील (पुत्रमेव पितरा मह्यं शिक्षतम् । १०.३९.६) असा त्यांना विश्वास वाटत

होता. ते नुसती आमची च चौकशी न करता आमच्या नातेवाईकांची विचारपूस करतील (बन्धुपृच्छा) कारण आमचा त्यांच्याशी स्नेह कित्येक पिढ्यांचा आहे; व त्याची जपणूक करणे त्यांना आवडते (युवोर्हि नः सख्या पित्राणि समानो बन्धुरुत तस्य वित्तम् । ७.७२.१). सहाजिकच आम्ही संकटात सापडलो तर ते सुटकेसाठी धावत येतील (अवतं नाधमानम्). सहाजिकच 'सुदानु' म्हणजेच भरपूर देणारे व 'मघवाना' म्हणजे उदार ही त्यांची नेहमीची बिरूदे. मग त्यांच्याजवळ द्रव्य आणि रत्ने यांची मागणी आर्यांनी करावी यात नवल नाही ? आमच्या गाईंनी दुधाचा वर्षाव करावा आणि आमच्या घोड्यांना सामर्थ्य लाभावे अशी प्रार्थना ते दुसऱ्या कुणापाशी करणार ?

ते 'दैव्या भिषजा' म्हणजे देवांचे वैद्य. सहाजिकच रोगांना आमच्यापासून दूर ठेवा ही मुख्य विनवणी (युयुतमस्मद् अमीवाम् ७.७१.२). 'शत्रूंच्या बाणांपासून अहोरात्र आमचे रक्षण करा' ही प्रार्थना. रोगाने आमच्यावर आक्रमण केले तर औषधे (भेषजा) देण्याचे काम या कनवाळू व 'विश्ववारा' वैद्यांशिवाय कोण करणार ? या वैद्यांच्या करामतीची उदाहरणे हि अनेक. ऋज्राश्वाच्या कठोर पित्याने त्याचे डोळे च काढले होते. तेव्हा त्याने यांच्या कृपेच्या जोरावर च आपली दृष्टी परत मिळवली (१.११७.१७). खेळाच्या क्रीडा स्पर्धेत (शर्यतीत) आपला एक पाय गमावून बसलेल्या विश्पलेला लाकडी पाय पुरवून स्पर्धेमध्ये विजय मिळवून देण्याचे काम या कुशल व कनवाळू शल्यक्रिया विशारदांचे (१.११२.१०,१.११६ १५,१०३९.८) म्हणूनच यांना 'विश्पलावसू' या नांवाने लोक ओळखू लागले. कण्वाच्या व्याकूळ होऊन केलेल्या स्तुतीने खूष होऊन (सृष्टुतिं जुषाणा) या आश्विनीकुमारांनी त्याला हि दृष्टिलाभ करून दिला व आंधळ्या आणि लंगड्या पर्वार्जाला पाहण्याची आणि चालण्याची शक्ती दिली. दध्यञ्चाच्या धडाला घोड्याचे शिर बसवून त्याला मस्तकाची उणीव भासू न देण्याची अजब किमया यांच्या शल्यकौशल्याची परिसीमा च नव्हे का ? (पहा ऋ. १.११६.१२, १.११७.२२, १.११९.९)

शल्यक्रियेत अशा प्रकारे नैपुण्य दाखविणाऱ्या आश्विनांनी लोकांचे रोग दूर करण्यात हि स्पृहणीय यश संपादन केले. शापामुळे कुष्ठरोगाने पीडित झालेल्या घोषा नावाच्या कक्षीवान ऋषीच्या कन्येला पूर्णपणे रोगमुक्त करून तिचे सुयोग्य पतीशी मिलन घडवून आणण्याचे कार्य या वैद्य भिषग्वरांनी केले. च्यवनाला तारुण्य प्राप्त करून देण्याची यांची किमया 'जुजुरूषो नासत्योत वव्रिं प्रामुञ्जतं द्रापिमिव च्यवानात्' या शब्दांत आर्यांनी वर्णन केली; सहाजिकच 'कुमारं साहदेव्यं दीर्घायुषं कृणोतन' ही विनवणी यांच्याशिवाय दुसऱ्याला कशी करणार ? भक्तांना त्यांच्या संततीला ही सशक्त व समर्थ करून देण्याची जबाबदारी हे

आनंदाने स्वीकारतात.

प्राणांतिक संकटातून स्तवनकर्त्याला किंवा भक्ताला मुक्त करण्यात तर आश्विनांचा हात धरणारा कोणीच ऋग्वेदात दिसत नाही तुग्रपुत्र भुज्यूला तुग्राने किंवा काहींच्या मते त्याच्या दुष्ट मित्रांनी समुद्रात एकटे सोडून दिले होते. त्याला जीविताची आशा उरली नव्हती. या भुज्यूला वाचविण्याची व तीन दिवस आणि तीन रात्री आपल्या रथांत घेऊन घरी आणून सोडण्याची विस्मयजनक कामगिरी या परोपकारी आश्विनीकुमारांची. अत्रि हा ऋषि एका अंधाऱ्या, खोल आणि तव्याप्रमाणे तापलेल्या जमिनीवरील गर्तेत सापडला होता. त्याने याचना केल्याबरोबर हे दोघे त्याच्याकडे धावले व सभोवतालची भयंकर उष्णता नाहीशी करून त्याला वर ओढून काढले आणि त्याला अन्नपाणी देऊन संकटमुक्त केले. वंदनाच्या सुटकेची अशीच कथा. याला आपल्या अद्‌भुत शक्तीच्या मदतीने वर उचलून घेऊन त्याचे प्राण वाचविले. इतकेच नव्हे तर त्याचे आयुष्य वाढवून दिले (१.११९.६.७). शरीराचे तीन तुकडे झालेल्या श्याव औचथ्याला यांनी शरीर सांधून दिले व अग्निदिव्य आणि जलदिव्याबरोबर त्रैतानाशी झालेल्या द्वंद्वयुद्धात हि त्याला विजय मिळवून दिला.

आश्विनीकुमारांच्या परोपकारात आपल्या भक्तांचे विवाह जुळवून आणण्याचा हि अंतर्भाव होतो. विमदला कमद्यू आणि कक्षीवताच्या कन्येला, घोषाला पति मिळवून देण्याचे कार्य यांनी केले. वस्तुतः अश्विनांचा विवाहसंस्थेशी फार महत्त्वाचा संबंध होता. ऋग्वेदाच्या १० मण्डलांतील प्रसिद्ध ८५ व्या सूक्तात (म्हणजेच विवाहसूक्तात) सूर्या ही वधू आणि अश्विना हे वर होते असे म्हटले आहे. किंबहुना विवाहानंतर प्रत्येक वधूला आपल्या रथांतून सुरक्षितपणे वराच्या घरी पोचविण्याची प्रार्थना या परोपरकारव्रती वैद्यांनाच केली जाते. विवाहित स्त्रियांच्या गर्भात जीवन सुरक्षित ठेवण्यासाठी यांचीच विनवणी करणारे एक सूक्त ऋग्वेदात आहे. यांत 'युवं हि गर्भं जगतीषु धत्थो विश्वेषु भुवनेष्वन्तः' अशी त्यांची प्रशंसा आहे.

या प्रकारच्या कथांचा विशेषत; रेभ, वंदन, भुज्यू इत्यादींच्या सुटकेच्या कथांचा उलगडा अश्विनीकुमारांचा संबंध एखाद्या नैसर्गिक घटनेवर आधारलेल्या रूपकाच्या मदतीने करणे कठिण आहे. या सगळ्या परोपकारपूर्ण कथांचे मूळ साधारणपणे एकाच तऱ्हेच्या आपत्तीशी असणे अशक्य आहे. परंतु सर्व व्यक्ती कल्पनेतून निर्माण झाल्या हे मान्य करणे शक्य नाही. अश्विनीकुमारांना दैवतकथांतील व्यक्ती मानणे अधिक औचित्यपूर्ण ठरेल.

निसर्गातील आकर्षक घटनांना वैदिक आर्यांनी मानवरूप दिले ही कल्पना

विंटरनिंज, स्टेन कनोसारख्या पाश्चिमात्य पंडितांनी हिरीरीने मांडली हे खरे, परंतु सध्या उपलब्ध असलेल्या तुलनात्मक भाषाशास्त्र, तुलनात्मक दैवतशास्त्र यासारख्या ज्ञानशाखांनी पुरविलेल्या माहितीकडे व भारतातील प्राचीन टीकाकारांच्या मतांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. खुद्द यास्काने (निरूक्त XII.1) अश्विनांबद्दलच्या अनेक मतांचा उल्लेख केलेला आहे. अश्विना म्हणजे स्वर्ग व पृथ्वी, किंवा सूर्य आणि चंद्र अथवा दिवस व रात्र अशी मते यास्काच्या काळी होती. यास्काने ऐयिहासिकांचे मत म्हणून अश्विना हे पूर्वीचे दोन परोपकारी राजे होते हे हि सांगितलेले आहे. गेल्डनरने अश्विना हे दोन भारतीय संत होते हे मत मांडले. वेबर ने ज्योतिःशास्त्राच्या आधाराने अश्विना म्हणजे जेमिनी चे दोन तारे हे मत मांडले. मुलर व लुडविग यांनी अश्विना म्हणजे सूर्य व चंद्र या प्राचीनांच्या मताला दुजोरा दिला. मॅनहार्डटच्या प्रमाणे ओलेडबर्गने अश्विना म्हणजे सकाळचे व संध्याकाळचचे तारे ह्या मताचा पुरस्कार केला. बोलेन्सन, श्रोडार आणि गुंटर्ट यांनी हि यालाच पाठिंबा दिलला आहे. या सर्व मतांच्या गलबल्यात ऐतिहासिकांचे अश्विनांच्या बाबतीतील मत च ऋग्वेदातील उल्लेखांवरून सयुक्तिक वाटते. अश्विनांची तुलना मात्र ग्रीकांच्या झीजसच्या दोन मुलांशी म्हणजे कॅस्टॉर व पोलुमस यांच्याशी करता येईल. अश्विनांप्रमाणे ग्रीक डॉयास्कुरी ही मानवांना संकटातून वांचविण्याचे कार्य व त्यांच्यावर उपकार करीत असे. लेट्टीकमधल्या देवपुत्रांशी अश्विनांचे बरेच साम्य आहे. दिवोनपाता हे अश्विनांचे विशेषण म्हणे लेट्टीक मधील देवा देलीया अनुवादच वाटतो. यांतील सूर्या व लेटिक 'सोलस मएटा' या एकच भासतात. परंतु यावरून अश्विना म्हणजे दोन तारे याची उपपत्ती लावता येत नाही. डॉयास्कुरी व अश्विना यांच्यातील साम्यामुळे अश्विनांचा संबंध अश्वांशी जोडणे हि सयुक्तिक होणार नाही. अश्विनांबद्दलचे ऋग्वेदातील सर्व उल्लेख ऐतिहासिकांच्या मताच्या आधारे अधिक उपपन्न होऊ शकतील. कांही आधुनिक अभ्यासकांच्या मते मुळांत अश्विना ही एकच देवता असावी नंतर ह्या देवतेचे पर्यवसान जुळ्या भावंडात झाले असावे. शल्यकर्म व वैद्यकीय कौशल्य यांच्याबरोबरच परोपकार हे व्रत म्हणून स्वीकारणारे अश्विनीकुमार सदैव तरूण च भासावे यात नवल कसले ?

[ 'स्वामिन् तव शरणम्' जुलै-ऑगस्ट १९८७ ]

# ५. ऋग्‌वेदातील सरस्वती

वेदवाङ्मय हे जगातील प्राचीन वाङ्मय असून ते छंदोबद्ध व उस्फूर्त आहे हे सर्वमान्य आहे. परंतु यामुळे ऋचांचा निश्चित अर्थ ठरविण्याच्या बाबतीत पाश्चात्य व पौर्वात्य विद्वानांत मतभेद झालेले आहेत हे हि मान्य करावे लागेल. यास्काने 'निरूक्त' या आपल्या ग्रंथात 'इति आध्यात्मिकाः', असा उल्लेख केला त्यावरून काही ऋचांचा आध्यात्मिक अर्थ त्याकाळी हि लावला जात असे, असे दिसते. यास्काच्या या शब्दांवरून वेदाचा वाच्यार्थ लावणाऱ्या भाष्यकारांबरोबर त्याचा ध्वन्यर्थ स्पष्ट करणारे भाष्यकार होते हे उघड आहे. वेदांचे भाष्यकार सायण हि काही ठिकाणी निरनिराळे अर्थ देताना दिसतात. आधुनिक काळात योगी अरविंदांनी The Secret of the Veda या ग्रंथात वेदांचा आध्यात्मिक अर्थ लावून वैदिक देवतांचे प्रतीकात्मक अर्थ विशद करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या मताने असा अर्थ लावल्यामुळे वेदांत आपाततः दिसणाऱ्या विसंगती दूर होतात व वेदांचे खरे रहस्य जिज्ञासूंना उमगते. अर्थात यासाठी त्यांना वेदांच्या इतर भाष्यकारांच्या अर्थ लावण्याच्या पद्धतीवर प्रसंगी सोदाहरण टीका करावी लागावी यात नवल नाही. योगी अरविंदांचे मत अर्थातच सर्व आधुनिक वेदाभ्यासकांना मान्य होण्यासारखे नाही, परंतु त्यांनी दाखविलेली दिशा पूर्णपणे उपेक्षणीय आहे असे म्हणता येणार नाही.

वेदांतील 'सरस्वती' चा योगिराजांनी लावलेला अर्थ लक्षांत घेण्यासारखा आहे. 'सरस्वती' ही पंजाबातून वाहणाऱ्या सप्त सिंधूपैकी एक आणि यौगिक अर्थाने 'सरस्वती' म्हणजे 'वाहणारा जलप्रवाह असणारी' हे सर्वांना माहित आहे. परंतु अरविंदांच्या मताने ती निव्वळ भौतिक स्वरूपाची नदी नसून वाणीची देवता आहे; दिव्यस्फूर्ती (Divine Inspiration)आहे. ऋग्वेदांतल्या पहिल्या मंडळातील तेराव्या सूक्तातील नववी ऋचा सरस्वतीबरोबर इळा व भारती यांचा हि उल्लेख करते. 'इळा सरस्वतीमही तिस्त्रो देवीर्मयोभुवः बर्हिः सीदन्तवसृधः' भारतीचे दुसरे नांव 'मही'. याचा अर्थ 'मोठी विशाल' म्हणजे विशाल अशा सत्यापासून निर्माण झालेली. 'इळा' म्हणजे नुसती 'अन्नवती' नव्हे तर 'सत्ययुक्त शब्द असणारी' म्हणजे सत्यातून निर्माण होणारी प्रभावी वाणी. योगी अरविंदांच्या मताने सरस्वती, इळा आणि भारती ही एकाच सत्याची तीन भिन्न रूपे. 'सरस्वती' ही सत्याची 'श्रुति' इळा ही त्याची 'दृष्टी' आणि 'मही' ही त्याची व्यापकता. या तीन्हींमधून जो परमानंद पाझरतो त्याचा पाया सत्य किंवा सत्; आनंद हे त्याचे मंदिर. या कल्पनेची पुढील काळात एकात्मतेत परिणती झाली व स्मृतीत आणि पुराणात सरस्वती, भारती आणि इळा हे पर्यायवाची शब्द बनले.

वेदात वृत्राने पर्वतावर पाणी अडवून ठेवले व इंद्राने तो पर्वत फोडून वृत्रवध केला आणि पाणी मोकळे केले. यात हि सत्यात अडकून पडलेल्या अज्ञानाचा नाश करून परम सत्याने आपल्या दिव्य सामर्थ्याने स्फूर्तीना मुक्त केले व त्यांचा मुक्त संचार सुरू केला हा आध्यात्मिक अर्थ योगिराजांना दिसला. संत ज्ञानेश्वरांच्या भाषेत बोलायचे म्हणजे 'दुरितांचे तिमिर' नाहीसे झाले व 'विश्व स्वधर्मसूर्ये पाहो' मधले आनंदाचे साम्राज्य स्थापन झाले.

यात 'सरस्वती'चा म्हणजे अंतःस्फूर्तीचा सहभाग महत्त्वाचा. साहजिकच वेदांतील सात नद्या ही सत्यांतून स्फुरलेली सात तत्त्वे. प्रथम मर्त्य म्हणजे मानवी सत्य आणि अमर्त्य म्हणजे दैवी सत्य यांची निर्मिती. पहिल्यात पृथ्वी, शरीर आणि प्रकृती यांचा अंतर्भाव तर दुसऱ्यात स्वर्ग, मन व पुरूष यांचा सामावेश होता. पुढे या तीन्हीत हि लौकिक व दैवी असे द्विविध भेद झाले आणि पहिल्यात मन, प्राण आणि शरीर व दुसऱ्यात सत्, चित् आणि आनंद यांचा आविष्कार झाला. या सहांत पुढे 'विज्ञान' किंवा 'महस्' या संज्ञानी सूचित होणारे 'ऋतं बृहत्' मिळविले गेले आणि तत्त्वांची संख्या सात झाली. सत्याच्या या शक्ती मानवी जाणिवेत आणि विश्वांत हि प्रकट होतात. यांनाच पुराणात 'सप्तलोक' ही संज्ञा दिलेली आहे.

पावका नः सरस्वती राजेभिर्वजिनीवती । यज्ञं वष्टुं धियावसुः । म्हणजे पावन अशी सत्यज्ञानाने समृद्ध झालेली सरस्वती ज्ञानाच्या वैभवासह यज्ञात प्रकट होवो. ही सरस्वती सद्विचारांचे उद्बोधन करणारी (सुमतीनां चेतन्ती) आणि प्रातिभ ज्ञानांची प्रेरक (यज्ञं दधे सुनृतानां चोदयित्री) असल्यामुळे यज्ञाला आधार देते. ज्ञानाच्या सर्व व्यवहारात हिचा च विलास दिसतो (धियो विश्वा विराजति) आणि हिच्या इच्छाशक्तीच्या जाणिवेला जाग आणतो.

सरस्वती आणि तिच्याशी संबंध असणाऱ्या देवतांचे हे स्वरूप लक्षात घेतले म्हणजे नंतरच्या वाङ्मयात ही सरस्वती 'शारदा बनून साहित्याची, कलांची, अधिष्ठात्री देवता कशी बनली; इतकेच नव्हे साऱ्या विश्वाची आदिशक्ती म्हणून गौरवशालिनी कशी झाली हे उलगडते. संत ज्ञानेश्वरांनी हिला नमन करतांना.

आता अभिनव वाग्विलासिनी । जे चातुर्यार्थ कला कामिनी ते श्री शारदा विश्वमोहिनी नमिली मियां ॥

असे अन्वर्थक शब्द वापरावे आणि समर्थ रामदासांनी आपल्या 'शारदा-स्तवन' या समासात 'परमार्थाचे मूळ' म्हणून तिचा गौरव करावा यात नवल नाही. वेदकाळातील सरस्वतीची ही मराठी संत साहित्यांतील परिणती योगिराजांच्या दिव्यदृष्टीचा च एक परिपाक असे म्हणण्यास हरकत नाही.

[ 'स्वामिन् तव शरणम्' - मार्च-एप्रिल १९८८ ]

# ६. भगवद्गीतेची समन्वयवादी विचारसारणी

भारतवर्षाच्या वाङ्मयात गीतेचा महिमा असाधारण आहे याबद्दल दुमत होणार नाही. तत्त्वज्ञानपर ग्रंथात गीतेची प्रामुख्याने गणना होते. लोकप्रियतेच्या बाबतीत तर गीतेने सर्व उच्चांक मोडलेले आहेत. पंडितांपासून निरक्षरांपर्यंत, राजकारणी नेत्यांपासून सर्वसाधारण कार्यकर्त्यांपर्यंत, थोरांपासून लहानांपर्यंत सर्वांना च गीतेने मोहिनी घातलेली आहे. या दृष्टीने गीताग्रंथ म्हणजे 'या सम हा' असेच म्हणणे भाग आहे.

गीता हा वस्तुतः महाभारताचा एक भाग आहे; परंतु या ग्रंथाला स्वतंत्र व सर्वमान्य ग्रंथाचे भाग्य लाभलेले आहे. उपनिषदे व भगवान् व्यासांनी लिहिलेली ब्रह्मसूत्रे यांच्या बरोबरीने गीतेचा उल्लेख करण्याची परंपरा आहे. या तिघांना प्रस्थानत्रयी हे नांव मिळालेले आहे. पूज्यपाद शंकराचार्य, रामानुजाचार्य, वल्लभाचार्य, मध्वाचार्य यांच्यासारख्या दिग्गज आचार्यांनी हि गीतेचा पुरस्कार केला हे लक्षांत ठेवण्यसारखे आहे. कृष्णाने अर्जुनाला रणांगणावर केलेला हा उपदेश आजपर्यंत सर्व विचारवंताना प्रेरणादायक ठरावा हे एक आश्चर्य च नव्हे का ? विसाव्या शतकात आधुनिक महाराष्ट्राला चैतन्याचा, कर्मयोगाचा मंत्र शिकवण्यासाठी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांना हि गीतेवर भाष्य लिहावे असे वाटले व त्यांतूनच 'गीतारहस्या'चा जन्म झाला. महात्मा गांधींचा 'अनासक्तियोग' हि गीतेच्या चिंतनातून निर्माण झाला. भगतसिंगासारख्या क्रांतिकारकांनी हि हसतमुखाने मृत्यूला सामोरे जाताना गीताच समोर ठेवली. आचार्य विनोबांची 'गीताई' हि गीतेच्या अध्ययनांतून च निर्माण झालेली नाही का

या विस्मयकारक लोकप्रियतेचे मूळ निरनिराळ्या विचार-प्रवाहांचा समन्वय करण्याच्या गीतेच्या पद्धतीत आहे. सहिष्णुता व तज्जन्य समन्वय हे भारतीय संस्कृतीचे विलोभनीय वैशिष्ट्य आहे; विकोपाला जाणारा विरोध, असहिष्णुता व वैर यांचे तिला वावडे आहे. गीतेने संस्कृतीच्या या गाभ्याला हात घातला. ज्ञान व कर्म, प्रवृत्ती आणि निवृत्ती, तत्त्वज्ञान व व्यवहार यांची बेमालूम सांगड घालून दिली. श्रद्धेला ज्ञानाचे पाठबळ मिळवून दिले व ज्ञानाच्या तर्ककर्कशतेला भक्तीच्या आर्द्रतेची जोड मिळवून देऊन तत्त्वज्ञानाचे व मोक्षाचे दरवाजे आबालवृद्धांना उघडून दिले आणि 'स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम्' ही ग्वाही दिली.

पूर्वीपासून चालत आलेल्या ज्ञानमार्गाचे म्हणजेच ज्ञान प्राप्त झाल्यानंतर

सर्वकर्मत्याग करून संन्यास घेण्याच्या पद्धतीचे महत्त्व गीतेने मान्य केले. 'यदहरेव विरजेत् तदहरेव प्रव्रजेत्' या उपनिषेदोक्तीशी गीतेचा विरोध नाही; परंतु यासाठी लागणारी बौद्धिक उंची सर्वसाधारण व्यक्तीजवळ असणे शक्य नाही याची गीतेला जाणीव होती, म्हणून च गीतेने कर्मयोगाचा पुरस्कार केला. प्रत्येक व्यक्तीने आपापले कर्तव्य करीत रहावे, परंतु हे करताना फलाची आशा धरू नये, केवळ फायद्याच्या दृष्टीने बघू नये एवढे च गीतेचे म्हणणे. फलासक्तीमुळे च कर्म बंधनकारक होते म्हणून ती आसक्ती च काढून टाकली म्हणजे झाले. फलाशा धरू नये हे म्हणणे ठीक आहे, परंतु अशा अकरणात्मकतेपेक्षा करणात्मक पद्धती च जास्त उपयोगी ठरते हे जाणून गीतेने फलत्यागाला भगवदर्पणबुद्धीची जोड दिली; लोकसंग्रहाच्या सिद्धान्ताने त्यागाला भक्कम आधार मिळवून दिला. प्रत्येक व्यक्ती हा समाजचा घटक आहे व समाज क्रियाशील रहावा यासाठी प्रत्येकाने आपल्या परीने यत्न करीत राहणे म्हणजेच स्वकर्तव्य करीत राहणे आवश्यक च नव्हे तर अपरिहार्य हि आहे हे गीतेने दाखवून दिले. हाच गीतेचा लोकसंग्रहाचा सिद्धांत. ज्ञानी व्यक्तीने स्वतःचा उत्कर्ष साधीत असताना हि स्वकर्तव्ये केली नाहीत तर अज्ञांचा बुद्धिभेद होईल व संकर माजेल. या बाबतीत गीतेने दाखविलेली सामाजिक हिताची दृष्टी खरोखर वाखाणण्यासारखी आहे. कर्मयोगाचा हा मार्ग चोखाळण्यासाठी हि चांगले कोणते आणि वाईट कोणते, स्थायी कोणते आणि क्षणभंगुर कोणते हे ओळखण्याचा विवेक हवा, म्हणजे च ज्ञान हि हवे.

ज्ञानयोगाला लागणारी बौद्धिक उंची व कर्मयोगाला आवश्यक असणारी निष्कामता या दोन्ही गोष्टी एखाद्याला शक्य नसतील तरी देखील त्याने निराश होण्याचे कारण नाही; भक्तीच्या जोरावर हि त्याला तरून जाता येईल असे गीतेचे म्हणणे, भक्तीने किंवा अनन्यभावाने भगवंताला काही हि अर्पण केले तरी त्याचा स्वीकार केला जातो अशी गीतेची ग्वाही आहे.

पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।
तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ।

इतकेच नव्हे, तर 'ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम्' म्हणून भगवान् कृष्णाने त्यांना आत्मीय मानण्याची हमी दिलेली आहे. एखादा दुराचारी माणूस हि जर माझी म्हणजे भगवंताची भक्ती अनन्यभावाने करीत असेल तर तो लवकरच धर्मात्मा होतो, त्याला शाश्वत शांतीचा लाभ होतो. या बाबतीत 'न मे भक्तः प्रणश्यति' हाच अबाधित सिद्धांत आहे. म्हणून कृष्णाने अर्जुनाला 'सर्वगुह्यतमं वचः' सांगताना,

'मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरू

मामेवैष्यसि सत्यं ते प्रातिजाने प्रियोऽसि मे ।'
असे निःसंदिग्धपणे सांगून टाकले आहे.

तात्पर्य, 'न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते' असे म्हणणारा ज्ञानमार्गी गीतेला जसा पूज्य आहे तसाच 'वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः' असे मानणारा भक्त हि गीतेला अत्यंत प्रिय आहे. सर्व कर्मांचा भार परमेश्वरावर टाकून निव्वळ कर्तव्यबुद्धीने व निष्कामतेने सर्व कर्मे करीत राहणारा कर्मयोगी हा तर गीतेला अभिप्रेत च आहे. तिघांचे हि साध्य एक च आहे म्हणून च स्थितप्रज्ञ, त्रिगुणातील व भक्त यांची लक्षणे सारखी च आढळतात. जो मार्ग ज्याला पटेल, जो ज्याला रूचेल, त्याने तो चोखाळावा.
'रुचीनां वैचित्र्यात् ऋजुकुटिलनानापथजुषां
नृणामेको गम्यस्त्वमसि पयसामर्णव इव'
या समन्वयवादी विचारसरणीचा गीतेने मोठ्या आकर्षक पद्धतीने पुरस्कार केला व म्हणून च तिची लोकप्रियता शुक्ल पक्षांतील चंद्राप्रमाणे सतत वाढत राहिली यात शंका नाही. गीता ज्या काळी लिहिली त्या काळी वैदिक धर्माच्या अनुयायांना अशा रीतीने एकत्र आणून एकसंध अशी फळी उभी करण्याची जरूर विचारवंताना भासत असावी व गीतेकरवी हे संघटनात्मक कार्य साध्य झाल्यामुळे हि तिचे माहात्म्य प्रस्थापित झाले असावे असे दिसते.

[ जीवन-विकास डिसेंबर १९६७ ]

# ७. कविकुलगुरू कालिदास व त्याचा प्रभाव

कालिदास भारतीय साहित्याचा मानबिंदू आहे. त्याच्या कविकुलगुरूत्वाविषयी मतभेदाला जागा नाही. भारतीय परंपरेने त्याला कविता-कामिनीचा विलास अशी सार्थ पदवी दिली व गटे, चेझी, मोनियर विल्यम्स, विल्सन सारख्या पाश्चात्य पंडितांनी त्याच्या कवित्वाची मुक्तकंठाने प्रशंसा करून जगाच्या कविमंडळात त्याला मानाचे पान दिले. ऋतुसंहार व मेघदूत यांसारखी खण्डकाव्ये व कुमारसंभव आणि रघुवंश यांसारखी महाकाव्ये निर्माण करणाऱ्या या सरस्वतीच्या वरद पुत्राने 'मालविकग्निमित्र' 'विक्रमोर्वशीय' व 'शाकुंतल' ही नाटके लिहून वाचकांना आपल्या अष्टपैलू प्रतिभेचा यथार्थ प्रत्यय आणून दिला. साहित्याच्या क्षेत्रात इतिहास निर्माण करणाऱ्या या अद्वितीय कलावंताच्या जीवनाचा इतिहास मात्र अजून हि अज्ञात च आहे याची खरोखर खंत वाटते. अलौकिक यश मिळवणाऱ्या व्यक्तींभोवती साहजिकच दंतकथांचे वलय निर्माण होते व तसे कालिदासाच्या बाबतीत झाले हि परंतु त्यांच्यावर विश्वास ठेवणे शक्य नसल्यामुळे कालिदासाच्या साहित्यावरून त्याच्या व्यक्तिमत्वाची ओळख करून घ्यावी लागते.

समृद्धीच्या व संपन्नतेच्या पार्श्वभूमीवरच कालिदासाचे साहित्य निर्माण झाले यात शंका नाही. त्याच्या वाङ्मयात निर्वेध कलाविकासाचे आणि उन्नत सामाजिक जीवनाचे प्रतिबिंब उमटलेले आहे. यावरून आणि त्याच्या कलाकृतीत सापडणाऱ्या राजकीय उल्लेखांवरून गुप्तराजांच्या किंवा वाकाटक राजांच्या दरबारात कालिदासाला मानाचे स्थान मिळाले असावे असे म्हणता येईल. उज्जयिनीबद्दल कालिदासाला विशेष प्रेम वाटत असावे असे मेघदूतावरून दिसते. त्याच्या काव्यात व नाटकात वेद, उपनिषदे, गीता, रामायण, महाभारत, भासाची नाटके यांसारख्या प्राचीन ग्रंथांबरोबर सहा दर्शने, वैद्यकशास्त्र, संगीत, नृत्य, चित्र इत्यादींचे जे मार्मिक उल्लेख जागोजाग येतात त्यावरून त्याला तत्कालीन नागर संस्कृतीचा अनुपम भाष्यकार असे म्हणण्यास मुळीच हरकत नाही. उत्तम कलावंत असल्यामुळे कालिदासाच्या पाण्डित्याला बोजडपणाचा स्पर्श झालेला नाही. किंबहुना पाण्डित्य व अभिजात रसिकता यांचा मनोज्ञ संगम झाल्यामुळे कालिदासाच्या लेखनाला आगळेच तेज चढलेले आहे हे कोणाला हि मान्य करावे लागेल.

जीवनावर मनापासून प्रेम करणाऱ्या व जीवनाचा आनंद मनसोक्तपणे अनुभवणाऱ्या कालिदासाच्या कलाकृतीत स्वाभाविकपणे शृङ्गाराला प्राधान्य आहे. परंतु शृङ्गाराची आवड सौंदर्यदृष्टीतूनच निर्माण झाल्यामुळे प्रमाणबद्धता

व संयम यांचा हि त्याने विलोभनीय अविष्कार केलेला आहे व स्त्री-सौंदर्याचे चित्रण करताना आदर्शाकडे डोळेझाक करण्याचा अविचार हि त्याने केलेला नाही हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. 'गृहिणी सचिवः सखी मिथः प्रियशिष्या ललिते कलाविधौ' असे इंदुमतीविषयी म्हणणारा अज व अजाणता अव्हेर केलेल्या शकुंतलेसमोर 'ज्यांच्या मनाला भुरळ पडलेली असते त्यांची शुभ गोष्टीबाबत अशीच विपरीत बुद्धी बनते' असे म्हणून आपली चूक कबूल करणारा दुष्यंत रंगवून कालिदासाने वाङ्मयात स्त्रीला पतीबरोबरचे स्थान देण्याचा प्रयत्न केलेला आहे हे विसरणे योग्य होणार नाही. रघुवंशातील राजांच्या लोकोत्तर गुणांचे वर्णन करताना कालिदासाने केलेली शब्दयोजना आधुनिक काळात नेतृत्वाची आकांक्षा बाळगणाऱ्यांनी हि आपल्या हृदयावर कोरून ठेवण्यासारखी आहे. खरे म्हणजे रघुवंशीय राजांच्या वर्णनात समर्पित जीवनाची मूल्ये च कालिदासाने लिपीबध्द करून ठेवली आहेत.

निसर्गप्रेम हे कालिदासाचे विलोभनीय वैशिष्ट्य. ऋतुसंहारात सहा ऋतूंचे वर्णन करणारा कालिदास मेघदूतात यक्षपत्नीच्या भावनांना निसर्गाची हळूवार साथ देतो व रघुवंशात एकदा रघूच्या दिग्विजयाच्या निमित्ताने आणि नंतर पुष्पक विमानात बसून अयोध्येला परतणाऱ्या रामाने सीतेसाठी परिचित स्थलांच्या निर्देशाच्या वेळी संपूर्ण भारताचे दर्शन घडवतो. कालिदासाच्या शाकुंतलात तर मानव व निसर्ग यांचे जे उत्कृष्ट तादात्म्य झालेले आहे त्याला भारतीय साहित्यात तोड नाही. याशिवाय इतरत्र पुष्पलतांचे, पशुपक्ष्यांचे, आकाशातील उड्डाणाचे व सृष्टीतील नादांचे आणि स्पर्शाचे कालिदासाने जे मार्मिक वर्णन केले आहे त्यावरून त्याची निसर्गप्रीति ही सांकेतिक नसून अस्सल आहे असे पटल्यावाचून रहात नाही.

शैलीकार म्हणून कालिदास हा निर्विवादपणे भारतीय कवींचा मुकुटमणी आहे. गांभीर्य आणि ओघ, नागरी डौल आणि पारदर्शक स्वच्छता हे गुण कालिदासाच्या शैलीत एकवटलेले आहेत. अंगभूत लवचिकपणामुळे कालिदासाची शैली विविध प्रसंगाना अनुरूप असा साज सहजपणे घेऊ शकते. व्यक्ति व निसर्ग यांच्यामधील सौंदर्य अचूकपणे व मोजक्या शब्दांत टिपण्याचे तिचे सामर्थ्य वाखाणण्यासाराखे आहे. या जोरावर कालिदासाने उपमेवर आपला कायमचा ठसा उमटवून टाकला. इंदुमतीच्या स्वयंवरात अन्य राजाना मागे टाकून पुढे जाणाऱ्या इंदुमतीला 'संचारिणी दीपशिखा' म्हणून कालिदासाने 'दीपशिखा कालिदास' ही पदवी मिळविली. 'भिन्नरुचिर्हि लोकः' , अतिस्नेहः पापशङ्की', 'भावस्थिराणि जननान्तरसोहृदानि', 'क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते', मूढः परप्रत्ययनेयबुद्धिः,' 'कामी स्वतां पश्यति,' 'बलवदपि शिक्षितानामात्मन्यप्रत्ययं

चेतः,' 'याच्ञ्या मोघा वरमधिगुणे नाधमे लब्धकामा' यांसारख्या अर्थगर्भ व सुटसुटीत सूक्ती या प्रतिभाशाली कवीच्या कलाकृतीत सर्वत्र विखुरलेल्या आढळतात. वृत्तांचा किंवा छंदाचा सुजाण उपयोग करून त्याने आपल्या काव्याला ओघ किंवा वेग मिळवून देण्यात विलोभनीय यश मिळवले. शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध या मनुष्याच्या मूलभूत संवेदनांवर आधारलेली कोमल प्रतिमाने कालिदासाने 'अनाघ्रातं पुष्पं.....' या शाकुंतलातील एका श्लोकात मोठ्या कलात्मक पध्दतीने साकार करून टाकली.

आशय व शैली या दोन्ही दृष्टींनी संस्कृत साहित्यावर अनुपम साज चढविणाऱ्या या भाग्यशाली नाटककाराच्या 'शाकुंतल' या कृतीच्या अनुवादामुळे च भारतीय साहित्याची थोरवी प्रथम पाश्चात्यांना कळली. हे ऋण भारतीयांना विसरता येणार नाही. अशा महान कवीचा प्रभाव नंतरच्या कवींवर व साहित्यावर पडावा यात नवल कसले ? इसवी सनाच्या सहाव्या शतकापासून आजपर्यंतच्या प्राचीन व अर्वाचीन कवींनी कालिदासावर स्तुतिसुमनांचा वर्षाव करावा हे हि स्वाभाविक च आहे परंतु यापेक्षा या कवीच्या काव्यांतील कल्पनांचे व वर्णित प्रसंगांचे अनुकरण करण्याचा मोह नंतरच्या कवींना व्हावा हे कालिदासाच्या श्रेष्ठतेचे खरे गमक आहे. या अनुकरणाचा प्रारंभ हि या कवीच्या मृत्यूनंतर ताबडतोब म्हणजे इसवी सनाच्या पांचव्या शतकातच दिसावा, हा योग अद्‌भुत च नव्हे का ? मालव वर्ष ५२९ म्हणजे ईसवी सन ४७३-७४ च्या मंदसोर येथील शिलालेखात वत्सभट्टीने.

चलत्पताकान्यबलासनाथान्यत्यर्थशुक्लान्यधिकोन्नतानि ।
तडिल्लताचित्रसिताभ्रकूटतुल्योपमानानि गृहाणि यत्र ।

या आपल्या श्लोकांत कालिदासाच्या मेघदूतांतील 'विद्युत्त्वन्तं ललितवनिताः सेन्द्रचापं सचित्राः .....' या ६६ व्या श्लोकाचे अनुकरण केलेले स्पष्ट दिसते. या कवीच्या शिशिर ऋतूच्या वर्णनावर हि कालिदासाच्या ऋतुसंहारातील 'निरूद्ध वातायनमंदिरोदरं.....' या कवितेतील शब्दसंहतीचा प्रभाव पडलेला दिसतो. मौखरी राजा अनंगवर्मा याची एक प्रशस्ति गयेजवळील नागार्जुन टेकडी येथे सापडलेल्या ईसवी सनाच्या सहाव्या शतकातील एका शिलालेखात आढळून आलेली आहे. या प्रशस्तीत

यस्याहूतसहस्त्रनेत्रविरहक्षामा सदैवाध्वरैः ।
पौलोमीचिरमश्रुपातमलिनां धत्ते कपोलश्रियम् ।।

या श्लोकावर रघुवंशाच्या सहाव्या सर्गातील

क्रियाप्रबंधादयमध्वराणामजस्त्रमाहूतसहस्रनेत्रः
शच्याश्चिरं पाण्डुकपोललम्बान्मन्दारशून्यानलकांश्चकार ।

या श्लोकाची छाया आहे हे सहज लक्षात येण्यासारखे आहे. सातव्या शतकात लिहिल्या गेलेल्या भट्टिकाव्यात व रविकीर्तीने लिहिलेल्या ऐहोळ येथील प्रशस्तीत कित्येक ठिकाणी कालिदासाच्या काव्यमय कल्पनांचे अनुकरण करण्याचा सहेतुक प्रयत्न दिसून येतो. या शतकात कालिदासाची कीर्ती भारताबाहेरील देशांत हि पोचली होती असे काम्बोडियातील एका शिलालेखात कोरलेल्या भववर्म्याच्या दोन श्लोकांवरून दिसून येते. रघुवंशात रघूच्या दिग्विजयाचे वर्णन करताना कालिदास म्हणतो :-

दिशि मन्दायते तेजो दक्षिणस्यां रवेरपि ।
तस्यामेव रघोः पाण्डयाः प्रतापं न विषेहिरे ।।

यांतल्या कल्पनेचे च अनुकरण भववर्म्याच्या

शरत्कालाभिमानस्य परानावृततेजसः ।
द्विषामसह्यो यस्यैव प्रतापो न रवेरपि ।।

या ओळींत केले आहे. याचप्रमाणे

भयोत्सृष्टविभूषाणां तेन केरलयोषिताम् ।
अलकेषु चमूरेणूश्चूर्णप्रतिनिधिः कृतः

या श्लोकातील कल्पना मूळची कालिदासाची हे

यस्य सेनारजो धूतमुज्झितालङ्कृतिष्वपि ।
रिपुस्त्रीगण्डदेशेषु चूर्णभावमुपागतम् ।

या रघुवंशातील श्लोकावरून पटते.

संस्कृतमधील नाट्यसाहित्यावर तर कालिदासाच्या नाटकांची निर्विवादपणे फार मोठी छाप पडलेली आहे. भवभूतीसारख्या विख्यात नाटककाराने हि कालिदासाच्या नाटकातील घटनांचे व प्रसंगांचे अनुकरण करण्यात धन्यता मानली. मालतीमाधवाच्या नवव्या अंकातील माधवाच्या उन्मादाचे वर्णन विक्रमोर्वशीयम्च्या चौथ्या अंकातील पुरूरव्याच्या उन्मादाच्या वर्णनावर आधारलेले आहे व उत्तररामचरितातील कुशलवांना आपले पुत्र म्हणून ओळखण्याचा रामाचा प्रयत्न व त्यातील मानसशास्त्रीय पायऱ्या शाकुंतलातील प्रत्यभिज्ञानात्मक अंकावर च आधारलेल्या आहेत. कल्पनासादृश्यांच्या जोडीला 'गौरीगुरोः पावनाः' यासारख्या शब्दप्रयोगांचे सादृश्य हि आकस्मिक कसे मानता येईल ? इतके असून हि भवभूतीला निव्वळ अनुकरण करणारा असे म्हणता येणार नाही हे खरे; परंतु नंतरचे हर्ष, राजशेखर, बिल्हण यांसारखे नाटककार तर आपल्या कृतीत कालिदासाच्या नाटकाचे च बव्हंशी अनुकरण करताना दिसतात. प्रियदर्शिका, रत्नावली, कर्पूरमञ्जरी, कर्णसुंदरी या संस्कृत नाटकातील पात्रे मालविकाग्निमित्रातील अग्निमित्र, धारिणी, इरावती व मालविका या पात्रांशी

मिळती-जुळती आहेत. या दृष्टीने कालिदासाने एका नाटकसंप्रदायाला जन्म दिला असे च म्हटले पाहिजे.

नाट्यविश्वात जे स्थान मालविकाग्निमित्राचे तेच स्थान काव्यक्षेत्रात मेघदूताचे. मेघदूताने केवळ संस्कृत कवींवर च नव्हे तर भारतीय कवींवर च विलक्षण मोहिनी टाकली व यातून दूतकाव्याची अविच्छिन्न परंपरा सुरू झाली. मेघदूतानंतरच्या १५० वर्षांतच वायुदूत, भ्रमरदूत, हारीतदूत, चक्रवाकदूत इत्यादि काव्ये इतक्या मुबलक प्रमाणात निर्माण झाली की सहाव्या शतकातील संस्कृत साहित्यशास्त्रज्ञ भामहाला अशा काव्यांवर काहीशी कठोर टीका करावी लागली. या टीकेला न जुमानता अशा नकली काव्यांची निर्मिती होत राहिली व ईसवी सनाच्या अकराव्या शतकात ही संख्या ५० पर्यंत पोचल्याचे दिसते. मेघदूताप्रमाणे या काव्यांतील नायक-नायिका एकमेकांकडे प्रणयाचे संदेश पोचविण्यासाठी चंद्र, वारा यांसारखे अचेतन पदार्थ, किंवा शुक, कोकिळ, चातक, चक्रवाक यांसारखे पक्षी किंवा उद्धवासारखी व्यक्ती यांचा उपयोग करून घेताना दिसतात. या बहुसंख्य काव्यांत मेघदूताने प्रसिद्ध करून ठेवलेले मंदाक्रांता वृत्त च वापरलेले आहे हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. हिंदी काव्यात सूरदासाने 'भ्रमरगीत' लिहून उद्धवाकरवी कृष्णाचा संदेश गोकुळातील गोपींना पोचविला आणि आधुनिक हिंदी काव्यात अशा प्रकारच्या काव्यपरंपरेचा प्रारंभ करून दिला. अगदी अलीकडच्या काळात हि या परंपरेतली दोन संस्कृत काव्ये म्हणजे 'मेघप्रतिसंदेश' व 'मेघदौत्य'. यांपैकी पहिल्या काव्यात यक्षपत्नी आपल्या पतीला संदेश पाठविते व दुसऱ्यात ती अलकाधिपती कुबेराकडे मेघाकरवी विनंती करून आपल्या प्रियमताला शापातून मुक्त करण्यात यशस्वी होते असे वर्णन आहे.

मेघदूताच्या लोकप्रियतेचा परिणाम वैष्णव, जैन कवींच्या वर हि झालेला आहे व काही कवींनी आपल्या धर्मातील सिद्धांताचा प्रचार करण्यासाठी हि या कल्पनेचा उपयोग करून घेतला. वैष्णव कवींनी सीता व राम, गोपी व कृष्ण यांच्या प्रेमकथांवर दूतकाव्ये लिहिली. हे सूरदास व नंतरच्या कृष्णभक्तिपर कवींच्या कृतीवरून लक्षात येईल. ईसवी सनाच्या आठव्या शतकात जिनसेन नावाच्या जैन कवीने 'पार्श्वाभ्युदय' लिहिताना समस्यापूर्तीसाठी मेघदूताच्या प्रत्येक ओळीचा उपयोग केलेला आहे. मेघदूत हे वस्तुतः विप्रलम्भ शृङ्गार या या रसावर अधिष्ठित आहे व 'पार्श्वाभ्युदय' हे प्राधान्याने तीर्थङ्कराच्या चरित्रावर म्हणजे शांतरसावर आधालेले. साहजिकच लेखकाला अर्थाची फार ओढाताण करावी लागली. परंतु त्याबद्दल विषाद न मानता त्यात हि प्रसन्नता वाटावी इतकी मेघदूताची मोहिनी आहे हे मान्य केल्यावाचून गत्यंतर नाही. अगदी आधुनिक काळात रवीन्द्रनाथासारख्या भारतीय परंतु विश्वविख्यात कवीला ही

मेघदूताचे विशेष आकर्षण वाटत होते असे दिसते. सन् १८९० च्या ज्येष्ठ महिन्यातील एका दुपारी आकाश मेघांनी भरून आले, विजा चमकू लागल्या व मुसळधार पाऊस पडू लागला असताना त्यांनी आपल्या अभ्यासिकेत तालासुरावर मेघदूत वाचावयास सुरवात केली व यामधूनच कालिदासाविषयीच्या श्रद्धेने भारावलेल्या 'मेघदूत' या बँगाली कवितेचा जन्म झाला. कालिदासाला उद्देशून रवीन्द्रनाथानी लिहिलेल्या प्रश्नमालिकेची सुरवात :-

कबिवर, कबे कोन विस्मृत वरषे
कोन, पुण्य आषाढेर प्रथम दिवसे
लिखेछिले मेघदूत

या प्रश्नाने होते व

छिन्न करि कालेर बंधन
सेई दिन झरे पडेछिल अविरल
चिरदिवसेर जेन रूद्ध अश्रुजल
आर्द्र करि तोमार उदार श्लोकराशि

या भावपूर्ण शब्दांत ते प्राचीन कवीला श्रद्धांजली अर्पण करताना दिसतात. सन १९०६ मध्ये प्रकाशित झालेल्या त्यांच्या Shipwreck या प्रसिद्ध कादंबरीवर हि 'कुमारसंभवम्' या कालिदासाच्या महाकाव्याचा बराच प्रभाव पडलेला आहे. या कादंबरीत या काव्याचा सहेतुक उल्लेख हि आढळतो. इतकेच नव्हे तर प्रस्तुत कादंबरी म्हणजे शिवपार्वती यांच्या प्रणयकथेला च आधुनिक रूप देण्याचा रवीन्द्रनाथांचा एक प्रयत्न आहे असे वाटण्याइतपत साम्य Shipwreck व Birth of War God (म्हणजेच कुमारसंभवम्) यांमध्ये आहे असे काही अभ्यासकांचे म्हणणे आहे. अगदी आधुनिक काळांतील 'मेघदूतोत्तरम्' (लेखक श्री. भि. वेलणकर) सारखी गीतिकाव्ये हि कालिदासाच्या प्रभावाची द्योतक आहेत.

कालिदासाच्या ग्रंथाचा अनुवाद यूरोपातील भाषात झाल्यानंतर काही पाश्चात्य कवींवर हि या भारतीय कवीने मोहिनी टाकली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. शाकुंतलाच्या जर्मन अनुवादावर मोहित होऊन सुप्रसिद्ध जर्मन कवी गटेने सन १९७२ त काढलेले उद्‌गार तर प्रसिद्धच आहेत. या जर्मन कवीने 'Faust' या आपल्या जगविख्यात नाटकाची प्रस्तावना संस्कृत नाटकाच्या पद्धतीने लिहिलेली आहे. मेघदूतामुळे प्रभावित होऊन जर्मन कवि शिलरने Maria Stuart या आपल्या काव्यात मेघाकरवी कारागृही खितपत पडलेल्या स्कॉटलंडच्या राणीचा संदेश स्वदेशी म्हणजे स्कॉटलंडकडे पोचविलेला आहे. यावरून भारतीय संस्कृतीतील सामर्थ्याबरोबरच कोमलतेचा व संयमाचा प्रणेता

म्हणून कविश्रेष्ठ कालिदासाच्या कीर्तीबद्दल सोड्ढलाच्या उदयसुंदरी कथेतील
ख्यातः कृती सोऽपिच कालिदासः शुद्धा सुधा स्वादुमती चास्य
वाणीमिषाच्चण्डमरीचिगोत्रसिंधोः परं पारमवाप कीर्तिः ।

हे उद्‌गार सार्थ ठरलेले आहेत; किंबहुना ही कीर्ती चिरंजीव रहाणार याची खात्री पटते.

[ 'धर्मभास्कर' दिवाळी अंक १९७४ ]

३४५८
निबंध

# ८. चतुर व गुणशालिनी इंदुमती

कविकुलगुरू कालिदासाची काव्यसृष्टी म्हणजे एक अनुपम चित्रांचा संग्रह आहे. या संग्रहातील स्त्रीरत्ने तर एकमेकांशी जणू स्पर्धा करणारी आहेत. सौंदर्याच्या बाबतीत 'युवतिविषये सृष्टिराद्यैव धातुः' वाटणारी यक्षकांता, 'अध्वरस्येव दक्षिणा' प्रमाणे शोभणारी पतिप्राणा सुदक्षिणा, 'श्रुतस्य किं तत्सदृशं कुलस्य' या शब्दांत रामाला जाब विचारणारी तेजस्विनी सीता, मुळात कन्दुकक्रीडेने हि क्लान्त होणारी परंतु शंकरासारखा पति मिळविण्यासाठी निर्धाराच्या जोरावर तपश्चर्येत ऋषीना हि मागे सारणारी तपस्विनी पार्वती- ही सर्व चित्रे एकाहून एक वरचढ आहेत हे मान्य करावे लागेल. या सर्व चित्रांत विदर्भराजाच्या राजधानीत स्वयंवराच्या मंडपात देशोदेशींचे विख्यात राजे जमलेले असताना मंगल वाद्यांच्यामृदू व मंद्र संगीतासह पालखीतून थाटात प्रवेश करणाऱ्या लावण्यखनि इंदुमतीचे स्थान ही अविस्मरणीय आहे यात शंका नाही.

इंदुमतीचा स्वयंवर मंडपातील हा प्रवेशच मुळी *She came, she saw and she conquered* या स्वरूपाचा आहे. याचा परिणाम काय झाला हे कालिदासानेच सांगावे हे योग्य. इंदुमती सर्व राजांना 'विधातुः विधानातिशय' म्हणजे विधात्याची सर्वांत उत्कृष्ट, कलापूर्ण कृती वाटली व सर्व राजांच्या अंतःकरणांनी तिच्याकडे धाव घेतली. त्यांची पार्थिव शरीरेच तेवढी आसनावर राहिली ! हा श्लोक मुळातूनच वाचला पाहिजे :-

तस्मिन्विधानातिशये विधातुः
कन्यामये नेत्रशतैकलक्ष्ये ।
निपेतुरंतःकरणैर्नरेंद्राः
देहैः स्थिता केवलमासनेषु ।।

जो तो नृपती आपापले वैशिष्ट्य दाखवण्याकरता नाना तऱ्हेच्या प्रणयसूचक हालचाली करू लागला नव्हे त्याच्याकडून आपोआप तशा 'श्रृंगारचेष्टा विविधा बभूवुः', कालिदास त्यांना 'प्रणयाच्या अग्रदूती' म्हणतो. एका राजाने आपल्या हातातले 'लीलाकमळ' गरगर फिरवले. यातील अभिप्राय स्पष्ट करताना मल्लिनाथाने लिहिले, 'करस्थलीलारविन्दवत्त्वयाहं भ्रमयितव्यः', ह्या कमळाला मी जसा फिरवतो आहे तशी तू पण मला हातातले खेळणे करू शकशील.' हा आशय चतुर इंदुमतीला कळावा ही इच्छा. इंदुमती खरोखर च चतुर होती. इतक्या चंचल वृत्तीच्या राजाकडे पाहण्याचे सुद्धा कारण नाही असे तिने ठरवले. मल्लिनाथाच्या शब्दांत 'हस्तघूर्णकोऽयमलक्षणकः इतीन्दुमत्यभिप्रायः' दुसऱ्या राजाने खांद्यावरून सरकलेल्या आपल्या बाहुभूषणाला योग्य जागी ठेवण्यासाठी

आपले मुख जरा तिरपे करून उत्तरीयाने खांदा झाकून टाकला. ही हालचाल वस्तुतः 'मी तुला असे आलिंगन देईन' हे सुचविण्यासाठी होती परंतु चतुर इंदुमतीने 'उत्तरीयाने खांदा झाकण्याचा हा प्रयत्न म्हणजे काहीतरी शरीरातील वैगुण्य लपविण्याचा प्रयत्न आहे' असे ओळखून त्या राजाकडे पहायचे नाही अशी खूणगाठ बांधली. एकजण मुद्दामच शेजारच्या सिंहासनावर हात ठेवून आपल्या सुहृदाशी गुजगोष्टी करू लागला. 'अशा रीतीने मी तुझ्याशी प्रेमालाप करीन' असे त्याला सुचवायचे होते. इंदुमतीला ही भाषा समजली परंतु 'दुसरीकडे तोंड फिरविणारा हा 'न कार्यकर्ता' अशी तिने त्याची परीक्षा करून टाकली ! दुसऱ्या एका राजाने वस्तुतः न ढळलेल्या आपल्या मुकुटावरून मुद्दाम च हात फिरवीत फिरवीत आपले ऐश्वर्य दाखवून 'मुकुटाप्रमाणे मी तुला लीलेने मस्तकावर धारण करीन' असे सुचविले. चतुर इंदुमतीने 'आपल्याच डोक्यावर हात ठेवणारा हा अपशकुनी च' असे ठरवून त्याला टाळणे च योग्य ठरवले. त्यावेळच्या प्रसिद्ध राजांच्या सभेत घाबरून न जाता त्यांच्या प्रणयचेष्टांचे योग्य मूल्य ठरविण्यातले इंदुमतीचे चातुर्य प्रशंसनीय नाही असे कोण म्हणेल ?

प्रत्यक्ष स्वयंवराच्या वेळची इंदुमतीची वागणूक मात्र तिच्या मार्मिकतेची, धैर्याची व राजकन्येला शोभणाऱ्या संयमाची ओळख पटवणारी आहे. तिची सखी सुनंदा ही अत्यंत हुषार असावी यात कालिदासाच्या वाचकांना आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. स्वयंवरासाठी उपस्थित झालेल्या प्रत्येक विवाहेच्छू राजाचे मोजक्या शब्दात चित्र रेखाटण्याचे काम तिने मोठ्या यशस्वीपणाने केले आहे. प्रत्येक राजाचे मोठे भुरळ पाडणारे वर्णन करून सुनंदेने कोठल्या हि राजावर तसा अन्याय होऊ दिला नाही; परंतु इंदुमती ही सुद्धा देखाव्याला किंवा बाह्य वैभवाला भुलणारी नाही. एखादा राजा गुणवान असला तरी मनाला येत नसला तर त्याला वरण्यात अर्थ नाही हे तिला माहित आहे. मगध देशाच्या राजा परंतपाचे च उदाहरण घेण्यासारखे आहे. सुनंदेने त्याचे वर्णन करताना म्हटले 'हा राजा खरोखरच परंतप म्हणजे शत्रूंना ताप देणारा परंतु स्वतःच्या प्रजाजनांचे रंजन करून कीर्तिशाली ठरलेला आहे. शरणागतीचे रक्षण करणाऱ्या या राजामुळेच पृथ्वी 'राजन्वती' (चांगल्या राजाने युक्त) मानता येईल. याने केलेल्या यज्ञांची तर अविच्छिन्न मालिका च प्रसिद्ध आहे; प्रत्येक यज्ञात इंद्राच्या अनिवार्य उपस्थितीमुळे इंद्राणीस दीर्घकाळ विरह सोसावा लागतो. याचे पाणिग्रहण केलेस तर तू पुष्पपुरात प्रवेश करताना तेथील अंगनांच्या नेत्रोत्सवाला कारणीभूत होशील'' हे वर्णन ऐकून हि आपल्या हातांतली पुष्पमाला किंचित् हलवीत काही न बोलता (अभाषमाणा) त्याला आदराने प्रमाण केला (ऋजुप्रणामक्रिययैव) ती पुढे गेली. यात इंदुमतीची गुणग्राहकता हि दिसली व स्वतंत्र प्रज्ञा हि कळली.

पुढच्याच अंगराजाच्या वर्णनात हि सुनंदेने बहार केलेली आहे. सुनंदा म्हणते, ''प्रत्यक्ष सुराङ्गना देखील याच्या यौवनश्रीची अपेक्षा ठेवतात. उत्तम हस्तिशिक्षकांनी शिकवलेल्या हत्तीमुळे याच्या वैभवाला खऱ्या अर्थाने 'गजान्त लक्ष्मी' हा शब्द वापरता येईल. पृथ्वीवर राहून हि हा इंद्रपदाचा उपभोग घेतो. कधीच एकत्र न रहाणाऱ्या श्री व सरस्वती दोन्ही याच्याजवळ गुण्यागोविंदाने नांदतात. कान्ति व सुनृता वाणी यांच्या जोरावर तूच त्यांची तिसरी सहचरी होण्यास योग्य आहेस'' यावरून अंगराजाच्या गुणवत्तेबद्दल शंका रहात नाही. इंदुमतीला हि गुणांची पारख नव्हती असे नव्हे, परंतु इंदुमतीने सुनंदेला 'पुढे चल' असे सांगितले कारण एकच 'भिन्नरुचिर्हि लोकः'

**दीपशिखेप्रमाणे चमकणारे लावण्य**

अशा रीतीने सुनंदेने अनेक गुणवान् वैभवशाली राजांचा प्रभावी भाषेत परिचय करून दिला; नाना प्रकारची प्रलोभने दाखवली. अवंतिनाथाच्या बाबतीत 'शिप्रा नदीच्या तरंगावरील वाऱ्याच्या झुळकीने कंपित होणाऱ्या उद्यानात विहार करण्याची संधी मिळेल' असे सांगतिले, प्रतीप नृपतीची राणी झालीस 'तर माहिष्मती नगरीत जाऊन राजवाड्याच्या गवाक्षांतून नर्मदेचा रम्य प्रवाह पाहण्याचे भाग्य लाभेल', शूरसेनाधिपती सुषेणाचा स्वीकार केलास तर 'कुबेराच्या चित्ररथ उद्यानासारख्या वृंदावनात मृदुप्रवाळांनी रचलेल्या पुष्पशय्येवर यौवनश्रीचा उपभोग घेता येईल व गोवर्धन पर्वताच्या कुशीत नृत्य पाहून मन रिझविता येईल,' कलिंगनृपती हेमांगदा चा पति म्हणून अंगीकार केलास तर 'तालवृक्षाच्या संगीताने गुणगुणाऱ्या समुद्रकिनाऱ्यावर तुला सुखाने विहार करता येईल' पांड्यराजाची राणी झालीस तर 'मलय पर्वतावरील रम्य स्थळे तुझीच होतील' या व इतर गोष्टी ऐकून इंदुमतीने आनंद व्यक्त केला पण ती भाळली हि नाही आणि पाहिजे ते मिळेपर्यंत आपल्या मनाची चंचलता हि तिने दाखवली नाही. ज्या ज्या राजाजवळ ती लावण्याने चमकणारी इंदुमती जात असे त्या त्या राजाचा चेहरा तात्पुरता स्वीकाराच्या आशेने प्रफुल्लित होत असे; परंतु 'अन्यवधूर्मवित्री' अशी ती त्याला टाळून पुढे गेली की त्याचा चेहरा स्वाभाविकपणे काळवंडून जात असे. हे चित्र वाचकांच्या पुढे उभे करण्यासाठी कालिदासाने इंदुमतीची तुलना 'संचारिणी दीपशिखे'शी केलेली आहे. मशाल जवळ आली की रस्त्यावरील प्रासाद प्रकाशात न्हाऊन निघावे व मशाल पुढे गेली की ते पुन्हा अंधारात गुरफटून जावे तसे राजांचे होत असे. या उत्कृष्ट उपमेमुळे कालिदासाला 'दीपशिखा कालिदास' असे नाव मिळाले, वस्तुतः कालिदासाने इंदुमतीच्या चमकत्या लावण्याला दिलेला हा शब्दरूपी अर्घ्य आहे असे म्हटले पाहिजे.

### मणिकांचनयोग

शेवटी सुनंदा व इंदुमती रघुपुत्र अजाजवळ आल्या. सुनंदेने इंदुमतीच्या वृत्तीत पडलेला फरक ओळखला; प्रफुल्ल सहकाराजवळ आल्यानंतर षट्पदश्रेणी दुसऱ्या वृक्षाकडे जाण्याची इच्छा कशी ठेवील ? सुनंदेने अजाच्या परिचयात मुळीच कसर ठेवली नाही. अजाच्या सुप्रसिद्ध कुळाचे, दिलीप व रघु यांच्या दिगंत पराक्रमाचे वर्णन करून सुनंदा म्हणाली, ''चांगल्या कुळातल्या रूपवान् गुणी पण विनयी अशा तुला सर्वतोपरी अनुरूप असलेल्या त्या राजपुत्राला तू वर आणि अशा रीतीने 'रत्नं समागच्छतु कांचनेन' ही म्हण खरी ठरू दे.'' इंदुमतीला हे पटले आणि 'लज्जां तनूकृत्य', राज्यकन्येने खऱ्या आवडीने चमकणारा कटाक्ष टाकला व त्याला माळ घालताना ती रोमांचित झाली. स्वयंवर झाले. सुनंदाने जाणूनबुजून च 'आर्ये, आम्ही आता जातो' असे म्हटले व इंदुमतीने मैत्रीच्या रागाने तिच्याकडे पाहिले. 'वधूरसूयाकुटिलं ददर्श' इंदुमती व अज यांचा जोडा खरोखर शोभत होता हे 'शशिनमुपगतेयं कौमुदी मेघमुक्ता जलनिधिमनुरूपं जन्हुकन्यावतीर्णा' या नागरिकांच्या उद्‌गारावरून च स्पष्ट होते. विशेषतः नगरप्रवेशाच्या वेळी पौरवधूंनी त्या दोघांना पाहून 'हे दोघे रति व मदन असले पाहिजेत नाहीतर एवढ्या हजारो राजपुरुषातून (राज्ञां सहस्त्रेषु) आमच्या राजकन्येने नेमक्या ह्याला च कसे निवडले (गतेयमात्मरूपामेव)'' असे म्हणावे हे रसिकांना जास्त आवडेल. प्रत्यक्ष विवाहाच्या वेळी मात्र ही चतुर राजकन्या 'लज्जावती' च दिसली हे कालिदासाचे म्हणणे योग्य च नव्हे का ?

इंदुमतीचा विवाह पार पडला हे खरे, परंतु अजाच्या यशामुळे संतापलेल्या राजांनी राजधानीला परतत असताना त्याच्यावर हल्ला केला, तुंबळ युद्ध झाले. 'तुल्यप्रतिद्वंद्वि बभूव युद्धम्' आणि इंदुमतीला आपल्या योग्य निवडीचा पुरावा मिळाला. शूर अजाने सर्व राजसमूहाचा पराभव केला परंतु त्याचे प्राणहरण न करता त्यांच्या रथाच्या ध्वजावर 'यशो हृतं सम्प्रति राघवेण न जीवितं वः कृपया' हे शब्द अंकित केले व प्रिय पत्नीला 'इतःपरानर्भकहार्यशस्त्रान् पश्य' अशी वीराला शोभणारी विनंती केली. रथांच्या घोड्यांच्या टापांनी उडविलेल्या धुळीमुळे केस भुरकटल्यामुळे 'समरविजयलक्ष्मी' च भासणाऱ्या इंदुमतीच्या आनंदाला उधाण आले परंतु लज्जाजन्य संकोचामुळे तिने आपल्या चतुर सखी करवी च त्याचे अभिनंदन केले. 'हृष्टापि सा ह्रीविजिता न साक्षाद्वाग्भिः सखीनां प्रियमभ्यनन्दत्' यातील मर्म सहज लक्षात येईल. इंदुमतीच्या आयुष्यातील हा 'सुवर्णक्षण' च म्हटला पाहिजे.

### सम्राज्ञी इंदुमती

अयोध्येला पोचल्यानंतर ताबडतोब तिच्या सासऱ्याने म्हणजे रघूने

वानप्रस्थाश्रम स्वीकारल्यामुळे तिच्यावर सम्राज्ञीपदाची जबाबदारी येऊन पडली व तिने ती कशी समर्थपणे सांभाळली याचे प्रत्यंतर तिच्या मृत्यूनंतर अजाने, तिच्या पतीने केलेल्या विलापावरून येते. तिने आपल्या पतीला ऋषिऋण व देवऋण फेडण्यास अनमोल मदत केली व दशरथासारख्या सुलक्षणी पुत्राला जन्म देऊन त्याचे वैवाहिक जीवन पूर्णपणे यशस्वी केले. तिचा मृत्यू मात्र अकाली च झाला असे म्हटले पाहिजे. एके दिवशी पतीबरोबर नंदन उद्यानात बसली असताना आकाशातून नारदांच्या हातातली स्वर्गीय फुलांची सुवासाने दरवळणारी माळ वाऱ्याच्या झोतामुळे निसटून तिच्या उरोजांवर पडली व तिला पाहून तिने जे डोळे मिटले ते कायमचे ! अजाच्या आश्चर्याला व शोकाला सीमा राहिली नाही. त्याचे अश्रू आवरता आवरेनात. आपल्या प्रिय पत्नीच्या निष्प्राण देहाला कवटाळून अजाने आपल्या शोकाला वाट करून दिली. रडता रडता तो इंदुमतीचे जे गुण आठवीत असे त्यावरून वैवाहिक जीवनातील इंदुमतीच्या अनमोल कर्तृत्वाची यथार्थ प्रचीती येते. अज म्हणतो 'इंदुमती, तुझ्या कोमल शरीराच्या कोवळ्या पल्लवांची व फुलांची शय्या सुद्धा बोचत असे. ते तुझे कोमल अंग मी चितेवर कसे ठेवू ? हा आम्रवृक्ष, ही फलिनी वेल यांचे जोडपे तूच ठरवलेस अन् त्यांचा विधीपूर्वक विवाह साजरा करण्यापूर्वीच तू कशी ग निघून गेलीस ? हा अशोक तूच लावलास - आता तो आपली तांबडी फुले भरपूर देऊ लागलेला आहे त्यांचा उपयोग तुझे केस माळण्यासाठी व्हायचा; आता तुझ्या निष्प्राण देहाला सजविण्यासाठी त्यांचा उपयोग कसा करू ? तू आणि मी मिळून तुझ्या निश्वासांचे अनुकरण करणाऱ्या बकुळीच्या फुलांची माळ करणार होतो; ती पूर्ण होण्यापूर्वीच तू कशी ग निघून गेलीस ?....... हे पहा तुझे मुख, त्याच्यावरचे कुरळे केस मधूनच वाऱ्याने हलतात अन् तू जिवंत आहेस असा भास होतो - परंतु आता त्यांतल्या मधुर कथा कायमच्या संपल्या यावर विश्वास तरी कसा बसावा ? ...... अजूनपर्यंत तू माझी अवज्ञा कधी केली नाहीस आणि आज मात्र माझी अनुज्ञा घ्यावी असे सुद्धा तुला वाटले नाही; इतका का मी अयोग्य ठरलो ? मी मनाने सुद्धा तुला न आवडेल असे काही केले नाही ? आणि तरीसुद्धा मला टाकून गेलीस ! अग, मी पृथ्वीपति आहे खरा परंतु तो नावाने - 'खरी प्रीती तुजवरती' ? तू गेल्यामुळे धैर्य खचले, संगीत विरून गेले, जीवनातला आनंद खरं म्हणजे जगण्याची उमेद च नाहीशी झाली. तुला कंटाळा कशाचा आला ? सुखदुःखात सहभागी होणाऱ्या तुझ्या मैत्रिणी आहेत, प्रतिपदेच्या चंद्राप्रमाणे शोभणारा असा तुझा मुलगा आहे आणि मी तर तुझ्याशी पूर्णपणे एकरूप झालेलो आहे. अन् तरीसुद्धा आम्हाला एकदम सोडून जाण्याचा हा निष्ठुरपणा तुला कसा ग करता आला ? कठोर मृत्यूने (करूणाविमूखेन मृत्युना) तुला म्हणजे माझ्या प्रेयसीला माझ्यापासून हिरावून नेले हे खरं नव्हे; त्याने माझी गृहिणी, माझी खरी

सल्लागार, माझी एकांतातली एकमेव सखी, माझी कलाविषयांतील शिष्या या सर्वानाच एका तडाख्यात नाहीसे, केले म्हणून च मी म्हणतो 'मृत्यूने माझे काय बाकी ठेवले ? 'करूणाविमुखेन मृत्युना हरता त्वां वद किं न मे हृतम्'

अजाच्या या उद्गारातून इंदुमतीचा हाळुवार स्वभाव, तिची कलाप्रियता, तिची सौन्दर्यदृष्टी, तिचे पतिप्रेम, तिचे चातुर्य या गुणांवर तर प्रकाश पडतो च. परंतु कर्तृत्ववान् पती जिच्याबद्दल
'गृहिणी सचिवः सखी मिथः प्रियशिष्या ललिते कलाविधौ'
असे उद्गार मनापासून काढू शकतो ती चतुर व गुणशालिनी इंदुमती म्हणजे खरोखरच आदर्श स्त्री नव्हे का ? तिच्या सर्वार्थाने यशस्वी जीवनावर मृत्यूने आकस्मिक घाला घातला व त्यामुळे तर तिचे चित्रण मनाला अत्यंत चटका लावून देणारे ठरते. *Our sweetest songs are those that tell of saddest thoughts* यांतील मर्म हि माझ्या मताने हेच.

[ 'पौरूष' - वर्षारंभ अंक २०-३-१९७७ ]

# १. कालिदासाच्या काव्यातील स्त्री-सृष्टी

**कविकुलगुरू** कालिदास हा भारतीय साहित्याचा मानबिंदू आहे. त्याच्या 'अभिज्ञान शाकुन्तल' या नाटकाच्या सर विल्यम जोन्सकृत अनुवादाने पाश्चात्य जगाचे लक्ष प्राचीन संस्कृत वाङ्मयाच्या गुणवत्तेकडे प्रथम लागले आणि यातुनच त्यांच्या भारतीय साहित्याच्या डोळस अध्ययनाला प्रारंभ झाला हे या कवीच्या त्या अजोड कृतीचे भारतावरील अविस्मरणीय ऋण. प्रतिभा, आशय व कला या तीन गुणांच्या जोरावर कालिदासाने काव्य व नाट्य या दोन्ही क्षेत्रात चिरंजीव यश मिळविले याबद्दल दुमत संभवत नाही. 'अस्मिन्नतिविचित्रकविपरम्परावाहीनि संसारे कालिदासप्रभृतयो द्वित्राः पञ्चशः वा महाकवय इति गण्यन्ते' हे मार्मिक संस्कृत काव्य-समीक्षक आनन्दवर्धनाचे म्हणणे सर्व मान्य च ठरेल. या चिरंजीव कीर्तीत कालिदासाने रंगविलेल्या स्त्री-पुरूषांच्या स्वभाव- रेखाटनाचा फार महत्त्वाचा वाटा आहे. त्याच्या पुरूषपात्रांत निरनिराळ्या स्वभावाचे ऋषी, ऋषितुल्य नृपती, कलानिपुण परंतु मत्सरी शिक्षक, प्रेमाकुल नायकांचे विदूषकांसारखे पारंपरिक मित्र, पोलीस अधिकारी आणि तोंडपुजे सेनापती अशा निरनिराळ्या थरांतल्या व्यक्ती भेटतात हे खरे परंतु यापेक्षा हि या कवीने रंगविलेली स्त्रीपात्रे अभ्यासकांच्या मते अधिक आकर्षक आहेत. या स्त्री-चरित्रांवरून वैभवाची पार्श्वभूमी लाभलेल्या रसिकाग्रणी परंतु संयमी कविश्रेष्ठाच्या स्त्रीविषयक संकल्पनेची प्रचीती येण्यास मदत होते हे मान्य करावे लागेल.

कालिदासाने रंगविलेल्या स्त्रीपात्रांत धारिणी, औशीनरी, सुदक्षिणा, इन्दुमती, इरावती, उर्वशी, यक्षपत्नी, पार्वती, सीता, शकुन्तला, मालविका, प्रियवंदा व अनसूया या तेराजणींना विशेष स्थान द्यावे लागेल. यात धारिणी, औशीनरी, सुदक्षिणा आणि काही प्रमाणात अनसूया या प्रौढ आणि गंभीर स्वभावाच्या स्त्रिया व बाकीच्या सर्व कलानिपुण आणि विलासी वृत्तीच्या तरुणी च ठरतील. या दृष्टीने कालिदासाच्या व्यक्तिचित्रणात मानवी जीवनातील सर्व भावनांना स्पर्श झालेला नाही ।हे स्पष्ट च आहे. अहंकार, महत्त्वाकांक्षा, सूडाची वृत्ती यांसारख्या भावनांनी ज्यांचे जीवन व्यापून टाकले अशा प्रकारची पुरूष-पात्रे हि कालिदासाच्या काव्य-नाटकात नाहीत, मग अशा तऱ्हेच्या स्त्रिया कशा आढळणार ? एकाच व्यक्तीच्या मनात सत्प्रवृत्ती व दुष्प्रवृत्ती यांच्यातला जोरदार झगडा चालू असतो ही वस्तुस्थिती हि कालिदासाच्या पात्रात दिसत नाही. राजाच्या हुकुमाची पर्वा न करता उच्च दैवी आदेश शिरोधार्य मानून भावाला सद्गती मिळावी म्हणून धडपड नव्हे प्राणार्पण करणारी 'अँटिगॉनी'

कालिदासाच्या स्त्रियांत आढळत नाही व 'इफिजिनिया इन औलिस' मधली देशाच्या हितासाठी स्वतःच्या पोटच्या मुलीचा हि बळी देणाऱ्या 'ॲमॅगेऑन' सारख्या स्त्रीचे हृदयंगम चित्र हि त्याने आपल्या वाचकांपुढे ठेवलेले नाही'. या दृष्टिकोणातून त्याने घडवलेले स्त्रीदर्शन एकांगी च ठरेल यात शंका नाही. बहुतेक पात्रे आदर्शाच्या स्वरूपात रंगविण्याची एकूण सर्व संस्कृत नाटकांची परंपरा हि याला थोडीशी जबाबदार आहे व म्हणून च व्यक्ती व समाज यांच्या संघर्षातून उत्पन्न होणाऱ्या सामाजिक व नैतिक प्रश्नांकडे लक्ष वेधण्याचे कार्य पाश्चात्यांच्या नाट्यकृतीत आढळते हे हि मान्य केले पाहिजे. तथापि साहित्यात आदर्श पात्रे रंगवू नयेत असा दण्डक घालणे जसे अयोग्य तसेच सामाजिक प्रश्नांची जाणीव साहित्यातल्या पात्रांत असली च पाहिजे असे बंधन घालणे हि अन्यायाचे. किंबहुना सामाजिक व नैतिक प्रश्नांची चर्चा करण्याच्या हेतूने नाटके लिहिणाऱ्या बर्नार्ड शॉने च एके ठिकाणी इब्सेनच्या 'ए डॉल्स हाऊस' सारख्या नाटकातील जिवंतपणा कालांतराने नाहीसा होईल परंतु शेक्सपियरच्या 'ए मिडसमर नाइटस् ड्रीम' सारख्या नाटकातील ताजेपणा कधी हि नाहीसा होणार नाही.' अशा आशयाचे उद्गार काढले हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. तात्पर्य, मानवाच्या जीवनातील चिरंजीव ठरणाऱ्या भाव-भावनांच्या प्रकर्षाच्या जोरावर नाट्य व काव्य सार्वकालीन आनंद देऊ शकतात हे मान्य केले म्हणजे कालिदासाच्या कृती आज हि वाङ्मयाच्या रसिकांना का रिझवू शकतात याचा उलगडा होतो.

सुरवातीला ज्या १३ स्त्रियांचा उल्लेख केला त्यांच्यात विविधता नाही असे मात्र म्हणता येणार नाही. धारिणी किंवा औशीनरी यांच्यातील गांभीर्य, इरावतीची स्त्रीसुलभ ईर्ष्या, मालविकेची मुग्धता, उर्वशीची विलासलोलुपता, पार्वतीची उग्र साधना, शकुन्तला व सीता यांचा प्रखर स्वाभिमान, सुदक्षिणेची कर्तव्यपरायणता आणि प्रियंवदेची परिहासप्रियता हे मनुष्यस्वभावात आढळणाऱ्या वैचित्र्यपूर्ण विलोभनीयतेचे च अविष्कार नव्हेत का ?

सोयीसाठी का होईना, कालिदासाच्या काव्यातील नायिकांकडे प्रथम वळले तरी हि त्याचे नारी-विश्व म्हणजे लोभस व्यक्तिचित्रांचा संग्रह आहे हे मान्य करावे लागते. सौन्दर्याच्या बाबतीत 'युवतिविषये सृष्टिराद्यैव धातुः' ठरणारी यक्षकान्ता ही जात्या पद्मिनी आहे परंतु,

उष्णोश्वासे अधरपुटिची रक्तिमा नष्ट झाली ।
हाती ठेले मुख अधिकसे झांकले लांब केशीं ॥

या विरहिणीच्या रूपात मेघदूताच्या वाचकांपुढे येते व मांडीवर वीणा घेऊन प्रियतम पतीच्या 'नांवावरि रचियलें' गीत गाण्यास तयार होते; परंतु वीणेच्या तारा 'ओल्या नयनसलिलें' होऊन जातात आणि 'ताना गेल्या फिरफिरूनि, जी

विस्मरोनी च जाई' अशी तिची अवस्था होते. कंकणाच्या नादाने युक्त अशा तालावर मोर नाचत असताना हाताने चाल धरणाऱ्या त्या कलानिपुण गृहिणीला विरहावस्थेत आपल्या पतीचे 'विरहकृशसें कल्पनाचित्र' काढण्याचा किंवा 'मंजुस्वनी' मैनेला 'आहे काही स्मरण पतिचे ? तत्प्रिया तूंहि बाई' असे विचारण्याचा च विरंगुळा आहे. यक्षकान्तेच्या या लोभस शब्दचित्राला कारुण्याची किनार लाभली व त्यामुळेच याला उठाव आला असे म्हणणे योग्य.

कुमारसंभवातली पार्वती स्त्रीच्या कमनीयतेबरोबर च तिच्या अपार मनोधैर्याचे, निश्चयाचे व तज्जन्य सामर्थ्याचे दर्शन घडविणारी आहे. हिमालयासारख्या वैभवशाली पर्वतराजाच्या राज्यात मन्दकिनीच्या वाळूवर आपल्या समवयस्क मैत्रिणींबरोबर कन्दुक आणि बाहुल्यांचा खेळ खेळणाऱ्या या किशोरीचे पहिल्या सर्गात दर्शन होते, या कन्येमुळे हिमालय हा संस्कारयुक्त वाणीने विभूषित झालेल्या मनीषी व्यक्तीसारखा 'पूतश्च विभूषितश्च' असे म्हणणारा कालिदास 'दारिका हृदयदारिका पितुः' या कल्पनेचा विरोधक ठरतो. किशोरावस्थेतून तारुण्यात प्रवेश करणाऱ्या पार्वतीचे वर्णन करताना

उन्मीलितं तूलिकयेव चित्रं सूर्यांशुभिर्भिन्नमिवारविन्दम् ।
बमूव तस्याश्चतुरस्रशोभि वपुर्विभक्तं नवयौवनेन ।।

असे अन्वर्थक शब्द वापरून चित्रकला व काव्यकला यांचा संगम घडवून आणण्याचे आणि वास्तव व काव्य यांच्या सीमारेषा पुसून टाकण्याचे दुहेरी कार्य साधतो. कन्येच्या विवाहाची काळजी कोठल्या हि पित्याला असते त्याप्रमाणे हिमालयाला हि होती परंतु पार्वतीच्या बाबतीत त्रिकालज्ञ नारदांनीच ती भगवान शंकराची अर्धांगिनी होणार असे भविष्य वर्तवले व तेच खरे ठरले. देवांना 'त्राहि त्राहि' करून सोडणाऱ्या तारकासुराच्या पाडावासाठी या 'अनिन्द्यसुंदरी' पर्वतराजपुत्रीकडे भगवान शंकराचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न खुद्द देवाधिपती इन्द्राने मदनाकरवी केला, परंतु 'किञ्चित्परिलुप्तधैर्यः' होऊन हि शंकराने मनावर ताबा मिळवून मदनाचे भस्म करून टाकले व 'सख्योः समक्षम्' सौन्दर्याचा अपमान झाल्यामुळे पार्वतीवर 'निनिन्द रूपं हृदयेन'चा प्रसंग आला. परंतु यामुळे 'तथाविधं प्रेम पतिश्च तादृशः' प्राप्त करण्याचा पार्वतीचा निश्चय अधिकच पक्का झाला आणि स्वजनांच्या ममत्वपूर्ण प्रतिबंधाला न जुमानता केशकलापातून पुष्पशय्येवर गळणाऱ्या फुलांनी हि जिच्या तनुलतिकेला वेदना होत होत्या त्या पार्वतीने दुर्धर पंचाग्निसाधन करून खडतर तपस्या केली आणि भल्याभल्या मुनींना हि मागे टाकले. स्त्रीचे शरीर कोमल फुलासारखे (मृदु प्रकृत्या) असेल परंतु हे फूल सोनेरी असते (ध्रुवं वपुः काञ्चनपद्मनिर्मितं) आणि त्यात पराकोटीचे कष्ट सहन करण्याची मूलभूत शक्ती असते (ससारमेव च) असे

म्हणून कालिदासाने स्त्रीला मानाचा मुजरा केलेला आहे हे विसरता येणार नाही. तपस्विनी पार्वतीच्या प्रेमाची, निष्ठेची परीक्षा पाहण्यासाठी प्रत्यक्ष भगवान शंकर 'ज्वलन्निव ब्रह्ममयेन तेजसा' अशा बटूच्या वेषात पार्वतीच्या आश्रमात आले आणि तिच्या तपस्येचे उद्दिष्ट प्रथम सखीकरवी व नंतर खुद्द तिच्या शालीन परंतु ठाम शब्दांमुळे समजल्यानंतर शंकराला 'अमंगलाभ्यासरति ' हे बिरूद बहाल करून त्याची (म्हणजे स्वतःची च) मनसोक्त निंदा केली व त्याच्यासाठी तपश्चर्या करण्यातले 'अनौचित्य' दाखवून दिले. याला पार्वतीने दिलेले चपखल उत्तर शिवभक्त कालिदासाच्या भावनेला आणि त्यासोबत नाट्यपूर्ण काव्याच्या दर्जाला शोभण्यासारखे च आहे. 'तू म्हणतोस त्याप्रमाणेच शंकर असतील हि परंतु 'ममात्र भावैकरसं स्थितं मनः' आणि 'न कामवृत्तिर्वचनीयमीक्षते' असे म्हणणारी पार्वती हि समर्पित प्रेमिका आहे; लोकनिन्देची तिने पर्वा करू नये हे च स्वाभाविक. यावर हि काहीतरी बोलू इच्छिणाऱ्या बटूकडून रागाने तोंड फिरवून निघालेल्या पार्वतीचा हात खुद्द चंद्रमौळी शंकरांनी च 'अद्यप्रभृत्यवनताङ्गि तवास्मि दासः क्रीतस्तपोभिः' असे शब्द उच्चारीत धरावा हे योग्य च नव्हे का ? यानंतर पार्वतीचे 'लज्जवनत रूप' सखीकरवी 'दाता मे भूभृतां नाथ प्रमाणीक्रियताम्' असे म्हणण्यात व्यक्त झालेली तिची शालीनता, तिला शंकरातर्फे रीतसर मागणी घालण्यासाठी आलेल्या ऋषींचे 'उमा वधूर्भवान् दाता याचितार इमे वयम् । वरः शंभुरलं ह्येष त्वत्कुलोद्भूतये विधिः' हे उद्गार ऐकताना आपल्या पित्याजवळच 'अधोमुखी' आणि 'लीलाकमलपत्राणि' मोजणारी पार्वती, सातव्या सर्गात विवाहाच्या मंगलप्रसंगी सखीच्या नर्मविनोदाने हरखून जाणारी व पतीच्या हातात हात देताना रोमांचित होणारी पार्वती आणि नंतर योग्य वेळी पतीला 'युवतिनैपुण्याची गुरुदक्षिणा' मोकळेपणाने अर्पण करणारी पार्वती ही सर्व स्त्रीची एकाहून एक आकर्षक रूपे अन्वर्थक शब्दांच्या साहाय्याने वाचकांसमोर सादर करणाऱ्या कालिदासाची कला हि संयमाने निर्विवादपणे 'पूत' आणि 'विभूषित' झालेली आहे.

रघुवंशात पहिल्यांदा पुत्रप्राप्तीसाठी कामधेनुपुत्री नन्दिनीची मनोभावे सेवा करणाऱ्या दिलीपाला श्रद्धेने साथ देणारी त्याची पट्टराणी सुदक्षिणा वाचकांसमोर येते. श्रुतींच्या अर्थाचे अनुकरण करणाऱ्या स्मृतीप्रमाणे ही राणी दिलीपाच्या एकनिष्ठ सेवेच्या 'परमकठिन' मार्गाचे अनुकरण करीत होती. नन्दिनीच्या कृपेने तिसऱ्या सर्गात 'गर्भभरालसा' सुदक्षिणेचे कालिदासाने केलेले वर्णन वस्तुतः मातृत्वाचा गौरव प्राप्त करू इच्छिणाऱ्या स्त्रीला दिलेली आदरांजली आहे. 'निधानगर्भामिव सागराम्बराम्' किंवा 'शमीमिवाभ्यन्तरलीनपावकाम्' या उपमा मातृत्वाला अर्घ्य देणाऱ्या आहेत. रघुवंशातील स्त्रीरत्नांत विदर्भराजाच्या राजधानीत स्वयंवर मंडपात मंगल वाद्यांच्या तालावर प्रवेश करणाऱ्या

'लावण्यखनी' इन्दुमतीला विशिष्ट स्थान द्यावे लागते. तिचा प्रवेशच मुळी She came, she saw and she conquered या स्वरूपाचा आहे कारण तिला पाहिल्याबरोबर जमलेल्या देशोदेशींच्या राजांच्या अंतःकरणांनी तिच्याकडे धाव घेतल्यामुळे 'देहैः स्थिता केवलमासनेषु' अशी त्यांची अवस्था झाली ! सर्व राजे आपापल्यापरीने योग्य होते परंतु लीलाकमल हाताने गरगर फिरवणाऱ्या राजाची भ्रमरवृत्ती ओळखून त्याच्याकडे लक्ष न देण्यात आणि शेजारच्या डाव्या बाजूच्या सिंहासनावर हात ठेवून सुहृदाशी संभाषण करण्यात मग्न असणाऱ्या राजाकडे 'परं दृष्ट्वा पराङ्मुखोऽयं न कार्यकर्ता', पाठ फिरविण्यात या रूपवतीचे चातुर्य दिसून येते. देखाव्याला किंवा बाह्य वैभवाला भुलणारी नसल्यामुळे परंतप राजाच्या भुरळ पाडणाऱ्या वर्णनामुळे तिला त्याच्याबद्दल आदर वाटला परंतु काहीच न बोलता ती पुढे गेली. कारण आदर म्हणजे अनुरागजन्य आकर्षण नव्हे. ज्या राजाजवळ ती जाई त्याचा चेहरा क्षणापुरता उजळून निघे परंतु माळ न घालता इन्दुमती पुढे गेल्यानंतर तो साहजिकच काळवंडून जाई. म्हणूनच इन्दुमतीची तुलना 'संचारिणी दीपशिखेव रात्रौ'शी करून कालिदासाने बहार केली, इन्दुमतीच्या चमकत्या लावण्याला शब्दरूपी अर्घ्य दिला. रघुपुत्र अजासमोर आल्यानंतर मात्र 'रत्नं समागच्छतु काञ्चनेन' हे सुनंदाचे म्हणणे पटल्यामुळे तिने 'लज्जां तनूकृत्य' अजाकडे कटाक्ष टाकला व त्याला माळ घालताना हि ती रोमांचित झाली. विवाहानंतर अजाला अपयशाने संतापलेल्या राजांच्या आक्रमणाला तोंड द्यावे लागले. त्यात त्या सर्वांचा लीलेने पराभव करून यांचे यश च राघवाने हरण केले; कृपेमुळे जीव मात्र वांचविला; 'आता तू यांच्याकडे पहा, यांची शस्त्रे लहान मुले हि पळवूं शकतील' अशी वीराला साजेशी विनंती करणाऱ्या अजाकडे पाहून रथाच्या घोड्यांच्या टापांनी उडविलेल्या धुळीमुळे केस भुरकटलेल्या या 'समरविजयलक्ष्मी'ला आनंदाचे उधाण यावे हे स्वाभाविकच नव्हे का ? परंतु लज्जाजन्य संकोचामुळे तिने आपल्या प्रियतम पतीचे अभिनंदन आपल्या सखींच्या शब्दांनीच केले. पृथ्वी सुद्धा पावसाळ्याच्या सुरवातीला मेघसमूहाचे स्वागत मोरांच्या केकांतूनच करते ना ! अयोध्येला पोचल्यानंतर क्रमाने ती सम्राज्ञी झाली. ही जबाबदारी तिने किती समर्थपणाने संभाळली याचे प्रत्यंतर अगदी अकाली आणि अकस्मात् झालेल्या मृत्यूनंतर अजाने केलेल्या उन्मुक्त विलापावरून येते. अज म्हणतो, ' मी पृथ्वीपति खरा परंतु शब्दांतच. माझी खरी 'प्रीती तुजवरती'. तू गेल्यामुळे माझे धैर्य खचले, संगीत विरून गेले. जगण्याची उमेद च संपली. तू गृहिणी आणि एकांतातली जिवाभावाची सखी तरी होतीस च; परंतु खऱ्या अर्थाने 'सचिव' होतीस, ललित कलांच्या बाबतीत प्रियशिष्या होतीस. म्हणूनच म्हणतो 'करूणाविमुख' मृत्यूने तुला हिराऊन नेऊन माझ्यापासून न्यायचे काय शिल्लक ठेवले ? (वद किम् न मे

हृतम्) ? कर्तृत्ववान पती ज्या सहधर्मचारिणीबद्दल असे उद्‌गार काढतो ती खरोखर 'दग्धापि अदग्धा'च नव्हे का ? ज्या पुरूषांना आयुष्यात अशी 'सहचरी' लाभली 'तेचि पुरूष दैवाचे' यात शंका नाही.

रघुवंशातली 'विदेहधिपतेः सुता' सीता त्यागावर आधारलेल्या स्त्रीच्या मुलभूत तेजस्वितेची गाथा आहे. या 'लक्ष्मीरिव गुणोन्मुखी'त इन्दुमतीचे सौन्दर्य आणि चातुर्य, सुदक्षिणेची प्रौढता आणि उदात्तता, कौसल्या आणि सुमित्रा यांची समर्पण-भावना आणि एका मनस्विनी क्षत्राणीचे तेज यांचा मनोज्ञ संगम झालेला आहे. लंकेत अग्निदिव्य करून आपल्या पावित्र्याची साक्ष पटविणाऱ्या (जातवेदोविशुद्धां) सीतेला रामासह पुष्पकविमानातून अयोध्येला जाताना पंचवटी आणि जनस्थाना त आपल्या वियोगाने व्याकुळ झालेल्या पतीच्या एकनिष्ठतेची आणि अभिजात रसिकतेची पावती प्रत्यक्ष त्याच्या तोंडून ऐकायची संधी कालिदासाने मिळवून दिली आणि 'जे न देखे रवि ते देखे कवि'ची यथार्थ प्रचीती आणून दिली. 'ज्या ठिकाणी तुझ्या चरणकमलांच्या वियोगामुळेच मौन झालेले तूझे नूपूर मला मिळाले ती जागा' ज्या शिखरावर तुझ्या वियोगामुळेच व्याकुळ झालेल्या मी आणि वर्षाकालीन मेघांनी आपल्या अश्रूंना मोकळी वाट करून दिली ते हे मौल्यवान पर्वताचे अम्बरचुम्बी शिखर' आणि 'मेघांच्या गडगडाटामुळे भयभीत होऊन तू दिलेल्या गाढ आलिंगनाच्या मधुर स्मृती या ठिकाणी च मला अत्यंत दुःख देणाऱ्या ठरल्या' असे रामाचे शब्द ऐकून सीता सुखावते. अयोध्येतल्या हर्षोत्फुल्ल स्वागतानंतर सम्राज्ञीपदाचा अभिषेक होतो आणि लवकरच डोहोळ्यांचा सुखद अनुभव आल्यामुळे सीतेच्या सुखाचा पेला कांठोकांठ भरून वाहू लागतो. निसर्गाच्या सान्निध्यात रसिक व कर्तबगार पतीबरोबर घालवलेल्या सोनेरी दिवसांच्या गोड आठवणींनी ती पुलकित होते आणि ते सुख पुन्हा अनुभविण्याची आपली इच्छा ती एकांतात रामाजवळ 'लाजत लाजत' प्रकट करते. राम ती कशी नाकारणार ? परंतु 'कस्यैकान्तं सुखमुपनतम्' हा जीवनातील न्याय खोटा ठरत नाही. आणि 'वैदेही-बन्धू' रामाचे हृदय अयोध्येत प्रसृत झालेल्या लोकापवादाच्या वार्तेमुळे विदीर्ण होऊन जाते. मग मनोदेवता सीतेच्या शुद्धतेची ग्वाही देत असताना हि (अवैमि चैनामनघेति) प्रजावत्सल राम तिच्या त्यागाचा कठोर निश्चय लक्ष्मणाकरवी अमलात आणतो. सीता मात्र 'प्रियंकरो मे प्रियः' असे मानत भागीरथीच्या तीरावरील त्या रुचिर प्रदेशांच्या आठवणींनी मोहरून गेली होती. सुमित्रासुत लक्ष्मणाने आपल्या भावजयीला कठोर सत्याची कल्पना रथातून तीरावर उतरविल्यानंतर च दिली. या अपमानाच्या दुर्धर आघाताने ती मूर्छित व्हावी यात नवल नाही. शुद्धीवर आल्यानंतर 'निघ्नस्य मे भर्तृनिदेशरौक्ष्यं क्षमस्व' असे नम्रपणे म्हणणाऱ्या

लक्ष्मणाला 'प्रीतास्मि ते सौम्य चिराय जीव' असा योग्य आशीर्वाद देते आणि लक्ष्मणाला निरोपाचे शब्द सांगताना म्हणते :

वाच्यस्त्वा मद्वचनात्स राजा
वह्नौ विशुद्धामपि यत्समक्षम् ।
मां लोकवादश्रवणादहासीः
श्रुतस्य कि तत्सदृशं कुलस्य ।।

'त्या राजाला माझे हे शब्द सांग. **डोळ्यांदेखत** अग्निशुद्धी करून दाखविणाऱ्या माझा तू लोकापवादाच्या **ऐकीच** बातमीवरून **त्याग करतोस** हे तुझ्या **ज्ञानाला** आणि **कुळाला** शोभेसे आहे का ?' रामाची अशी कानउघाडणी करणारी सीता विवेकमूल धैर्याची प्रतिमा आहे. रामाची प्रवृत्ती मूलतः कल्याणकारिणी आहे (कल्याणबुद्धेः तव) याबद्दल तिला खात्री आहे म्हणून हे त्याचे स्वच्छंद वागणे आहे असे ती म्हणत नाही. परंतु कुणाच्या हि आश्रयाने जगणे तिच्यासारख्या स्वाभिमानी स्त्रीला शक्य नव्हते. म्हणून जगण्याची हि तिला इच्छा नाही; परंतु रघुकुळाच्या गर्भाची हत्या करण्याचा अविवेक तिला करायचा नाही. (स्याद् रक्षणीयं यदि मे न तेजस्त्वदीयमन्तर्गतमन्तरायः). म्हणून प्रसूतीनंतर 'जननान्तरे अपि त्वमेव भर्ता' व्हावा म्हणून सूर्याकडे दृष्टी लावून मी तपश्चर्या करणार आहे. आणि हे राजा, पत्नी म्हणून नव्हे परंतु तपस्विनी म्हणून, वानप्रस्थाश्रमातील एक प्रजाजन म्हणून माझी काळजी घेण्याची जबाबदारी राजा या नात्याने तुझी च आहे.' या सीतेच्या संदेशात एक स्वाभिमानी व विदुषी असलेल्या क्षत्राणीचे निर्विवादपणे दर्शन होते. मुनिवर्य वाल्मीकीने 'प्राप्तासि वैदेही पितुर्निकेतम्' या शब्दांत अशा तेजस्विनीच्या सुखपूर्ण प्रसूतीची जबाबदारी स्वाकारावी हे योग्य च होते आणि राम हा राजा सत्यप्रतिज्ञ आणि स्वतःचा बडेजाव न माजविणारा असला तरी याबाबतीत त्या भरताग्रजावर माझा रागच आहे हे त्यांनी स्पष्टपणाने सांगितले. सीतेच्या दोन्ही पुत्रांचे नामकरण करून त्यांना शिक्षण वाल्मीकींनी दिले आणि पुढे शम्बूकवधाच्या निमित्ताने आश्रमात आलेल्या रामाला कुशलवांकडून सीतात्यागापर्यंतचे रामायण ऐकविले; शुद्ध आणि शांत अशा सीतेच्या निष्कलंकत्वाची खाली मान घातलेल्या नागरिकांना प्रचीती आणून दिली. यानंतर मात्र मूळ रामायणातील कथेला अनुसरून कालिदासाची ही तेजस्विनी महर्षि वाल्मीकींच्या व प्रजाजनांच्या उपस्थितीत 'काया वाचा मनसा' मी जर व्यभिचार केला नसेल तर, 'हे विश्वंभरे देवि मामन्तर्धातुमर्हसि' अशी रामाकडे च पहात पहात वसुंधरेला विनंती करते आणि 'मा मा' असे राम म्हणत असताना च 'समुद्ररशना' वसुंधरा एका सिंहासनासह प्रकट होऊन त्यावर विराजमान झालेल्या तिला आपल्यात सामावून घेते. कालिदासाने सीतेला न्याय दिला असेच म्हटले पाहिजे. रघुवंशासारख्या १९ सर्गांच्या वर्णनपर महाकाव्यात वस्तुतः

व्यक्तिचित्रे रंगविण्याला फारसा वाव नसताना हि सुदक्षिणा, इंदुमती आणि सीता यांसारखी पात्रे निर्माण करून समर्पणावर आणि त्यागावर आधारलेल्या भारतीय स्त्रीच्या मूलतः तेजस्वी जीवनाची उज्ज्वल प्रतिमा कालिदासाने रसिकांसमोर सादर केली. स्त्री ही पुरुषाची सहचरी खरी, परंतु सहनशीलता, सेवावृत्ती आणि त्याग यांच्या जोरावर कटु सत्य सांगण्याचे अतुलनीय धैर्य तीच दाखवू शकते आणि पुरुषाला हि वंदनीय ठरते हे पार्वती आणि सीता यांच्या चरित्र्यावरून कालिदासाने स्पष्ट केले असे म्हणणे योग्य.

[ 'लोकराज्य' कालिदास विशेषाङ्क १ सप्टेंबर १९८८ ]

# १०. नेतृत्वाचा कालिदासप्रणीत आदर्श

भारतीय सारस्वताला विश्वसाहित्यात मानाचे स्थान प्राप्त करून देणाऱ्या थोर शारदोपासकांत कालिदास अग्रगण्य आहे. भारतीय परंपरेने त्याला 'कविताकामिनीचा विलास' किंवा 'कविकुलगुरू' ही विरूदे बहाल करावी यांत काहीच नवल नाही. या रससिद्ध कवीच्या शाकुंतलाच्या अनुवादानेच भारतीय संस्कृती व संस्कृत भाषा यांच्या सामर्थ्याची पाश्चात्य विद्वानांना प्रथम प्रचीती आली इतकेच नव्हे तर या नाटकाचे सर विल्यम्स जोन्स यांच्यासारखे पंडित विस्मित आणि मोहित झाले हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. जर्मन कवि गेटे याच्या सुप्रसिद्ध 'फाउस्ट' नाटकाच्या आरंभीची प्रस्तावना संस्कृत नाटकांतल्यासारखी आहे व ती बहुधा शाकुंतलावरून च सुचली असावी असे दिसते. तसेच जर्मन कवि शिलर याच्या 'मराया स्टुअर्ट' या काव्यात कैदेत असलेल्या स्कॉटलंड राणीने मेघाकरवी जो संदेश पाठवला त्यावरहि मेघदूताची छाप पडलेली दिसते. आशय व शैली या दोन्ही दृष्टीनी कालिदासाने संस्कृत सारस्वतावर व पर्यायाचे भारतीय साहित्यावर जो साज चढवला त्याचाच हा परिणाम आहे यात शंका नाही.

सरस्वतीच्या या वरद पुत्राच्या कलाकृतींकडे जरी ओझरती नजर टाकली तरी देखील समृद्धीच्या व संपन्नतेच्या पार्श्वभूमीवरच याच्या साहित्याचा प्रासाद उभा आहे याची प्रचीती आल्यावाचून रहात नाही. हे साहित्य म्हणजे उज्ज्वल आणि उन्नत सामाजिक जीवन व त्यामधूनच निर्माण झालेला निर्बंध कलाविलास यांचा आरसा च आहे. राजाश्रय, तज्जन्य अधिकार व सन्मान आणि साहित्यक्षेत्रांत नेत्रदीपक यश यांचा यथेच्छ लाभ झालेल्या या भाग्यशाली कलावंताच्या नाटकात व काव्यात सर्वत्र तृप्तीचा व समाधानाचा स्वर भरून राहिलेला दिसला तरी त्यांत नवल कसले ? विस्मयकारक वैभवाचा व सर्वांगीण उत्कर्षाचा अनुभव घेण्याचे भाग्य लाभलेल्या कालिदासाचे नायक गुणांचे चाहते, कलांचे भोक्ते आणि सौंदर्याचे उपासक असावे, त्याच्या नायिका ललितकलांत निष्णात आणि रूपाने अप्रतिम असाव्या व त्याच्या कलाकृतीत जीवनांतील आनंदाचा पुरेपूर आस्वाद घेण्याची दुर्दम्य आकांक्षा अभिव्यक्त व्हावी हे स्वाभाविक च नव्हे का ? दारिद्र्य, दैन्य आणि वैफल्य यांनी ग्रासलेले जीवन जगणाऱ्या लोकांना या समृद्धीचे नवल, काही प्रमाणात वैषम्य वाटावे व त्यांनी कालिदासाच्या जीवन-दृष्टीवर निव्वळ भोगलोलुपतेचा, अनिर्बंध सौंदर्यासक्तीचा शिक्का मारून मोकळे व्हावे आणि सर्वसाधारण जनतेच्या हिताची आकांक्षा बाळगणाऱ्या आजच्या लोकशाहीच्या जमान्यात समजण्यासारखे आहे. परंतु वस्तुस्थिति मात्र याहून निराळी आहे हे नमूद करणे भाग आहे.

कालिदासाचा काळ सुबत्तेचा आणि वैभवाचा होता व यामुळे त्याच्या साहित्यांत हि साधनसंपन्नतेचे, पर्यायाने सौंदर्याचे व शृङ्गाराचे साम्राज्य स्थापित झालेले आढळते व या दृष्टीने आमच्या आजच्या निष्काञ्चन व विपन्न जीवनाशी त्याचे काहीच साम्य नाही हे हि मान्य करायला हवे. अर्थात याचा हि दोष कालिदासाला देणे योग्य होणार नाही; किंबहुना सुखासीन जीवन जगून वेळी-अवेळी दीन-दलितांच्या सहानुभूतीचा टाहो फोडणाऱ्या, त्यांच्या दुःखांना वाचा फोडण्याचा अट्टाहास करणाऱ्या तथाकथित साहित्यिकांच्या अप्रामाणिकपणापेक्षा कालिदासाचा प्रामाणिकपणा च अधिक स्पृहणीय ठरेल यात शंका नाही. परंतु हा प्रश्न जरी क्षणभर बाजूला ठेवला, तरी देखील कालिदासाचा शृङ्गार दुर्बळांचा नाही, तो बलवंतांचा अलंकार आहे हे विसरून कसे चालेल ? समृद्धीचे आणि वैभवाचे चित्र कालिदासाने रंगविले हे खरे; परंतु ती समृद्धी पराक्रमावर आधारलेली होती, ते वैभव विवेकावर अधिष्ठित झालेले होते याचा विसर होऊ देणे म्हणजे कालिदासावर, भारतीय संस्कृतीच्या त्या प्रणेत्यावर अन्याय करण्यासारखे आहे. हे समजण्यासाठी कालिदासाने आपल्या कलाकृतीत ज्या कर्तबगार पुरुषांची चित्रे रंगवलेली आहेत. त्यांच्याकडे बारकाईने लक्ष देणे आवश्यक आहे. यातूनच कालिदासाने कल्पिलेल्या नेतृत्वाची यथार्थ कल्पना येऊ शकेल.

नेतृत्वाचा आदर्श रंगविताना कालिदासाने तत्कालीन जीवनसरणीचा च उपयोग करून घेतलेला आहे. त्या काळी वर्णाश्रमधर्म सर्वमान्य होता, राजसत्ता व प्रजेचे राजानुवर्तित्व विचारवंतांना हि मंजूर होते. कालिदासाचे जीवन हि 'पृथ्वीवल्लभपणिपल्लवतले नीतं नवीनं वयः' याप्रकारचे च होते असे अनुमान त्याच्या साहित्यावरून काढणे चुकीचे ठरणार नाही. साहजिकच कालिदासाने नेतृत्वाचे गुण राजाच्या रूपाने लोकांपुढे ठेवावे यांत नवल नाही. राजसत्ता ही आज भूतलावरून नामशेष होण्याच्या मार्गावर असली तरी देखील कालिदासाने रंगवलेल्या कर्तबगार नृपतीचे सद्गुण लोकशाहीत नेतृत्व करू इच्छिणाऱ्यांना हि मार्गदर्शक व अनुकरणीय ठरतील असे वाटते.

कालिदासाच्या ग्रंथरचनेत मालविकाग्निमित्र हे अनुक्रमाने पहिले नाटक. या नाटकांत पात्रांच्या मनोलेखनापेक्षा कथानकातील घटनांकडे च लेखकाने जास्त लक्ष पुरवलेले आहे हे खरे व अग्निमित्राचे चित्रण करताना ध्येयवादी किंवा आदर्श नायकांचे चित्रण करण्याऐवजी वास्तवाचे च चित्र रंगवण्याचा कालिदासाचा हेतु असावा हे हि मान्य करावे लागेल. परंतु अग्निमित्राचे आपल्या कर्तव्याकडे म्हणजे राज्यकारभाराकडे मुळीच लक्ष नाही असे म्हणणे मात्र कदापि न्याय्य होणार नाही. पहिल्या अंकाच्या प्रारंभी च त्याचा व अमात्य वाहतकाचा जो संवाद आहे

त्यावरून तो जातीने राज्यकारभारात लक्ष घालतो, इतकेच नव्हे तर विदर्भाधिपति यज्ञसेनाने त्याच्या पत्राला पाठवलेल्या उत्तरावरून त्याने त्याच्यावर चाल करून जाण्याचा घेतलेला निर्णय हा पूर्णपणे शास्त्रसंमत होता असेच वाहतकाला म्हणावे लागते हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. पांचव्या अंकात विदर्भाची फाळणी करण्याची सूचना हि त्याचीच व मंत्रिपरिषदेला 'कल्याणी देवस्य बुद्धिः' या शब्दांत ती मान्य करावी लागते. तात्पर्य, अग्निमित्र जरी प्राधान्याने प्रेमाच्या खटपटीत च मग्न असला तरी स्वकर्तव्याकडे डोळेझांक करणारा आहे असे मुळीच म्हणता येणार नाही. रोजचे धर्मासनावर बसून निवाडे देण्याचे काम त्याने कधीच बंद ठेवले नव्हते हे पांचव्या अंकातील 'तद्यावद्धर्मासनगतं देवं प्रतिपालयामि' या प्रतीहाराच्या उद्‌गारावरून हि स्पष्ट होते. तेव्हा 'अग्निमित्र हा रक्षणकर्ता असेपर्यंत प्रजेवर कोठल्या हि प्रकारचे संकट येणार नाही' अशा अर्थाचे भरतवाक्यातील शब्द ही एक पोकळ बढाई नव्हे, प्रजेच्या त्याच्यावरील निरतिशय विश्वासाची निशाणी आहे असे च म्हणणे योग्य होईल. अनुयायांमध्ये अशा प्रकारचा विश्वास निर्माण उत्पन्न करणारे नेतृत्व लोकशाहीच्या काळांत हि आवश्यक नाही का ? नेत्यांच्या मूलतः कल्याणकारक प्रवृत्तीविषयी अनुयायांची खात्री नाही हीच लोकशाहीतील आमच्या विद्यमान नेतृत्वाची खरी शोकांतिका आहे.

विक्रमोर्वशीय नाटकाचा नायक पुरूरवा ही अग्निमित्राची च सुधारलेली आवृत्ती. पाचव्या अंकात मणि चोरून नेणाऱ्या गृध्रपक्ष्याला शासन करण्याच्या निमित्ताने त्याच्या राजत्वाला थोडाफार उठाव आलेला आहे व या दृष्टीने अग्निमित्राइतका त्याचा राज्यकारभाराशी प्रत्यक्ष संबंध आलेला नाही हे खरे; परंतु संयमाच्या बाबतीत तो अग्निमित्राहून उजवा आहे यात शंका नाही. चौथ्या अंकातील त्याचा उन्माद उर्वशीवरच्या आत्यंतिक प्रेमाचा स्वाभाविक परिपाक आहे. परंतु पांचव्या अंकात उर्वशीचा चिरवियोग होणार हे कळल्यानंतर -

'प्रभवति परवत्ता शासने तिष्ठ भर्तुः
अहमपि तव सूनावद्य विन्यस्य राज्यं
विचरितमृगयृथान्याश्रयिष्ये वनानि ।।'

म्हणजे 'पराधीनता अशीच (प्रभावी) असते. तू स्वामीच्या (म्हणजे इंद्राच्या) आज्ञेचे जरूर पालन कर. मी हि तुझ्या मुलावर राज्याची जबाबदारी सोपवून मृगयूथांसह आश्रमात जाऊन राहीन' असे प्रौढत्वाला व संयमी राजाला शोभणारे उद्‌गार काढले हे त्याच्या धीरत्वाचे द्योतक आहे. शूराला शोभून दिसणारा विनय हा हि पुरुरव्याच्या बाबतीत उठून दिसतो. तो चंद्राचा नातू व बुधाचा मुलगा, यामुळे स्वतःच्या रथातून आकाशात सहज संचार करणे (अंबरतले गतिः),

सूर्यमंडलापर्यंत जाऊन सूर्याची पूजा करणे (सूर्योपस्थानात्प्रतिनिवृत्तः) व केशीसारख्या महाप्रबळ दानवाचा लीलेने पराभव करणे या काहीशा अद्‌भुत शक्ति त्याच्याजवळ असाव्यात यात नवल नाही. किंबहुना यामुळे च उर्वशीसारख्या स्वर्गलोकीच्या अनुपम लावण्याने युक्त अशा अप्सरेवरील त्याचा अनुराग संभाव्य वाटतो. परंतु उर्वशीला सोडवून आणून इंद्रावर केलेल्या त्याच्या नारायणतुल्य उपकाराची ज्यावेळी चित्ररथाने प्रशंसा केली त्यावेळी या विनयशाली राजाने 'इंद्राच्या पक्षांतील लोक आपल्या शत्रूवर विजय मिळवतात हे खरे पण हा वस्तुतः इंद्राचाच पराक्रम आहे' असे म्हणून आपल्या पराक्रमाचे श्रेय इंद्राला च देऊन टाकले ! चित्ररथाने 'अनुत्सेकः खलु विक्रमालङ्कारः' असे म्हटले नसते तरच नवल.

शाकुंतल नाटकात दुष्यंताचे चित्रण करताना कालिदासाने फारच कौशल्य दाखवलेले आहे. नाट्यवस्तूच्या दृष्टीने प्रेम हाच प्रमुख विषय. परंतु प्रेमाच्या बाबतीत हि दुष्यंतावर अप्रामाणिकपणाचा किंवा उथळपणाचा आरोप करता येणार नाही. इतर नाटकातील नायकाप्रमाणे याला हि अगोदरच्या अनेक भार्या असतात, त्यांच्यावर त्याने पूर्वी प्रेम केलेले हि असते व या दृष्टीने हंसपदिकेने त्याच्यावर केलेला भ्रमरवृत्तीचा आरोप त्याला हि नाकारता येणार नाही हे खरे; परंतु त्याची वागणूक तत्कालीन रीतिरिवाजाशी विसंगत होती असे म्हणता येणार नाही. स्त्रीसौंदर्याचे आकर्षण वाटणे हा च एक दोष मानावयाचा झाला तर गोष्ट निराळी परंतु या आकर्षणात हि तो युक्तायुक्ततेचा विचार केल्याशिवाय रहात नाही. शकुंतलेच्या सौंदर्याने मोहित होऊन त्याला तिच्या प्राप्तीची अभिलाषा उत्पन्न झाली तरी 'तत्त्वान्वेषण' करण्याचे तो ठरवितो आणि मगच अभिलाषेला शब्दरूप देण्याचा तो निर्धार करतो. याचा अर्थ त्याची अभिलाषा विवेकाने नियंत्रित आहे. केवळ स्त्रीची प्राप्ति हे या अभिलाषेचे उद्दिष्ट असे हि म्हणता येणार नाही; विवाहात याची परिणती व्हावी अशी दुष्यंताची इच्छा आहे. म्हणजेच दुष्यंताला अधर्माची चीड व धर्माची चाड आहे. पांचव्या अंकात दुष्यंताच्या या बाबतीतील दक्षतेचे सुंदर चित्र रंगवलेले आढळते. दुर्वासाच्या शापामुळे त्याला शकुंतलेची विस्मृती झालेली असते. शकुंतला ही अवगुंठनवती म्हणजे विवाहित स्त्री आहे हे लक्षांत आल्यानंतर 'परस्त्रीकडे न्याहाळून पहाणे योग्य नव्हे' (अनिर्वर्णनीयं परकलत्रम्) असे तो म्हणतो. शकुंतलेबरोबर आलेले कण्वशिष्य व गौतमी यांनी शकुंतलेला स्वीकारण्याची विनंती केली होती. दुष्यंताने तिचा स्वीकार केला असता तरी त्यात तत्कालीन रीतिरिवाजांशी विसंगत असे काहीच नव्हते. दुष्यंत हा सौंदर्यप्रेमी होता. अपूर्व लावण्य असलेली शकुंतला स्वतः त्याच्याकडे चालून आलेली होती. तशांत त्याची खात्री पटावी

म्हणून गौतमीने शकुन्तलेचे अवगुंठन दूर करून तिच्या अनुपम लावण्याचा साक्षात्कार त्याला घडवला. तरी देखील परस्त्री वाटत असल्यामुळे तिचा अव्हेर करण्याचे मनोबल दाखवून त्याने आपल्या 'आर्यं मनः'ची प्रचीती आणून दिली असे च म्हटले पाहिजे. मोहाच्या क्षणी मोहित होणे हा मानव-सुलभ दोष आहे परंतु विवेकाने त्यावर विजय मिळवणे हा फार मोठा गुण आहे; नेत्याला तर याची फारच आवश्यकता असते. या दृष्टीने 'अहो धर्मावेक्षिता भर्तुः । ईदृशं नाम सुखोपनतं रूपं दृष्ट्वा कोऽन्यो विचारयति' हे प्रतीहाराचे उद्‌गार सार्थ च आहेत यात शंका नाही. शकुंतलेची हि बाजू खरी होती व दुष्यंत हि न्यायाला धरून च वागत होता. यामुळेच पाचव्या अंकातीत संघर्ष दोन सत्प्रवृत्त पक्षांत झालेला आहे असे म्हणणे भाग आहे. शार्ङ्गरव व शारद्वत यांनी अर्थातच दुष्यंताची यथेष्ट निर्भर्त्सना केली. परंतु यामुळे रागावून न जाता दुष्यंताने 'कथिमिमामभिव्यक्तसत्त्वलक्षणां प्रत्यात्मानं क्षेत्रियमाशङ्कमानः प्रतिपत्स्ये' हा प्रश्न विचारला व 'तुमचे म्हणणे खरं ठरले तर मी धर्मपत्नीचा त्याग करणारा ठरेन व माझे जर खरे असले तर हिचा स्वीकार करणे परस्त्रीचा अपहार करण्यासारखे आहे; तेव्हा यात कोणते जास्त वाईट हे तुम्ही ठरवा' असे शांतपणे सुचवून त्याने सर्वांना निरूत्तर केले. तात्पर्य, दुष्यन्ताच्या प्रेमात विचाराचा किंवा विवेकाचा भाग बराच मोठा आहे यांत शंका नाही. शिवाय शकुंतलेचा स्वीकार करण्यात दुष्यंताच्या पुत्रोत्पत्तीच्या आशेचा हि विचार करावा लागतो. विवाहापूर्वी शकुंतलेला त्याने 'कुलाची प्रतिष्ठा' म्हणून स्थान देण्याचे वचन दिले होते. पुढे सहाव्या अंकात शापनिवृत्तीमुळे स्मृति प्राप्त झाल्यानंतर दुष्यंताने केलेला शोक हि तीव्र आहे. त्यांत हि वंशविच्छेदामुळे निर्माण होणाऱ्या असहायतेची छटा मिसळलेली आहे. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे दुष्यंताच्या शकुंतेवरील प्रेमात उथळपणा हि नाही व केवळ शरीरसुखाच्या उपभोगाची लालसा हि नाही हे स्पष्ट आहे.

नेतृत्वाला आवश्यक असणाऱ्या इतर गुणांचा सुंदर समाहार दुष्यंतात झालेला आहे. शाकुंतलात राजाचे आदर्श गुण प्रकर्षाने दाखविण्याचा कालिदासाने सहेतुक प्रयत्न केलेला आहे असे म्हणणे सत्याला धरून होईल. प्रजेचे रक्षण करण्याची, प्रजेच्या हितासाठी झटण्याची दुष्यंताची तत्परता वाखाणण्यासारखी आहे. 'कुतो धर्मक्रियाविघ्नः सतां रक्षितरि त्वयि' म्हणजे 'सज्जनांचे रक्षण करणारा तू राजा असताना धर्मक्रियेत विघ्न निर्माण होणे कसे शक्य आहे ? असा त्याच्या प्रजाजनांचा विश्वास आहे. स्वतःच्या सुखाची पर्वा न करता लोकहितासाठी झटणे हा त्याचा स्वभाव आहे (स्वसुखनिरभिलाषः खिद्यसे लोकहेतोः); प्रजेला उन्मार्गापासून वाचवणे, त्यासाठी प्रसंगविशेषी दंड धारण करणे, लोकांतील तंटे

वाढू देणे व त्यांचे रक्षण करणे हे आपले कर्तव्य आहे असे तो मानतो. यामुळेच -

अतनुषु विभवेषु ज्ञातयः सन्तु नाम
त्वयि तु परिसमाप्तं बन्धुकृत्यं प्रजानाम् ।

अशी त्याच्याविषयी प्रजाजनांची धारणा आहे. प्रजाजनांचे रक्षण करण्याच्या त्याच्या तत्परतेचा नाटकासाठी कौशल्याने उपयोग करून घेतलेला आहे. भ्रमरापासून शकुंतलेचे रक्षण करण्यासाठी च तो पहिल्या अंकात पुढे होतो व शकुंतला त्याच्या दृष्टीस पडते. पांचव्या अंकात ज्यावेळी तपस्वी त्याला भेटावयास येतात त्यावेळी धर्मासनावरील नित्याचे काम संपवून तो नुकताच विश्रांती घेत असतो (निषेवते श्रांतमना विविक्तम्) व त्यामुळे तपस्व्यांच्या आगमनाचे वृत्त सांगण्याचे कंचुकीच्या जीवावर येते (पुनरुपरोधकारि कण्वशिष्यागमनस्मै नोत्सहे निवेदयितुम्). परंतु ते कळल्याबरोबर दुष्यंत तात्काळ त्यांना भेटण्यासाठी अग्निगृहाकडे जातो. सहाव्या अंकात शकुंतलेच्या त्यागाच्या जाणीवेतून उत्पन्न झालेल्या शोकामुळे त्याला नेहमीप्रमाणे न्यायदानाचे काम करणे शक्य होत नाही व तो ते काम तात्पुरते अमात्यावर सोपवितो. (याला हि स्मृतीची अनुज्ञा आहे. पहा-यदा स्वयं न कुर्यात्तु नृपतिः कार्यदर्शनम् । तदा नियुञ्जैद् विद्वांसं ब्राह्मणं कार्यदर्शने ।। मनुस्मृति ८।९) खरे. परंतु त्यातहि 'शेवटच्या हुकुमासाठी सर्व कागदपत्र माझ्याकडे पाठवून द्या' (यत्प्रत्यवेक्षितपौर-कार्यमार्येण तत्पत्रमारोच्य दीयतागिति ।) ही आज्ञा आहे च. राज्यतंत्र संभाळण्याचे काम सुखाचे नाही, दगदगीचे आहे याची दुष्यंताला पूर्ण जाणीव आहे व ते निरलसतेने करीत रहाण्याची त्याची आकांक्षा आहे. जनतेच्या हिताची इतकी कळकळ जर विद्यमान शासकांनी दाखविली व दुष्यंताप्रमाणे स्वतःच्या हातून कुठला हि प्रमाद न घडण्याची त्यांनी खबरदारी घेतली ('अहन्यहन्यात्मन एव तावज्ज्ञातुं प्रमादस्खलितं न शक्यम्' अंक ५) तर निवडणुका जिंकण्यासाठी सुक्तासूक्त मार्गाचा अवलंब करण्याची त्यांना जरूर भासणार नाही.

राजत्वाला शोभून दिसणारे व नेतृत्वाला आवश्यक असणारे दोन गुण म्हणजे असामान्य शौर्य व विनय. दुष्यंताच्या चित्रणात कालिदासाने दोन्हीवर योग्य तो भर दिला आहे. कण्व ऋषींच्या आश्रमांतील यज्ञांत विघ्न आणणाऱ्या राक्षसांचा त्याने लीलेने पाडाव केला; किंबहुना त्याने आश्रमात प्रवेश केलाबरोबर च राक्षसांची पांचावर धारण बसली. त्याच्या धनुष्याच्या टणात्काराने च विघ्ने दूर होतात असा कण्वशिष्याने विश्वास व्यक्त केलेला आहे. सहाव्या अंकात ज्यावेळी मातलीने स्वतः अदृश्य राहून विदूषकाला हि दृष्टीआड नेऊन बुकलले त्यावेळी दुष्यंत अदृश्य मित्राला धक्का न लावता नेमके अदृश्य शत्रूला च टिपणारा बाण रागाने सोडण्याच्या विचारात होता (तमिषुं संदधेयो हनिष्यति वध्यं त्वा रक्ष्यं

रक्षिष्यति द्विजम् ।). तेव्हा मातलीने प्रत्यक्ष पुढे होऊन 'तू या बाणाचा वापर राक्षसांवर करावा अशी इंद्राची इच्छा आहे व कालनेमि नावाच्या दुर्जय दानवांवर जय मिळवून देवांना उपकृत करावे ही विनंती करण्यासाठी च मी आलो' असे सांगितले. यावरून देवांचा हि त्याच्या शौर्यावर अढळ विश्वास होता असे स्पष्ट दिसते व पुढे त्याने दानवांवर पराक्रमाने मिळवलेला विजय देवांच्या हि स्तुतीला पात्र ठरल्याचे वर्णन कालिदासाने केलेले आहे. इतके सामर्थ्य असून हि त्याने बढाई मुळीच मारलेली नाही. इंद्राने सभेत त्याचा सन्मान करण्याच्या हेतूने त्याला अर्धासन दिले व स्वतःच्या गळ्यातील मंदारमाला त्याला अर्पण केली. याबद्दल 'मी काही इतक्या सत्काराला पात्र नव्हतो' असेच विनयाचे उद्‌गार दुष्यंताने मातलीजवळ काढले व आपल्या विजयाचे सर्व श्रेय इंद्राच्या मोठेपणाला च देऊन टाकले. (सिध्यन्ति कर्मसु महत्स्वापि यन्नियोज्याः संभावनागुणमवेहि तमीश्वराणाम् ।) हे लक्षांत ठेवण्यासारखे आहे. पांचव्या अंकात 'न परिहार्ये वस्तुनि पौरवाणां मनः प्रवर्तते' किंवा 'विनिपातः पौरवैः प्रार्थ्यते इति न श्रद्धेयम्' यासारखे उद्‌गार आहेत हे खरे परंतु यांत आत्मप्रौढीपेक्षा कुलाभिमान च जास्त दिसतो व त्यांत वस्तुतः अनुचित वाटण्यासारखे काही नाही.

दुष्यंताचा आणखी एक स्पृहणीय गुण म्हणजे तपस्व्यांबद्दल म्हणजे च पर्यायाने ज्ञानाची उपासना करणाऱ्याबद्दल त्याला वाटणारा नितांत आदर. 'आश्रममृगोऽयं न हन्तव्यः न हन्तव्यः' अशी तपस्व्यांची हांक ऐकल्याबरोबर धनुष्यावर चढवलेला बाण त्याने तात्काळ मागे घेतला व त्यांनी दिलेला आशीर्वाद विनयाने नमस्कार करीत स्वीकारला. कण्व आश्रमात नाही असे कळले तरी देखील आपला त्याच्याबद्दलचा आदर व्यक्त करण्यासाठी त्याने कण्वकन्येची गांठ घेण्याचे ठरविले. तपोवनांत प्रवेश करताना हि त्याने राजचिह्नं उतरून ठेवली (विनीतवेषेण प्रवेष्टव्यानि तपेवनानि नाम) व तपस्वी लोकांना रथाचा किंवा सैन्याचा उपद्रव होऊ नये याची पुरेपूर काळजी घेतली. तपस्वी लोकांमध्ये गूढ असे दाहात्मक तेज असते व त्यांच्या तपाच्या फलाचा एकषष्ठांश भाग हे च राजाचे अविनाशी धन अशी त्याची मनोमन धारणा आहे. कण्वासारख्या तपस्वी ऋषीची विनंति त्याला आज्ञेसमान वाटते. सातव्या अंकात स्वर्गातून परतताना वाटेवर भगवान् मारीच ऋषींचा आश्रम आहे असे कळल्याबरोबर त्याने 'अनतिक्रमणीयानि श्रेयांसि । प्रदक्षिणीकृत्य भगवन्त गन्तुमिच्छामि' ही अभिलाषा व्यक्त केली. हेमकूटावरील स्वर्गीय वातावरणात राहून हि एकाग्रतेने तपश्चर्या करणाऱ्या ऋषीकडे पाहून 'मोठ्यांचे आदर्श हि मोठेच' (उत्सर्पिणी खलु महता प्रार्थना ।) असे उत्स्फूर्त उद्‌गार त्याच्या तोंडून बाहेर पडले. आश्रम ही च त्याकाळची विद्यापीठे व कण्वमारीचासारखे ऋषि म्हणजे तत्कालीन ज्ञानाचे

सागर हे ध्यानात ठेवले म्हणजे हा ज्ञानाला दिलेला मुजरा होय. लोकशाहीत हि या मूल्यांची जोपासना करणे आवश्यक नाही का ? निवडणुकांच्या धुमाळीत विद्वत्तेला किंमत रहात नाही व निवडणुका जिंकल्यांतर विद्वानांची बूज राखण्याची आवश्यकता उरत नाही ही सध्याची परिस्थिती बदलावयाची असेल तर 'सरस्वती श्रुतिमहतां महीयताम्' ही कालिदासाची आकांक्षा आम्ही व्यवहारात खरी करून दाखविली पाहिजे.

अशा रीतीने कालिदासाच्या नाटकांत हि नेतृत्वाविषयीच्या त्याच्या कल्पनेला शब्दरूप प्राप्त झालेले आहे हे खरे परंतु आदर्श नेतृत्वासंबंधीची याची धारणा रघुवंश या काव्यात च चिरंजीव झालेली आहे. शाकुंतलात नाटकाच्या मर्यादा सांभाळणे व तत्कालीन वास्तवाकडे हि थोडेफार लक्ष देणे आवश्यक होते, रघुवंशासारख्या काव्यात याची जरूरी न भासल्यामुळे कालिदासाच्या प्रतिभेला खरा बहर आलेला दिसतो. रघुवंशातील राजांच्या गुणांनी च त्याला या वंशावर काव्य लिहिण्यास प्रवृत्त केले. त्याचे वर्णन करताना कालिदास म्हणतो :-

सोऽहमाजन्मशुद्धानामाफलोदयकर्मणाम् ।<br>
आसमुद्रक्षितीशानामानाकरथवर्त्मनाम् ॥<br>
यथाविधिहुताग्नीनां यथाकामार्चितार्थिनाम् ।<br>
यथापराधदण्डानां यथाकालप्रबोधिनाम् ॥

यातल्या प्रत्येक शब्दाचा संबंध 'रघूणाम्' या पदाशी जोडावा लागतो. रघुवंशातील राजे शुद्ध चारित्र्याचे होते, फलप्राप्तीपर्यंत आपले कार्य सतत करीत राहणारे, समुद्रवलयांकित पृथ्वीचे मालक व आपल्या रथाचा मार्ग अप्रतिहतपणे स्वर्गापर्यंत नेऊन भिडवणारे होते. इतकेच नव्हे तर ते यथासांग यज्ञ करणारे, याचकांची अभिलाषा पूर्ण करणारे व अपराधाप्रमाणे योग्य दंड देणारे व सतत जागरूक रहाणारे व योग्य वेळीच सावध होऊन घटनांमागील अर्थ समजून घेणारे होते. ही गुणांची यादी सामान्यतः आज हि स्पृहणीय ठरण्याच्या योग्यतेची आहे. कालिदासाने या गुणांची सुरवात 'आजन्मशुद्धानाम्' या शब्दाने केली हे ध्यानात ठेवण्यासारखे आहे. राजे किंवा नेते यांचे चारित्र्य शुद्ध असावे हा त्याचा आग्रह आहे. 'यथा राजा तथा प्रथा' हे पूर्वकाळी जितके खरे होते तितकेच आज हि आहे; राजा व प्रजा या शब्दांऐवजी नेता व अनुयायी हे शब्द वापरले म्हणजे झाले!

चारित्र्याच्या बाबतीत नेत्यांनी च आदर्श घालून दिला पाहिजे. तेच जर मोहाला बळी पडणारे असतील तर त्यांच्या शब्दांना वजन च राहणार नाही. 'यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरे जनाः' ही वस्तुस्थिती आहे. 'Caeser's wife should be above suspicion' हा च त्याच्या वरचा तोडगा. आमच्या समाजात सर्वत्र वशिल्याचा बुजबुजाट आहे, काळ्या बाजाराला ऊत आलेला आहे याचे खरे

कारण म्हणजे शुद्ध चारित्र्य असणाऱ्या नेत्यांचा अभाव हे होय. साध्या शिपायाची नेमणूक करण्यासाठी चिठ्ठी पाठवणारे अधिकारी ज्या देशांत आहेत त्या देशाच्या रहिवाश्यांनी सकस व दमदार नेतृत्वाच्या गप्पा मारण्यात अर्थ नाही. नेतृत्वासाठी जबर किंमत द्यावी लागते याची कालिदासाला जाणीव असल्यामुळे च त्याने 'आजन्मशुद्धानाम्' या शब्दाने नेतृत्वाच्या गुणांचा प्रारंभ केलेला आहे व लोकशाहीत हि याचा विसर पडू देणे योग्य होणार नाही.

'यथापराधदण्डानाम्' हा गुण हि नेतृत्वाला अत्यंत उपयोगी पडणारा आहे. 'जसा अपराध तसा दण्ड' हे सूत्र वाटते तितके प्रत्यक्षात आणावयास सोपे नाही. याला लागणारा निःपक्षपातीपणा व याबाबतीत आवश्यक ठरणारी कर्तव्यकठोरता या दोन्ही गोष्टी दुर्मिळ आहेत. अपराध करणाऱ्या व्यक्तीवर दण्डाचे प्रमाण अवलंबून ठेवणे म्हणजे च न्यायाचा कांटा समतोल न ठेवणे. अपराध करणारी व्यक्ति जर मोठी असेल, त्या व्यक्तीची वरपर्यंत ओळख असेल म्हणजे च तिची वर्णी लागत असेल तर ती व्यक्ती निर्दोष सुटू शकते हा अनुभव काही आपल्याला नवीन नाही. नियमांचा भंग झाल्यानंतर शासन झाल्याशिवाय रहात नाही असा विश्वास जनतेत निर्माण करणे हे लोकशाहीच्या नेत्यांचे कर्तव्य आहे व 'यथापराधदण्डानाम्' मध्ये याचा च अंतर्भाव केलेला आहे. इंग्लडचे सेक्रेटरी ऑफ स्टेट लॉर्ड ॲमरी यांच्या मुलाने शत्रूंच्या म्हणजे जर्मन रेडियोवरून प्रभावी भाषणे केली. युद्धविरामनंतर या देशद्रोहाबद्दल त्याच्यावर खटला झाला व फांशीची शिक्षा झाली. लॉर्ड ॲमरीने रदबदली करण्याचा यत्किंचित् हि प्रयत्न केला नाही; इतकेच नव्हे तर 'तुला जे शासन झाले ते योग्य च आहे' असे साश्रुनयनांनी मुलाला सांगितले. हे कर्तव्यकठोरतेचे उदाहरण आम्ही डोळ्यापुढे का ठेवू नये ?

'यथाकालप्रबोधिनाम्' हा रघुवंशीय राजांचा गुण तर विद्यमान व उदीयमान नेत्यांनी व शासकांनी हृदयावर कोरून ठेवण्यासारखा आहे. प्रजेच्या हिताबद्दलची जागरूकता तर त्यात अभिप्रेत आहेच; शिवाय अखंड सावधानता, प्रत्यही घडणाऱ्या घटनांचे मर्म समजून घेण्याची पात्रता या गुणांचा हि समावेश यांत च होतो. नेतृत्वाचे हे व्यवच्छेदक लक्षण च मानणे योग्य. अखंड सावधानतेचे सूत्र आम्ही विसरलो, गाफील राहिलो, सरहद्दीवर घडणाऱ्या घटनांच्या परिणामाकडे लक्ष दिले नाही; संभाव्य शत्रूच्या हालचालीकडे दुर्लक्ष केले आणि याचे भीषण परिणाम सर्व देशाला आक्रमणाच्या रूपाने भोगावे लागले हा इतिहास अगदी ताजा आहे. अनुयायांचे किंवा जनतेचे हित डोळ्यात तेल घालून जपणे हे रघुवंशीय राजानी आपले प्रथम कर्तव्य मानले होते असे दिलीपाच्या व रघूच्या चरित्रावरून दिसते. Eternal vigilance is the price of liberty हा

च 'यथाकालप्रबोधिनाम्' चा अर्थ आणि हे विसरणे म्हणजे स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेण्यासारखे च नाही का ?

रघुवंशीय राजे शैशवांत विद्यांचा अभ्यास करून स्वतःच्या व्यक्तित्वाची उभारणी करीत, यौवनांत विषयांचा उपभोग घेत, आयुष्याच्या सायंकाळी संन्यस्त वृत्ति पतकरीत आणि शेवटी योगमार्गाने देहत्याग करीत असे कालिदासाचे म्हणणे आहे. यावर चार आश्रमांतली कर्तव्ये योग्य वेळी करावीत या काहीशा जुन्या कल्पनेचा पगडा आहे हे जरी मान्य केले तरी नेत्यांच्या कर्तव्यांची अवस्थेनुसार केलेली विभागणी ही आज हि पूर्णपणे त्याज्य आहे असे म्हणता येणार नाही. प्रारंभी विद्याभ्यासावर व अध्ययनावर जोर देऊन नेतृत्वाला लागणारी पात्रता संपादन करण्यावर कालिदासाचा भर आहे. शस्त्रविद्येबरोबरच 'शास्त्रेष्वकुण्ठिता बुद्धिः' असणे हे हि नेतृत्वाला आवश्यक आहे. निव्वळ मतांच्या जोरावर निवडून येऊन पांच वर्षे जागा अडवून बसण्याच्या सध्याच्या काळात 'शैशवेऽभ्यस्तविद्यानाम्' वर जोर देणे भागच आहे. नंतरच्या काळात विषयांचा योग्य तो उपभोग घेणे यात गैर काही नाही; किंबहुना व्यक्तित्वाच्या विकासाच्या दृष्टीने त्याची फार गरज हि आहे. विषयोपभोगावर विवेकाचा अंकुश हा नेत्याला ठेवावा लागतो व या दृष्टीने 'अनाकृष्टस्य विषयैर्विद्यानां पारदृश्वनः । तस्य धर्मरतेरासीद् वृद्धत्वं जरसा विना ।।' या शब्दांत दिलीपाचे चित्र कालिदासाने रंगवलेले आहे. 'योगेनान्ते तनुत्यजाम्' आजच्या काळात शक्य नसेल; परंतु 'वार्धके मुनिवृत्तीनाम्' चा अवलंब मात्र विद्यमान नेत्यांनी अवश्य करावयास हवा; नाहीतर नव्यांना संधि मिळणे दुरापास्त होऊन बसेल. अधिकार प्राप्त करण्यासाठी धडपड व नंतर तो टिकवण्यासाठी पूर्वीपेक्षा हि जास्त धडपड हा सध्यांचा शिरस्ता आहे. या जमान्यात 'योग्य वेळी अधिकार सोडण्याची तयारी ठेवणे' हा गुण अनुकरणीय च ठरणार यांत शंका नाही.

रघुवंशीय राजांच्या या गुणांच्या यादीत कालिदासाने 'त्यागाय संभृतार्थानां' आणि 'सत्याय मितभाषिणां' दोन्हीचा अंतर्भाव करून फार मोठे औचित्य साधलेले आहे. प्रजेपासून कर गोळा करणे हे राजाचे काम खरे परंतु यांत हि प्रजेच्या हिताची दृष्टी हवी; प्रजेच्या सुखासाठी च त्यांचा विनियोग करण्याची तयारी हवी. दिलीपाचे वर्णन करताना कालिदासाने रघुवंशात :-

प्रजानामेव भूत्यर्थं स ताभ्यो बलिमग्रहीत् ।
सहस्त्रगुणमुत्स्रष्टुमादत्ते हि रसं रविः ।।

म्हणजे 'प्रजेच्या उत्कर्षासाठीच तो त्यांच्यापासून कर गोळा करीत असे कारण, 'रवि पृथ्वीवरील पाणी शोषून घेतो ते सहस्रपटीने पृथ्वीला परत देण्यासाठीच असते' असे म्हटले आहे. विद्यमान शासकांनी यापासून धडा घेण्यासारखा आहे.

वर्तमान युगांत कर सतत वाढत रहातात आणि त्याबरोबर जनतेच्या अडचणी हि दिवसेंदिवस वृद्धिंगत होतात. अशा परिस्थितीत संप व हरताळ सतत होत राहिले तर त्यांत नवल कसले ? करांमुळे वाढलेले उत्पन्न हे आपल्यासाठी खर्च होते असा विश्वास जनतेच्या मनात निर्माण करणे आवश्यक आहे. त्यासाठी विद्यमान शासकांनी 'त्यागाय संभृतार्थानाम्'चा आदर्श च डोळ्यासमोर ठेवून त्याप्रमाणे आचरण करण्याचा बुद्धिपुरःसर प्रयत्न केला पाहिजे.

'सत्याय मितभाषिणाम्' ची तर आज फार च आवश्यकता आहे. मोठे लोक स्वभावतःच मितभाषी असतात. बोलणे जितके कमी तितके सत्याला उपकारक ठरते. आजचे आमचे मंत्री व नेते तर विज्ञानपरिषदेच्या उद्घटनांपासून केशकर्तनालयाच्या उद्घाटनापर्यंच्या सर्व सभांत भाषणे करण्यात मग्न असतात. अधिकारावर आल्याबरोबर भाषणे करण्याच्या स्पर्धेत सर्वजण अहमहमिकेने भाग घेताना दिसतात. निवडणुकीपूर्वी भाषणे करणे भागच असते व निवडून आल्यानंतर जनतासंपर्काच्या निमिताने भाषणांचा पाऊस पडत असतो. यामुळे भाराभर आश्वासने देण्याचा प्रसंग येतो आणि ती जर पुरी झाली नाहीत तर स्पष्टीकरणासाठी पुन्हा भाषणे करावी लागतातच. तात्पर्य, बोलणे चालूं च राहते आणि काम करायला वेळ च राहत नाही. हे सर्व टाळावयाचे असेल तर रघुवंशीय राजांच्या मितभाषित्वाचा स्वीकार करणे योग्य ठरेल. बोलण्याचे प्रमाण कमी केले म्हणजे आपोआपच काम करावयाला वेळ उरेल आणि भरमसाट आश्वासने दिल्याने पुढे होणारी नाचक्की हि टळेल. लोकशाहीत ' न बोलणाऱ्याचा मोतीचूर पडून रहातो व बोलणाऱ्यांचे चुरमुरे हि संपून जातात' हे जरी काही अंशी खरे असले तरी नेत्यांनी या बाबतीत संयम पाळावा व आपले वजन कायम राखावे हेच उत्तम.

तात्पर्य, कालिदासाने वर्णिलेल्या राजांच्या चरित्रांत, शौर्य, धैर्य, संयम, विद्वत्ता व विनय या गुणांचा समावेश होतो. 'ज्ञाने मौनं क्षमा शक्तौत्यागेश्लाघाविपर्ययः' हे गुण कुठल्या हि काळातील नेतृत्वाचे भूषण ठरतील. अग्निमित्र, पुरूरवा व दुष्यंत यांच्या चरित्रांतून शिकण्यासारखा भाग बराच आहे. दिलीप, रघु किंवा अज यांसारख्या रघुवंशीय राजांची चरित्रे आज हि प्रेरक ठरण्यासारखी आहेत. रघुवंशीय राजांच्या गुणवर्णनात वास्तवापेक्षा कालिदासाने आदर्शाकडेच जास्त लक्ष पुरवले हे 'सोऽहमाजन्मशुद्धानां......' सारख्या श्लोकांवरून स्पष्ट दिसते. 'जीवन कसे आहे किंवा होते' हे रंगवून समाधान मानण्यापेक्षा 'जीवन असे असावे' यासंबंधी परिणतप्रज्ञ कलाकाराने काहीतरी सांगावे अशी अपेक्षा बाळगणे रास्त ठरेल. रघुवंशीय राजांच्या गुणांचे वर्णन करताना कालिदासाने नेतृत्वाचा सार्वकालीन व सार्वदेशीय आदर्श प्रस्थापित

करून ही अपेक्षा पूर्ण केलेली आहे यात शंका नाही. या दृष्टीने ही हा भाग्यशाली कवि भारतीय साहित्याचा मानबिंदू आहे असे म्हणणे औचित्यपूर्ण होईल.

[ 'वसंत' रौप्यमहोत्सवी दिवाळी अंक नोव्हेंबर १९६७ ]

महालय ठाणे
निबंध
१८।१।८२

# १०. भवभूति-व्यक्ती आणि वाङ्मय

संस्कृत सारस्वतात कविकुलगुरू कालिदासाच्या जोडीने भवभूतीचे नांव घेतले जाते. काव्य मीमांसाकार राजशेखर स्वतःला आदिकवी वाल्मीकीचा अवतार म्हणून घेतो हे खरे परंतु 'स्थितः पुनर्यो भवभूतिरेखया' या शब्दांत भवभूतीचा गौरव करण्यास विसरत नाही. 'क इह रघुकारे न रमते' या सुप्रसिद्ध उक्तीत कालिदासाच्या रघुवंशाची महती सांगणारा 'सदुक्तिकर्णामृता चा लेखक श्रीधरदास (इ. स. १३००) हि 'तथाप्यन्तर्मोदं कमपि भवभूतिर्वितनुते' असे म्हणून आपल्या कविप्रशस्तीचा समारोप करतो. वस्तुतः काव्य आणि नाट्य या दोन्ही क्षेत्रात नेत्रदीपक यश मिळवणाऱ्या कालिदासाशी केवळ नाट्याच्या क्षेत्रात निर्विवादपणे यशस्वी न ठरलेली तीन नाटके लिहिणाऱ्या भवभूतीची तुलना विद्वानांना व रसिकांना करावीशी वाटावी यांतच भवभूतीचे मोठेपण आहे असे म्हणण्यास हरकत नाही.

साधारणपणे संस्कृत कवी आणि नाटककार स्वतःबद्दल मौनच पाळतात हे सर्वांना माहीत आहे. याला मात्र भवभूती हा अपवाद ठरतो. महावीरचरितम् या नाटकात त्याने आपल्या पूर्वजांचे नांव उदुम्बर होते असे सांगून बरीच माहिती दिली. ते दक्षिणापथातील पद्मपूरचे राहणारे तैत्तिरीय शाखेचे, काश्यपगोत्री, पंचाग्नी ठेवणारे, सोमयाजी, ब्रह्मवेत्ते, सत्त्वशील आणि पङ्क्तिपावन ब्राह्मण होते. भवभूतीच्या पाचव्या पूर्वजाने-महाकवीने-वाजपेय हा श्रौतयाग केला होता. भवभूतीचे आजोबा भट्टगोपाल. त्याचे वडील नीलकंठ, पावित्र्याबद्दल प्रसिद्ध आणि आई जातुकर्णी. महावीरचरितम् हे नाटक सादर करणाऱ्यांनी 'भवभूतिर्नाम कविर्मित्रधेयमस्माकमित्यत्र भवन्तो विदांकुर्वन्तु' असे म्हटले हे उल्लेखनीय. या प्रस्तावनेत च 'श्रीकण्ठपदलाञ्छन' या शब्दात श्री म्हणजे वाग्देवीच्या कण्ठ म्हणजेच भवभूतिने मिळवलेल्या यशाचा उल्लेख दिसतो. श्रीकंठ हे शंकराचे हि एक नांव आहे हे वीरराघवासारख्या संस्कृत टीकाकाराने तर भवभूती हे नांव हि कवीला 'साम्बा पुनातु भवभूतिपवित्रमूर्तिः' या ओळीत त्याने रचलेल्या श्लोकार्धावर प्रसन्न झालेल्या राजाने बहाल केले असा तर्क करतो. भवभूतीला शंकराच्या (भवात) कृपेमुळे ऐश्वर्य (भूतिःयस्य) प्राप्त झाल्यामुळे हे उपनांव मिळाले असे हि डॉ. कुन्हन राजा यांनी Survey of Sanskrit Literature या आपल्या ग्रंथात सुचविले. भवभूतीने आपले उपनांव उदुम्बर असे म्हटलेले आहे; डॉ. केतकरांनी हे उपनांन उम्बर असावे असे आग्रहपूर्वक प्रतिपादन केले परंतु डॉ. तोडरमल यांनी संपादलेल्या व त्यासाठी घेतलेल्या १७ प्रतींत 'उदुम्बरे' असाच पाठ असल्यामुळे आणि 'उम्बर' हा पाठ फक्त कलकत्ता प्रतीत मिळत

असल्यामुळे 'उदुम्बर' हे भवभूतीच्या पूर्वजांच्या जुन्या गांवाचे नांव व त्याचीच स्मृती जपण्यासाठी या विद्वान् ब्राह्मणांनी हे कुलनाम पद्मपूरता रहावयास आल्यानंतर हि धारण केले असावे हा तर्क सयुक्तिक ठरतो. कवीचे मूळ नांव भवभूतीच असले पाहिजे हे अर्थातच राजशेखर, कल्हण, गोवर्धनाचार्य वगैरेंनी या नांवाने च केलेल्या प्रशस्तींवरून स्पष्ट आहे.

शंकर पांडुरंग दीक्षित यांनी 'गौडवहो'च्या प्रस्तावनेत मालतीमाधव नाटकाच्या एका प्रतीतल्या 'इति श्रीकुमारिलस्वामिप्रसादप्राप्तवाग्वैभव-श्रीमदुम्बेकाचार्य विरचिते मालतीमाधवे षष्ठोऽङ्कः' आणि 'इति श्रीभट्टकुमारिल-शिष्यकृते मालतीमाधवे तृतीयोऽङ्कः' या उल्लेखाच्या आधाराने भवभूति म्हणजेच मीमांसक उम्बेक असे मत मांडले. कुप्पुस्वामी शास्त्री, गंगानाथ झा व महामहोपाध्याय काणे या संशोधकांनी हि या मताला पाठिंबा दिला. उम्बेकाचार्य हा एक महान् मीमांसक त्याने श्लोकवार्तिकावर टीका लिहिली व कुमारिलाचा एके ठिकाणी 'गुरू' म्हणून उल्लेख (मण्डनमिश्राच्या भावनाविकारावरची टीका) केला हे खरे. परंतु मालतीमाधवाचा कर्ता म्हणून उम्बेकाचा उल्लेख फक्त एका प्रतीतच आहे व ज्या शांकर दिग्विजयाचा आधार उक्त मताच्या समर्थनासाठी घेतला जातो तो ग्रंथ उम्बेकाच्या कालानंतर अनेक शतकांनी रचलेला असल्यामुळे तो विश्वसनीय मानता येत नाही. शिवाय उम्बेकाने कुमारिलाचा उल्लेख वार्तिककार म्हणून केला असणे शक्य आहे. कुमारिलाचे श्लोकवार्तिक, मंडनमिश्राचे भावनाविवेक आणि उम्बेकाची तात्पर्यटीका यांचा अभ्यास केल्यानंतर उम्बेक या दोघांनंतर होऊन गेला असे स्पष्ट दिसते. उम्बेकाचा काळ त्याच्या मताची चर्चा करणाऱ्या कमलशीलाच्या आधी म्हणजे इ.स. ८०० च्या आधी च घ्यावा लागेल. हा काळ हि भवभूतीच्या सुमारे ५० वर्षानंतरचा आहे. अशा परिस्थितीत उम्बेकाच्या तात्पर्यटीकेत 'ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञां........' हा मालतीमाधवातला श्लोक येतो या जोरावर हे दोघे एकच होते असे म्हणणे कठिण आहे. उम्बेक हे नांव हि द्राविड आहे व भवभूति मीमांसक नसून वेदान्ती होता हे हि स्पष्टच आहे. शास्त्रग्रंथ लिहिणाऱ्यांची टीका होते कां हा हि प्रश्न विचारात घ्यावा लागेल. या सर्वांचा विचार करून भवभूति व उम्बेक यांचा काही संबंध नाही हे डॉ. मिराशींचे म्हणणे अधिक सयुक्तिक वाटते. महामहोपाध्याय डॉ. काणे यांच्या यावरील आक्षेपांचे खण्डन हि डॉ. मिराशी यांनी आपल्या Bhavabhuti या पुस्तकाच्या Appendix II (P. 89-102) त केलेले आहे.

भवभूतीच्या जन्मस्थानाची समस्या हि आता उरलेली नाही. भवभूती स्वतःच आपले जन्मस्थान पद्मपुर हे एक नगर होते असे सांगतो त्याचे बालपण येथे गेले.

हे पद्मपुर म्हणजे पद्मावती हे श्री. लेले यांनी मालतीमाधवाचा टीकाकार जगद्धर याच्या साक्षीवरून ठरवले, तथापि हा प्रदेश भवभूतीच्या वर्णनाशी तितका जुळणारा नाही. पद्मपुर किंवा पदमपुर हे भंडारा या प्राचीन विदर्भातल्या जिल्ह्यातील आमगाव जमींदारीतले. आमगाव स्थानकाच्या पूर्वेला २।।-३ मैलावर असलेले सध्यांचे हे खेडे असे डॉ. मिराशी यांनी उत्खननातल्या व अन्य पुराव्यांवरून ठरवले. प्राचीन काळी हे वाकाटकांच्या राजधानीचे शहर असावे हे उपलब्ध ताम्रपटाच्या पुराव्यावरून पटण्यासारखे आहे. या भागात अनेक प्राचीन मूर्ती सांपडतात व हा प्रदेश विविधाकृती खडक, झाडे, हिंस्त्र पशू, सर्प यांनी मंडित होता. हे भवभूतीच्या नाटकांतील वर्णनाशी मिळते जुळते आहे. सध्या पद्मपुराचे एका लहान खेड्यात रूपांतर झाले असले तरी जवळपास उत्कृष्ट प्राचीन मूर्ति सांपडतात आणि आसपास अद्यापि यजुर्वेदाच्या तैत्तिरीय शाखेचे ब्राह्मण (भवभूति याच शाखेचा) हि आढळतात.

भवभूतीच्या बालपणात मात्र पद्मपुरात व कलचुरी राजांच्या राष्ट्रकूटवंशी नन्नराजाचे राज्य असल्यामुळे भरभराटीला वाव नव्हता म्हणून नशीब काढण्यासाठी भवभूतीला उत्तरेत पद्मावतीला जावे लागले व तेथे त्याने बरीच वर्षे काढली. त्याचा विद्याभ्यास हि बहुधा येथेच झाला. त्याने आपल्या गुरूचे नांव ज्ञाननिधी असे दिले. नंतर तो कनोजला, मौर्यवंशी यशोवर्मा या नृपतीच्या आश्रयाला गेला. या यशोवर्म्याच्या दरबारात भवभूतीबरोबरच, 'गौडवहो' या ग्रंथाचा कर्ता वाक्पतिराज यांसारखे कवी होते असे राजतरंगिणीकार कल्हणाचे कविर्वाक्पतिराज श्रीभवभूत्यादि सेवितः । जितो ययो यशोवर्मा तद्गुणस्तुति-बन्दिताम् (तरंग ४ लोक १४४) ।। या प्रसिद्ध श्लोकांत म्हटलेले आहे. या उल्लेखांवरून भवभूतीचा काळ ठरविण्याला हि मदत होते. चीनी इतिहास ग्रंथावरून ललितादित्याचा काळ इ.स. ७२४ ते ७६१ असा ठरतो. (यशोवर्मा म्हणजे मध्यभारताचा 'श्चाफानमो') हा इ.स. ७२५ त गादीवर आला, कालप्रियनाथाच्या यात्रेच्या प्रसंगी भवभूतीच्या नाटकांचे प्रयोग झाले. हा कालप्रियनाथ म्हणजे उज्जयिनीचा महाकाल नसून कनोजच्या दक्षिणेला यमुनेच्या काठी वसलेल्या व त्या काळी गाजलेल्या मंदिरातील सूर्य हे हि आता सर्वमान्य झालेले आहे. या काल्पीचा उल्लेख राष्ट्रकूट राजा चौथा गोविंद याच्या ताम्रपटात आहे आणि भविष्य, वराह व स्कन्द या पुराणातल्या कृष्णपुत्र सांबाच्या सूर्यपूजेची कथा हि याला उपोद्बलक ठरते. मालतीमाधवात सूर्याच्या स्तुतिपर श्लोक हि आढळतो. [कल्याणानां .....।१-३]. राजतरंगिणीतल्या सूर्यग्रहणाच्या वर्णनावरून याकोबीने १४ ऑक्टोबर ७३३ ही या सूर्यग्रहणाची तारीख ठरवली व ती हि भवभूतीच्या आठव्या शतकाच्या आरंभीच्या काळाशी जुळते. भवभूतीवर

कालिदासाचा प्रभाव स्पष्ट च आहे. साहित्यशास्त्रकारात नवव्या शतकाच्या आरंभी होऊन गेलेल्या वामनाने महावीरचरित (१-५४) व उत्तररामचरित (१-३८) अशी दोन उदाहरणे दिली. स्वतःला भवभूतीचा अवतार म्हणून घेणाऱ्या राजशेखराचा काल इ.स. ८९० ते ९५०. यानंतरच्या सर्व साहित्यशास्त्रकारांनी म्हणजे धनंजय (९७४-१०००), वक्रोक्तिजीविताचा कर्ता कुन्तक (इ.स.१०००), भोज (इ.स. १०१०-१०५५) या सर्वांनी भवभूतीचा आदराने उल्लेख केलेला आहे. या सर्वांवरून भवभूतीच्या नाट्यरचनेचा काल इ.स. ७००-७३० ठरतो.

नवनवीन पुरातत्त्वीय शोध आणि सहृदय कल्पनाशीलता यांच्या साहाय्याने कै. डॉ. मिराशी यांनी भवभूतीची बाल्य, तारुण्य आणि वार्धक्य येथवरची जीवन- गाथा चांगल्या तऱ्हेने उकलून दाखवलेली आहे. महावीरचरित हे भवभूतीने अपूर्ण सोडून दिले. त्याचे उरलले अंतिम दोन अंक दोन कवीनी वेगवेगळे पूर्ण केले. नंतरच्या मालतीमाधव नाटकाच्या प्रस्तावनेत आपला अवमान करणाऱ्या पंडितंमन्यांविषयी उपेक्षा व्यक्त करणारे स्वाभिमानाचे

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञां
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः।
उत्पत्स्यतेऽ स्ति मम कोऽपि समानधर्मा
कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी ।। (मालतीमाधव १-६)

असे स्वाभिमानाचे उद्‌गार काढणारा भवभूती उत्तरापथाच्या यात्रेवर निघाला असेल. ग्वाल्हेरजवळील पद्मावती नगरी (आधुनिक पवाया किंवा पद्मपवाया) आपल्या तत्कालीन सांस्कृतिक वैभवामुळे आणि भगवान् कालप्रियनाथाच्या सान्निध्यामुळे त्याला फार आवडली असावी व तो तिथेच स्थायिक झाला असेल हे मिराशींचे अनुमान योग्यच ठरेल. मालतीमाधव नाटकांतला नायक माधव हि विदर्भातील पद्मपुर नगर सोडून न्यायशास्त्राच्या उच्च अध्ययनासाठी पद्मावतीला येतोच ना. माधव बौद्ध भिक्षुणी कामन्दकीचा शिष्य बनतो तर भवभूति संन्यासी ज्ञाननिधीचे शिष्यत्व पत्करतो. मालतीमाधवात उल्लेखिलेल्या तीन नद्या, नाटकांतला परिसर वगैरे सर्व पवायाच्या भूगोलाच्या आधारे मिराशीनी कौशल्याने दाखवून दिले. कल्हणाच्या राजतरंगिणातील श्लोकाच्या आधारे भवभूतीला उत्तरायुष्यात राजाश्रय मिळाला असावा या त्यांच्या अनुमानाला बळकटी आणणारे उल्लेख मात्र भवभूतीच्या तीन्ही नाटकात सापडत नाहीत. राजदरबारी वातावरण आणि राजाश्रयामुळे निर्माण होणाऱ्या सुस्थितीचे संकेत भवभूतीत कोठेच दिसत नाहीत, किंबहुना भवभूतीची प्रवृत्ती राजाश्रय विमुख च होती असे म्हणणे अंतर्गत प्रमाणावरून जास्त सयुक्तिक भासते. म्हणून डॉ. मिराशींनी उत्तररामचरित्र नाटकाच्या रचनेनंतर भवभूतीला वार्धक्यात पद्मावतीजवळच्या

कनोजच्या राजा यशोव़र्म्याकडून सन्मान मिळाला असे स्पष्टीकरण केले व ते कांही उल्लेखांवरून मान्य होण्यासारखे आहे.

भवभूतीचे पहिले नाटक महावीरचरित; दुसरे मालतीमाधव व तिसरे आणि शेवटचे आधिक विख्यात नाटक उत्तररामचरित. महावीर चरित व उत्तररामचरित ही नाटके रामचरित्रावर आधारलेली असल्यामुळऐ नाटकरचनेचा अनुक्रम बदलून मालतीमाधव या नाटकाची विवेचना सुरवातीला करणे मला विवेचनाच्या दृष्टीने अधिक सोयीचे वाटते. तथाबि नाटकाचा विचार करताना No conflict no drama हा उक्ती पाश्चिमात्य नाटक-चर्चेत फार प्रसिध्द आहे. तसे पाहिले तर प्रत्येकाच्या च जीवनात कमी अधिक प्रमाणात संघर्ष हा असतो च व या दृष्टीने जीवनाचे अनुकरण करणाऱ्या साहित्यात च त्याची प्रचीती यावी हे स्वाभाविक. परंतु नाटकाचा विचार करतांना पाश्चिमात्य विवेचन पद्धतीत No conflict no drama ही परवलीची उक्ती ठरते. या दृष्टीने पाहिले तर भरत किंवा अरिस्टॉटल यांनी संघर्षाला नाटकांत प्राणभूत तत्त्व मानले नाही याचे आश्चर्य वाटेल. तथापि या दोघांना या तत्त्वाची कल्पना नव्हती असे म्हणणे मात्र अन्यायाचे ठरेल. भारतीय पद्धतीच्या नाट्यविवेचनात हि गर्भसंधी हा संघर्षावरच आधारलेला आहे हे लक्षात येईल. भवभूतीच्या नाटकांत तर संघर्षाला सर्वत्र प्राधान्य आहे असे दिसते. 'भूम्नां रसनां प्रयोगाः गहनाः' सौहार्दहृद्यानि विचेष्टितानि । औद्धत्यमायोजितकामसूत्रं चित्राः क्रिया वाचि विदग्धता च ।। असे लिहून भवभूतीने या संघर्षाचे च सूतोवाच केलेले आहे. तशांत हे प्रकरण असल्यामुळे कविकल्पनेला अधिक महत्त्व प्राप्त झाले. यामुळे निरनिराळ्या घटना, निरनिराळ्या व्यक्ती यांच्या माध्यमांतून हा संघर्ष फुलवण्याचा भवभूतीचा प्रयत्न कांहीसा 'औद्धत्या'त मोडणारा आहे. मालती व माधव यांच्या प्रणयाच्या मार्गात बाधेच्या स्वरूपांत येणाऱ्या नन्दनामुळे या संघर्षाचे बीज तयार होते; अघोरघण्ट, कपालकुण्डला आणि माधवाच्या विरोधांत ठाकलेले राजपुरुष यांच्या माध्यमातून बाह्यसंघर्षाला वाव मिळतो आणि भवभूतीत यशस्वी नाटककाराला आवश्यक असणाऱ्या निर्लेप वृत्तीचा अभाव असल्यामुळे हा संघर्ष च प्रभावी नव्हे प्रमाथी झाल्यासारखा भासतो. कथांशाच्या योजनाबद्दल विकासात पाल्हाळिकतेमुळे अनेक अडसर निर्माण होतात. (नवव्या अंकातील माधवाचा कंटाळवाणा शोक) किंवा श्मशानातील प्रवेशानंतरचा नाटकाचा असंबद्ध वाटणारा भाग) हे खरे परंतु राजकारणी विवाहाच्या वेदीवर आपल्या लाडक्या कन्येचा बळी देऊन (कथमुपहारीकृतास्मि तातेन राज्ञे) कापालिकत्वावर हक्क सांगणारा पिता भवभूतीनेच संस्कृत नाटकात रंगवला. हे अमान्य करता येणार नाही. एका दृष्टीने मालतीचा बळी देऊ इच्छिणाऱ्या कापालिक अघोरघंटाच्या नृशंस प्रधानापेक्षा हि भूरिवसु अधिक निष्कसण नाही का ? कालिदासाने समकालीन सामन्ती

वातावरणात अपरिहार्यपणे होणाऱ्या स्त्रीच्या विटंबनेचे चित्र काढले परंतु 'गृहे गृहे पुरुषाः कुलकन्यंकाः समुद्वहन्ति, न खलु कोऽपि लज्जापराधीनमनपराद्धं मुग्धसुकुमारस्वभावं कुलकुमारीजनं प्रभवामीति वाचानलेन प्रज्वालयन्ति । एते खलु ते हृदयशल्यविशेषा आमरणं संस्मर्यमाणदुःसहाः पतिगृहनिवासवैराग्य कारिणो महापरिभवा येषां कृते स्त्रीजन्मलाभं जुगुप्सन्ते बान्धवाः'' या शब्दांत 'गृहिणं: कथं पीड्यन्ते' ची प्रचीती आणून देणाऱ्या भवभूतीचे 'विचेष्टित' त्याकाळी औद्धत्यपूर्णच होते हे मान्य करावे लागते. श्मशान, नरबलि, युद्ध, भर रस्त्यात सिंहाशी सामना या सगळ्यांचे चित्रण करून भवभूतीने प्रणयाच्या कथेला एक विशाल पार्श्वभूमी मिळवून देण्याचे 'सौहार्दहृद्य विचेष्टित' च केले. मालतीमाधवाच्या प्रणयाची कथा ही युवक-युवतींच्या मनात स्वाभाविकपणाने निर्माण होणाऱ्या परंतु शब्दांच्या पलीकडे असलेल्या आणि 'जडयति च संतापयति' चा यथार्थ अनुभव करून देणाऱ्या विकाराची कहाणी आहे. True course of love never did run smooth या न्यायाने मालतीप्रमाणे माधवाला हि दुःखाच्या खाईतून जावे लागते, मालतीला आपल्या स्वाभाविक प्रवृत्ती विरूद्ध दुःसाहस करावे लागते आणि म्हणूनच पिता-पुत्रींची भेट दहाव्या अंकात च होते. प्रणयाबरोबरच जीवनांत अपरिहार्यपणे अनुभवाला येणाऱ्या दुःखाच्या अंतर्निहित प्रवाहाची ही कथा आहे आणि या दुःखापासून पराङ्मुख न होता याचा प्रतिकार करून सुखाची प्राप्ती घेण्याचे 'विचेष्टित' करण्यांत माधव-मालती प्रमाणे मकरन्द-मदयन्तिका यांचा च नव्हे तर भूरिवसु आणि कामन्दकी यांचा हि अन्तर्भाव होतो. संपूर्ण नाटकात मनुष्याचे कर्तृत्व आणि जीवनांतील दुःख यांचा एक भीषण संघर्ष दिसतो. कधी कधी मनुष्य नियतीच्या आघाताने किंकर्तव्यमूढ होऊन हतबल होतो परंतु त्याचवेळी नियतिजन्य यहृच्छा आपल्या हातांत सूत्रे घेते. याचा अनुभव कपालकुण्डला आणि अघोरघंट यांच्याप्रमाणे कामन्दकीला हि येतो. मालतीला बळी देण्याच्या वेळी माधवाने श्मशानात असणे, शंकरपुरात वाघाने मांडलेल्या धुमाकुळीत ऐनवेळी येऊन मकरंदाने मदयन्तिकेला सोडवणे हा सगळ्या 'काकतालीय' घटना हि नियतिजन्य यदृच्छेचा आविष्कार 'सर्वंकषा भगवती भवितव्यतेव' हे खरे परन्तु म्हणून मालती-माधवांतील पात्रे कार्यपराङ्मुख होतांना दिसत नाहीत; त्यांना

प्रविक्षिप्तं चेतः प्रविशति च मोहान्धतमसम्
अकिञ्चित्कुर्वाणाः पशव इव तस्यां वयमहो
विधातुर्वामत्वाद् विपदि परिवर्तामह इमे ॥

याचा अनुभव आल्यावाचून रहात नाही. मालती-माधव तांत्रिक दृष्ट्या सुखान्त नाटकांतल्या या ओळी We are like flies to wanton boys, they kill us for their sport'' या ग्लूसेस्टरच्या ओळींची आठवण करून देणाऱ्या आहेत.

अशा रीतीने मूलतः दारुण असलेल्या दैवाचे 'परिणाम रमणीयत्व' दाखवणारा भवभूती हा खऱ्या अर्थाने वेदान्ती होता. नाटकाच्या कथेचे धागे तीन :- मालती माधव यांच्या प्रेमाची मुख्य कथा, मकरन्द आणि मदयन्तिका यांच्या प्रेमाची गौण कथा आणि कलहंस आणि मालतीची दासी मंदारिका यांच्या विवाहाची कथा. हे धागे जोडतांना भवभूतीने आपली कथा परिचित पद्मावती शहरांतील उद्यान, राजवाडा, देऊळ, बुद्ध विहाराचा परिसर यांच्यातून फिरवली, अपरिचित आणि भयावह श्मशान भूमीत नेऊन बीभत्स आणि रौद्र या रसांशी कथेचा संबंध जोडला. कथेत प्रगट झालेल्या भावनांची विविधता प्रणयापासून युद्धापर्यंत, नाजुकपणापासून भयावह भीषणतेपर्यंत आणि शृङ्गारापासून नर्मविनोदापर्यंत (मकरंदाची भूमिका, गणेशविषयक नान्दीश्लोक) सर्वांना गवसणी घालते. यांत 'वैदग्ध्य' आहे, 'पाण्डित्य' आहे, प्रसंगाचे वैचित्त्य (कामदेवमंदिरातली प्रणयिजनांची पहिली भेट, वाघाची झडप) हि आहे परंतु पाल्हाळिक वर्णनामुळे 'नाटक' मात्र गौण आहे हे मान्य करावे लागेल. परंतु या नाटकाची गुणवत्ता प्रेम आणि साहसाची कथा, कापालिकांचे अपरिचित चित्र, मालती, मदयन्तिका आणि कामन्दकी या स्त्रियांचे कौशल्यपूर्ण चित्रण निरनिराळ्या, अगदी बीभास आणि सैद्र यांसारख्या रसांचे दर्शन आणि

अविरलमिव दाम्ना पौण्डरीकेण नद्धः
स्नपित इव च दुग्धस्त्रोतसा निर्झरिण ।
कवलित इव कृत्स्नश्चक्षुषा स्फारितेन
प्रसभममृतमेघेनेव सान्द्रेण सिक्तः ।। (मालतीमाधव ३-१६)

यांसारख्या भावनेचा रञ्जक आविष्कार करणारी मुक्त काव्यशैली यांवर अवलंबून आहे. या नाटकांत वापरलेल्या विषयानुरूप वृत्तांचा हि विचार करणे योग्य. सग्धरे बरोबर अघोरघंट व कपालकुंडला यांनी केलेल्या चामुण्डेच्या प्रशंसा-गीतात भवभूतीने दण्डक वृत्त कौशल्याने वापरले.

रामायणातील पूर्व रामचरित्र हे संविधानक म्हणून घेऊन त्यांत कार्यैक्य (Unity of acton) साधण्याच्या भवभूतीच्या प्रयत्नांतून महावीरचरित या नाटकाचा जन्म झाला. 'महापुरुषसंरभो यत्र मंभीरभीषणः' म्हणजे रामासारख्या महावीराचा परशुराम, वाली इत्यादिकांशी भयानक स्वरूपाचा कलह म्हणजेच असाधारण व्यक्तींच्या माध्यमांतून वीररसाचा आविष्कार रंगभूमीवर करण्याचा हा भवभूतीचा प्रयोग 'अप्राकृतेषु पात्रेषु यत्र वीरः, स्थितो रसः' ( राम, परमशुराम,वाली इत्यादिकांत तो प्रत्यक्षपणे दिसतो तर वसिष्ठ, विश्वामित्र, जनक, दशरथ वगैरेंच्या उद्‌गारांत हि तोच डोकावतो), 'भेदैः सूक्ष्मैरभिव्यक्तैः प्रत्याधारं विभज्यते' या शब्दांत हे भवभूतीने स्पष्ट केले. पूर्व रामचरित्रात अनेक

घटना घडल्या आणि त्या पात्रांशी त्याचा संबंध आला एवढाच सर्वांना जोडणारा दुवा. यांत कार्यैक्य साधण्यासाठी भवभूतीला रामायणात अनेक फेरफार करावे लागले. रावणाचा अमात्य माल्यवान् याच्या कपटी कारस्थानामुळे ही कथा घडल्याचे भवभूतीने दाखवले. सीतेकरता रावणाने घातलेली मागणी, शूर्पणखेने रामलक्ष्मणांना फसविणे, मारीचाने केलेली रामाची फसवणूक, सीतेचे हरण, वालीचा वध, बिभीषणाचे रावणाला सोडून जाणे आणि रामलक्ष्मणांशी त्याचे सख्य या सर्व घटना माल्यवानाच्या कारस्थानामुळे झाल्या आणि यात त्याचा हेतू रावणाचे राज्य दृढमूल करण्याचा होता असे दाखवून भवभूतीने या नाटकाला राजकारणाची पार्श्वभूमी मिळवून दिली. अहल्योद्धार, ताटकावध, शिवधनुर्भङ्ग या घटना विश्वमित्राच्या आश्रमांत सीता आणि उर्मिला यांच्या उपस्थितीत घडल्याचे दाखवून त्यांच्या मनात रामलक्ष्मणांविषयी अनुराग उत्पन्न होतो ही भवभूतीची ची करामत. परशुरामाला धनुर्भङ्गाची बातमी सांगून चिथावणे व परस्पर त्याच्याकरवी रामाचा, रावणाच्या शत्रूचा कांटा काढण्याचा प्रयत्न करणे हा माल्यवानाच्या राजनीतीचा च एक भाग. युधाजित् आणि भरत यांनी च रामाला राज्यभिषेक करावा ही विनंती दशरथाला केली होती; त्यावेळी माल्यवानाच्या सूचनेप्रमाणे शूर्पणखेने पछाडलेल्या मंथरेने कैकयीच्या म्हणून दिलेल्या पत्रातील विनंतीनुसार तिच्यासाठी दोन वर रामाने मिथिलेत च दशरथाकडे मागितले असे भवभूतीने दाखवले आणि कैकेयीला दोषमुक्त केले. पंचवटीतील खरदूषणादिकांचा वध, सीताहरण वगैरे घटनांच्या मुळाशी तर माल्यवानाचे कारस्थान होते, इतकेच नव्हे तर वालीसारख्या वीरश्रेष्ठाला रामवधासाठी उद्युक्त करण्याची क्लृप्ति हि माल्यवानाची च होती असे दाखवून रामावरचा वालिवधाचा कलंक हि भवभतीने पुसून टाकला. अर्थात् कारस्थानी माल्यवान् आपला सगळा बेत उघड करतो हे खऱ्या मुत्सद्याला शोभण्यासारखे नाही. पण हा नाटककाराच्या अभिधेबद्दलच्या आग्रहाचा परिपाक. सीतेच्या अपहरणाची कथा जटायूच्या तोंडी घालून सीतेने रामायणांत लक्ष्मणावर व्यक्त केलेल्या संशयाला हि कलाटणी दिली. अहल्योद्धार, ताटकावध, जृम्भकास्त्रे, शिवधनुर्भङ्ग, रामसीतेच्या विवाहाविषयीची बोलणी या घटना या नाटकात विश्वमित्राच्या आश्रमात घडतात, नाटकाचा दुसरा व चौथा अंक मिथिलेत घडतो असे दाखवून भवभूतीने आवश्यक ती पात्रे मिथिलेत आणली. या सर्व फेरफारांमुळे महावीरचरिताच्या कथानकाला एकसूत्रता आली असेल, परंतु विश्वसनीयता राहिली नाही. रामलक्ष्मणांचा विवाह दशरथाच्या गैरहजेरीत मिथिलेत ठरला कौसल्या, सुमित्रा वगैरेंच्या अनुपस्थितीतअसे दाखविण्यात दशरथावर व त्याच्या राण्यांवर उघडपणे अन्याय होतो. वसिष्ठांची अनुपस्थिती ही हि विस्मयजनक च. हे उत्तरामचरितातील ''जीवत्सु तातपादेषु नवे दारपरिग्रहे ।

मातृभिश्चिन्त्यमानानां ते हि नो दिवसाः गताः ।। या श्लोकाशी विसंगत आहे हे भवभूतीच्या लक्षांत आलेले नाही. कार्यैक्य साधण्याच्या या प्रयत्नांत पांचव्या अंकात च भवभूतीला रामलक्ष्मणांचा पंचवटी ते किष्किन्धा हा रामलक्ष्मणांचा प्रवास व त्यांत कबंध आणि वाली यांच्याशी झालेला रामाचा संघर्ष दाखवावा लागला आणि त्यामुळे स्थलैक्य (Unity of place) नाहीसे च झाले. रामायणासारख्या प्रख्यात व लोकदृष्टया श्रद्धेचा विषय झालेल्या कथेत इतके मूलगामी बदल करावे हे रुचणे शक्य च नव्हते; आनन्दवर्धनासारख्या रसिक काव्यमर्मज्ञाला हि ते आवडले नव्हते हे 'सन्ति सिद्धरसप्रख्या ये च रामायणादयः। कथाश्रया न तैर्योज्या स्वेच्छारसविरोधिनी'' या त्याच्या टीकेवरून स्पष्ट आहे. तथापि हे बदल करण्याच्या मुळाशी शील, शक्ति आणि सौंदर्य या तीन्ही गुणांचा प्रकर्ष ज्या व्यक्तीच्या ठिकाणी आहे व आपली व्यवहारातील कर्तव्ये हि जो व्यवस्थितपणे पार पाडू शकतो तो नेता कडव्या विरोधकांना हि वंदनीय वाटतो हे रामासारख्या महावीराच्या चित्रणांतून दाखवणाचा भवभूतीचा हेतू होता असे दिसते. राम हा अवतारी पुरूष म्हणून मात्र भवभूतीने रंगविलेला नाही हे लक्षांत ठेवण्यासारखे आहे, परंतु त्याचा आत्मविश्वास, त्याचे चारित्र्य, त्याची धीरोदात्तता, निर्मत्सरी वृत्ती, शत्रू च्या हि गुणांचे कौतुक करण्याची तयारी यांमुळे वाली 'कामं त्वया सह श्लाघ्यो वीरगोष्ठीमहोत्सवः' असे उद्‌गार काढतो; पराभूत झाल्यानंतर हि रामाचा उल्लेख 'गुणराशि' या शब्दाने करतो आणि हतप्रभ परशुराम हि त्याच्याबद्दल 'वत्स ब्राह्मणवत्सलेन शमितः क्षेमाय दर्पामयः' म्हणजे तू 'माझा दर्परूपी रोग नाहीसा करून ब्राह्मणांबद्दलचे प्रेम च प्रकट केलेस' असे म्हणतो.

हे सर्व लक्षांत घेतले म्हणजे महावीर-चरित हे केवळ रामकथेचे नाट्य रूपांतर नव्हे तर यांतील संविधानकाच्या त्रुटी मान्य करून हि निश्चित हेतू डोळ्यापुढे ठेवून लिहिलेले राजकीय नाटक आहे. यांतला संघर्ष मात्र नाटकाच्या स्वरूपामुळे 'बाह्य' पातळीवर च राहिला हे मान्य केले पाहिजे. मानरक्षणापुढे मुक्तीला हि तुच्छ लेखणाऱ्या आणि असामान्य शौर्य व विद्वत्ता अंगी असणाऱ्या परशुरामाचा पराभव हा अमर्याद घमेंडीमुळे होतो हे दाखवून भवभूतीने कारुण्याचा अन्तःप्रवाह या वीररसपूर्ण नाटकात हि कायम ठेवला. महावीरचरितांत वाली सारख्या असाधरण शौर्य व नेत्रदीपक यश मिळविणाऱ्या व्यक्तीला दैवामुळे रावणासारख्याशी मैत्री जोडावी लागते व त्याचे मोल प्राणांनी मोजावे लागते ही देखील भवभूतीच्या मताने ' सर्वंकषः कषति हा विषमः कृतान्तः' ची प्रचीती. म्हणजे जीवनाला व्यापून राहिलेल्या कारुण्य व तज्जन्य दुःखरूपी नाटकाचाच एक अङ्क. सीता-वियोगामुळे शोकामग्न झालेल्या रामाच्या उद्‌गारांत हि कारुण्याची

छटा दिसते.

मालतीमाधव नाटकाप्रमाणे या सुरवातीच्या नाटकात हि भवभूतीने प्रसंगानुरूप आणि रसानुकूल भाषा वापरून संस्कृत भाषेवरले आपले प्रभुत्व दाखवून दिले. रौद्र आणि बीभत्स रसांच्या वर्णनांत शार्दूल विक्रीडित (उत्खात-क्षितिपालवंश-गहना ....... २-१९), स्त्रग्धरा (कैलासोद्धारक्षारत्रिभुवन ......२-१६) यांसारख्या पलेद्दार वृत्तांची योजना करणारा हा वश्यवाक् कवी शृङ्गार आणि करुण रसांच्या अभिव्यक्तीकरता वसन्ततिलका, मालिनी, मन्दाक्रांता अशी लहान वृत्ते वापरण्याचे औचित्य दाखवतो. अनुनयाकरता रथोद्धता वृत्ताच्या वापरात (एषा नो नरपतितिर्यथा स्थितः ...... ३-१३) हि हे कौशल्य दिसते.

उत्तररामचरिता त भवभूतीने रामायणाच्या उत्तरकांडातील कथेला नाट्यरूप दिले. महावीर चरितांतील पांचव्या अंकातले व 'यामोषधि (२-४), 'दनुर्नाम श्रियः पुत्रः, (३४) हे श्लोक रामायणाच्या चिकित्सक आवृत्तीत अनुक्रमे अरण्यकाण्ड (६३-१४) व किष्किन्धाकाण्ड (४-१२) यांत मिळतात. याचप्रमाणे उत्तररामचरितातल्या सहाव्या अङ्कात कुशाने 'रामायणा'च्या बालचरितातून पाठ म्हणून दाखवलेले 'प्रकृत्यैव प्रिया सीता' आणि 'तस्यैव रामाः सीतायाः' दोन श्लोक पाठभेदांनी रामायणाच्या बालकांडाच्या चिकित्सक आवृत्तीत दिसतात. उत्तररामचरितांतील सीतेचे 'अहमप्येतस्य हृदयं जानामि ममाप्येषः' हे उद्‌गार म्हणजे वर उल्लेखिलेल्या श्लोकातील 'अन्तर्गतमापि व्यक्तमाख्याति हृदयं हृदा' या ओळीचा अनुवाद आहे. तसेच 'त्वदर्थमिव विन्यस्तः शिलापट्टोऽयमग्रतः यस्यायमभितः पुष्पैः प्रवृष्ट इव केसरः ।।' हा लवाने पाठ म्हणून दाखवलेला श्लोक 'रामायणा'च्या उत्तरभारतीय प्रतीत पाठभेदाने आढळतो.) हे सर्व खरे, परंतु उत्तररामचरिताची नाट्यकथा रचतांना हि भवभूतीने आपल्या नाट्यकल्पनेनुसार मौलिक फेरफार केले. ऋष्यशृंगाचे सत्र आणि त्यामुळे सर्व वडील मंडळीचे अयोध्येत नसणे, सीतारामांचे चित्रदर्शन (अङ्क पहिला), दुसऱ्या अंकातील वनदेवता वासंती आणि आत्रेयी यांचा प्रवेश व नंतरचे दण्डकारण्यवर्णन हे सर्व भवभूतीचे 'विचेष्टित'. शम्बूकवधानंतर राम अगस्त्याश्रमात गेल्याचा उल्लेख रामायणात आहे, पण तेथून पंचवटीत गेल्यानंतर रामाचे दुःख असह्य होऊन तो मूर्च्छित झाल्यानंतर त्याला सावध करण्यासाठी सीतेला अदृश्य स्वरूपात आणण्याची म्हणजे छाया-अंकाची मौलिक कल्पना भवभूतीची. या निमित्ताने सीतेच्या मनांत सलणारे अकारण परित्यागाचे शल्य काढून टाकून रामाच्या पुनर्मीलनासाठी तिची मानसिक तयारी करण्याचे कार्य भवभूतीने साधले आणि एका दृष्टीने सीतेला न्याय हि दिला. चौथ्या अंकातील जनक कौसल्या यांचा

प्रवेश, लवाशी भेट आणि त्याच्याबद्दल वाटणारे आकर्षण, पांचव्या अंकातील लव-चंद्रकेतूंचे वीरोचित वागणे आणि बोलणे, सहाव्या अंकातले त्यांचे युद्ध, नंतर रामाची कुशलवांशी भेट आणि अनेक प्रमाणांच्या आधारे त्यांची ओळख पटणे हे सर्व भवभूतीच्या कल्पनेचे विलास. रामायणात अश्वमेधाचा उल्लेख आहे परंतु लव-चंद्रकेतूंच्या युद्धाचा प्रसंग नाही. सातव्या अंकातील गर्भनाटक आणि नंतर राम सीतांचे पुनर्मीलन हे हि मौलिक च.

या सर्व फेरफारांना जोडणारा, किंबहुना मानवी जीवनाला व्यापून टाकणारा, अगदी आनंदाच्या क्षणी हि आपल्या सुप्त सामर्थ्याची चुणूक दाखवून देणारा कारुण्याचा प्रवाह वाङ्मयात हि सर्वस्पर्शी असू शकतो हे नाटकांत परिणामकारकतेने प्रत्ययाला आणून देण्यात उत्तररामचरिताची थोरवी आहे. उत्तररामचरित्राच्या पहिल्या अंकाचा विषय सीतात्याग. याबद्दल निर्णय रामाने सुखासुखी घेतला नाही कारण 'तीर्थोदकं च वह्निश्च नान्यतः शुद्धिमर्हतः' हीच त्याची तिच्याबद्दलची धारणा. चित्रदर्शनातील काही प्रसंगांच्या (समयःस वर्तत' या कवितेतील विवाहाची स्मृती) अनुरोधाने भवभूतीने राम व सीता यांच्या अकृत्रिम प्रेमाचे ('किमपि किमपि मन्दं' हा श्लोक) मनोज्ञ वर्णन करून सीतात्यागातील कारुण्याची उत्कटता वाढवली. चित्रदर्शनात माल्यवान् पर्वताची ओळख पटल्याबरोबर सीतेच्या वियोगाची आठवण होऊन 'विरम विरम अतःपरं न क्षमोऽस्मि । प्रत्त्यावृत्तः पुनरिव स मे जानकीविप्रयोगः'' असे म्हणणारा राम या अंकाच्या शेवटी सीतात्यागाचा कठोर निर्णय घेतो. यात कारुण्याचे रंग अधिक गडद करण्याचा प्रयत्न आहे. चित्रदर्शनामुळे गर्भभरालसा सीतेला 'विविध विस्रम्भां'ची साक्ष असणाऱ्या त्या रमणीय प्रदेशात जाण्याची इच्छा होते व राम तिचे डोहाळे पुरविण्यासाठी लक्ष्मणाला ताबडतोब रथ तयार करण्याची 'अयि करतो. 'आर्यपुत्र युष्माभिरप्यागन्तव्यम्' असे सुचविणाऱ्या सीतेला आणि कठिनहृदये एतदपि वक्तव्यम्' असे प्रेमाने म्हणून थकलेल्या सीतेला आपल्या बाहूवर डोके ठेवून घेण्याचे सुचवितो आणि सीतेने तसे केल्यावर तिच्या स्पर्शाने मोहरून जातो. स्वप्नातच 'हा आर्यपुत्र, सौम्य, कुत्रासि' असं विचारणाऱ्या सीतेला स्नेहाने स्पर्श करून पतिपत्नींच्या मनोमीलनाचे अविस्मरणीय चित्र 'अद्वैतं सुखदुःखयोरनुगुणं ......' या श्लोकांत काढणारा राम दुर्मुखाकडून सीतापवादाची बातमी समजल्यानंतर प्रेम आणि कर्तव्य यांच्य कटु अन्तःसंघर्षात सांपडतो. शुद्ध चारित्र्य असणाऱ्या सीतेवर बालंट यावे आणि त्याचा फैलाव विषारी कुत्र्याच्या विषाप्रमाणे सर्वत्र व्हावा यावर उपाय कोणता ?वडील मंडळींच्या अनुपस्थितीत नूतन राजत्वाच्या जबाबदारीची जाणीव वसिष्ठसंदेशाने तीव्र होते व तो कर्तव्यासाठी स्वसुखाचा होम करण्याचा निर्णय घेतो आणि सीतेला हे सर्व

सांगण्याचे साहस करू न शकल्यामुळे सीतेला प्रणाम करून तिला अरण्यात सोडून देण्याची आज्ञा देतो. पहिल्या अंकातल्या कोमल, सात्त्विक आणि संयत शृङ्गाराने कारुण्याला आपला अर्घ्य अपर्ण केला असे म्हणणे योग्य.

दुसऱ्या अंकात सुरवातीला विष्कम्भकात वाल्मीकि-शिष्या आत्रेयी आणि वनदेवता वासंती यांच्या संवादातून सीतात्यागानंतरच्या घटना कळतात व आत्रेयीकडून वाल्मीकीच्या काव्यस्फुरणाची वार्ता वाचकांना समजते. वाल्मीकीच्या काव्यस्फुरणाचा संबंध शोकाशीच असल्यामुळे कारुण्याची छाया या विष्कंभकावर हि पडली. पुढे शंबूकवधाच्या निमित्ताने रामाला जनस्थानात आणि पंचवटीत आणून नाटकांतील कारुण्याला भवभूतीने मुक्तद्वार करून दिले. शम्बूकवधासारखे मनाला न पटणारे कठोर कृत्य रामाला राजधर्म म्हणून करावे लागते. यांत हि कारुण्याची छटा आहे. हे कृत्य करतांना रामाला सीतात्यागाची आठवण होते आणि 'रामस्य गात्रमसि निर्भरगर्भखिन्न सीताविवासनपटो करुणा कुतस्ते ' असे म्हणत वधानंतर 'कृतं रामसदृशं कर्म' असे उद्‌गार काढतो. जनस्थानाचा तो प्रदेश आहे हे कळल्याबरोबर त्याच्या हृदयाची जखम उलते आणि 'धनीभूतः शोको विकलयति मा नूतन इव' चा अनुभव येतो. तिसऱ्या अंकाच्या सुरवातीला अनिवार शोकामुळे रामावर कोसळणाऱ्या संभाव्य आपत्तीच्या प्रतिकारासाठी भागीरथीकरवी सीतेला अदृश्यस्वरूपात रामाजवळ आणून सोडण्याची व्यवस्था भवभूतीने केली. म्हणून हा छाया अंक. या अंकात सीतेचा प्रवेश च 'करूणस्य मूर्तिरिव शरीरिणी । विरहव्यथेव', या स्वरूपात. यातील पंचवटीचे दर्शन, पुत्रवत् प्रेम केलेल्या हत्तीच्या छाव्यावर आलेले संकट पाहून अभावितपणे सीतेने रामाला हांक मारणे, वस्तुस्थितीचे भान झाल्यामुळे सीतेचे भानावर येणे, रामाच्या येण्याचे प्रयोजन कळल्यानंतर 'दिष्ट्या अपरिहीनधर्मः खलु स राजा' असे त्रयस्थासारखे उद्‌गार काढणे, राम शोकावेगाने मूर्च्छित झाल्यानंतर तमसेच्या सूचनेनुसार स्पर्श करून राम शुद्धीवर आल्याबरोबर 'प्रत्यागतमिव जीवितं त्रैलोक्यस्य' असे अभावितपणे म्हणून जाणे या सर्वांतील करुणरम्यता वाखाणण्यासारखी आहे; ' अहो संविधानकम्' असे वाचकांना म्हणायला लावणारी आहे. नंतरची रामाची वासंतीशी भेट, तिने रामाची प्रेमाने केलेली कानउघाडणी आणि विचारलेला जाब, रामाने 'लोको न विमृशतीति' आणि कारण विचारल्यानंतर 'स एव जानाति किमपि' असे असहायपणे म्हणणे वगैरे ऐकून हळूहळू सीतेत होऊ लागलेले परिवर्तन आणि शेवटी रामाच्या तोंडून अश्वमेधात त्याने सहधर्मचारिणी म्हणून आपलीच मूर्ति उभी केली हे कळल्यानंतर अंकाच्या शेवटी सीतेने आनंदाने काढलेले 'उत्खातमिदानीं परित्यागलज्जाशल्यमार्यपुत्रेण' हे उद्‌गार हे सर्व रामाच्या 'पुटपाकप्रतीकाशः'

रामस्य 'करुणो रसः' ची खात्री पटवणारे आहेत.

चौथ्या अंकाच्या सुरवातीला आश्रमांत शिकणाऱ्या मुलांच्या मनाचे निरागस चित्रण करून भवभूतीने निर्मळ विनोदाचा शिडकावा करून कारुण्याचा ताण कमी केला, परंतु याच विष्कंभकात जनक व कौसल्या यांच्या आगमनाची वर्दी देऊन स्थायी करुण रसाचे विस्मरण होऊ दिलेले नाही. जनक व कौसल्या यांच्या या अंकातील सीतात्यागावरच्या प्रतिक्रिया, जनकाचा सात्त्विक अमर्ष, कौसल्येने केलेली रदबदली या सर्व घटना दुःखाचे, कारुण्याचे रंग गडद करतात. पांचव्या अंकात लव आणि चंद्रकेतु यांच्या द्वंद्वयुद्धाची तयारी असल्यामुळे वीररसाचा आविष्कार हा या अंकाचा विषय; परंतु यांत हि युद्ध पहाणाऱ्या सुमंत्राला लवाकडे बघून सीतेची आठवण व्हावी, त्याने जृंभकाचा उपयोग केलेला बघून त्याचा संशय बळावत जावा आणि शेवटी सीता च अरण्यात मृत्युमुखी पडली असे धरून चालल्यामुळे 'लतायां पूर्वलूनायां प्रसवस्योद्गमः कुतः' म्हणजे लता च नाहीशी झाल्यावर तिच्यावर फुले कशी उमलणार', असे मनांत येऊन त्याने अश्रू ढाळावे ही भवभूतीची योजना कारुण्याला च उठाव देणारी आहे हे लक्षांत येते.

सहाव्या अंकात लव-चंद्रकेतूंचे युद्ध रामाच्या आगमनामुळे थांबल्यानंतर लवकुशाचे सीतेशी असलेले साम्य, रघुवंशातील राजांच्या आकृतींशी त्यांची मिळतीजुळती रूपे, लवाने केलेला जृम्भकास्त्राचा उपयोग, लव-कुशांचे जुळेपण वगैरेंमुळे रामाने सरळ प्रश्न विचारण्याचे ठरवले; परंतु तितक्यात 'विना सीतादेव्या किमिव हि न दुःखं रघुपतेः ।। प्रियानाशे कृत्स्नं खतु जगदरण्यं हि भवति '।। असे रामायणांतले श्लोक कुशाने तिऱ्हाइतपणे पाठ म्हटलेले ऐकून रामाच्या पालवलेल्या आशा खुरटून जातात. ही गोष्ट कारुण्यालाच पोषक ठरते. राम त्या मुलांना आणखी कांही श्लोक म्हणायला सांगतो आनि ते ऐकल्यानंतर रामाला आपण सीतेवर केलेल्या अन्यायाची जास्तच तीव्रतेने जाणीण होते. यात भर म्हणून कौसल्या, जनक वगैरे मंडळी आश्रमाकडे च येत आहेत ही बातमी कळते आणि त्यांना सामोरे जाण्याची तयारी करताना रामाच्या दुःखाला पारावार रहात नाही. या दृष्टीने या अंकातल्या सुरवातीच्या वात्सल्याची परिणती हि करुणरसांत च होते.

सातव्या अंकाची परिणती राम व सीता यांच्या पुनर्मिलनात म्हणजे आनंदी-आनंदात होते हे खरे परंतु यासाठी वापरलेल्या गर्भनाटकाचा स्थायी भाव शोक च आहे. गर्भनाटकाची सुरवात हि 'करुणाद्भुतरसं किञ्चिदुपनिबद्धम्' ने होते आणि भवभूती वाचकांना व प्रेक्षकांना नाटकाच्या मध्यवर्ती कल्पनेचा विसर पडू देत नाही. प्रत्यक्ष गर्भनाटक हि 'परित्यक्त व असहाय सीता स्वतःला

अगतिकपणे भागीरथाच्या प्रवाहात झोकून देत आहे' या पडद्याआडच्या सूचनेने सुरू होते आणि हे नाटक आहे हे विसरून राम 'देवि सीते लक्ष्मणवेक्षस्व' असे म्हणतो. नंतर पृथ्वी आणि भागीरथी यांच्या कृपेने सीता सुखरूप प्रसूत होऊन जुळ्या मुलांना जन्म देते आणि त्या दोघी सीतेसह मंचावर येतात. सीता स्वतःला अनाथ व अभागिनी म्हणून मुलांच्या जबाबदारी त्यांच्यावर च सोपविते हे बघून रामाला अतोनात दुःख होते. भागीरथी व गंगा ती जबाबदारी वाल्मीकींच्या वर सोपविली असे सांगून तिच्यासह निघून जातात. सीता खरोखरच विलीन झाली या कल्पनेने राम मूर्च्छित होतो आणि नाटक दुःखातच संपणार असे सर्व प्रेक्षकांना म्हणजे लक्ष्मणाला व अयोध्यावासीयांना वाटू लागते. गंगा व पृथ्वी यांच्यासह सीता प्रकट होते व रामाला आपल्या संजीवक स्पर्शाने शुद्धीवर आणते. सीतेला अरूंधतीसमोर आणून अयोध्यावासी प्रेक्षकांना सीतेच्या पावित्र्याची खात्री पटवली जाते व लज्जित झालेल्या नागरिकांनी अनुमती दिल्यानंतर राम-सीता यांचे पुनर्मिलन होते. हा अद्‌भुताचा भाग हि कारुण्याच्या पार्श्वभूमीवर आधारलेला आहे.

अशा रीतीने करुणरस हा च उत्तररामचरिताचा कणा आहे. पाण्यावर प्रसंगोपात्त आवर्त किंवा भोवरे निर्माण होतात, कधी कधी तरंग दिसतात, कधी बुडबुडे दृष्टीला पडतात परंतु मुळाशी पाणी च असते त्याप्रमाणे उत्तररामचरितांतील दृश्यांत प्रसंगानुरूप राम व सीता यांच्या संयत शृगाराचे आवर्त आहेत, चौथ्या व सहाव्या अंकात वात्सल्याचे बुडबुडे दिसतात, पांचव्या अंकात वीररस व सातव्या अंकात वात्सल्य या रसांचे तरङ्ग आहेत हे खरे. सर्वांच्या मुळाशी करूण हा च स्थायी रस आहे. याची साक्ष उत्तररामचरिताच्या वाचकांना पटल्यावाचून रहात नाही. 'भूम्नां रसानां गहनाः प्रयोगाः' ने भवभूतीला संतोष झाला नाही; सर्व रसांचा करुणात समाहार करणे 'वंदेमहि च तां वाचममृतामात्मनः कलाम्'च्या या पुरस्कर्त्याला आवश्यक वाटले व त्यासाठी वैयक्तिक जीवनांतील कर्तव्य व राजत्वाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर अनुरोधाने येणारी प्रजारञ्जनाची जबाबदारी यांतल्या अंतःसंघर्षावर आधारलेल्या रामचरित्रातल्या उत्तरभागाची निवड करण्यात या नाटककाराने मोठे औचित्य दाखवले. सीतात्यागापूर्वी रामाने सीतेला जर सर्व सांगितले असते तर नाटकांतला संघर्ष निर्माण झाला नसता हे खरं; पण तेवढे धैर्य रामाला झाले नाही आणि सीतेला परित्यागाचे कारण समजले नाही असे दाखवून भवभूतीने रामाचा मानवसुलभ संकोच व्यक्त केला आणि त्याला देवत्व किंवा ऋषितुल्यत्व प्राप्त होऊ दिले नाही.

गर्भनाटकाच्या साहाय्याने राम व सीता यांचे पुनर्मिलन हा निव्वळ योगायोग

किंवा संस्कृत नाट्यसंकेताचे पालन करण्याच्या अट्टहास आहे का ? या प्रश्नाचे उत्तर नकारार्थी च द्यावे लागेल. नाटकाचा शेवट राम व सीता यांच्या पुनर्मिलनांत होणे अपरिहार्यपणे वाटावे याची काळजी भवभूतीने घेतलेली आहे. नाटकाची सुरवात 'यथा स्त्रीणां तथा वाचां साधुत्वे दुर्जनो जनः' या भवभूतीच्या अनुभवावर आधारलेल्या उक्तीने होते परन्तु यातच 'सर्वथा ऋषयो देवताश्च श्रेयो विधास्यन्ति' ची ग्वाही दिलेली आहे. तीर्थोदक आणि अग्नि यांच्याशी च पावित्र्यात व शुद्धतेत जिची तुलना होऊ शकेल त्या सीतेला विश्वासांत न घेतल्याचे दुःख रामाने जाणुनबुजून च ओढावून घेतले होते. परंतु यामुळे सीतेच्या मनांतले अकारण त्यागाचे शल्य काढून टाकल्याशिवाय तिच्या स्वाभिमानी मनाची पुनर्मिलनाला तयारी होणे शक्य नव्हते; त्यासाठी छाया-अंकाची योजना भवभूतीने केली. यांत पती म्हणून पत्नीचा त्याग च नव्हे तर तिच्या संभाव्य मृत्यूला हि तो जबाबदार ठरतो हे वासन्तीच्या 'त्वं जीवितं ....' या श्लोकांत स्पष्ट केले. राजा म्हणून रामाच्या चरित्रांतील हीण चवथ्या ते सहाव्या अंकार कवीने दाखवून दिले.

वृद्धास्ते न विचारणीयचरितास्तिष्ठन्तु किं वर्ण्यते
सुन्दस्त्रीमथने ऽप्यकुण्ठयशसो लोके महान्तो हि ते ।
यानि त्रीण्यपराङ्मुखान्यापि पदान्यासन्खरायोधने
यद्वा कौशलमिन्द्रसूनुनिधने तत्राप्यभिज्ञो जनः ।। (५.३४)

यांतली लवाची प्रतिक्रिया बालसुलभ आणि निरपराध असली तरी नवी पीढि राजा म्हणून रामाच्या चरित्राची समीक्षा कशी करू शकते याची द्योतक आहे. यापेक्षा हि 'कोऽयमग्निर्नर्नामास्मात्प्रसूति-परिशोधने' असा रास्त प्रश्न विचारणाऱ्या मनस्वी जनकाने 'अहो राज्ञः रामस्य क्षिप्रकारिता' या शब्दांत घेतलेला रामावरचा आक्षेप आणि 'अहो निर्दयता दुरात्मनां पौराणाम्' यात सीतेच्या चारित्र्याबद्दल शंका प्रकट करणाऱ्या 'द्विज, बाल, वृद्ध, विकल आणि स्त्रैण' अयोध्यावासीयांवर केलेला स्पष्ट आणि कठोर प्रहार अधिक महत्त्वाचा आहे. 'क्रोधस्य ज्वलितुं धागित्यवसरश्चापेन शापेन वा' मधल्या संकटाचे निवारण अरुन्धतीला 'राजन्नपत्यं रामस्ते पाल्याश्च कृपणाः जनाः' या अनुनयपूर्ण शब्दांत करावे लागले हे लक्षांत ठेवण्यासारखे आहे. हे सगळे झाल्यानंतर च गर्भनाटकाच्या मिषाने लोकांची भयंकर चूक त्यांच्या पदरांत अरुन्धतीने घालती कारण हा राजा-राणीच्या निव्वळ पुनर्मिलनाचा प्रश्न नव्हता; 'गुणाः पूजास्थानं गुणिषु न च लिङ्गं न च वयः' या नात्याने जगताला वंदनीय (वन्द्यासि जगताम्) अशा सीतेच्या प्रतिष्ठेचा प्रश्न होता. रामकथेचा हा नवीन अर्थ 'सुखदुःखसमन्वित' अशा 'लोक' स्वभावाचे अनुकरण करणाऱ्या नाट्य कलेच्या माध्यमांतून आणि तो

हि परम्परेने 'सुकुमार' पठडीतल्या 'नाटक' या प्रकारांतून दाखवण्याचा भवभूतीचा प्रयत्न, त्याच्या लेखनाचे काही दोष मान्य करून हि प्रशंसनीय ठरतो. रामायणाच्या मूळ कथेचा महत्त्वाचा भाग कायम ठेवून रामाच्या मनांतील संघर्षावर संपूर्ण नाटकाची उभारणी करण्याची भवभूतीची योजना त्याच्या प्रयोगशीलतेबरोबर च नाट्य-वस्तू संबंधीची त्याची मर्मस्पर्शी संकल्पना व्यक्त करते. मूलतः तो कवी असल्यामुळे रामचरित्राचा नवा अर्थ त्याला समजला, परंतु नाट्याच्या चौकटीत तो व्यक्त करतांना शोक आणि क्षोभ यांच्यावर अंकुश ठेवणे त्याला जमले नाही व यामुळे कांही प्रसंगी नाटकाचे काव्यात रूपांतर झाले. नाट्याला आवश्यक असलेला संयम सुटला आणि मुळांत अत्यंत प्रामाणिक आणि अस्सल असलेली भावना अभिव्यक्तीच्या अतिरेकामुळे नाटकात कृत्रिम वाटू लागली हे खरे; परंतु जीवनांतल्या त्या भावनेच्या यथार्थतेबद्दल व प्रभावीपणाबद्दल शंका घेणे अन्यायाचे ठरेल. कालिदासाच्या कृतीत दुःखांत घालविलेल्या दिवसांची आठवण देखील सुखात परिणत होते.

तयोर्यथा प्रार्थितमिंद्रियार्थानासेदुषोः सद्मसु चित्रवत्सु
प्राप्तानि दुःखान्यपि दण्डकेषु सन्चित्यमानानि सुखीबभुवुः ।। (रघुवंश १३-२५)

भवभूतीने हा क्रम उलटवला आणि सुखाच्या क्षणी सुद्धा 'मातृभिश्चिन्त्यमानानां ते हि नो दिवसाः गताः' ची स्मृती जपणारा राम लंगवला. सातव्या अङ्कात शेवटी रामाचे सीतेशी मिलन झाले परंतु त्यावेळी हि 'सर्वामिदमनुभवन्नपि न प्रत्येमि, यद् वा प्रकृतिरियमभ्युदयानाम्' हा अनुभव रामाला आला. दोन्ही गोष्टी जीवनात खऱ्याच आहेत. भवभूतीला 'पुरा भूतः शोको विकलयति मां नूतन इव' याचे चित्रण करावेसे वाटले, परंतु तो निव्वळ वेदनेचा कवि मात्र नाही; सुखानुभूतीचे त्याला वावडे आहे असे मात्र नाही. तथापि ऐन सुखाच्या वेळी हि दुःखाचा, कारुण्याचा अन्तःप्रवाह कायम असतो आणि जीवनांतील आस्वादाचा हा 'मिश्रीभूतक्रम'; 'हितास्ता मधुनो धाराश्च्योतन्ति सविषास्त्वायि' ची ही अनुभूती भवभूतीला अभिव्यक्त करावीशी वाटली इतकेच. सुखदुःखाच्या धाग्यांनी विणलेल्या जीवनाशी याची जवळीक मान्य करणे योग्य ठरेल. 'विनिश्चेतुं शक्यो न सुखमित्ति वा दुःखमिति वा' हा रामाचा अनुभव जीवनाशी विसंगत आहे असे कोण म्हणू शकेल ? या भवभूतीच्या भूमिकेतून च करुणमय आणि काव्यदृष्टचा उत्तम गणल्या गेलेल्या छाया-अंकाची निर्मिती झाली. कै. पं. रंगाचार्य रेड्डी यांनी 'काव्येषु नाटकं रम्यं' या कालिदासाच्या शाकुन्तलाच्या चौथ्या अंकाची प्रशंसा करणाऱ्या श्लोकाच्या चालीवर

काव्येषु नाटकं रम्यं तत्रोत्तरं च चरित्रकम् ।
तत्रापि च तृतीयोङ्कस्तत्र श्लोकचतुष्टयम् ।।

हा श्लोक रचला आणि (१) 'एतत्तदेव कदलीवनमध्यवर्ति ...... (३-२१), (२) त्वं जीवितं त्वमसि मे हृदयं द्वितीयं ...... (३-२६), (३) अयि कठोर यशः किल ते प्रियं ....... (३-२७) आणि (४) आस्मिन्नेव लतागृहे त्वमभवं ..... (३-३७) या श्लोकांची निवड हि करून टाकली.

उत्तररामचरिताची थोरवी मान्य केल्यानंतर रामायणांत फेरफार करतांना त्याच्या हातून झालेल्या प्रमादांकडे हि दृष्टिक्षेप करणे योग्य ठरेल. नाटकांतील काव्यगुणांची प्रशस्ती करणाऱ्या कै. पं. रेड्डींनी दोन दोष दाखवले. १) रावण वधानंतर दोन तीन आठवड्यांनी च रामाने तिच्या महालांत जाणे ही घटना महिन्या दोन महिन्याच्या आंतच घडली. हे मान्य केले तर लंकेतून येऊन दोन महिन्याच्या अवधीतच सीता नवमासपरिपूर्ण गर्भवती आहे असे वर्णन केल्यासारखे होते आणि यामुळे अयोध्यावासीयांच्या संशयाला बळकटी च येते हे भवभूतीच्या लक्षांत आलेले नाही व हा 'प्रथमग्रासे मक्षिकापातः' चा प्रकार झाला हे रेड्डींचे म्हणणे मान्य करावे लागेल. मूळ रामायणांत राज्यभिषेक झाल्यानंतर, सर्व मंडळी परत गेल्यानंतर राम व सीता यांनी अयोध्यासमीप असणाऱ्या अशोकवाटिकेत विविध विलास केले व नंतर सीता आपन्नसत्त्वा झाली असे अगदी सयुक्तिक वर्णन आहे. (२) दुसरा रेड्डींनी दाखवलेला दोष जृम्भकास्त्रांच्या वारंवार केलेल्या अकारण उल्लेखांसंबंधी आहे. याचे प्रयोजन समजत नाही. हा उल्लेख सीतेच्या चारित्र्याबद्दलच्या आक्षेपाचे समाधान करूं शकत नाही. लव-कुश ही सीतेची जुळी मुळे हा वादाचा विषय च नाही. (३) तिसऱ्या अंकात आत्रेयी या प्रौढ शिष्येची योजना हि दोषास्पद ठरते. ही पंचवटीत यायला निघाल्याच्या वेळी क्रष्यशृंगाचे सत्र संपले होते. ती शेंकडो मैलांचा प्रवास करून पंचवटीत पोचते तरी हि वसिष्ठादि मंडळी मात्र पोचत नाहीत. या आत्रेयीची वासंतीशी ओळख नव्हती; मग तिला दण्डकारण्यांतील सीतेला प्रिय झालेल्या पशुपक्ष्यांची माहिती कशी कळली ? (४) राम पंचवटीहून विमानाने निघून वाल्मीकी आश्रमात पोचतो त्या दिवशी कांही तास आधी वसिष्ठांचे येणे असंभाव्य वाटते. (५) लव आणि कुश यांच्या लहान वयातल्या पराक्रमांबरोबर चन्द्रकेतुसारख्या त्यांच्या च वयाच्या कुमाराची अश्वाच्या संरक्षणासाठी नियुक्ती तितकीशी विश्वसनीय वाटत नाही. (५) सहाव्या अंकाच्या प्रारंभी विद्याधर-मिथुनांनी केलेले युद्धवर्णन आधीच्या दोन नाटकातील वर्णनाप्रमाणे निबन्धवजा आणि पाल्हाळिक वाटते. या नाटकांतली भाषा साधारणपणे प्रासादिक आणि सुटसुटीत असल्यामुळे ही विसंगती अधिक जाणवते.

हे सर्व दोष पूर्वी सांगितल्याप्रमाणे उत्तररामचरिताच्या इतर गुणांच्या मानाने गौण ठरतील. महावीरचरित आणि उत्तररामचरित या दोन्ही नाटकांच्या

माध्यमातून भवभूतीने रामाला देवत्व न देता रामचरित्राकडे पहाण्याचा एक नवा दृष्टिकोण लोकांपुढे ठेवला. किंबहुना संपूर्ण रामचरित्रावर नाटके लिहिणारा भवभूती हा एकटाच संस्कृत साहित्यकार. नंतरच्या शक्तिभद्र, मुरारि, राजशेखर, जयदेव वगैरे कवींनी पूर्वरामचरित्रावर च आपली नाटके लिहिली, दिङ्नागाचे कुन्दमाला आणि धनिकाच्या दशरूपकावलोकातील उल्लेखा वरून ललितराम नावाचे नाटक उत्तर रामचरित्रावर आधारलेले आहे. भवभूतीने मूळ रामायण कथेत फरक करण्याची दिशा दाखवून दिल्यामुळे या कवींनी आपापल्या प्रतिभेनुसार रामकथेत फरक करून संविधानकांची रचना हि केली परंतु यातील बहुसंख्य नाटककारांनी अद्‌भुताचा च आश्रय अधिक घेतला आणि रामाला नंतरच्या काळांत प्राप्त झालेल्या देवत्वाची पार्श्वभूमी तयार केली. अध्यात्मरामायण, आनंद रामायण, अद्‌भुत रामायण या काव्यांनी रामाला सम्पूर्णपणे देवत्व बहाल केले. आणि यांतूनच पुढे बंगाली, मराठी, कानडी, हिन्दी वगैरे आधुनिक भारतीय भाषांत जनमानसावर अद्‌भुत प्रभाव टाकणारी रामचरित्रपर काव्ये निर्माण झाली. रामचरित्रावर नाटके लिहिणाऱ्या सर्व उत्तरकालीन संस्कृत नाटककारांवर भवभूतीचा फार मोठा प्रभाव पडलेला आहे. या दृष्टीने रामकथेच्या भारतातील विकासात भवभूती हा एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. त्याने रामचरित्राला जे आगळे परिमाण दिले ते नंतरच्या रामचरित्रावर आधारलेल्या संस्कृत साहित्याला च नव्हे तर समग्र भारतीय साहित्याला प्रेरक ठरले असे म्हणण्यात अतिशयोक्ती वाटण्याचे काहीच कारण नाही.

उत्तररामचरितांत भवभूतीने वापरलेल्या भाषेचा, त्यांतील प्रतिमानांचा स्वतंत्रपणे विचार करावा लागेल. या नाटकाचा पहिला चित्रदर्शनाचा अंक वस्तुतः शब्दचित्रांचा कोश आहे. 'रथ' हा शब्द निरनिराळे भाव वेगवेगळ्या प्रसंगी व्यक्त करतो. सीतेचे डोहाळे पुरविण्यासाठी रामाने 'अस्खलितसुखसम्पातं रथमुपस्थापय' असे लक्ष्मणाला सांगितले तेव्हा तो 'दोहद-रथ' होता; सीतेच्या मनांतील इच्छा पूर्ण करणारा होता. परंतु दुर्मुखाने 'देवि कुमारलक्ष्मणो विज्ञापयति सज्जो रथः' यातील 'सज्जो रथः' सीतेच्या आकांक्षेचा चक्काचूर करणारा ठरला. सीता सर्व देवतांना वन्दन करून त्या रथावर आरूढ होते आणि त्यावेळी 'स्फुरति मे गर्भभारः' हे शब्द उच्चारते त्यावेळी हे स्फुरण निव्वळ शारीरिक नसून अनिष्टाच्या आशङ्कतून निर्माण झालेले असावे. हाच 'रथ' हा शब्द लवाच्या तोंडी 'किं त्वरण्यसदो वयमनभ्यस्तरथचर्याः' येतो तेव्हा उच्चभ्रू लोकांच्या वाहनाचा वाचक ठरतो. यात सामान्य जनांचा प्रतिनिधी असलेल्या लवाने हंसत हंसत 'बूर्झ्वा' लोकांना दिलेला टोमणा आहे. हा लव मुळांत

राजपुत्र च असतो हा नियतीच्या यदृच्छेचा भवभूतीच्या पठडीत बसणारा आविष्कार. जे रथ या शब्दाबद्दल तेच 'राजा' या शब्दाच्या अर्थसूचक वापराबद्दल. 'नूतनो राजा रामः' राजाचे नूतनत्व लोकाराधनाच्या व्रताला वाजवीपेक्षा जास्त ताणण्यात झाले. तमसेने ज्यावेळी 'तपस्यतः किल शूद्रस्य दण्डधारणार्थमैक्ष्वाको राजा जनस्थानमागत इति' असे म्हटले आणि सीतेने 'दिष्ट्या अपरिहीनधर्मः खलु स राजा' असे तिऱ्हाइताला शोभणारे उद्गार काढले. त्यावेळा 'राज' शब्दाला निराळे उपरोधात्मक परिणाम लाभले आणि जनकाच्या 'अहो रामस्य राज्ञः क्षिप्रकारिता' या शब्दांत राजाचा आणि रामाचा अविचारीपणा, उतावीळपणा व्यक्त झालेला आहे. या धर्तीवर उत्तररामचरितांतील प्रतिमानांचे विश्लेषण भवभूतीने केलेल्या शब्दांच्या प्रयोगाला एक वेगळे परिमाण देऊ शकेल असे वाटते. याची अधिक चर्चा Prespectives in Bhavabhuti या श्री. पी. एम्. पाण्डे यांच्या पुस्तकातील (१९७४) पहिल्या प्रकरणांत केलेली आहे.

उत्तररामचरितात भवभूतीने वापरलेल्या उपमा हि संस्कृत साहित्यातल्या सांकेतिक चौकटीत बसणाऱ्या नाहीत. सीताविषयक विषारी प्रवादाला कुत्र्याचा विषाची समर्पक उपमा देऊन सीताविषयक प्रवाद लोकांत कसा पसरतो हे सुचविले. रामाच्या स्वतःच्या दुःखाला आयुर्वेदांतील औषधींच्या पुटपाकाची उपमा (अंक ३-१), रामाने आपल्या मनांतील संतापाला 'निकृन्तन्मर्माणि क्रकच इव मन्युर्विरमति' (४-३) यात 'अयोधातुं यद्वल्लघुरयस्कान्तशकलः' (६) ही लोखंडाला खेचून घेणाऱ्या लोहचुंबकाच्या कणाची वेदान्तात आढळणारी उपमा या सर्व भवभूतीच्या विद्वत्तेबरोबर च मार्मिकतेच्या द्योतक आहेत. तपोनिष्ठ परंतु क्षत्रियवधाचे भयंकर कृत्य करणाऱ्या जमदग्निपुत्र परशुरामाला अथर्ववेदाची अनुरूप उपमा किंवा ब्रह्मद्वेष्टच्या राक्षसांचा संहार करणाऱ्या रामाला उद्देशून विश्वमित्राच्या तोंडी घातलेली अथर्ववेदातल्या अभिचारकर्माची महावीरचरितातली उपमा भवभूतीला च सुचू शकते. कपालकुण्डतेने आपल्या कचाट्यात सांपडलेल्या असहाय्य मालतीला 'श्येनावपातचकिता वनवर्तिका' म्हणावे हे हि भवभूतीच्या मौलिक निरीक्षणाचे द्योतक आहे. सामान्यपणे मूर्त उपमाने कौशल्याने वापरणारा हा कवी कालिदासाप्रमाणे अमूर्त कल्पनांतून हि उपमानांची निवड करतो. महावीरचरितात विश्वमित्राबरोबर आलेल्या रामलक्ष्मणांना कुशध्वजाने धर्माच्या मागून उत्पन्न होणाऱ्या प्रताप आणि विक्रम यांची उपमा (प्रतापाविक्रसमौ धर्मं पुरस्कृत्योद्गताविव १-२२) किंवा उत्तरराचरितात लवाने रामाला उद्देशून योजलेली 'प्रकृष्टस्यैव धर्मस्य प्रसादो मूर्तिसुन्दरः' (६-१०) ही उपमा भवभूतीच्या आध्यामिकतेला आणि प्रौढतेला

शोभणारी आहे.

कालिदासाप्रमाणे भवभूतीने हि संस्कृत सारस्वतांतील निसर्गवर्णनावर आपला स्वतंत्र ठसा उमटविलेला आहे. कालिदासाने आपल्या शृगांरिक प्रवृत्तीना अनुसरून सृष्टीच्या सौम्य, कोमल आणि रम्य स्वरूपाचे मोठे मनोज्ञ वर्णन केले. भवभूतीला अशा स्वरूपाबद्दल आकर्षण नव्हते असे म्हणता येणार नाही. दण्डकारण्यांतील मध्यमारण्यांचे वर्णन करतांना :-

इह समदशकुन्ताक्रान्तवानीरवीरूत् -
प्रसवसुराभिशीतस्वच्छतोया वहन्ति -
फलभरपरिणामश्यामजम्बूनिकुञ्ज -
स्खलनमुखरभूरिस्त्रोतसो निर्झरिण्यः ।।

अशी वैदर्भी रीतीला शोभणारी वर्णाने हि त्याने केली. कुंजातून वाहणाऱ्या झऱ्यांचे पाणी वेताच्या फुलांनी सुगन्धित झालेले त्याला दिसले, 'सभोवार जुईच्या फुलांचे उमललेले झुपके त्याला भावले' पर्वताच्या शिखरांवर मोर नाचत असतांना मेघ त्यांच्यावर छत्र धरीत आहेत आणि पर्वताचे उत्तरेकडील भाग शुभ्र कुड्यांच्या फुलाप्रमाणे जणुं काही हंसत आहेत हे हि (मालतीमाधव ९-३५) त्याने टिपले. परन्तु 'गोदावरीनदीगद्गद्वारयः' बद्दल हि त्याला प्रेम आहे; पद्मावतीच्या परिसरातील पर्वत, नद्या आणि धबधबे हि त्याला आकर्षक वाटतात, भर उन्हाळ्यात अरण्यात दिसणाऱ्या भीषण दृश्यांचे

निष्कूजस्तिमिताः क्वचित्क्वचिदपि प्रोच्चण्डसत्त्वस्वनाः
स्वेच्छासुप्तगभीरघोरभुजगश्वासप्रदीप्ताग्नयः,

असे वर्णन करतांना हि तो रंगून जातो, दण्डकारण्यातील 'स्निग्धश्यामा' प्रमाणे 'भीषणाभोगरूक्षाः' असे प्रदेश हि त्याला 'परिचितभुवः' भासतात

क्षिपन्निद्रामुद्रां मदनकलहच्छेदसुलभा-
मवाप्तोत्कण्ठानां गमिथुनानां प्रथमतः
दधानः सौधानामलघुषु ।।कुञ्जेषु घनता -
मसौ संध्याशङ्खध्वनिरनिभृतःखे विचरति ।। (मालतीमाधव २-१२)

असे संध्याकाळचे 'कामिजनसुलभ' वर्णन करणारा हा कवि मध्यरात्रीचे (मालतीमाधव ७-५) आणि मध्याह्नाचे (उत्तररामचरित २-९) ही रम्य वर्णन करू शकतो. सृष्टीत सर्वत्र चैतन्य भरलेले आहे या वेदान्तानुकूल श्रद्धेने प्रेरित झालेला हा कवि सृष्टीच्या रम्यतेप्रमाणे तिच्या रौद्र व भीषण स्वरूपावर हि प्रेम करतो आणि म्हणूनच सौम्य सृष्टीकडे च पाहण्याऐवजी निसर्गप्रेमाला व्यापक स्वरूप प्राप्त करून देतो यात शंका नाही.

संस्कृत साहित्यांत कालिदासाच्या जोडीने भवभूतीचे नांव घेतले जाते.

कालिदासाचा काळ वैभवाचा आणि समृद्धीचा असला पाहिजे; भवभूतीचा काळ त्या मानाने अशांततेचा आणि धामधुमीचा, युद्धांचा काळ होता. कालिदासाला जीवनांतच सम्मान प्राप्त झाला असावा असे दिसते. भवभूतीला उपेक्षेचा आणि अनादराचा अनुभव आला आणि नशीब काढण्यासाठी देशाटन करावे लागले. दोघे हि चांगले बहुश्रुत, भवभूती तर 'पदवाक्य प्रमाणज्ञ,' धर्मसूत्रे, आयुर्वेद, व्याकरण मीमांसा, सांख्य, वेदान्त, नाट्यशास्त्र, कामशास्त्र इत्यादि तर्ककर्कश शास्त्रांप्रमाणे अर्थशास्त्र, कामशास्त्र आदि सुकुमार शास्त्रांचा ही उत्तम अभ्यासक होता याची प्रमाणे तीन्ही नाटकात सर्वत्र दिसतात. कालिदासांच्या ज्ञानाला विद्वज्जडता मात्र कधीच आलेली दिसत नाही याचे कारण त्याचा अपूर्व संयम. भवभूतीच्या बाबतीत असे म्हणता येणार नाही तथापि तो केवळ पढीक पंडित होता असे मात्र नाही. नाटक निर्मितीत पढीक पाण्डित्याएवजी

यत्प्रौढत्वमुदारता च वचसां यच्चार्थतो गौरवं ।

तच्चेदस्ति ततस्तदेव गमकं पाण्डित्यवैदग्ध्ययोः ।। (मालतीमाधव १-७)

याचे त्याला भान होते. यातूनच दोघा महाकवींच्या गुणवैशिष्ट्यांचा आणि मर्यादांची पारख करता येते, कालिदासाची कलात्मकता व शृंगाराबद्दलची आसक्ती उपपन्न होते आणि भवभूतीची भावनातिरेकातून उत्पन्न होणारी कृत्रिमता व कालानुरूप येणारी भाषेची समासप्रचुरता यांचा उलगडा होतो. कालिदासाच्या तुलनेने भवभूति गंभीर स्वभावाचा नाटककार आहे. 'सर्वंकषा भगवती भवितव्यतेव' याचा कटु अनुभव आलेला असल्यामुळे हास्यनिर्मितीसाठी विदूषकासारखे पात्र योजण्याचे त्याच्या मनांत आले नसावे. विनोदाचे त्याला संपूर्ण वावडे होते असे मात्र नव्हे. उत्तररामचरिताच्या पहिल्या अंकातील चित्रदर्शनांतला नर्मविनोद व चौथ्या अंकाच्या विष्कम्भकातल्या वाल्मीकीच्या आश्रमातील विद्यार्थ्यांचा निरागस सौधातकी वसिष्ठाला 'जीर्णकूर्च' म्हणतो आणि त्याच्या मधुपर्काकरिता आश्रमातली कालवड मारली होती म्हणून त्याला 'वृक' किंवा 'व्याघ्र' असे संबोधतो हा विनोद आणि यज्ञीय अश्वाचे अरण्यातील आश्रमात रहाणाऱ्या विद्यार्थ्यांनी केलेले 'पश्चात्पुच्छं वहति विपुलं तच्च धुनोत्यजस्रं' (४-३८६) हे विनोद निर्माण करणारे वर्णन हे याचे पुरावे आहेत. तथापि दोघांच्या जीवनाकडे बघण्याच्या दृष्टिकोणातील अंतर लपण्यासारखे नाही. यातूनच त्यांच्यातील वेगळेपणाची उपपत्ति लागते. कालिदास शृङ्गाररसाचा कलापूर्ण व मनोज्ञ आविष्कार करतो, भवभूती जीवनातल्या कारुण्याचा आणि गांभीर्याचा प्रभावी पुरस्कर्ता ठरतो. कालिदासाने रंगविलेली स्त्री 'श्रोणीभारादलसगमना' आणि 'पक्वबिम्बाधरोष्ठी' आहे, भवभूतीची सीता 'इयं गेहे लक्ष्मीः' आणि 'इयमृतवर्तिर्नयनयोः' आहे. भवभूती पति-पत्नीच्या 'सुखदुःखयोरनुगुणं अद्वैतं' चा अमर भाष्यकार आहे, निरनिराळ्या रसांचे चित्रण

करणारा कवि आहे. 'अर्थ अमित आखर अति थोरे' वर कलावंत कालिदासाचा भर आहे. तो व्यञ्जनेचा पुरस्कर्ता आहे म्हणून त्याचा दुष्यन्त 'लब्धं नेत्र-निवार्णम्' एवढेच म्हणून She was a phantom of delight मधला सर्व अर्थ सूचित करतो. तर प्रामुख्याने कवि असलेल्या भवभूतीचा भर अभिधेवर असल्यामुळे त्याचा माधव हीच भावना

अविरलमिव दाम्ना पौण्डरीकेण नद्धः
स्नपित इव च दुग्धस्रोतसा निर्झरेण ।
कवलित इव कृत्स्नश्चक्षुषा स्फारितेन
प्रसभममृतमेघेनेव सान्द्रेण सिक्तः ॥ (३-१६)

निरनिराळ्या परंतु अन्वर्थक उत्प्रेक्षांच्या साहाय्याने व्यक्त करतो. म्हणूनच कालिदासात कलात्मकता आहे तर भवभूतीत प्रामाणिक भावनेचा आवेग आहे. आणि तो भाषेत व्यक्त करण्याचे सामर्थ्य आहे. साहजिकच कालिदास नायिकेच्या नेत्रांची चञ्चलता 'मृगाक्षि' या एकाच शब्दांत साठवितो तर भवभूती त्यासाठी 'त्रस्तैकहायनकुरङ्गविलोलदृष्टेः' असा शब्द वापरून एका वर्षाच्या हरिण बालकाचे उपमान आणून त्या चाञ्चल्याला हि एक प्रकारचे गांभीर्य आणून देतो. दोघा हि कवींचा ओढा शब्दालंकारांपेक्षा अर्थालंकाराकडे अधिक आहे म्हणूनच स्वभावोक्ती दोघांच्या हि कृतींत प्राधान्याने आढळते. भवभूतीचे गद्य मात्र कालिदासाच्या तुलनेने समासप्रचुर आणि क्लिष्ट आहे याला कारण भवभूतीच्या काळी 'ओजः समासभूयस्त्वमेतद् गद्यस्य जीवितम्' हा दण्डक सर्वमान्य झाला होता. महावीरचरितात वीररसानुरूप गौडी रीति भवभूतीने वापरली आणि उत्तररामचरितात विषयानुरूप अशा वैदर्भी रीतीचा अवलंब केला. 'नवनीलनीरधरधीरगर्जित' या चरणात दीर्घस्वरांची योजना करून मेघगर्जनेचे अनुकरण आणि 'क्षणबद्धकुड्मलकदम्बमम्बरम्' या पुढच्या चरणांत हृस्व स्वरापुढे संयुक्त व्यजन वापरून कदम्बवृक्षाला ताबडतोब येणाऱ्या कळ्यांचा प्रार्दुभाव सूचित करण्याचे कौशल्य भवभूतीजवळ हि भरपूर आहे. भावनांच्या कल्लोळांचे सुंदर शब्दचित्र रेखाटण्याचे भवभूतीचे सामर्थ्य उत्तररामचरितात प्रकर्षाने दिसते. बारा वर्षांच्या दीर्घ वियोगानंतर दण्डकारण्यात शोकग्रस्त रामाला बघून सीतेच्या मनांत भावनांचा जो कल्लोळ उठला त्याचे भवभूतीने तमसे करवी रेखाटलेले अप्रतिम चित्र पहा :-

तटस्थं नैराश्यादपि च कलुषं विप्रियवशा -
द्वियोगे दीर्घेऽस्मिञ्झटिति घटनोत्तम्भितमिव ।
प्रसन्नं सौजन्याद्दयितकरुणैर्गाढकरुणं
द्रवीभूतं प्रेम्णा तव हृदयमस्मिन्क्षण इव ॥

यात अलङ्कारांचा सोस नाही; परंतु भावाभिव्यक्तीचे अपार सामर्थ्य आहे. कौटुंबिक

उदात्त विचार व्यक्त करून भवभूतीने स्थलकालाच्या बंधनांवर मात करून रसिकांची मने हेलावून टाकली. 'स्त्रीजन्मलाभं जुगुप्सन्ते बान्धवाः' हे आधुनिक काळातल्या भारतीय समाजात हि जुने झालेले नाही. आज हि 'कन्यायाः किल पूजयन्ति पितरो जामातुराप्तं जनम्' हे अमान्य करता येईल का ? कौटुंबिक सुखाची गुरुकिल्ली 'इतरेतरानुरागो हि विवाहकर्मणि परार्घ्यं मङ्गलम्' यात च आहे हे अमान्य करता येणार नाही. 'तत्तस्य किमपि द्रव्यं यो हि यस्य प्रियो जनः' आणि 'आनन्दग्रन्थिरेकोऽयमपत्यमिति बध्यते' हा तुमचा-आमचा सर्वांचाच अनुभव नाही का ? माधव आणि मकरन्द यांच्यासारखे एकमेकांच्या सुखदुःखांशी एकरूप झालेले मित्र भवभूतीसारखा कौटुंबिक कवी च रंगवू शकतो. भवभूतीने वर्णन केल्याप्रमाणे :-

प्रियप्राया वृत्तिर्विनयमधुरो वाचि नियमः
प्रकृत्या कल्याणी मतिरनवगीतः परिचयः
पुरो वा पश्चाद् वा तदिदमविपर्यासितरसम्

असे 'साधूनाम् रहस्यम्' अंगी बाणवणाऱ्यांची 'मांदियाळी' वाढायला हवी असेच कुणाला हि वाटेल.

तात्पर्य, आशय व भाषा या दोन्ही दृष्टींनी कालिदासाच्या जोडीला संस्कृतात भवभूतीचे च नांव द्यावे लागते. समकालीनांच्या अनादराने आणि उपेक्षेने उद्विग्न झालेल्या भवभूतीचे 'समानधर्मा' असे रसिक आज निश्चितपणे निर्माण झालेले आहेत आणि ते त्याच्या बाबतीत एकमुखाने

जयन्ति ते सुकृतिनो रससिद्धाः कवीश्वराः
नास्ति येषां यशःकाये जरामरणजं भयम् ।।

असे उद्‌गार काढतील यात शंका नाही.

[सुमारे २ वर्षांपूर्वी मुंबई विद्यापीठात टागोर अध्यासन व मराठी विभाग यांच्या सहकार्याने आयोजित विश्व-कवींच्या मालेत वाचलेला हा निबंध. त्यांच्या सौजन्याने.]

# १२. संस्कृत नाटकांतील विनोद

संस्कृत नाटकातील कथानकांची बीजे प्राधान्याने रामायण व महाभारत या राष्ट्रीय महाकाव्यांत आढळतात हे स्पष्ट आहे यामुळेच ग्रीक नाट्याचा किंवा रोमन मूकनाट्याचा भारतावर परिणाम झाला हे मत आपोआप च त्याज्य ठरलेले आहे. संस्कृत नाटकांचा उद्‌गम धार्मिक परिसरात झाला हे मान्यच करावे लागेल व या नाटकातील बहुतेक विनोदाचे अधिष्ठान विदूषक हा च आहे याबद्दल हि दुमत होण्याचे कारण नाही. नाट्याचार्य भरताने विदूषकाचा उल्लेख नटवर्गात केलेला आहे. देवासुरांच्या विनंतीवरून 'क्रीडनीयक' म्हणजे करमणुकीचे किंवा विनोदाचे साधन म्हणून नाट्याची निर्मिती झाली ही नाट्यशास्त्रातील कथा या दृष्टीने उद्‌बोधक ठरेल. सहाजिकच पूर्वरङ्गत विदूषकाची योजना करून त्या पात्राने प्रेक्षकांना, नाट्यगृहात जमलेल्या मानवसमूहाला रिझवावे, हंसवावे असा दंडक भरताने घालून दिलेला दिसतो. समूहाच्या मानसशास्त्राची चांगली जाण असणाऱ्या या नाट्याचार्याने विदूषकाच्या सोंगाचे वर्णन करताना स्थूलपणाचा किंवा कुरूपतेचा उपयोग करून घेतला असला तर त्यात आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. सुरवातीच्या नाट्यप्रयोगाचे स्वरूप देव व असुर यांच्या संघर्षाचे असून या प्रयोगात असुरांनी आपला पराजय झाल्याचे बघितले व ते चिडले असा जो उल्लेख भरताच्या नाट्यशास्त्रात आढळतो त्यावरून असुराचे सोंग व विनोदी पात्र यांच्यामध्ये जवळचा संबंध असावा या अनुमानाला बळकटी येते. युरोप व इंग्लंडमधील प्राथमिक नाटकात सैतानाचे चित्रण विनोदी पद्धतीने केले जात असे हे लक्षात घेतले म्हणजे दुर्गुणी पात्राचा हास्यनिर्मितीशी संबंध जोडणे अस्वाभाविक मानण्याचे कारण नाही. शिवाय थट्टा, उपहास किंवा परिहास करण्याची मानवाची प्रवृत्ती लक्षात घेतली तर मूर्खपणाला च वाव देऊन विडंबनातून हास्य निर्माण करणारा संस्कृत नाटकातील विदूषक सनातन च मानला पाहिजे. हे विडंबन धर्माचे किंवा धर्मविधीचे होते असे म्हणणे अयोग्य ठरेल कारण अशा विडंबनाला तत्कालीन धर्मप्राण जनमनाचा पाठिंबा मिळणे अशक्य होते. परंतु धर्मविधीत अनुस्यूत असलेल्या गोष्टींवरून विनोदी प्रसंगाची निर्मिती करणे संस्कृत नाटककारांना शक्य असे. शाकुंतल नाटकातील माढव्य हा विदूषक इंद्रसारथी उसाच्या कांडीप्रमाणे मला तीन ठिकाणी वांकवितो 'इक्षुरिव मां त्रिभङ्गं करोति' असे दुष्यन्ताला सांगतो. ही कल्पना धर्मविधीत सोमविक्रेत्याला केलेल्या मारहाणीवरून सुचली असणे असंभवनीय नाही व नंतर दुष्यन्ताने मातलीचे स्वागत केलेले पाहून 'येनाहं इष्टिपशुमारं मारितः सोऽनेनस्वागतेनाभिनन्द्यते' ही माढव्याची तक्रार तर स्पष्टपणे यज्ञांतील पशूच्या असहायतेवर आधारलेली आहे.

संस्कृतातील सुरवातीचे नाट्यप्रयोग विविध आनंदाच्या प्रसंगी म्हणजे धार्मिक उत्सवांच्या वेळी किंवा यज्ञांच्या निमित्ताने होत असत हे स्पष्ट आहे. भरताने नाट्यशास्त्रात विदूषकाचे वर्णन करताना तो 'खुजा दांताड्या, कुबड्या, वक्रतुंड, टकल्या व घाऱ्या डोळ्यांचा ब्राह्मण असवा'' असे म्हटले (अध्याय २४.१०६) व १२ व्या अध्यायातील १२१ ते १२५ या श्लोकात अंगहास्य, काव्यहास्य व नेपथ्यहास्य या विचित्र स्वारीने निर्माण करावे असे नमूद करून ठेवले. विदूषक हा निखालस टकल्या तरी असावा किंवा काकपदाप्रमाणे कोचकीचे केस त्याने राखावे असे भरताने म्हटले हे लक्षात घेतले म्हणजे मृच्छकटिकातील शकार विदूषक मैत्रेयाला 'काकपदशीर्षमस्तक' का म्हणतो हे ध्यानात येते. भरताने चार प्रकारच्या विदूषकांचे वर्णन करून देवांच्या विदूषकात वेद जाणणे, संगीतात गती असणे, घरगुती भांडणे कौशल्याने मिटविणे या गुणांचा समावेश केलेला आहे. या विदूषकाचा पुराणातील 'कलहप्रिय' नारदाशी जवळचा संबंध असावा. मूलतः देवांसाठी निर्माण झालेला नाट्यवेद कालांतराने पृथ्वीवर कसा अवतरला याची हि हकीकत भरताने दिली. कालिदासाने निक्रमोर्वशीय नाटकात 'लक्ष्मीस्वयंवर' नावाच्या भरताने बसवलेल्या प्रयोगात लक्ष्मीची भूमिका करणाऱ्या उर्वशीने 'कतमस्मिन् ते भावः' या प्रश्नाच्या उत्तरात 'पुरुषोत्तम'च्या ऐवजी 'पुरूरवसि' हे म्हटल्यामुळे तिला पृथ्वीवर दाखल होण्याचा शाप मिळाला असे दाखवले. नाटकांचे विषय हळूहळू लौकिकाकडे झुकत चालले याचे हे निदर्शक आहे. नाट्यवेदाच्या ज्ञानामुळे भरतपुत्र चढून गेले, त्यांच्या अभिनयात अतिरेक होऊ लागला, ऋषींचा उपहास होऊ लागला. त्यामुळे ब्राह्मण भरतपुत्रांना 'तुम्ही शूद्र व्हाल' असा शाप दिल्याची नाट्यशास्त्रांतील कथा एका दृष्टीने नाट्यविकासाची सूचक मानावयास हरकत नाही. नटवर्गाचा सामाजिक दर्जा घसरत चालल्याचा इशारा जसा या कथेतून मिळतो त्याचप्रमाणे नाटकातील प्रहसनवजा भाग म्हणजे लौकिक अंश वाढत चालल्याची ही सूचना आहे. स्वर्गातील संगीत नाट्यप्रयोग पाहून ती कला पृथ्वीवर आणण्यासाठी प्रजापतीची प्रार्थना करणाऱ्या नहुष राजाची नाट्यशास्त्रातील गोष्ट नाट्यकलेला मिळालेल्या राजाश्रयाकडे बोट दाखविते. यामधूनच लौकिक विषय व राजा नायक असा नाट्यप्रकार रूढ होत गेला आणि दरबारी नाटकांचा जमाना आला. यात रंजकतेवर भर असणे व राजाच्या खाजगी जीवनातील खुशमस्कऱ्या म्हणजे विदूषक हा राजाचा अंतरंग मित्र म्हणून रंगविला जाणे स्वभाविकच नव्हे का ? विदूषकासारखे लोक पदरी बाळगण्याची प्रथा राजांप्रमाणे सुसंस्कृत धनिकांना हि होती हे कामसूत्रातील नागरकाच्या वर्णनावरून स्पष्ट होते. तात्पर्य, संस्कृत नाटकांतील विदूषक प्रत्यक्ष समाजातून उत्पन्न झाला हे म्हणणे सयुक्तिक ठरते.

भरतानंतरच्या संस्कृत साहित्यशास्त्रज्ञांनी विदूषकाच्या लक्षणांत थोडी

आणखी भर टाकली. ती विदूषक या पात्राच्या विकासाची द्योतक आहे. पूर्वीप्रमाणे निव्वळ वांकुल्या दाखवून किंवा निरर्थक बडबड करून लोकांची करमणूक करण्याऐवजी तो अधिक मार्मिक बनला, कथानकाच्या विकासात हि त्याचा उपयोग होऊ लागला. सामाजिक नाटकांना अनुकूल वातावरण निर्माण करण्याच्या हेतूने राजांच्या दरबारातील जीवनक्रम, राजे लोकांचा प्रणय, त्यांच्या अन्तःपुरातील हेवेदावे व संघर्ष, दासींचे व वेश्यांचे जीवन यांचे अवलोकन करून नाटकात त्यांचा अन्तर्भाव करणाऱ्या नाटककारांना उपहास (विशेषेण दूषयति सर्वानिति विदूषकः) लोकांना खपला नसता. हा दर्जा त्याला ब्राह्मणत्वाने व राजाच्या मैत्रीने दिला. या निमित्ताने ब्राह्मण वर्गातील विसंगती उपहासाचा विषय बनली. वेदाध्ययन्त न केलेले, संस्कृत नीट न बोलता येणारे परंतु ज्ञानाचा जन्मजात टेंभा मिरवणारे ब्राह्मण त्या काळी हि होते; त्यांच्यावर कोरडे ओढून हास्य निर्माण करणे नाटककारांना शक्य झाले. 'रामायणं नाम नाट्यशास्त्रम्' असे म्हणणारा अविमारकातील संतुष्ट व वेदांतील मंत्र म्हणण्यास असमर्थ असणारा परंतु दारूच्या वासाने जिव्हेवर येणारी वेदाक्षरे लुप्त झालेली आहेत असे बोलून वेळ मारून नेणारा नागानंदांतील आत्रेय हे यामधून निर्माण झाले.

ब्राह्मण या नात्याने च विदूषकाला काही विशेष अधिकार मिळाले हे अमान्य कसे करता येईल ? राजवाड्यावरील दासी, गणिका वगैरेंबरोबर राण्या व प्रत्यक्ष राजा यांच्यावर हि उपहासाचा झोत फिरविण्याचा त्याचा हक्क अबाधित राहिला. शाकुन्तलातील माढव्य दुष्यन्ताच्या दुतोंडी सेनापतीवर ज्याप्रमाणे तुटून पडतो, त्याचप्रमाणे कण्वाश्रमातील ऋषींना उद्देशून 'लम्बकूर्चानां कदम्बैः' असे उद्गार काढू शकतो इतकेच नव्हे तर दुष्यन्ताची शकुन्तले विषयीची आसक्ती लक्षात आल्यानंतर 'यथा कस्यपि पिण्डखजूरैरुद्वेजिस्य तिन्तिण्यामभिलाषो भवेत्तथा स्त्रीरत्नभोगिणो भवतः इयमर्थ्यना' म्हणजे 'गोड खजूर खाऊन कंटाळल्याने चिंचेबद्दल प्रेम व आस्था दाखवावी तशी स्त्रीरत्नांचा उपभोग घेतलेल्या तुला तापसकन्येबद्दल अभिलाषा निर्माण झालेली दिसते असा अहेर राजाला तो करू शकतो आणि शकुन्तलेच्या अनिन्द्य सौंदर्याची कल्पना आल्यानंतर तो थट्टेने 'जा बाबा, तिचे लवकर रक्षण कर, नाही तर इंगुदीच्या तेलाने मस्तक चिकट झालेल्या एखाद्या ऋषींच्या पदरी ती पडेल बरं' असा इशारा तो देऊ शकतो. प्रियानुप्रसादनासारख्या व्रताच्या मिषाने उर्वशी वर प्रेम करणाऱ्या पुरूरव्याला मोकळीक देणाऱ्या राणी औशीनरीला उद्देशून विदूषकाने काढलेले, 'छिन्नहस्ते मत्स्ये पलायिते निर्विण्णो धीवरो भणनि धर्मो मे भविष्यतीति' हे उद्गार हि त्याला च शोभून दिसतात.

दुसऱ्याची थट्टा करणारा संस्कृत नाटकातला विदूषक स्वतःच्या कुरूपतेचा हि

उपहास करण्याला कचरत नाही हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. किंबुहना आपल्या कुरूपतेचा त्याला अभिमान आहे असे दिसते. विक्रमोर्वशीयातील माणवक 'किं तत्रभवती उर्वशी रूपेणाद्वितीया अहमिव कुरूपतया' असा प्रश्न विचारतो आणि मालविकाअग्निमित्रांतील गौतम पिङ्गलवानराने संकटातून मित्राला सोडविण्याचे बघून आनंदाने म्हणतो, ''साधु रे पिङ्लवानर, साधु सुष्ठु त्वया परित्रतः स्वपक्षः' असे लोकांना खदखदून हसविणारे उद्‌गार काढतो. बुद्धि व रूप यांच्या बाबतीत स्वतःची तुलना हसत हसत रस्त्यांवरील बैलाशी करणारा विदूषक Laughing at oneself चा ही उपयोग करतो आणि म्हणूनच त्याच्या विनोदाची पातळी उंचावते हे मान्य केले पाहिजे.

कुरूपतेबरोबरच विनोदाच्या खुलावटीसाठी संस्कृत नाटककारांनी त्याच्या खादाडपणाचा, भोजनप्रियतेचा हि भरपूर उपयोग करून घेतला. 'ब्राम्हणो भोजनप्रियः' हे सुभाषित प्रसिद्ध च आहे. अभिजात संस्कृत नाटकांतील सर्व विदूषक ''औदरिकस्य अभ्यवहार्यमेव विषयः' या कोटीत येतात. प्रमाणाबाहेर खादाडपणा केल्यामुळे अजीर्ण झालेला, कुक्षिपरिवर्तनाचा अनुभव येणारा स्वप्नवासवदत्तातील वसंतक नाइलाजाने 'सर्वमानयतु भवती वर्जयित्वा भोजनम्' असे म्हणतो तर पुरूरव्याच्या प्रकृतीतील फरक स्त्रीप्रेमामुळे झालेला नसून पित्तामुळे झाला आणि त्यावर खात्रीचा उपाय म्हणजे 'पानभोजनं त्वरय' असे विक्रमोर्वशीयातील माणवक सुचवितो आणि मृच्छकटिकात वसंतसेनेच्या प्रासादाची समृद्धी व शोभा पहात पहात मुदपाकखान्याजवळ आल्यानंतर 'बहुविधाहारविकारमुपसाधयति सूपकारः । बध्यन्ते मोदका पच्यन्तेऽ पूपकाः' हे वर्णन करण्यात रंगून जातो व 'अपीदानीमहं वर्धितं भुङ्‌क्ष्व इतीह पादोदकं लप्स्ये' ची आशा बाळगतो. एकंदरीत उदयाला येणारा चंद्र हि संस्कृत नाटकातल्या ज्या विदूषकाला 'खण्डमोदका' प्रमाणे भासतो त्याची भोजनप्रियता वादातीत च मानायला हवी.

आहाराबरोबरच विहाराचे वेड निद्रेवरती प्रीती हि आली. खरं म्हणजे सुखासीनता हा विदूषकाचा स्थायीभाव आहे. स्वप्नवासवदतातील उदयन मगधाच्या राज्यकन्येशी विवाह झाल्यानंतर हि 'लावाणके हुतवहेन हृताङ्गयष्टिं तां पद्मिनीं (नाम वासवदतां) हिमहतामिव चिन्तयामि' या विचारात मग्न असतो पण त्याच्या मित्राला मात्र खाण्यापिण्याची चंगळ झाल्यामुळे 'अनप्सरःसंवासः उत्तरकुरुवासः' चा अनुभव येत असतो. कालिदासाचा एक विदूषक तर स्वर्ग सुखाला 'न तत्र अश्यते न पीयते । केवलमनिमिषनयनैर्मीना विडम्ब्यन्ते ।' असे म्हणून राजावाड्याच्या तुलनेने कःपदार्थ ठरवितो. निद्रेच्या आसक्तीमुळेच मालविकाग्निमित्राच्या चौथ्या अंकात अग्निमित्र व मालविका यांची कुंजातील भेट

अल्पजीवी ठरली एवढेच नव्हे तर कुंजाच्या दाराशी झोपलेल्या गौतमाला पाहून इरावतीला शंका आली व त्यात हि झोपेत 'इरावतीमतिक्रामन्ती भव' असे बरळणाऱ्या गौतमाने अनर्थ करून टाकला व अग्निमित्रावर बांका प्रसंग ओढावला. झोपेत बडबडण्याच्या सवयीमुळे व वसंतसेनेने ठेव म्हणून दिलेले दागिने संभाळण्याच्या ताणामुळे मृच्छकटिकातील मैत्रेयाने ठेव म्हणून दिलेले दागिने झोपेत शर्विलकाला बहाल करून टाकले. आहार, विहार व निद्रा यांच्या आकर्षणाबरोबरच या विदूषकाच्या भित्रेपणाचा ही भरपूर उपयोग संस्कृत नाटककारांनी करून घ्यावा यात नवल नाही. दोरीला साप समजणे, अंधारात जायला घाबरणे हे गुण ही सर्व विदूषकांत आढळतात. शाकुन्तलात राजा दुष्यंताने शकुंन्तलेच्या सौंदर्याचे उत्कृष्ट वर्णन केले व आश्रमातील ऋषींचे राक्षसांपासून संरक्षण करण्यासाठी बोलावणे आल्यानंतर राजाने त्याला विचारले 'अस्ति शकुन्तलादर्शने कुतूहलम्;' भित्र्या माढव्याचे उत्तर पहा -प्रथमं सपरिवाहमासीत् इदानी राक्षसवृत्तान्तेन बिन्दुरपि नावशेषितः' ।

संस्कृत नाटककारांनी विदूषकाची, राजाच्या अंतरंग मित्राची भाषा प्राकृत ठेवावी हे सकृद्दर्शनी विसंगत वाटेल परंतु अभिजात संस्कृत नाटकांच्या काळात प्राकृत ही सामान्य बोलभाषा झालेली होती असे म्हणण्यास पुष्कळ जागा आहे. नाटक हे प्राधान्याने लोकानुरञ्जनासाठी आहे ही कल्पना मान्य असल्यामुळे सामान्य प्रेक्षकाची उपेक्षा करणे शक्य नव्हते. मग विदूषकाच्या विनोदामुळे हमखास लोकप्रिय होणाऱ्या पात्राच्या संभाषणाची मौज त्यांच्यापर्यंत पोचवायच्या दृष्टीने त्याने बोलभाषेचा उपयोग करावा हेच श्रेयस्कर होते. सामाजिक व्यंग्यांवर बोट ठेवण्याचे विदूषकाचे कार्य ही प्रभावीपणे करण्याचा तोच मार्ग होता. म्हणून मुळात देवांचा सहचर म्हणून भरताने कल्पिलेला विदूषक हा राजाचा अंतरंग मित्र होऊन हि नाटकात लोकभाषेत बोलतो. शिवाय ब्राह्मणाच्या तोंडी प्राकृत ही विसंगती ही हंशाला मदत करणारी ठरली.

विदूषक हे पात्र एकंदरीत सांकेतिकच तथापि संस्कृत नाटककारांनी त्याला शेक्सपियरच्या नाटकांतील Foolसारखे कथानकापासून वेगळे ठेवले नाही; किंबहुना त्याचा गबाळेपणा, विसरभोळेपणा, भाबडेपणा व बावळटपणा यांचा उपयोग कथानकाच्या विकासासाठी करून घेतला. कधी कधी यामुळे त्याच्याकडून घडलेल्या प्रमादांमुळे नाटकाची कथानके अधिक गुंतागुंतीची व आकर्षक झाली. उदाहरणार्थ, विक्रमोर्वशीय, मृच्छकटिक व रत्नावली या नाटकांत अनुक्रमे भूर्जपत्र, अलंकार व चित्रफलक त्या त्या विदूषकांनी गबाळेपणाने टाकून दिल्यामुळे या नाटकांच्या कथानकांना विशेष रंग चढला. संस्कृत नाटककारांनी विदूषकाला नाटकात अपरिहार्यत्व आणून देण्याची काळजी कशी घेतली हे

बघण्यासारखे आहे. (१) काही नाटकात बदलत्या दृश्याचे वर्णन करण्याचे व कथानकातील धागे उलगडण्याचे काम विदूषकाने केले. स्वप्नवासवदत्त नाटकाच्या चौथ्या अंकांतील उदयनाच्या प्रवेशाची पार्श्वभूमी तयार करण्याचे व कथानकातील धागे उलगडण्याचे काम विदूषकाने केले. प्रियदर्शिका नाटिकेच्या दुसऱ्या अंकाच्या सुरवातीला विदूषक च राजाचे आगमन सुचवितो आणि धारागृह उद्यानाचे वर्णन करतो. (२) कालिदासाच्या मानविकाग्निमित्र नाटकातील गौतम गणदास आणि हरदत्त या नाट्याचार्यांत खुबीने भांडण लावून देतो आणि त्यांची परीक्षा घेण्याच्या निमित्ताने नायिकेला नायकासमोर नृत्य करायला लावतो (३) सर्वात महत्त्वाचे म्हणजे प्रेमपूर्तीत नायकाला साहाय्य करण्याचे काम हा 'कामतंत्र सचिव' ज्या कौशल्याने मालविकाग्निमित्र या नाटकात करतो त्याला खरोखरच तोड नाही. मालविका नृत्यप्रसंगी अधिक वेळ रंगभूमीवर अग्निमित्राच्या नजरेसमोर रहावी म्हणून याने आपल्याकडे मूर्खपणा पत्करून तिची चूक झाली असे सांगितले, सगळ्यांचे औत्सुक्य वाढविले आणि नंतर सांगितले सर्वात मोठी चूक माझ्यासारख्या ब्राह्मणाची प्रथम पूजा केली नाही !'' हे ऐकून मालविका हि हसते आणि त्या स्थितीत मालविकेला बघून राजाच्या डोळ्याचे पारणे फिटते. पुढे आपण राणीच्या दर्शनाला निघालो असताना. उपायनपुष्पे तोडतां तोडतां 'साप चावला' असा बहाणा करून विष चढते आहे 'सिमसिमायन्ति मे अङ्गानि' असे बेमालूम नाटक करून या गौतमाने राणीकडून तिची अंगठी मिळवली व तिच्या साहाय्याने बंदीत पडलेल्या मालविकेची सुटका करविली. यावरून त्याचा हिकमती स्वभाव आणि समयसूचकता व्यक्त होते. स्वतःच्या विद्वत्तेवर व स्मरणशक्तीवर आपणहून टीका करून हि विदूषकाने हजरजवाबीपणामुळे विनोद केलेला आहे. विदूषकाचे सर्वत्र पसरलेले कपटजाल ओळखून इरावती ज्यावेळी 'इयमस्य काततंत्रसचिवस्य नीतिः,' असे म्हणते त्यावेळी विदूषक 'नीती' या शब्दाचा 'राजनीती' हा अर्थ करून चट्दिशी म्हणतो 'यदि नीत्यां एकमपि अक्षरं पठेयम् ततो ननु गायत्रीमपि विस्मरेयम्.'' विदूषकाचा हा हजरजवाबीपणा किंवा हे प्रत्युत्पन्नमतित्व हर्षाच्या रत्नावलीत ही दिसते 'सागरिकेच्या शेजारी उदयन राजाचे चित्र कसे?'' हा प्रश्न राणी वासवदत्ताने रागाने केल्यावर राजा ही बुचकळ्यात पडला, सागरिकेवरील प्रेमाचे आपले बेंड बाहेर पडते म्हणून गोंधळला, पण विदूषकाने ताबडतोब उत्तर दिले मी राजेसाहेबांना म्हटले 'आत्मा किल दुःखमालिख्यते' म्हणजे स्वःताने स्वतःचे चित्र काढणे फार कठिण आहे.' तेव्हा हे हि कौशल्य आपल्यात आहे हे दाखवण्यकरता राजेसाहेबांनी आपली प्रतिमा या चित्राशेजारी काढली.''

विदूषकाच्या स्वभावविशेषातून घडून आलेल्या प्रसंगांमुळे प्रसंगनिष्ठ विनोद

अनेक संस्कृत नाटकात निर्माण झालेला आहे. समाजात ब्राह्मण हा पूज्य मानला जात असे आणि विदूषक या वर्गाचा प्रतिनिधी. अशा व्यक्तीचे किंवा वर्गाचे दोषदर्शन लोकांच्या दृष्टीने रोचक च होते. ब्राह्मणांचा सारा उद्योग म्हणजे परान्न आकंठ घेऊन घोरत पडावयाचे हे सुचविण्यासाठी मृच्छकटिकातील मैत्रेयाने चवथ्या अंकात वसंतसेनेच्या देवडीवाल्याला अशा ब्राम्हणाची उपमा देताना म्हटले, 'श्रोत्रिय इव सुखोपविष्टो निद्राति दौवारिकः'. पूर्वीच्या वैदिक ब्राह्मणांना पाठ केलेल्या वेदांचा अर्थ समजत नसे, क्वचित् लिहिता वाचता हि येत नसे. यावर अविमारकात विनोद केला चंद्रिका नावाच्या दासीला विदूषक म्हणतो, ''ब्राह्मणो दुर्लभोऽक्षरज्ञोऽर्थज्ञः', असा ब्राम्हण मी आहे. ती आपली अंगठी दाखवून त्यावरील अक्षरे वाचायला सांगते. मग जी पंचाईत झाली ती सावरून नेण्यासाठी विदूषक म्हणतो 'एतदक्षरं मम पुस्तके नास्ति'. मुद्राराक्षसात खुद्द चाणक्य ही शिष्याला सांगतो, 'चांगला कायस्थ बोलावून आण, कारण श्रोत्रियाक्षराणि प्रयत्नलिखितान्यपि नियतं अस्फुटानि भवन्ति' विद्धशालभञ्जिकेत विदूषकाने मौनव्रत धारण केले होते; म्हणून त्याने आपले म्हणणे राजाला लिहून दाखविले. ते पाहून राजा विदूषकाला म्हणतो, '' अरे, मी अठरा लिप्या जाणतो, पण तुझ्या या लिपीपुढे हात टेकले बुवा !''

कधी कधी विदूषकाच्या बोलण्यात चमत्कारिक विनोदी उपमा व समाजावर विनोदी टीका येते व त्यामुळे कल्पनानिष्ठ व शाब्दिक विनोद निर्माण होतो. या बाबतीत मृच्छकटिकांतील मैत्रेय वाकबगार दिसतो. 'खलु अस्माकं प्रदीपिकाः अपमानितनिर्धनकामुका इव गणिकाः निःस्नेहाः इदानीं संवृत्ताः' या मैत्रेयाच्या शेऱ्यात 'स्नेह' शब्दावरील श्लेषाने शब्दनिष्ठ विनोद निर्माण झाला. वसन्तसेनेच्या वाड्याचे वर्णन करताना या मैत्रेयाने पशुपक्ष्यांना दिलेल्या विनोदी उपमा मोठ्या रमणीय आहेत. फुसफुसणाऱ्या रेड्याला अपमानित कलिङ्ग ब्राम्हणाची उपमा किंवा 'कुरकुर' शब्द करणाऱ्या सारिकेला डोक्यावर चढून बसलेल्या व कुरकुर करणाऱ्या गृहदासीची उपमा मोठी मार्मिक आहे. हाच मैत्रेय पहिल्या अंकात चारुदत्ताला म्हणतो. 'देवतांना नैवद्य ठेवून देण्यासाठी मी चव्हाट्यावर जाणार नाही कारण, 'मम पुनर्ब्राह्मणस्य सर्वमेव विपरीतं परिणमति। आदर्शगतेव छाया वामतो दक्षिणा दक्षिणतो वामा', म्हणजे 'माझ्या बाबतीत नेहमी सुलटे असले तरी उलटे होते जसे आरशातील आपल्या प्रतिबिम्बात डावी बाजू उजवीकडे व उजवी बाजू डावीकडे दिसते त्याप्रमाणे'' मैत्रेय हा खऱ्या अर्थाने 'सर्वकालमित्र' आहे. त्याने शकाराला मारायला काठी उगारावी आणि त्याच्याच काखेतून दागिने पडून चारुदत्ताविरुद्ध पुरावा मिळावा हा खरोखर दैवदुर्विलास. त्याच्या सात्विक संतापाला कारुण्याची किनार लाभल्यामुळे

मैत्रेयेचा सांकेतिकपणा नाहीसा झाला असेच म्हणावे लागेल.

विध्दशालभग्जिकेतला चारायण हा प्रेमवेड्या राजाला विनोदी म्हणींचा उपयोग करून शहाणपण शिकवतो. या नाटकातला राजा स्वप्नातील लावण्यवतीवर भाळतो आणि राणीकडे दुर्लक्ष करतो. तेव्हा विदूषक म्हणतो 'अरे हे तुझे वर्तन 'नष्टे दृष्टे मुण्डिते उपविष्टः पतिर्मुण्डितः' या म्हणीप्रमाणे झाले. एका बाईला एक मोठा सुरूप आणि अलंकारानी नटलेला नट दिसला म्हणून त्याच्यावर भाळून तिने पतीला मुंडणाने विद्रूप केले. यामुळे तिची स्थिती 'तेल हि गेले तूप हि गेले हाती धुपाटणे आले' अशी झाली. बाळा, 'आज मिळणारी तित्तिरी पक्षीण पुरवली, उद्या मिळणारी मयूरी नको', वरं तत्कालोपनता तित्तिरी, न पुनर्दिवसान्तरिता मयूरी'. या विदूषकाची थट्टा करण्यासाठी राणी त्याचे लग्न एका स्वैरवर्तनी छाटक्या पोऱ्याशी म्हणजे बन्धुलाशी लावायचे ठरविले आणि त्याला लग्नाच्या पोषाखाने सजवले. राजाने विदूषकाला त्या वेषांत पाहून विचारले 'हि रे काय' तो म्हणतो 'राणीसाहेब आज गाझे लग्न करणार आहेत.'' राजाने विचारले 'पण मुलगी कोण, कोणाची ?' धूर्त विदूषकाचे उत्तर ऐकण्यासारखे आहे. ''आमच्या श्वशुरांचे नाव शशशृंग, आमच्या सासूबाई मृगतृष्णिका, काकू आणि त्यांचे कन्यारत्न 'अम्बरमाला' (आकाशपुष्पाची माळ), हे आमचे कुटुंब.'' हाच विदूषक 'पण्डिताः खलु अलीकविल्कपैः विस्मृतफला इव मर्कटाः मूलमलभमानाः पल्लवग्राहिणाः भवन्ति' आणि आम्ही 'मूर्खा पुनः पनसवनपालकाः इव मुलमनुरसन्तः फलं प्रानुवन्ति' अशा उपमा देऊन मूलग्राही आणि पल्लवग्राही पाण्डित्य या दोन शब्दांनी सूचित झालेल्या रूपकाचा मनोहर विस्तार करून मोठी मौज निर्माण करतो यात शंका नाही.

संस्कृत नाटकांतला सर्व विनोद विदूषकाभोवती फिरतो असे मात्र म्हणता येणार नाही. मृच्छकटिकांतला शकार म्हणजे परस्परविरूद्ध दोषांचे अभिनव मिश्रण. याचा भेकडपणा व अचरटपणा तर विनोद निर्माण करतोचः- 'शीर्षमस्तक.' 'नरपुरुषमनुष्य' 'शकुनिसहविहङ्ग' अशी शब्दांची द्विरुक्ती करणे, 'एषा नाणकमोशिकामकशिका मत्स्याशिका लाशिका' अशी शकारबहुल भाषा वापरणे, 'निर्नासा कुलनाशिका अवशिका कामस्य मञ्जूषिका' अशी वसन्तसेनेच्या सौंदर्याची प्रशंसा करणे, 'गाडी आली ? बैल हि आले ? आणि तू हि आलास ? '' असे आपल्या चेटाला विचारणे, किं 'भीमसेनो जमदग्निपुत्रः कुन्तीसुतो व दशकन्धरो वा । एषोऽ हं गृहीत्वा केशहस्ते दुःशासनस्यानुकृतिं करोमि' असे बिनदिक्कतपणे म्हणणे, जटायूने वालीची बायको ओढली, रावण कुंतीच्या मागे लागला अशी बालिश बडबड करणे वगैरे विनोद हे शकाराच्या अचरटपणातून निर्माण झाले. कल्पनानिष्ठ विनोदाचे हि या शकाराला वावडे

नाही. अन्धारात वसन्तसेना एकदम नाहीशी झालेली बघून ही वल्ली म्हणते, ''अरे विटा, उडदाच्या राशीत शिरलेल्या काजळाच्या गोळीप्रमाणे वसंतसेना अंधकारात नाहीशी झाली.' पुढे तिच्या अंगावरील फुलांचा वास आणि पायांतील पैंजणांचा आवाज ऐकून 'शृणोमि माल्यगंधं । अन्धकारपूरितया पुनर्नासिकया न सुव्यक्तं पश्यमि नूपुरशब्दम् ।' अशी मजेदार भाषा वापरतो. वसंतसेनाचा पाठलाग करताना 'एषा गर्भदासी दरिद्रचारूदत्तमनुरक्ता .... वामतस्तस्य गृहम्' असे म्हणण्याचा मूर्खपणा शकाराजवळ आहे, कुत्रे आणि कुत्र्यामागे लागले असता जसा एखाद्या गावातून कोल्हा पळत सुटावा त्याप्रमाणे मी आपल्या घरी जातो असे ऐटीने म्हणणाऱ्या शकाराच्या विनोदात भीषणतेची झांक आहे. तो जितका भेकड आहे तेवढाच हिकमत्या आणि पाताळयंत्री आहे, जितका घमेंडखोर आहे तितका लाचार हि आहे, जितका रानदांडगा आहे तेवढाच गुलहौशी हि आहे. त्याच्या विनोदात मनुष्यद्वेषाची छटा आहे, त्याला माणसे किड्यामुंगीसारखी वाटतात, 'स्त्रीणां शतं मारयामि, शूरोऽहं' असे म्हणणारा शाकार कौशल्याने विटाला घालवून देऊन 'गतो भावः अभावम्' असे म्हणू शकतो, आपल्या दुष्ट सामर्थ्याची जाणीव पदोपदी दाखवून देतो, वसंतसेनेचा रागाने गळा आवळण्याला तो कमी करत नाही. त्याचा विनोद क्रौर्याच्या सीमारेषेवर असतो. त्याच्या भीषण विनोदाचे आणखी एक उदाहरण. अचरटपणाने गाणाऱ्या शकाराला विट विचारतो आपण गन्धर्व केव्हा झालात ?'' त्याचे उत्तर आहे, 'कथं मन्धर्वो न भवामि । मी घसा साफ होणारी सर्व औषधे, ठिंगूळ सुंठगूळ, मिरे वैगरे फस्त केली आणि वर कोकिळेचे मांस हि खाल्ले. तेव्हा माझा स्वर मधुर का होणार नाही?'' चारूदत्ताला त्याने दिलेली धमकी 'कपाटप्रविष्टकपित्थत्थगुलिकमिव मस्तकं ते मडमडायिष्यामि' या शब्दांत व्यक्त झाली आणि तो खरच तसे करू शकेल याची वाचकांना आणि प्रेक्षकांना खात्री वाटते. शूद्राने शकाराच्या माध्यमातून क्रौर्याच्या सीमारेषेवर जाणाऱ्या विनोदाचे नवे दालन उघडले असेच म्हटले पाहिजे.

मृच्छकटिक नाटक म्हणजे वस्तुतः विनोदाचा कधीही न आटणारा झरा. या नाटकातला दर्दुरक स्वभावनिष्ठ विनोद निर्माण करतो. पळता पळता देवीच्या देवळात जाऊनतिच्याजागी निस्तब्ध उभे राहण्याची मुक्त फांशांच्या आवाजाने विफल होते. त्याची संभावितपणाची ऐट, अंगावर घेतलेल्या वस्त्राचे 'अयं पटः सूत्रदरिद्रतां गतो ह्ययं पटःछिद्रशतैरलंकृतः । प्रावरितुं न शत्र्यते ह्ययं पटः संवृत एव शोभते' हे मजेदार वर्णन, नाटकाच्या सहाव्या अंकातील चंदनक व वीरक यांचे एकमेकांची कुळे उद्धरणारे मौजेचे भांडण, शर्विलक नावाच्या ब्राम्हण चोराने जानव्याचे चौरकर्मात सांगितलेले उपयोग हे सर्व अस्सल विनोदाचे नमुने आहेत. शर्विलक म्हणतो 'यज्ञोपवीताने भिंतीत पाडावयाच्या भोकांचे मोजमाप

घेता येते; झोपी गेलेल्या स्त्रियांच्या अंगावरील दागिन्यांचे वेढे सैल करून ते काढून घेता येतात, कोठे वानगी दाखल कडी कोयंडा घट्टा बसलेला असेल तर तो या जानव्याच्या मदतीने वर ओढून काढता येतो आणि चोरी करीत असताना हातापायांना सांपकिडा चावलाच तर तो अवयव घट्ट आवळून टाकता येतो ! जानव्याचे हे उपयोग दाखवून देणारा शर्विलक हा अगदी चोरांचा राजा शोभून दिसतो !

विद्धशालभञ्जिकेत स्त्रियांत पुरुषांचा व पुरुषांना स्त्रियांस वेष दिल्यामुळे जो घोटाळा निर्माण होतो त्यातून नाट्यकथानकात गुंतागुंत व विनोद निर्माण झालेला आहे. हा विनोद शेक्सपियरच्या 'As You Like It' किंवा Midsumner Nights Dream च्या धर्तीवरचा आहे. या नाटिकेतला राजा नवरदेव म्हणून उभा, राणीच्या मताप्रमाणे नवरी म्हणून स्त्रीवेषात आणलेला मृगाङ्कवर्मा त्यांच्यासमोर उभा व कुवलयमाला हि राजाच्या थट्टेचा हा सोहळा संपून राजाच्या नवरीशी आपले लग्न केव्हा लागते म्हणून वाट पहात जवळच उभी! विवाहविधी चालू आहे. इतक्यात दूताकरवी लाटदेशाच्या चंद्रवर्म्याला मुलगा झाल्याची बातमी आली. भागुरायण प्रधानाने ही वेळ साधून मृगाङ्कवर्मा आणि मृगाङ्कावली यांचे रहस्य उघड केले. त्यामुळे राणीचा डाव उलटला आणि राजा समोरील राणीच्या मताने पुरुष असलेली व्यक्ती राणीची सवत होऊन तिची बायको ही राजाची पत्नी झाली. यावर विदूषकाचा शेरा मोठा विनोदी आहे. तो म्हणतो आमच्या खेडेगावात म्हण आहे, मेहुण्याची बायको ही अर्धी बायको असते ( मृगाङ्कवर्मा हा राणीचा मामेभाऊ -म्हणजे राजाचा मेहुणा) पण मित्रा, तुझी तर ही कुवलयमाला सगळीच बायको झाली ! ''

शाकुन्तलाच्या सहाव्या अंकाच्या सुरवातीच्या प्रवेशकात राजाची मुद्रांकित अंगठी बाजारात विकत असताना दोन पोलिसांनी एका कोळ्याला पकडले. त्या कोळ्याने पोलिसांच्या कचाट्यात सापडून ही 'सहजं कित यद्विनिन्दितं न खलु तत्कर्म विवर्जनीयम्' असे म्हणत म्हणत 'पशुमारणकर्मदारूणो अनुकम्पामृदुरेव श्रोत्रियः' असा उपरोधिक विनोदी टोमणा हाणला. पोलिसांचे हात त्या कोळ्याला मारण्यासाठी कसे शिवशिवत होते त्याचे सत्य परंतु विनोदमिश्रित वर्णन कालिदासाने केले परंतु नंतर अंगठी राजाकडे नेल्यानंतर त्याला शकुन्तला आठवली आणि त्याने कोळ्याला बक्षिस दिले. 'शूलादवतार्य हस्तिस्कधे प्रतिष्ठापित'. हे खरे ठरल्याबरोबर उद्दाम पोलिसांचा आणि श्यालकाचा नूर पालटला, 'चोरीच्या अपराधासाठी तुला फांसावर चढलेला बघीन' वगैरे वल्गना करणारे पोलिस त्याच्याच गळ्यात हात घालून गोडीगुलाबीच्या गोष्टी करू लागले. हे बघून तो कोळी ही 'तुमच्या थोर मनाबद्दलचे बक्षिस धरा' (इतोऽर्ध

युष्माकं सुमनोमूल्यं भवतु) असा टोला हाणतो. मग मागचे सर्व विसरून ही मंडळी मैत्रीची पहिली सलागी सुरादेवीच्या समोर देण्यासाठी गुत्त्याकडे निघाली ! 'धीवर, महत्तरस्त्वं प्रियवयस्य इदानी मे संवृत्तः । कादम्बरीसाक्षिकं अस्माकं प्रथम सौहृदमिष्यते तच्छौन्डिकापणमेव गच्धामः । यातील विनोद आजहि शिळा झालेला नाही.

भवभूतीची मनोवृत्ती विनोदाला तितकीशी अनुकूल नसावी. त्याच्या नाटकात विदूषक नाही हे खरे परंतु काही ठिकाणी विनोदाची चुणूक त्याने हि दाखवली. उत्तररामचरिताच्या चौथ्या अंकातील वाल्मीकीच्या आश्रमांतले दोन शिष्य मोकळेपणाने बोलताना दाखविले. त्या दिवशी आश्रमात बडे पाहुणे येणार असल्यामुळे 'शिष्टागमने अनध्यायः,' या नियमानुसार शिष्यांना सुट्टी मिळाली. यामुळे आनंदित होऊन सौधातकी नावाचा विद्यार्थी म्हणतो, ''स्वागतमनेक प्रकाराणां जीर्णकूर्चानामनध्यायकारणानाम्, 'नाना प्रकारच्या पिकलेल्या दाढ्या धारण करणाऱ्या व आम्हाला सुट्टी देणाऱ्या या पाहुण्यांचे मनःपूर्वक स्वागत असो.' तो पुढे विचारतो या म्हाताऱ्या मंडळींच्या म्होरक्याचे नाव काय ? '' हे ऐकून थोडासा प्रौढ विद्यार्थी दाण्डायन त्याला चापतो व म्हणतो अरे ते तर भगवान वसिष्ठ. तू काय बडबडतोस ? ''सौधातकी म्हणतो, 'असं होय. मया पुनर्ज्ञात व्याघ्रो वा बृको वैष इति । '' कारण त्यानी आल्याबरोबर गरीब बिचारी कल्याणी कालवड गट्ट केली ! ''पूर्वी, अतिथी म्हणून आलेल्या ब्राह्मणाला समांस मधुपर्क म्हणून देत असत; त्याला उद्देशून सौधातकीचे हे म्हणणे खरोखरच हास्य निर्माण करते. याच अंकात रामाच्या अश्वमेधीय अश्वाला पहिल्यांदा पाहून वाल्मीकीच्या आश्रमांतील कुमारांनी त्याचे केलेले वर्णन 'पच्शात्पुच्छं वहति विपुलं तच्च धूनोत्यजस्त्रं दीर्घग्रीनः स भवति खुरास्तस्य चत्वार एव' यांत हि विनोद आहे; परंतु यातील स्वभावोक्ती अधिक प्रभावी ठरते.

मालतीमाधवाच्या सातव्या अंकात ही भवभूतीने एक विनोदी प्रसंग निर्माण केला. माधवाच्या मित्राने, मकरन्दाने मालतीचा वेष घेतला आणि त्याचे नन्दन नावाच्या कलाकाराशी लग्न लावून दिले. मालतीचा वेष घातलेल्या मकरन्दाची उद्धट वर्तनाबद्दल कानउघाडणी नंदनाची बहिण मदयन्तिका करते. खुद्द मदयन्तिकेचे प्रेम मकरंदावर च असते. याविषयी गोष्टी निघाल्या असताना मदयन्तिकेने बुद्धरक्षिता, लवङ्गिका वगैरे स्त्रियांबरोबर आपले मकरंदावरील प्रेम व्यक्त केले; खरं म्हणजे या दोघींनी मालतीचा वेष घेतलेल्या मकरंदासमोर वदवायला लावले आणि मग मदयान्तिका जायला निघताच मकरंदाने आपले स्वरूप प्रकट करून तिला ओळख दिली. हे संस्कृत नाटकात प्रथम पताकास्थानकाचे उदाहरण मानतात. यातला विनोद अर्थातच शृङारावर

आधारलेला आहे.

कृष्णमिश्राच्या प्रबोधचंद्रोदय या रूपकात्मक नाटकाच्या तिसऱ्या अंकात महामोहरूपी खलनायकाला जाऊन मिळालेल्या दिगंबर जैन, बौद्ध भिक्षू व कापालिक या तिघा धार्मिकांचे आपापल्या धर्मविषयीचे अभिमान नाटककर्त्याने मोठ्या विनोदबुद्धीने दाखवले. यातला क्षपणक म्हणतो, ''साधुजनांच्या सेवेने मनोमन धुवून टाकून स्वच्छ आत्मा जाणण्याचा प्रयत्न करा. हे साधू घरांतील बायकांशी रममाण झाले तरी मनात ईर्ष्या किंवा मत्सर बाळगू नये (ईर्ष्यामलं न कार्यं ऋषीणां दारान्रममाणानाम् । ). हा क्षपणक बुद्धाच्या सर्वज्ञत्वाची थट्टा करताना बुध्दभिक्षूला विचारतो, ''बुद्ध सर्वज्ञ आहे हे तुला कसे समजले ?'' बुद्धभिक्षू म्हणाला, ''बुद्धाच्याच ग्रंथावरून तो सर्वज्ञ होता असे आम्ही जाणतो.'' क्षपणक यावर म्हणाला, ''अरे निर्बुद्धा, जर बुद्धाच्याच बोलण्यावरून तुम्ही त्याचे सर्वज्ञत्व कबूल करता, तर मग मी हि म्हणतो, 'मी सर्वज्ञच आहे. आणि तुला सांगतो की तू आपल्या पूर्वजांसह सात पिढ्यांचा माझा दास आहेस.'' मग कापालिक प्रवेश करतो आणि हातात तीक्ष्ण तलवार घेऊनच त्यांना धर्म समजावून सांगतो. त्याच्या गळ्यातल्या हाडकांच्या माळा, प्रेतांच्या कवट्यांतून जेवण वगैरेमुळे अहिंसावादी भेदरून जातात. जेव्हा जेव्हा त्यांना कापालिकाच्या तत्वज्ञानाबद्दल शंका वाटते तेव्हा तेव्हा कापालिक त्यांना एका सुंदर कापालिकेचे आलिंगनसुख चाखवी आणि मद्याचा घोट देई कारण 'स्त्रीमुखं तु सदा शुचि' हा त्याचा आवडता सिध्दांत.

मुद्राराक्षस नाटक तसे विनोदविरहित च. या नाटकाच्या पाचव्या अंकात गावाला निघालेल्या सिद्धार्थक वाटेत भेटलेल्या क्षपणकाला विचारतो, 'काय रे भिक्षो, हा दिवस गावाला जायला बरा आहे का ?'' त्यावर क्षपणक हसून म्हणतो, ''मुण्डितमुण्ड नक्षत्राणि पृच्छामि'' भल्या गृहस्था, हजामत करून घेऊन मग विचारतोस, 'हजामतीला हा दिवस बरा आहे का ?'' हा मिस्किलपणा म्हणजे विनोदाचाच शिडकावा !

संस्कृत नाटकांच्या नांदी पद्यांत ही विशिष्ट प्रकारचा विनोद व्यक्त झालेला दिसतो. या विनोदाचा उठाव हास्यरसाला प्रतिकूल मानल्या जाणाऱ्या ईश्वरविषयक भक्तीच्या पार्श्वभूमीवर झालेला आहे हे विशेष उल्लेखनीय. 'नंदन्ति देवता अस्याम्. हे नांदीचे प्रयोजन, यातच इष्ट देवतेच्या कौटुंबिक फटफजितीचे वर्णन आढळले म्हणजे विनोदाचा व्यापकपणाचे नवल वाटल्यावाचून रहात नाही. विशाखदत्ताच्या मुद्राराक्षस नाटकात प्रारंभीच शङ्कराने पार्वतीशी शब्दछल करून तिला फसविण्यात धूर्तपणा व्यक्त केलेला आहे. विनोदाचे नाही म्हटले तरी वावडे

असणाऱ्या भवभूतीने मालतीमाधव नाटकाच्या नांदीवजा श्लोकात गणपतीच्या नासारंध्रात भ्यालेला सर्प शिरल्यामुळे तो त्याला सूंसूं करून लावीत आहे असे वर्णन केले. सानंद नंदिहस्ताहतमुरजरवाहूत कौमारबर्हि-त्रासान्नासाग्ररंध्रं विशती फणिपतौ भोगसंकोचभाजि, असे म्हणून शेवटी 'वैनायक्यश्चिरं वो वदनविधुतयः पान्तु वो चीत्कारवत्यः' अशी प्रार्थना भवभूतीने केलेली आहे. रत्नावली, प्रियदर्शिका या नाटकांतून कधी शंकरासारख्या विचित्र पतीशी वागताना पार्वतीची जी तारांबळ झाली त्याचे वर्णन आहे तर कधी गंगेसम्बन्धातल्या शिव-पार्वतीच्या कलहाचे वर्णन आढळते. शङ्कराने मस्तकावर धारण केलेल्या गङ्गेबद्दल पार्वतीला सदैव मत्सर वाटतो व त्याबद्दल कित्येक वेळा ती शङ्कराला पेचात आणते. मग शङ्कर हि कौशल्याने पार्वतीच्या पेचातून सुटतो. अशा एका प्रसंगाचे नान्दीवजा श्लोकात वर्णन करताना मुद्राराक्षसाचा कर्ता लिहितो.

धन्या केयं स्थिता ते शिरसि शशिकला किं नु नामैतदस्याः
नामैवास्यास्तदेतत्परिचितमपि ते विस्मृतं कस्य हेतोः।
नारीं पृच्छामि नेन्दुं कथयतु विजया न प्रमाणं यदीन्दुर्देन्या-
न्निह्नोतुमिच्छोरिति सुरसरितं शाठ्यमन्याद् विभोर्वः ॥

''आपल्या डोक्यावर बसलेली ही धन्य स्त्री कोण ? पार्वतीच्या या प्रश्नाला वेड पांघरून उत्तर ''ही तर चंद्रकोर'' पार्वती म्हणते, 'हे काय हिचे नाव आहे! शङ्कर म्हणतात ''होय, ते का बरं विसरलीस ? थोडेसे चिडून पार्वती विचारते, ''मी तुम्हाला डोक्यावर ठेवलेल्या स्त्रीबद्दल विचारले, चंद्राबद्दल नव्हे.'' यावर अधिकच वेड पांघरून शङ्कर म्हणतात, ''पुरूषावर विश्वास नसलेली तू विजयेला विचार. ती नक्की सांगेल.'' अशा तऱ्हेने पार्वतीच्या तडाख्यातून गंगेचे रक्षण करण्याचे शङ्कराचे चातुर्य तुमचे रक्षण करो.

वेणीसंहार नाटकाच्या प्रारंभी राधाकृष्णाच्या शङारांतील एक विनोदी प्रसंग आहे. कालिन्दीच्या तीरावर रासक्रीडा करीत असताना रागावून आणि खेळ तेथेच टाकून राधा फणकाऱ्याने जाऊ लागते. मग कृष्ण हि मागोमाग जाऊन पावलावर पाऊल ठेवून चालू लागतो यामुळे ही कृष्णाच्या अंगावर रोमांच उभे राहतात. ते मागे वळून पाहिल्यानंतर व तो आपले अनुकरण करतो आहे हे पाहून तिने उसना आणलेला राग गळून जातो व दोघांची दृष्टादृष्ट होऊन भांडणाचे मधुर हास्यात पर्यवसान होते. कृष्णाच्या अक्षुण्ण अनुनयाने आणि रोमांच दर्शनाने प्रसन्न झालेल्या व ज्याच्याकडे ती स्निग्ध बघत आहे असा तो कंसारि कृष्ण तुमचे रक्षण करतो 'प्रसन्नदयितादृष्टस्य कंसद्रिषः अक्षुण्णोऽनुनयः वः पुष्णातु' या श्लोकांतील नर्म विनोद कृष्णाच्या अनुषंगाने आलेला आहे.

अशा रीतीने संस्कृतातील दशरूपकांपैकी नाटक, नाटिका व प्रकरणे

(मृच्छकटिक आणि मालतीमाधव) यातील विनोद निरनिराळ्या प्रकारचा आहे. या विनोदातून देवता ही सुटलेल्या नाहीत हे उल्लेखनीय. संस्कृतातील प्रहसन हे तर हास्यरसाचे माहेरघर; परंतु यात हलक्या दर्जाच्या पात्रांच्या माध्यमातून विनोद उत्पन्न केला जातो. यात दम्भस्फोटाला स्थान असते व परधर्मातील आचारावर विनोदी टीका असते. संस्कृत काव्यापेक्षा नाटकात विनोद अधिक आढळतो हे निःसंशय.

[ साहित्यसंगम- दिवाळी अङ्क १९८७ ]

# १३. संस्कृत साहित्यांतील शृङ्गार

वैज्ञानिक युगांत मानवाने बुद्धिवादाचा च पाठपुरावा केला पाहिजे हे खरे, परंतु त्याच्या जीवनांत श्रद्धेला म्हणजे हृदयाला हि महत्त्वाचे स्थान आहे हे मान्य केल्यावाचून गत्यंतर नाही. बुद्धिवादी मानव जर हृदयहीन झाला तर त्याचे बुद्धिवैभव वरदान न ठरता शापमूलक ठरण्याचा संभव असतो. मानवाचे हृदय म्हणजे विविध भावनांचे अक्षय भांडार च आहे. या भावना ज्यावेळी प्रमाथी ठरतात किंवा पराकोटीला पोचतात त्यावेळी त्यांची कुठल्या तरी रूपांत अभिव्यक्ति होणेच हितावह ठरते. तसे न झाल्यास त्याच्या जीवनाला च धोका निर्माण होतो असा हि अनुभव येतो. Home They Brought The Warrior Dead या इंग्रजी कवितेत मृत पतीचे शव पाहून हि वरवर अगदी निर्विकार भासणाऱ्या त्याच्या पत्नीचा वस्तुतः कोंडमारा होतो; तिच्या जीविताला धोका अहे हे ओळखून नव्वद वर्षाच्या अनुभवी परिचारिकेने पतीची प्रतिमा च असलेल्या मुलाला तिच्या मांडीवर बसविले व मग 'like summer temptest came her tears', आणि 'O my child, I live for thee' असे उद्‌गार काढल्यामुळे च ती वाचली असे जे वर्णन केले आहे त्याचे मर्म हेच. सर्व कला भावाभिव्यक्तीच्या मानवाच्या या आवश्यकतेतून च जन्माला आल्या. साहित्य ही अशीच एक कला आहे. या कलेत सार्थ शब्द हे अभिव्यक्तीचे माध्यम ठरतात.

मानवाच्या मनांत उसळत असणाऱ्या विविध भावनांमध्ये स्त्री-पुरुषांच्या नैसर्गिक आकर्षणातून एकमेकांच्या अभिलाषेतून निर्माण होणारी रति भावना ही अधिक प्रभावी व त्या भावनेचे चित्रण मनुष्याला सर्वात जास्त रोचक वाटावे यात आश्चर्य कसले ? रति स्थायी भाव असल्यामुळे साहित्यिक त्याच्या आविष्काराला संस्कृत काव्यशास्त्रात शृङ्गाराची संज्ञा आहे. यामुळे 'रसांमाझारि शृङ्गार' हा राजा ठरावा हे हि स्वाभाविक च आहे. प्रेमिकांच्या मीलनांतून निर्माण होणारा संभोग शृङ्गार व त्यांच्या विरहांतून उत्पन्न होणारा विप्रलम्भशृङ्गार ही दोन्ही याच रतिभावनेच्या आविष्काराची मनोज्ञ रूपे. सुप्रसिद्ध संस्कृत कवींच्या काव्यांत किंवा नाटकांत या दोन्हींचे प्रत्ययकारी चित्रण आढळते. 'रति' हा भाव व त्या भावनेचे चित्रण म्हटले की त्यांत शारीरिक आकर्षणाचा, कामुकतेचा किंवा वासनेचा अंश अपरिहार्यपणे येतो व त्यांत मुलतः कांही वाईट आहे असे मानण्याचे मुळीच कारण नाही; परंतु निव्वळ शारीरिक आकर्षणात म्हणजे भोगलालसेत च याची परिणति होत असेल तर मात्र योग्य संयमाच्या अभावामुळे शृङ्गाराचे ते चित्रण भडक व म्हणून च अस्वीकार्य ठरेल. या दृष्टीने संस्कृत

कवींच्या शृङ्गार-वर्णनाकडे लक्ष देणे मनोरंजक ठरल्यावाचून रहाणार नाही.

संस्कृत कवींत गुणानुक्रमाने कालिदास हा श्रेष्ठ. त्याच्या तीन्ही नाटकांत शृङ्गार रसाला च प्राधान्य आहे. या नाटकांचे नायक अनुक्रमे अग्निमित्र, पुरूरवा व दुष्यंत. यापैकी अग्निमित्राचे मालविकेवरील प्रेम हे या दोघांच्या वयांतील अंतराचा विचार करताना जास्त वैषयिक हे मान्य च करावे लागेल. पण तो सुद्धा मालविकेकडून आपल्या प्रेमाला प्रतिसाद मिळणार हे सखीशी झालेल्या तिच्या संवादावरून कळल्यानंतर च मालविकेची विनवणी करतो हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. कारण त्याच्या मताने प्रेमिकांचे एकमेकांवर उत्कट प्रेम असले तरच त्यांचा समागम घडवून आणण्यांत स्वारस्य; किंबहुना एक थंड किंवा उदासीन व दुसरा च आतुर अशा परिस्थितीत मीलन होण्यापेक्षा दोघे हि तितकेच आतुर असताना मीलन न झाल्यामुळे त्यांचा नाश झालेला चांगला. 'परस्परप्राप्तिनिराशयोर्दरं शरीरनाशोऽपि समानुरागयोः' हे त्याचे उद्‌गार या बाबतीत अगदी स्पष्ट आहेत. 'विक्रमोर्वशीयम्' या नाटकांत सुद्धा नायक पुरूरवा उर्वशीच्या सखीला म्हणजे चित्रलेखेला 'साधारणोऽयं प्रणयः स्मरस्य' आम्हा दोघांची प्रणयव्याकुळता सारखी च आहे व म्हणूनच 'तप्तेन तप्तमयसा घटनाय योग्यम्' यानुसार तू आमची गांठ घालून देणे च योग्य हे पटवून देतो.

प्रेमिकाला आपली प्रियतमा हीच जगांतली सर्वात सुंदर स्त्री वाटत असते; त्याच्या दृष्टीने ती 'मम जीवितम्' असते किंवा दुष्यंताच्या शब्दांत 'नेत्रनिर्वाणम्', कवि वर्ड्‌स्वथच्या शब्दांत 'Phantom of delight' तर असते च परंतु मेघदूतांतील यक्षाने आपल्या कांतेबद्दल म्हटल्याप्रमाणे 'या तत्र स्याद्युवतिविषये सृष्टिराद्यैव धातुः' अशी च असते यात शंका नाही. या भावनेत तिच्या कमनीय व प्रमाणबद्ध सौंदर्याचा भाग असतो व म्हणूनच

'विपुलं नितम्बबिम्बे मध्ये क्षामं समुन्नतं कुचयोः अत्यायतं नयनयोः' यासारखे मालविकाग्निमित्रांतील वर्णन किंवा

'अधरः किसलयरागः कोमलविटपानुकारिणौ बाहू ।
कुसुममिव लोभनीयं यौवनमङ्गेषु सन्नद्धम्॥

म्हणजे 'हिचा अधर कोवळ्या पालवीप्रमाणे लालसर आहे, हिचे हात नाजुक फांदीप्रमाणे आहेत, कुसुमाप्रमाणे कमनीय असलेलं यौवन हिच्या अङ्गप्रत्यङ्गातून मुसमुसत आहे' यांसारखी शाकुंतलातील वर्णने स्वाभाविक च नव्हेत का ? भवभूतीच्या मालतीमाधवांत हि मालतीचे वर्णन करतांना

सा रामणीयकविधेरधिदेवता वा
सौन्दर्यसारसमुदायनिकेतनं वा ।

या माधवाच्या उद्‌गारांत हि हा च स्वर आढळतो. सौन्दर्याबद्दलच्या या आदरांतून

च अभिलाषा निर्माण होते व या अभिलाषेच्या पोटी च प्रियतमेच्या सहवासांत निरंतर राहणाऱ्या व्यक्तीबद्दल असूया व तिच्या सानिध्यांत येणाऱ्या प्राण्यांबद्दल हि हेवा वाटू लागतो. शकुंतलाच्या पहिल्या अंकात शकुंतलेच्या मुखाजवळ जाणाऱ्या भुंग्यांकडे पाहून दुष्यंताला त्याचा असाच हेवा वाटू लागतो व तो त्याला उद्देशून 'तू खरा भाग्यवान्'

चलापाङ्गां दृष्टिं स्पृशसि बहुशो वेपथुमतीं
रहस्याख्यायीव स्वनसि मृदु कर्णान्तिकचरः
करौ व्याधुन्वत्याः पिबसि रतिसर्वस्वमधरं

व मी मात्र 'तत्त्वान्वेषांत' मग्न झाल्यामुळे करंटा असे उद्‌गार काढतो यांत नवल नाही.

प्रेमाचा अङ्कुर निर्माण झाल्यानंतर प्रियमतेची प्रत्येक कृती आपल्याला च उद्देशून आहे अशी प्रियकराची गोड समजूत होते. 'सर्वं तत्किल मत्परायणमहो कामी स्वतां पश्यति' या शाकुंतलातील सुभाषितवजा वाक्याचे हेच मर्म. प्रियतमा हि प्रियकराच्या सहवासात जास्त वेळ रहाण्यासाठीं निमित्त शोधू लागतो व 'शोधा म्हणजे मिळेल' यांनुसार ते तिला मिळते हि. विक्रमोर्वशीयम् च्या पहिल्या अंकात पुरूरव्याच्या प्रेमात पडल्यानंतर स्वर्गलोकी परत जाताना उर्वशीच्या गळ्यांतील 'एकावली' हेमकूट पर्वताच्या शिखरावरील झुडपांत अडकते व त्यामुळे ती थोडा वेळ रेंगाळते व शाकुंतलाच्या पहिल्या अंकात शेवटी शकुंतलेच्या पायात दर्भाचा कांटा रुततो व तिचे वल्कल कोरांटीच्या झाडाच्या फांदीत अडकते याचे रहस्य हेच नव्हे का ? प्रियतमेच्या दर्शनाने होणारा आनंद व्यक्त करताना कालिदासासारखा कवि 'अये लब्धं नेत्रनिर्वाणम्' असे मोजके परंतु अर्थपूर्ण शब्द वापरतो तर भवभूतीसारखा कवि हीच कल्पना सुंदर शब्दांत स्पष्ट करतो. मालती माधवाकडे पहात असताना माधवाने केलेले वर्णन सूचक नसले तरी सुंदर आहे हे मान्य च करावे लागेल. माधव म्हणतो :-

अविरलमिव दाम्ना पौण्डरीकेण नध्दः
स्नपित इव च दुग्धस्त्रोतसा निर्झरेण ।
कवलित इव कृत्स्नश्चक्षुषा स्फारितेन
प्रसभममृतमेघेनेव सान्द्रेण सिक्तः ।।

डोळे भरून माझ्याकडे पहात असल्यामुळे ही मला जणुं काही शुभ्र कमळांच्या माळेन बांधून टाकीत आहे किंवा सतत दुग्धवर्षावाने न्हाऊ घालत आहे किंवा अमृतमेघाच्या आविरत प्रवाहाने जणु काही सिंचन करीत आहे असे वाटते. भवभूतीच्या या वर्णनातली भावनेची आर्द्रता खरोखर प्रशंसनीय आहे हे कोण नाकबूल करू शकेल ?

प्रियकराला लिहिलेल्या पत्रांत आपले हृदय च जणु ओतणारी महाकवि बाणभट्टाची कादंबरी ही तर भावार्द्र नायिकांमध्ये अग्रगण्य म्हणून शोभून दिसेल. 'स्वयं साहसं संदिशंती बाला जिह्वेमि किं वा संदिशामि' असे म्हणत म्हणत तिने जे लिहिले ते प्रेमिकांची मीलनोत्सुकता व्यक्त करणाऱ्या नर्म शृङ्गाराचे लेणे च ठरावे या योग्यतेचे आहे. कादंबरी म्हणते :- अतिप्रियोऽसि इति पौनरुक्त्यम् । ......... त्वया विना न जीवामि इति अनुभवविरोधः । अवश्यमागन्तव्यम् इति सौभाग्यगर्वः । स्वयमागच्छामि इति स्त्रीचापलम् ।

शृङ्गाराच्या साम्राज्यात नायकनायिकांच्या हस्तस्पर्शाची, चुम्बनालिङ्गनांचीच मुक्तहस्ताने खैरात करणाऱ्या व त्या वर्णनातच रंगून जाणाऱ्या लेखकांची तथाकथित साहित्यात मुळीच वाण नाही, किंबहुना अशी आधुनिक वर्णने म्हणजेच खरा शृङ्गार उत्तान असे मानणाऱ्यांचा पंथ वाढत आहे असे म्हणण्यास हरकत नाही. संस्कृत साहित्यिकांनी याबाबतीत फारच संयम पाळलेला आहे. मालविकाग्निमित्रांतील -

'हस्तं कम्पवती रूणाद्धि रशनाव्यापारलोलाङ्गुलिं'

यासारख्या श्लोकांतील शृङ्गार उत्तान आहे पण भडक नाही, 'ज्ञातास्वादो विवृजघनां को विहातुं समर्थः' या मेघदूतांतल्या ओळीत समागमाचे सुख भोगलेल्या व्यक्तीचा अनुभव धीटपणाने ग्रथित झालेला आहे हे हि खरे परंतु सामान्यपणे -

'आसीद्वरः कण्टकितप्रकोष्ठः स्विन्नाङ्गुलिः संववृते कुमारी' या अनुभवामुळेच 'मदनाने आपला प्रभाव दोघांवर हि सारख्याच प्रमाणांत गाजवला' असे वर्णन करून शृङ्गार सूचित करण्याकडेच कालिदासाची प्रवृत्ति दिसून येते. भवभूति मात्र काही ठिकाणी संकल्पाने निर्मित प्रियसमागमामुळे स्त्रीला जो आनंद होतो त्याचे वर्णन करताना तो आपल्या सूक्ष्म निरीक्षणशक्तीचा प्रत्यय आणून देतो. उदाहरणार्थ -

नीवीबन्धोच्छ्वसनमधरस्पन्दनं दोर्विषादः
स्वेदश्चक्षुर्मसृणमधुराकेकरस्निग्धमुग्धकम् ।
गात्रस्तम्भः स्तनमुकुलयोरुत्प्रबंधः प्रकम्पो
गण्डाभोगे पुलकपटलं मूर्च्छनां चेतनां च ।।

या मालतीमाधवांतल्या श्लोकांतील नीवीची शिथिलता, अधरकंप, बाहूंची ग्लानी वगैरे लक्षणे सूक्ष्म निरीक्षणाची द्योतक आहेत. परंतु हा श्लोक कामन्दकीसारख्या संन्यासिनीच्या तोंडी आल्यामुळे त्यांतला लालसेचा भाग बोथट होऊन कौतुकाच्या अंशाला च प्राधान्य मिळते हे विसरून चालणार नाही. ही च

कामंदकी मालतीला आपल्या जवळ बसवून तिच्याबद्दलच्या प्रीतीमुळेच माधवाची कशी अवस्था झालेली आहे त्याचे हि मनोज्ञ वर्णन करते. ती म्हणते -

'तो नुकत्याच मोहोरलेल्या आणि कोकिलाच्या शब्दाने युक्त असलेल्या आम्रवृक्षाकडे टक लावून बसतो; बकुलपुष्पांनी सुवासित झालेल्या वाऱ्याच्या मार्गात उभा राहतो व आपले संतप्त शरीर जळून जाऊन मृत्यू प्राप्त व्हावा या उद्देशाने त्यावर फक्त कमलपत्रांचे आवरण घालून चंद्रकिरणांचेच सतत सेवन करीत राहतो.'

प्रियमतेचा अनुनय करताना प्रियकरांच्या भाषेतला गोडवा सुप्रसिद्ध संस्कृत कवीनी अगदी साकार करून टाकलेला आहे. अशा प्रसंगी प्रियकराने स्वतःला प्रियमतेचा 'ननु तव साक्षादयमहमन्यसाधारणो दासः' (मालविकाग्निमित्र ४.१०) म्हणावे किंवा शीण घालवणाऱ्या कमलपत्रांच्या शीतल पंखांनी तुला गार वारा घालू ? की हे 'लावण्यलतिके,' तुझे कमळाप्रमाणे लालसर असलेले पाय मांडीवर ठेवनू ते चुरूं, म्हणजे तुला बरे वाटेल' (शाकुंतल ३.१९) अशा गोड शब्दांत तिला विचारावे हे स्वाभाविक च आहे. मालतीमाधवात आकस्मिकपणामुळे आनंदित परंतु काहीशा बावरलेल्या मदयन्तिकेला उद्देशून मकरन्दाचे -

रम्भोरू संहर भयं क्षमते विसोढु -
मुत्कम्पित स्तनभरस्य न मध्यभागः ।
इत्यं त्वयैव कथितप्रणयप्रसादः
संकल्पनिर्वृतिषु संस्तुत एष दासः ।

हे उद्‌गार या विनवणीच्या मधुर स्वरांशी मिळतेजुळते आहेत.

अनुनयांत यशस्वी झाल्यानंतर व प्रेमाला तितक्याच प्रमाणात प्रतिसाद मिळाल्यानंतर 'I kissed her wild wild eyes with kisses four' असे एका आंग्ल कवीने निःसंकोचपणाने वर्णन केले तर नाटकाच्या मर्यादा लक्षात घेऊन शाकुंतलात कालिदासाने दुष्यंताच्या या बाबतीतल्या अतृप्ततेचे वर्णन करताना -

मुहुरङ्गुलिसंवृताधरोष्ठं
प्रतिषेधाक्षरविक्लवाभिरामम् ।
मुखमंसविवर्ति पक्ष्मलाक्ष्याः
कथमप्युन्नमितं न चुम्बितं तु ॥

या श्लोकात रंगविलेले शकुंतलेचे चित्र हि विलोभनीय वाटल्यावाचून रहाणार नाही. याच्या हि पुढे जाऊन प्रेमिकांच्या मीलनांत संपूर्ण समर्पणाच्या भावनेने

एकरूप झाल्यामुळे मिळणाऱ्या आनंदाचे मिश्रण जयदेवाने गीतगोविंदात आपल्या 'कोमलकान्तपदाबली' च्या साहाय्याने अमर करून टाकलेले आहे. शृङ्गार हा खरोखर जीवनाचा एक आवश्यक भाग असेल तर त्याची परिणती जीवन संपन्न करण्यात आली पाहिजे व हे व्हावयाचे असेल तर शरीराबरोबर मने हि एकरूप झाली पाहिजेत. असे होऊ शकले तरच भवभूतीने वर्णन केलेली -

'अद्वैत सुखदुःखयोरनुगुणं सर्वास्ववस्थासु यत्' ही स्थिती प्राप्त होते,

किमपि किमपि मंद मंदमासत्तियोगा-
दविरविलतकपोलं जल्पतोरक्रमेण ।
अशिथिलपरिरम्भव्यापृतैकैदोष्णो -
रविदितगतयामा रात्रिरेव व्यंरंसीत् ।।

या कवितेतल्या मनोज्ञ शृङ्गाराचा आस्वाद घेता येतो व त्या कवीच्या च शद्बांत -

'भद्रं तस्य सुमानुषस्य कथमप्येकं हि तत्प्राप्यते' असे म्हटल्यावाचून राहवत नाही.

संयोगावस्थेतल शृङ्गाराच्या उपर्युक्त चित्रणाप्रमाणेच संस्कृत कवीनी वियोगावस्थेतील शृङ्गार कौशल्याने व संयमाने रंगवलेला आहे. प्रियतमेच्या वियोगाने व्यथित झालेल्या प्रियकराला जगांतील रमणीय वस्तूंचा तिरस्कार वाटू लागतो, त्याला आपल्या नेहमीच्या कर्तव्याचे तितकेसे भान रहात नाही, शान्त झोप हि लागू शकत नाही. त्यामुळे स्वप्नात भेट होणे हि अशक्य होऊन बसते. सहाजिकच त्याच्या चेहऱ्यावर एक तऱ्हेची खिन्नता पसरलेली आहे असे सूक्ष्मपणाने पहाणाऱ्यांच्या लक्षात येते वगैरे वर्णने थोडी फार सांकेतिक आहेत हे खरे ? परंतु या संकेतांत सत्याचा अंश मुळीच नाही असे कसे म्हणता येईल ? शिवाय या संकेतांच्या चौकटीत हि कलापूर्ण चित्रणामुळे प्राण ओतणारे कविकुलगुरू कालिदासांसारखे कवि संस्कृत सारस्वताला लाभले होते च ना ? शापजन्य विस्मृतीमुळे भर दरबारात शकुंतलेच्या चारित्र्याबद्दल अप्रत्यक्षपणे शंका व्यक्त करून तिचा त्याग करणाऱ्या दुष्यंताला ज्यावेळी तिच्या बोटातून खरोखरच गळून पडलेली अंगठी मिळते व आपण केलेल्या अन्यायाची त्याला जाणीव होते त्यावेळी 'मुहूर्तं प्रकृतिगम्भीरोऽपि पर्यश्रुनयनः आसीत्' अशी त्याची अवस्था झाली व त्याचा परिणाम -

रम्यं द्वेष्टि पुरा प्रकृतिभिर्न प्रत्यहं सेव्यते
शय्याप्रान्तविवर्तनै विंगमयत्युन्निद्र एव क्षपाः

असा झाल्यामुळे तो 'चिन्ताजागरणप्रताम्रनयनः' व 'श्वासापरक्ताधरः' या

स्वरूपांत सेवकांना दिसू लागला असे म्हणून वस्तुतः कृश झालेला असून हि 'तेजोगुणादात्मनः' 'संस्कारोल्लिखितो महामणिरिव' म्हणजे पैलू पाडण्यासाठी घासलेल्या मौल्यवान् रत्नाप्रमाणे 'क्षीणोऽपि नालक्ष्यते' असे दुष्यंताचे वर्णन करण्यांतली कलात्मकता वाखाणण्यासारखी च आहे. शाकुंतलाचा सहावा अंक म्हणजे विप्रलम्भशृङ्गाराच्या संयमपूर्ण म्हणूनच कलात्मक परिपोषाचे चांगले उदाहरण आहे यात शंका नाही. रामायणांत वाल्मीकी सीताहरणानंतर शोकाने रामाची जी अनुकंपनीय अवस्था झाली तिचे वर्णन करताना राम 'करिकेसरिकीरकेकि हरिणां' नाहि तिच्याबद्दलची माहिती विचारीत अरण्यात हिंडत होता असे रंगवलेले आहे. याचाच अधिक कलात्मक आविष्कार कालिदासाच्या विक्रमोर्वशीयातील चौथ्या अंकांतल्या पुरूरव्याच्या शोकांत आढळतो. उर्वशीचे रूपांतर आकस्मिकपणे लतेत झाल्यामुळे पुरूरवा दुःखाने वेडा होऊन जातो व निसर्गात सगळीकडे त्याला उर्वशीचीच प्रतिमा दिसते. नदीचे तरङ्ग त्याला तिच्या भुवयांप्रमाणे, क्षुब्ध झालेली पक्ष्यांची पंक्ती तिच्या कमरपट्याप्रमाणे व नदीच्या पाण्यावरील फेस हा रंगाने शिथिल झालेल्या उर्वशीच्या वस्त्राप्रमाणे भासतो व ---

यथाविद्धं यान्ति स्खलितमभिसंधाय बहुशो
नदीभावेनेयं ध्रुवमसहना सा परिणता।

ही त्याची कल्पना अत्यंत हृद्य आहे हे नाकबूल करता येणार नाही. रघुवंशाच्या तेराव्या सर्गात रावणावर विजय मिळवून राम सीतेसह विमानाने अयोध्येला येत असताना वाटेत दण्डकारण्य व पंचवटी ही ठिकाणे दाखवतो व या ठिकाणी तुझ्या वियोगामुळे माझी कशी अवस्था झाली होती याचे जे मनोज्ञ चित्रण करतो त्यांतहि विप्रलम्भ शृङ्गाराचे कलात्मक रूप आढळते. यांत एका ठिकाणी 'तटावरील अशोकलतेला तूंच समजून मी आलिङ्गन देत असताना लक्ष्मणाने अश्रुपूर्ण नेत्रांनी मला सांवरले' अशी काहीशी भावार्द्र कल्पना आलेली आहें. वियोगात विरंगुळा म्हणून कालिदासाचे नायक आपल्या प्रेयसीचे चित्र रेखाटून त्या चित्राकडे पहात बसतात, परंतु त्या प्रसंगी सुद्धा मेघदूतांतील यक्ष 'क्रूरस्तस्मिन्नपि न सहते संगमं नौ कृतान्तः' या शब्दांत तक्रार करताना आढळतो. मेघदूतात विरहिणी यक्षपत्नीचे

आलोके ते निपतति पुरा सा बलिव्याकुला वा
मत्सादृश्यं विरहतनु वा भावगम्यं लिखन्ती ।
पृच्छन्ती वा मधुरवचनां सारिकां पञ्जरस्थां
कच्चिद्भर्तुः स्मरसि रसिके त्वं हि तस्य प्रियेति ।।

इत्यादि श्लोकांत केलेले चित्रण मोठे भावपूर्ण आहे. शाकुंतलाच्या सातव्या अंकातील 'वसने परिधूसरे वसाना नियमक्षाममुखी धृतैकवेणी' हे विरहिणी शकुंतलेचे चित्र हि कौशल्याने रंगविलेले आहे. सहृदयानंदात दमयंतीच्या वियोगामुळे विव्हळ झालेल्या नळाला सर्वत्र तिचा भास होतो इतकेच नव्हे तर क्षणोक्षणी तिच्या नूपुरांचा आवाज च कानांत घुमत राहतो हे 'इदमिदं तव नूपुरशिजितं सविधे मम जृम्भते' या शब्दांवरून स्पष्ट च होते.

कालिदासारख्या कवीनी केलेल्या विरहवर्णनावरूनच पुढे विरही जनांच्या विरंगुळ्याचे शास्त्र बनले व

वियोगावस्थासु प्रियजनसदृशानुभवनं  
ततश्चित्रं कर्म स्वप्नरूपमये दर्शनमपि ।  
तदङ्स्पृष्टानामुपनतवतां दर्शनमपि -  
प्रतीकारोऽनङ्गव्यथितमनसां कोऽपि गदितः ॥

असे नमूद करून ठेवणारे 'गुणपताके' सारखे ग्रंथ लिहिले गेले व वियोगाच्या दाही अवस्थांचे पृथक्करण केले गेले. 'अमरुशतका'तला शृङ्गार मात्र कमनीय आहे. आठव्या शतकानंतर ही शास्त्रे डोळ्यांपुढे ठेवून संस्कृत काव्ये लिहिली गेल्यामुळे वर्णनात सांकेतिकपणा च जास्त दिसू लागला हे खरे; परंतु या कसोट्या कालिदासादि कवींना हि लावणे म्हणजे त्यांच्यावर अन्याय करण्यासारखे आहे.

तात्पर्य, सुप्रसिद्ध संस्कृत कवींच्या शृङ्गारवर्णनात रतिभावनेचे निःसंकोच चित्रण आहे हे जरी निर्विवाद असले तरी त्यांनी काव्याला आवश्यक असणारा संयम चांगलाच पाळलेला असल्यामुळे त्यांच्या बाबतीत 'जयन्ति ते रससिद्धाः', कवीश्वराः', असेच म्हणणे योग्य ठरेल.

[ वसंत दीपावली अंक १९७१]

# १४. संस्कृत साहित्यांतील वसंततिलका

मनुष्यप्राणी हा मुळांत सहृदय असल्यामुळे तो इतरांच्या सुखदुःखात सहभागी होऊ शकतो व यामुळेच त्याला भावनांची अभिव्यक्ति करणाऱ्या कलांबद्दल सनातन आकर्षण वाटत आलेले आहे. स्थलकालादिकांच्या मर्यादा ओलांडून वाचकाला आगळ्याच आनंदाच्या साम्राज्यात विहार करण्याची संधि देणाऱ्या काव्यकलेबद्दल हि त्याला विशेष ममत्व वाटावे यांत नवल कसले ? परन्तु मनुष्य जसा सहृदय आहे तसाच तो बुद्धिमानहि आहे हे विसरून चालणार नाही. सहाजिकच केवळ अनुभव घेऊन स्वस्थ न बसता तो अनुभवांचा तुलनात्मक अभ्यास करून मुलभूत नियम शोधून काढण्याचा हि प्रयत्न करतो. या प्रयत्नातूनच विविध शास्त्रांचा उगम होतो. वृत्तांचा विचार करणाऱ्या छन्दशास्त्राची व्युत्पत्ती हि अशीच असली पाहिजे. व्यावहारिक दृष्टीने 'गद्यं पद्यमिति प्राहुर्वाङ्मयं द्विविधं बुधाः' हे गंगादासाचे छन्दोमंजरीतील वचन जरी मान्य केले तरी छन्दाचा व पर्यायाने वृत्ताचा संबंध पद्याशीच जास्त जवळचा आहे हे कबूल करावे लागेल. पद्य म्हणजे लयबद्ध अक्षररचना. 'पादेन संयोगात् पद्यम्' या वचनानुसार पद्याचे तुकडे म्हणजे पाद किंवा चरण. यात अर्थपूर्तीपेक्षा नियमित अंतराने येणाऱ्या विरामांना महत्त्व प्राप्त होत असते. अर्थापेक्षा लयीकडे जास्त लक्ष दिल्यामुळे सलगपणे गळ्यावर काही ठराविक ठिकाणी ठराविक वेळ थांबत जे म्हटले जाते व या लयबद्धतेमुळे जे सहज अवगत होते ते पद्य असे म्हणण्यास हरकत नाही. या सगळ्याचा विचार करूनच पद्याची व्याख्या करताना भरताने आपल्या नाट्यशास्त्रांत

नियताक्षरसम्बन्धं छन्दोयतिसमन्वितम् ।
निबद्धं तु पदं ज्ञेयं सतालपतनात्मकम् ॥

असे मार्मिक उद्गार काढलेले आहेत.

संस्कृत वाङमयाकडे सहज दृष्टिक्षेप केला तरी गद्यग्रंथापेक्षा पद्यग्रंथांचा च भरणा जास्त आहे असे आढळून येते. आमचे प्राचीनतम ग्रंथ म्हणजे वेद. हे हि छंदोबद्ध आहेत. यज्ञयुगात ज्या सूक्तांचा उपयोग केला जात असे त्यांतील लयबद्धतेमुळे व सुस्वरपणामुळे या सूक्तांची रोचकता निश्चितपणे वाढत असेल. या दृष्टीने 'चंदयति आल्हादयति इति छंदः' ही छंदस् शब्दाची व्युत्पत्ति उपेक्षणीय म्हणता येणार नाही. वेद ग्रंथाना गति देणाऱ्या छंदांचा वेदाङ्गात अंतर्भाव व्हावा यात आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. 'छंदः पादौ तु वेदस्य' या शिक्षाग्रंथातील पुराणांचे हि प्रसंगोपात् पठण होत असल्यामुळे त्यांची हि रचना छंदात झाली. गद्यापेक्षा पद्य हे पाठांतरास सोयीचे, शिवाय गद्यापेक्षा पद्यात मोजक्या शब्दांत भरपूर अर्थ सूचित करता येतो. या दोन्हीचे पूर्वकाळी बरेच महत्त्व असल्यामुळे

संस्कृतात मन्वादि स्मृती, शास्त्रे व कोश यांची हि रचना निरनिराळ्या छंदातच झाली. थोडक्यात गायनामुळे येणारे माधुर्य, पाठांतराची सुलभता व अर्थसंग्राहकता यांच्या जोरावर छंदांना संस्कृत वाङ्मयात प्राधान्य मिळाले याबद्दल दुमत होण्याचे कारण नाही.

छंदाचा हा जो सार्वत्रिक प्रसार झाला त्याचे निरीक्षण करून बुद्धिमान आर्यांनी त्यासंबंधी काही नियम घालून द्यावे हे स्वाभाविकच नव्हे का ? ह्या नियमांचा समूह म्हणजेच छंदःशास्त्र. या शास्त्राचा म्हणजेच छन्दोविषयक सूत्रांचा प्रणेता पिङ्गल याच्या हि पूर्वी काश्यप, सैतव, रात, माण्डव्य हे छन्दोविवेचक होऊन गेले असे पिङ्गलाच्या सूत्रांवरूनच कळते. पिङ्गलाची छन्दःसूत्रे पाणिनीच्या अष्टाध्यायीप्रमाणे आठ अध्यायांत विभागलेली आहेत. पिङ्गलाने आपल्या या ग्रंथात वैदिक छन्दाबरोबर तनुमध्या या षडक्षरी वृत्तापासून चण्डवृष्टिप्रपात या सत्तावीस अक्षरी दण्डाकापर्यंत कांही लौकिक वृतांचे स्वरूप सांगितले. अक्षरगणांना ज्या पद्याची म्हणजे चतुष्पाद युक्त अक्षररचनेची गणना किंवा मोजणी करता येते ते वृत्त आणि ज्या पद्याची रचना मात्रागणांनी मोजता येते ती जाति. पिङ्गलानेच त्र्यक्षरी गणांना म-य-र-स-त-ज-भ-न-व लघुगुरू अक्षरानांना ल-ग या संज्ञा देऊन टाकल्या, इतकेच नव्हे तर यतिस्थाने सांगण्यासाठी चार पांच यांसारख्या अंकासाठी समुद्र, कामशर सारख्या संज्ञा वापरून वृत्तांची लक्षणे हि सूत्रबद्ध करून टाकली. 'प्राकृत छंदः सूत्र' हा दुसरा ग्रंथ हि या पिङ्गलाच्या नावावर च आहे. यांत प्राकृत भाषेत येणाऱ्या छंदाचे निरूपण केलेले आहे. छंदशास्त्राच्या या आद्य प्रणेत्यांच्या कालासंबंधाने निश्चित विधान जरी करता येत नसले तरी यास्कानंतर च याचा हा ग्रंथ लिहिला गेला हे उघड आहे. पिङ्गलाच्या छंदःसूत्रावर लिहिल्या गेलेल्या वृत्तीत 'हलायुधा' ही वृत्ति सर्वमान्य आहे. भरताच्या नाट्याशास्त्राप्रमाणे गरूडपुराण व अग्निपुराण यांत हि या शास्त्राची त्रोटक चर्चा आहे. नंतरच्या काळात केदारभट्ट, क्षेमेंद्र, गंगादास वगैरे संस्कृत पंडितांबरोबर स्वयंभू व हेमचंद्र आदि जैन पंडितांनी छन्दःशास्त्राच्या विवेचनाला प्रतिष्ठा मिळवून दिलेली आहे.

'वसन्ततिलका' हे प्राचीन काळापासून प्रचलित असलेले समवृत्त आहे. सहाजिकच याचे चारी चरण सारखे म्हणजे चौदा अक्षरांचे असतात. 'उक्ता वसन्ततिलका तभजाजगौगः' या सुप्रसिद्ध व्याख्येनुसार या वृत्तांत त-भ-ज-ज हे चार व्यक्षरी गण असतात व शेवटी दोन गुरू अक्षरे येतात. तगणः ताराप म्हणजे अंत्यलघु, भगण-भास्करा म्हणजे मध्य लघु व जगण जनास म्हणणे मध्यगुरू अशी अक्षरांची योजना या वृत्तात असते. या वृत्तात यति हा आठ अक्षरांवर येतो. उदाहरणार्थ 'साक्षात्प्रियामुपगतामहाय पूर्वं' या शाकुन्तलांतल्या श्लोकात

'साक्षात्प्रियामुपगता' हा पहिला अंश व दुसरा 'मपहाय पूर्वं' असा पडतो. यांत अर्थापेक्षा लयीकडेच जास्त लक्ष दिले आहे हे उघड आहे. या चरणापेक्षा दुसऱ्या चरणाची रचना 'चित्रार्पितां पुनरिमां' व 'बहु मन्यमानः' या सोयीस्कर अंशात विभागली गेल्यामुळे जास्त सुखद वाटते. प्रत्यक्ष म्हणताना हा श्लोक अनुप्रासांच्या समर्पक उपयोगामुळे कानांना सुखद वाटतो. संपूर्ण श्लोक आहे.

साक्षात्प्रियामुपगतामपहाय पूर्वं
चित्रार्पितां पुनरिमां बहु मन्यमानः ।
स्त्रोतोवहां पथि निकामजलामतीत्य
जातः सखे प्रणयवान् मृगतृष्णिकायाम् ।।

या वृत्ताला सिंहोन्नता हे नांव पिङ्गला पूर्वीच्या काश्यपाने उद्धर्षिणी हे नांव, सैतवाने दिलेले होते असे 'सिंहोन्नता काश्यपस्य व उद्धर्षिणीयमुदिता मुनिसैतवेन' या पिङ्गलाच्या च सूत्रावरून स्पष्ट होते. अर्थात ही नांवे कशी पडली हे मात्र सांगता येणे कठिण आहे; अपराजिता, प्रहरणकलिता, चंद्रवर्ता वगैरे आकारांत वृत्तांना युवती मानले तर त्या सर्वांत भूषणविरहित अवस्थेत हि सुबक आकृतीमुळे उठून दिसणारी सिंहाप्रमाणे लहान कंबर असणारी ही सिंहोन्नता जास्त खुलून दिसते अशी कल्पना छंदोमंजरीचे कर्ते मराठी कवि रामजोशी यांनी केलेली आहे. रामजोशी म्हणतात :-

सिंहोन्नता वदिली ती मुनि काश्यपांनी
ताटंक भूषण जिला न जरी तरी ती
पाहूनिया च हरिच्या हि मना हरी ची ।।
जीचा नितंबउर थोर कृशस्व मानी
सिंहोन्नता दिसतसे युवतीमाजी ।

सैतवाने या वृत्ताला उद्धर्षिणी हे नांव देण्यास कारण सांगताना रामजोशी यांनी हिची तुलना कृष्णाशी क्रीडा करण्यात निमग्न होऊन हर्षनिर्भर होणाऱ्या उद्धर्षिणी राधेशी केलेली आहे. वृत्तविवेचनांत हि कल्पकता कशी असू शकते याचे प्रत्यंतर रामजोशींच्या ज्या काव्यपंक्तीत मिळते त्या हि मुळात वाचण्यासारख्या आहेत :-

उद्धर्षिणी कथिलि ती मुनि सैतवांनी ।
ती त्या विभूसी भजता रजनी पुरेना ।
कामाग्निची लहरि थोर अली सरेना ।
ऐसे व्रजीं सुख दुजीस न हे हि मानी ।
उद्धर्षिणी म्हणति देव तिला विमानी ।
शृंगार सर्व करुनी वृषभानु कन्या ।

सौंदर्यासद्गुणयुता युवतींत धन्या ।।
कृष्णार्थ जाउनि बरी करी कुंजवास ।
उद्धर्षिणी दिसली त्या मुनि सैतवास ।।

या सर्व ओळी या वृत्तातच रचण्यामध्ये रामजोशींचे कौशल्य दिसून येते.

वसंततिलका हे वृत्त स्त्रग्धरा, शार्दूलविक्रीडित वगैरे वृत्तांच्या तुलनेने लहान असल्यामुळे शृङ्गार किंवा करुण रसांच्या अभिव्यक्तीला पोषक ठरते, हे ओळखून कालिदास, भवभूति वगैरे रससिद्ध कवींनी त्या रसांच्या परिपोषासाठी या वृत्ताचा मोठा समर्पक वापर केलेला आहे. शांकुतलाच्या पहिल्या अंकात शकुंतला जरी एक शब्द हि उच्चारीत नव्हती तरी माझंच बोलण कान टवकारून ऐकत होती. अन् ती जरी माझ्यासमोर उभं रहायच टाळत होती तरी तिची नजर मला सोडून दुसरीकडे स्थिर होत च नव्हती हे ओळखून दुष्यंत जे म्हणतो त्यासाठी या वृत्ताशिवाय दुसरे वृत्त चालले नसते. म्हणूनच :-

वाचं न मिश्रयति यद्यपि मद्वचोभिः
कर्ण ददात्यभिमुखं मयि भाषमाणे ।
कामं न तिष्ठति मदाननसंमुखीयं
भूयिष्ठमन्यविषया न तु दृष्टिरस्याः ।।

ह्या श्लोकाचे वृत्त वसन्ततिलका.

शृङ्गाराप्रमाणे करुण रसाचे सौंदर्य खुलवण्यात हि वसन्ततिलका 'युवतीसमाजी सिंहोन्नता' कशी हे भवभूतीने दाखवून दिलेले आहे. रामाने गोड बोलून सीतेला फसविले, तिचा त्याग केला हे सूचित करून रामाचा सौम्य परन्तु तीव्र अधिक्षेप करताना वासन्तीच्या तोंडी या वृत्तातला श्लोक घालून भवभूतीने खरोखर बहार केलेली आहे.

त्वं जीवितं त्वमसि मे हृदयं द्वितीयं
त्वं कौमुदी नयनयोरमृतं त्वमङ्गे ।
इत्यादिभिः प्रियशतैरनुरूध्य मुग्धां
तामेव शान्तमथवा किमिहोत्तरेण ।।

भवभूतीचा सुप्रसिद्ध श्लोक,

'एको रसः करूण एव निमित्तभेदाद् -
भिन्नः पृथक् पृथगिवाश्रयते विवर्तान्'

हा हि वसन्ततिलका वृत्तात च आहे, हे ह्या दृष्टीने अन्वर्थक.

कोणत्या प्रसंगी कोणत्या वृत्ताची रचना करावी याविषयी आचार्य क्षेमेन्द्रांनी आपल्या सुवृत्ततिलकांत मार्मिक विचार प्रकट केलेले आहेत. त्यांच्या मताने वीर

व रौद्र रस यांच्या संकरात वसंततिलका वृत्त शोभून दिसते. वीररसांचा जणु काही पुतळा असा वाटणारा लव संपूर्ण पृथ्वीला वांकवीत च चालतो ही कल्पना व्यक्त करताना भवभूतीने

दृष्टिस्तृणीकृतजगत्रयसत्त्वसारा
धीरोध्दता नमयतीव गतिर्धरित्रीम् ।
कौमारकेऽपि गिरिवद्गुरूतां दधानो
वीरो रसः कियमेत्युत दर्प एषः ।

या श्लोकांत वसंततिलकेचा वापर मोठ्या कौशल्याने केलेला आहे. शृङ्गाराच्या स्मृतीने अधिकच तीव्र झालेल्या कारुण्याला पोषक वातावरण हे च उत्तरामचरिताचे वैशिष्ट्य असल्यामुळे या एका नाटकांत भवभूतीने १२ ते १४ श्लोक या वृत्तात लिहून एका दृष्टीने या वृत्तावर कारुण्याचा ठसा च उठवून टाकलेला आहे असे म्हणण्यास हरकत नाही.

तात्पर्य, वसंततिलका हे वृत्त शृंगार व करुण या रसांना उठाव आणून देणारे असल्यामुळे कवींचे अत्यंत आवडते आहे. सहाजिकच काव्याची विवेचना करणाऱ्या पंडितांना व काव्याचा रसिकतेने आस्वाद घेणाऱ्या व्यक्तींना या वृत्ताचा विसर पडणे शक्य नाही. आचार्य पिङ्गलापासून ते रामजोशीसारख्या रसिक व चतुर कवीपर्यंत सर्वांनीच या वृत्ताचे वैशिष्ट्य मोकळेपणाने मान्य केलेले आहे. तेव्हा

तारेऽभा समजतां व्रजराज रानी
येता असा निरखिला गगनी सुरांनी ।
टाकी किरीटकटकांगदहार राया
घेतो वसंततिलकास शिरी धराया ।।

हे रामजोशींचे शब्द अर्थपूर्ण नाहीत असे कोण म्हणू शकेल ?

[ 'वसन्त' १९७१ ]

# १५. भाष्यकार श्रीशंकराचार्यांची शैली

प्रस्थानत्रयीवर, म्हणजेच उपनिषदे, गीता व ब्रह्मसूत्रे यांवर भव्य भाष्य लिहिणाऱ्या सर्व आचार्यांमध्ये श्रीशंकराचार्य कालानुक्रमाने पहिले आहेत. एवढेच नव्हे तर त्यांच्या मताचा प्रसार व प्रभाव हि इतर आचार्यांपेक्षा सगळ्यांत जास्त आहे हे कोणी हि मान्य करील. आज 'वेदान्त' हा शब्द उच्चारल्याबरोबर प्राधान्याने शंकराचार्यांच्या केवलाद्वैत सिद्धांताचा किंवा मायावादाचा बोध होतो; विशिष्टाद्वैत किंवा शुद्धाद्वैत, द्वैताद्वैत किंवा द्वैत या सिद्धांतांकडे एकदम माणसाचे मन वळत नाही. श्रीशंकराचार्यांचा सिद्धांत हा तर्कदृष्ट्या निर्दोष आहे व उपनिषदे काय किंवा ब्रह्मसूत्रे काय यांच्या परंपरेशी जुळणारा आहे हे जरी मान्य केले तरी श्रीशंकराचार्यांनी ज्या भाषेत किंवा ज्या शैलीत आपला सिद्धांत मांडला ती हि अत्यंत प्रभावी व परिणामकारक होती ही वस्तुस्थिती हि याला कारणीभूत झाली असल्यास नवल नाही. भाषा म्हणजे भावाभिव्यक्तीचे एक साधन हे खरे, परंतु या भाषेच्या सामर्थ्यावर भावाभिव्यक्तीचे साफल्य अवलंबून असते हे हि तितकेच खरे.

या दृष्टीने पाहिले तर श्रीशंकराचार्यांची भाषाशैली हा संस्कृत गद्याचा अलंकार आहे असे म्हणण्यास मुळीच प्रत्यवाय नाही. वैचारिक संस्कृत गद्याचा एक आदर्श त्यांनी घालून दिला. गहन विषयसुद्धा सोप्या व अन्वर्थक भाषेत मांडण्याचे त्यांचे सामर्थ्य वादातीत आहे. म्हणूनच त्यांच्या शैलीच्या काही वैशिष्ट्यांची तोंडओळख करून घेणे मोठे मनोरंजक आहे.

आचार्यांच्या भाषेचा पहिला गुण म्हणजे प्रसाद. लहान लहान व सुटसुटीत वाक्यांमध्ये विचार ग्रथित करण्याची कला त्यांना उत्तम साधलेली होती. ब्रह्मसूत्रांवरील दुसऱ्या अध्यायाच्या पहिल्या पादातील पहिल्याच सूत्रावर भाष्य लिहीत असताना, कपिल आदि सिद्धांना देखील श्रुतीच्या साहाय्याशिवाय अतींद्रिय अर्थाचे आकलन होणे शक्य नाही हे सांगताना आचार्य लिहितात :-

" शक्यं कपिलादीनां सिद्धानाप्रतिहतज्ञानत्वादितिचेत् । न । सिद्धेरपि सापेक्षत्वात् । धर्मानुष्ठानापेक्षा हि सिद्धिः । स च धर्मश्चोदनालक्षणः । ततश्च पूर्वसिद्धायाश्चोदनाया अर्थो न पश्चिमसिद्धपुरुषवचनवशेनातिशङ्कितुं शक्यते ।" या वाक्यात तर्कदृष्ट्या सुसंगतपणा आहे इतकेच नव्हे, तर प्रत्येक वाक्य म्हणजे विचाराचा एकेक टप्पा आहे. ब्रह्मसूत्रावरील भाष्यांत अशा प्रकारची वाक्ये तर जागोजाग विखुरलेली आहेत. कांही कांही वाक्ये तर वर्ण्यविषयाची परिभाषा म्हणून केव्हा हि उद्‌धृत करण्यास हरकत नाही. उदाहरणार्थ "तच्च सम्यग्ज्ञानमेकरूपम्, वस्तुतन्त्रत्वात् । एकरूपेण ह्यवस्थितो योऽर्थः स परमार्थः"

या दोन वाक्यात 'सम्यक् ज्ञान' व 'परमार्थ', म्हणजेच अबाधित सत्य यांचे स्वरूप स्पष्टपणे व्यक्त झालेले आहे.

कांही वेळा संपूर्ण विचार एका वाक्यांत व्यक्त करण्याच्या उद्देशाने वाक्ये जरी थोडीशी मोठी झाली तरी त्यामध्ये विस्कळीतपणा मात्र मुळीच आलेला नाही हे लक्षांत ठेवण्यासारखे आहे. वेद हे नित्य व अनुभवमूलक असल्यामुळे त्यांनी व्यक्त केलेल्या अर्थात व्यवस्थितपणा व सुसंगतपणा दिसून येतो. साहजिकच त्यांतून उत्पन्न होणाऱ्या ज्ञानाला स्वभावतःच अस्थिर असणाऱ्या निव्वळ तर्काच्या साहाय्याने बाध आणणे हे भूत, वर्तमान व भविष्य या तीन्ही काळात वावरणाऱ्या तार्किकांना कधी हि शक्य होणार नाही हे ठासून सांगताना आचार्यांनी लिहिलेले - "वेदस्य तु नित्यत्वे विज्ञानोत्पत्तिहेतुत्वे च सति व्यवस्थितार्थविषयत्वोपपत्तेस्तज्जनितस्य ज्ञानस्य सम्यक्त्वमतीतानागतवर्तमानैः सर्वैरपि तार्किकैरपह्नोतुमशक्यम्" हे वाक्य याचे उत्तम उदाहरण आहे.

तत्त्वज्ञानासारखा गहन व काही-सा किचकट विषय सोपा व सहज आकलनीय वाटावा या हेतूने शंकराचार्यांनी व्यावहारिक दृष्टांतांचा मोठा औचित्यपूर्ण उपयोग करून घेतलेला आहे. त्यांनी निवडलेल्या उपमा व दृष्टांत अत्यंत समर्पक असल्यामुळे सामान्य वाचकालाहि त्यांचा मुद्दा एकदम पटतो. ब्रह्माच्या बाबतीत 'एकत्व' व 'नानात्वमं' या दोन्ही गोष्टी सहज संभवतात हे पटविण्यासाठी आचार्य दृष्टांतांची मालिका वाचकांपुढे लीलेने उभी करताना म्हणतात :- "यथा वृक्ष इत्येकत्वं शाखा इति नानात्म्, यथा च समुद्रात्मनैकत्वं फेनतरङ्गाद्यात्मना नानात्वम्, यथा च मृदात्मनैकत्वं घटशरावाद्यात्मना नानात्वम्" (२-१-१४), वृक्ष-शाखा, समुद्र-फेनतरंग वगैरे वस्तू रोजच्या व्यवहारात प्रत्येकाच्या अनुभवाला येणाऱ्या आहेत; साहजिकच शंकेला जागा रहात नाही. परमेश्वराच्या बाबतीत बाह्य प्रयोजनाशिवाय सुद्धा प्रवृत्ति संभवते हे सिद्ध करण्यासाठी आचार्यांनी एके ठिकाणी पूर्णकाम (आप्तैषण) राजा किंवा त्याचा पूर्णकाम अमात्य यांचे समर्पक उदाहरण घेतलेले आहे. तसेच अज्ञानाने कल्पिलेल्या भेदांमुळे निरवयव ब्रह्म अवयवयुक्त होऊ शकत नाही हे सिद्ध करण्यासाठी आचार्यांनी तिमिर नांवाच्या रोगाने दूषित झालेल्या डोळ्यांनी पाहणाऱ्याला अनेक चंद्र दिसले तरी मुळात चंद्र एकच असतो हा कुणाला हि पटण्यासारखा दृष्टांत दिलेला आहे न हि तिमिरोपहतनयनेनानेक इव चन्द्रमा दृश्यमानोऽनेक एव भवति । २।१।२७. मुंडकोपनिषदांत ब्रह्माच्या आदेशानुसार भ्रमण करीत राहणाऱ्या सूर्यचंद्रादीना अलातचक्राची उपमा देण्यास आचार्य विसरत नाहीत. याच उपनिषदातील भाष्यांत एके ठिकाणी, बाह्य विषयांनी दूषित झालेल्या ज्ञानाला मळ साचलेल्या आरशाची समर्पक उपमा देऊन त्यात नेहमी च सन्निहित असलेल्या आत्मतत्त्वाचे

प्रतिबिंब पडण्याची शक्यता नाही ही गोष्ट पटवून दिलेली आहे. ''तन्तुवायस्यापि तन्तूनतन्त्वानस्यापि तन्त्वानस्येव वस्त्रलाभः'' अशी अनुप्रासयुक्त शब्दयोजना हि प्रसंगविशेषी आढळते. वस्तुतः शंकराचार्यांच्या भाष्यांतील विविध उपमा दृष्टांत हा एक अध्ययनाचा स्वतंत्र विषय होण्यासारखा आहे. त्यांच्या भाषाप्रभुत्वाचे,या विषयावरील अधिकाराचे हे हि एक उत्तम गमक नव्हे काय ? तत्त्वतः हे काव्यांतील उपमा दि अलंकार नव्हेत हे माझे मित्र डॉ. लेले यांनी दाखवून दिले हे मान्य करावे लागेल.

ब्रह्मसूत्रावरील दुसऱ्या अध्यायाच्या दुसऱ्या पादात म्हणजे तर्कपादात तर श्रीशंकराचार्यांच्या भाषाशैलीचे काही गुण विशेष प्रकट झालेले आहेत. सांख्य, वैशेषिक, बौद्ध वगैरे प्रतिस्पर्ध्यांच्या विचारसरणीचे केवळ तर्काच्या आधाराने खंडन करणे हा या पादाचा विषय. यात पूर्वपक्ष म्हणून पहिल्याप्रथम आचार्यांनी प्रतिस्पर्ध्यांच्या मताचे मंडन इतके बहारीने केलेले आहे की, तेवढाच भाग वाचणाऱ्या व्यक्तीला शंकराचार्य हे त्या त्या मतांचे पुरस्कर्ते च वाटतील. पण नंतर 'नेति ब्रूमः' म्हणून स्वतः आचार्य आपण च मांडलेली विचार-सरणी सूक्ष्म दोष दाखवून देऊन हळूहळू एकेक मुद्दा खोडू लागतात. त्यावेळेस चिकित्सक वाचकाला सुद्धा मोठी मौज वाटते व इतकी साधी गोष्ट आपल्या लक्षांत कशी आली नाही याबद्दल आश्चर्य हि वाटू लागते. शंकराचार्यांच्या च भाषेत सांगावयाचे झाले तर, जो जो पूर्वपक्षाची विचारसरणी तर्काच्या निकषावर घासून पाहावी तो तो वाळूत बांधलेल्या विहीरीप्रमाणे ती भुसभुशीत व कोसळणारी असल्याचे प्रत्ययाला येते (सिकताकूपवद्विदीर्यते).

या तर्कपादात, तर्कावर किंवा विवादपटुत्वावर जोर असल्यामुळे शंकराचार्यांनी उपरोध, उपहास वगैरे शस्त्रांचा हि भरपूर उपयोग करून प्रतिस्पर्ध्यांना अगदी जर्जर केलेले आहे. विज्ञान हे प्रदीपाप्रमाणे स्वतःच अनुभव-विषय होते असे मानणाऱ्या विज्ञानवादी बौद्धांचा उपहास करताना आचार्य लिहितात :- ''अत्यन्तविरूद्धां स्वात्मनि क्रियामभ्युपगच्छस्यग्निरात्मानं दहतीति वत् ...... अहो पाण्डित्यं महद्दर्शितम्'' म्हणजे अग्नि स्वतःलाच जाळतो ही सर्वस्वी अनुभवविरूद्ध गोष्ट तुम्हाला मान्य आहे आणि आत्म्याशिवाय वेगळे अस्तित्व असलेल्या ज्ञानामुळे जगांतील बाह्य वस्तूंची प्रचीती येते ही अनुभवाशी सुसंगत अशी गोष्ट तुम्ही अमान्य करता तेव्हा तुमचे पांडित्य काय वर्णावे ? कधी कधी प्रत्यही अनुभवाला येणाऱ्या बाह्य वस्तूंचे अस्तित्व अमान्य करणारा बौद्धमतानुयायी प्रतिस्पर्धी विवादांत आपल्यासमोर उभा आहे अशी कल्पना करून आचार्य सरळ सांगतात ''बाढमेवं ब्रवीषि निरंकुशत्वात्ते तुण्डस्य । न तु युक्त्युपेतं ब्रवीषि ।'' (म्हणतोच आहेस तर म्हण बाबा ! तुझ्या तोंडावर हात

कोण ठेवणार ? परंतु जे बोलतोस ते तर्कशुद्ध मात्र नाही.) प्रसंगविशेषी आयार्चांचा उपरोध मोठ्या संयत भाषेत हि व्यक्त झालेला आहे. स्वप्नाप्रमाणे जागृत अवस्थेतले अनुभव हि खोटे आहेत असे मानणाऱ्या प्रतिस्पर्ध्याला दोन्ही अवस्थांतील अंतर दाखवून देऊन ''स्वतःला शहाणे समजणाऱ्यांनी स्वानुभवाचा अपलाप करणे चांगले नाही'' 'न च स्वानुभवापलापः प्राज्ञमानिभिर्युक्तः कर्तुम् ।' २।२।२९ अशी समज देण्यास ते कमी करीत नाहीत. वैशेषिकाने 'अणु, आत्मा व मन यांचे प्रदेश कल्पनेने मानतो' असे म्हटल्याबरोबर अविद्यमान वस्तूंची कल्पना च करावयाची तर मग ज्याला जे आवडेल त्याची कल्पना करावी (तस्माद्यस्मै यस्मै यद्यद्रोचते तत्तत् सिद्ध्येत्) म्हणजे ती गोष्ट सिद्ध झाली असे परखड उत्तर देऊन शंकराचार्य दोन परस्परविरोधी परंतु गमतीदार उदाहरणे देऊन प्रतिस्पर्ध्याला कसे अगदी निरूत्तर करून टाकतात पहा :- प्राणिनां दुःखबहुलः संसारः मा भूदिति कल्पयेत्, कस्तयोर्निवारकः स्यात् ।'' 'बुद्धीला पटत नाही' या अर्थाने ''न बुद्धिसंतानमोरहति'' सारखे आचार्यांचे शब्दप्रयोग संस्कृत भाषेला गौरव प्राप्त करून देतात. 'अन्धपंगुन्याय' 'अन्धपरंपरान्याय', 'स्थूणानिखननन्याय', वगैरे व्यावहारिक म्हणींचा योग्य ठिकाणी वापर करून आयार्चांनी ब्रह्मसूत्रावरील आपल्या भाष्याला सामान्य वाचकाच्या दृष्टीने मोठी आकर्षकता आणलेली आहे.

तात्पर्य, प्रसाद व ओज या काव्यगुणांबरोबर दैनिक व्यवहारांतील समर्पक दृष्टांत व विवादाला आवश्यक असणारी उपरोध, उपहास वगैरे साधने यांचा भरपूर उपयोग करून घेऊन श्रीशंकराचार्यांनी प्रस्थानत्रयीवर लिहिलेल्या आपल्या भाष्यांना एक वेगळेच सामर्थ्य प्राप्त करून दिले, संस्कृतमधील वैचारिक गद्याला हि प्रतिष्ठा मिळवून दिली. या दृष्टीने संस्कृत सारस्वतांत एक शैलीदार लेखक म्हणून त्यांचा गौरव होतो तो सर्वथा उचित च आहे.

[ 'जीवन-विकास' जानेवारी १९६४ ]

# १६. श्रीवल्लभचार्यांचा पुष्टिमार्ग व त्याचा हिन्दी कवींवरील प्रभाव

शुद्धाद्वैत वेदान्तमताचे प्रवर्तक श्रीवल्लभाचार्य (सन १४७३ ते १५३०) यांनी शंकराचार्यप्रणीत मायावादाचा स्वीकार न करता 'कार्यकारणरूपं हि शुद्धं ब्रह्म न मायिकम्' या सिद्धांताचे जोरदार मंडन केले. त्यांच्या दृष्टीने श्रीकृष्ण म्हणजेच सच्चिदानंद परब्रह्म. जीव म्हणजे ब्रह्म च परंतु त्यात आनंद अंश तिरोहित असल्यामुळे तो हीन-दीन व दुःखी दिसतो. कार्यकारणरूप जग हे देखील ब्रह्मच परंतु त्यात चित् व आनंद हे दोन्ही अंश तिरोहित असून केवळ 'सत्' रूपी अंशाचा च आविर्भाव असतो. सच्चिदानंदरूप परब्रह्माची प्राप्ती ज्ञानाने होत नसून भक्तीने च होते व यात देखील भगवंताच्या अनुग्रहाचा च भाग त्यांनी महत्त्वाचा मानला. श्रीमद्भागवताच्या 'पोषणं तदनुग्रहः' वर आधारलेल्या भगवंताच्या पोषणाला म्हणजे अनुग्रहाला च सर्वोत्कृष्ट साधन मानणाऱ्या या वल्लभचार्य-प्रणीत सिद्धांताला 'पुष्टिमार्ग' ही संज्ञा मिळावी हे स्वाभाविकच आहे. भगवंत आपल्या अनुग्रहाच्या सामर्थ्याने च जीवाला आपल्यासारखे आनंदमय करून टाकतो व ही आनंदमय स्थिती म्हणजेच मुक्ती. ही दोन प्रकारची-पुष्टिभक्ती आणि मर्यादाभक्ति. मर्यादाभक्तीत फलाची आसक्ती शिल्लक राहते; ती भक्ती भगवंताच्या चरणकमलांची. सहाजिकच त्यांत दैन्यभावनेला महत्त्व. पुष्टिभक्ती यापेक्षा श्रेष्ठ, ती भक्ती थेट भगवंताच्या मुखकमलाची; त्यात वात्सल्याला, माधुर्यभावनेला महत्त्व. पुष्टिभक्तीचे हि ४ प्रकार; प्रवाहपुष्टी, मर्यादापुष्टी, पुष्टि-पुष्टी आणि शुद्धिपुष्टी. प्रवाह-पुष्टीत संसारात राहून भक्त भगवंताची आराधना करतो. मर्यादा पुष्टीत तो संसारातील सर्व सुखांचा त्याग करून कीर्तन, वंदन, स्मरण आदि साधनांच्या साहाय्याने भक्ती करतो. पुष्टि-पुष्टीत त्याला भगवंताचा अगुग्रह लाभतो व तो भक्तीत पूर्ण रममाण होतो आणि शुद्धि-पुष्टीत भगवंताच्या लीलांशी त्याचे मानसिक तादात्म्य स्थापन होते, तो पूर्णपणे भगवंताचा आश्रित बनतो आणि राधाकृष्णाच्या बरोबर गोलोकांतच निवास करण्याचा त्याला अधिकार प्राप्त होतो. हीच पुष्टिमार्गातली चरम स्थिती; हेच श्रीवल्लभाचार्यांनी आपल्या संप्रदायाचे ध्येय मानले. अणुभाष्यात यासंबंधी लिहिताना आचार्य म्हणतात -''कृतिसाध्यं साधनं ज्ञानभक्तिरूपं शास्त्रेण बोध्यते । ताभ्यां विहिताभ्यां मुक्तिमर्यादा । तद्रहितानामपि स्वस्वरूपबलेन स्वप्रापणं पुष्टिरित्यभिधीयते ।

या सिद्धांतानुसार महाप्रभु वल्लभाचार्यांनी गोपींना पुष्टिमार्गातील गुरू मानले कारण त्यांनी कृष्णावर निरतिशय प्रेम केले व कृष्णाचा अनुग्रह प्राप्त करून

घेतला. गोपींचे सुख व दुःख यांच्याशी समरस होण्याची शक्ति संपादन करणे हे पुष्टिमार्गीय भक्तांचे ईप्सित झाले पाहिजे. श्रीकृष्णाला च सर्वस्व मानणारे नंद यशोदा व गोकुळातील निवासी यांचे वियोगदुःख हे हि आदर्शरूप च; कारण त्यात श्रीकृष्णाबद्दलची तन्मयता प्रकर्षाने दिसते. म्हणूनच 'निरोधलक्षणम्' मध्ये आचार्य म्हणतात :-

**यच्च दुःखं यशोदाया नन्दादीनां च गोकुले ।**
**गोपिकानां च यद् दुःखं तद् दुःखं स्यान्मम क्वचित् ।**
**गोकुले गोपिकानां च सर्वेषां व्रजवासिनाम् ।**
**यत्सुखं समभूत्तन्मे भगवान् किं विधास्यति ।।**

८१ व्या नारदभक्तिसूत्रात सांगितल्याप्रमाणे गुणासक्ति, माहात्म्यासक्ति, रूपासक्ति, पूजासक्ति, कान्तासक्ति, वात्सल्यासक्ति, आत्मनिवेदनासक्ति तन्मयासक्ति व परमविरहासक्ति या अकरा प्रकारच्या आसक्ती ही सर्व भक्तीची च रूपे. या भक्तीत च सुप्रसिद्ध नवधा भक्तीचा समावेश होतो. श्रीनाथाच्या पूजेच्या निमित्ताने रसेश्वर श्रीकृष्णाच्या भक्तीला मोठे डौलदार व समृद्धशाली रूप प्राप्त करून देण्याचे कार्य श्रीवल्लभचार्यांनी आपल्या शिष्यांच्या साहाय्याने केले. आज हि मथुरा-वृंदावन हा परिसर सामान्य माणसाला भगवान श्रीकृष्णांच्या जवळ जाण्याचा अधिकार प्राप्त करून देणाऱ्या या पुष्टिमार्गीय भक्तीच्या रंगात रंगलेला दिसतो हे मान्य करावे लागते. 'नायमात्मा प्रवचनेन लभ्यः .......... यमेवेष वृणुते तेनैव लभ्यः' या सारख्या उपनिषद्वाक्यांचे या मार्गात महत्त्व फार.

श्रीवल्लभाचार्यांना च व्रजभाषेत लिहिल्या गेलेल्या कृष्णभक्तिपर काव्याचे श्रेय द्यावे लागेल. यांच्या शिष्यात सूरसागराच्या रूपाने व्रजभाषेत अपार सौंदर्याचा सागर निर्माण करणाऱ्या सूरदासांना सर्वप्रथम स्थान आहे. पुष्टिमार्गीय परंपरेनुसार सूरदास 'श्री आचार्यजी सों दस दिन छोटे हुते' व श्रीवल्लभाचार्यांच्या संपर्कात येण्यापूर्वीच या जन्मांध कवीने 'चरनकमल वन्दौं हरि राई' किंवा 'मो सम कौन कुटिल खल कामी' अशा धर्तीची रचना करून लोकांत थोडी फार प्रतिष्ठा मिळवली होती. पण योगायोगाने गऊघाटला उतरलेल्या वल्लभाचार्यांची या कवीशी गाठ पडली व या प्रतिभावान् कवीची पारख करून त्याला 'सूर घिघियात काहे कु है, कछु भगवल्लीला वर्णन करौ' या शब्दांत बालक कृष्णाची लीला वर्णन करण्याची पुष्टिमार्गीय दिव्यदृष्टी प्रदान केली. या अनुग्रहामुळे च सूरदासाच्या काव्याला बहर आला व व्रजयुवतीच्या अंगणात 'घुटरून चलत रेनु तन मंडित मुख दधि लेप किए' या अवस्थेत खेळणारा नंदकुमार हा भारतातील सर्वसामान्य काव्यरसिकांच्या व भक्तशिरोमणींच्या हृदयातील सिंहासनावर अधिष्ठित झाला. पुष्टिमार्गातील गुणमाहात्म्यासक्ति, आत्मनिवेदनासक्ति,

तन्मयासक्ति व परमविरहासक्ति यांचे काव्यमय, मनोज्ञ चित्रण सूरदासाने भ्रमरगीतात करून टाकले. 'चलत चितवत दिवस जागत सपन सोवत राति । हृदय तें वह स्याम मूरति छन न इत लत जाति' या सूरदासाच्या गोपींच्या उक्तीतील तन्मयता, 'सदा रहत पावसरितु हम पै, जब तें स्याम सिधारे' मधली गोपींची विरहासक्ती, 'कालिही करत हुते हमरे साथ सिंगार' मधली कान्तासक्ति, पुष्टिमार्गीय हिन्दी काव्याला गौरव प्राप्त करून देणारी आहे. सूरसागर हा श्रीकृष्णाच्या सौंदर्याचे, रूपाचे वर्णन करणारा म्हणजेच स्वरूपासक्तीचा अक्षयकोष च आहे. मथुरेत गेलेल्या कृष्णाला उद्देशून नंद व यशोदा यांनी सूरसागरात व्यक्त केलेल्या भावना वात्सल्यसक्तीचे उत्तम उदाहरण आहेत व गोपींच्या विरहाचे आणि 'श्रमजलअंतर तनु भीजै ता तालच न धुवावत सारी' हे राधिकेचे चित्रण म्हणजे कान्तासक्तीचे काव्यमय निदर्शन मानले पाहिजे. 'ग्वालन कर तें कौर छुडावत' या सारख्या पदांत सख्यासक्तिचे गोंडस रूप दिसून येते. आणि सूरदासाने लिहिलेल्या विनय-पदांत दास्यभक्तीचा प्रकर्ष आढळून येतो. 'श्रीवल्लभनखचंद्रछटा बिनु सब जग माँहि अंधेरो ' असे म्हणून गुरूची वंदना करणाऱ्या, श्रीनाथ व नवनीतप्रिया समोर प्रत्यही कीर्तन करीत भक्तिपूर्ण काव्याचा सागर निर्माण करणाऱ्या या भक्तश्रेष्ठाला वल्लभाचार्यपुत्र विठ्ठलनाथांनी 'पुष्टिमार्ग को जहाज' म्हणून यथार्थ गौरव केला यात शंका नाही. श्रीवल्लभाचार्यांनी स्थापन केलेल्या पुष्टिमार्गीय सेवाप्रणालीला पूर्णता व वैभव प्राप्त करून देणाऱ्या व मंदिरात भगवान कृष्णांच्या ८ आकर्षक वेषांची रचना करून त्यासाठी ८ कीर्तनकारांची म्हणजेच 'अष्टछाप' की स्थापना करणाऱ्या विठ्ठलनाथांनी सूरदासाचा असा आदरयुक्त उल्लेख करावा यात च सूरदासाचे अनन्यसाधारणत्व आहे.

श्रीविठ्ठलनाथांच्या 'अष्टछाप' मध्ये सूरदासाप्रमाणे श्रीवल्लभाचार्यांच्या ज्या ३ शिष्यांचा अंतर्भाव केलेला होता त्यात कृष्णदास (सन् १५४३), परमानंददास (सन् १५५०) व कुंभनदास (सन् १५५०) या भक्त कवींचा समावेश होता. 'चौरासी वैष्णवन की वार्ता' या ग्रंथात या तिघांच्या हि चरित्रांचे वर्णन केलेले आहे. सूरदासाप्रमाणे च हे तिघे हि संगीताचे मर्मज्ञ होते व सूरदासाच्या तोडीचे नसले तरी चांगल्यापैकी कवी होते. कृष्णदास हे जातीने शूद्र असले तरी भक्तीच्या जोरावर त्यांनी वल्लभ संप्रदायात मानाचे स्थान मिळवले होते. त्यांनी 'भ्रमरगीत' व 'प्रेमतत्त्व निरूपण' ही पुस्तके लिहिली. यांत संयोग, शृंगाराचे वर्णन केलेले आहे. पुष्टिमार्गीय भक्तात यांनी लिहिलेल्या 'जुगल-मान-चरित्र' या रचनेचा मोठा आदर केला जातो. परमानंददास हे वल्लभाचार्यांच्या प्रियशिष्यांपैकी एक होते, यांच्या 'ध्रुवचरित्र' व 'दानलीला' या ग्रंथात

पुष्टिमार्गीय तन्मयता प्रकर्षाने आढळते. यांनी लिहिलेल्या रसपूर्ण पदांचा संग्रह हि प्रसिद्ध आहे. जगातील गौरव व सम्मान यांना विषाप्रमाणे मानणाऱ्या संत कुंभनदास यांची फुटकळ पदे च उपलब्ध आहेत परंतु 'दो सौ बावन वैष्णवन की वार्ता' या ग्रंथावरून यांना सम्राट अकबराकडून बोलावणे आलामुळे नाइलाजाने सीकरीला जावे लागल्याचे कळते व त्या संबंधीची आपली दुःखद प्रतिक्रिया व्यक्त करणारे यांचे पद फारच प्रसिद्ध आहे. हे म्हणतात ---

सन्तन कहाँ सीकरी सो काम ।
आवत जात पनहियाँ टुटी भूलि गयो हरिनाम ।

इतकेच नव्हे तर 'जिनको मुख देखि दुख उपजत, तिनको करिबे परो सलाम' याच्याबद्दल यांना अतिशय दुःख झाले कारण 'लाल गिरधर बिनु और सबै बेकाम' हीच या निःस्पृह कवीची भूमिका होती.

श्रीवल्लभाचार्यानंतर पुष्टिमार्गीय आचार्यत्व त्यांचे कनिष्ठ पुत्र श्री विठ्ठलनाथ यांच्याकडे आले व त्यांनी 'अष्टछाप' ची स्थापना केल्याचा उल्लेख तर आलेला च आहे. या चार शिष्यांत गुणानुक्रमे व प्रभावाच्या दृष्टीने नंददास यांना सूरदासाखालोखाल स्थान द्यावे लागेल. 'रासपञ्चाध्यायी' व 'भँवरगीत' हे यांचे सुप्रसिद्ध ग्रंथ. श्रीकृष्णाच्या रासलीलेचे रोला छंदात वर्णन करणारा पांच अध्यायांचा हा ग्रंथ म्हणजे पुष्टिमार्गीय काव्याचे एक लेणे आहे. हा ग्रंथ भागवतावर च आधारलेला आहे व पुष्टिमार्गातील कान्तासक्तीचे काव्यमय निरूपण करणाऱ्या या ग्रंथाची लोकप्रियता वादातीत आहे. माधुर्य व प्रसाद हे या काव्यग्रंथाचे विशेष गुण. वियोगिनी ब्रजयुवतींचे 'नैन मूँदिबो महाअस्त्र लै हाँसी हाँसी । मारत हो कित सुरतनाथ बिना मोल को दासी ।।' हे वर्णन पुष्टिमार्गातील विरहासक्तीचा मनोज्ञ अविष्कार करणारे आहे. पुष्टिमार्गाच्या सांप्रदायिक ग्रंथात विद्वतेच्या व खंडनमंडनाच्या दृष्टीने नंददासाच्या 'भँवर गीता' ला अनुपम स्थान आहे. नंददासाच्या गोपी सूरदासाच्या गोपींपेक्षा विद्वान आहेत. सूरदासाच्या भ्रमरगीतात खंडनमंडनाला फारसे महत्त्व नव्हते, ते महत्त्व या ग्रंथात मिळाले. सगुणभक्तीचे गोपींच्या उक्तींच्या माध्यमातून कवीने जोरदार मंडन केलेले आहे. पुष्टिमार्गातील पद्धतीनुसार गोपींच्या विरहाचे कारुण्यपूर्ण वर्णन हि या भंवरगीतात आहे परंतु ब्रह्म, माया व जीव यांच्या पुष्टिमार्गीय स्वरूपाचे हि पाण्डित्यपूर्ण वर्णन करून या ग्रंथांतल्या गोपी उद्धवाला कसे गप्प बसवितात हे मुळात वाचण्यासारखे आहे. 'जो उनके गुन नहि, और गुन भये कहाँ तें' असा प्रश्न विचारणाऱ्या व 'माया के गुन और और गुन हरिके जानो' असे बजावणाऱ्या गोपी नुसत्याच भावनेच्या ओघात वाहणाऱ्या नसून तर्कात प्रवीण व वादविवादात प्रतिपक्षाची (म्हणजे निर्गुण निराकार ज्ञानाची) रेवडी उडवणाऱ्या आहेत.

पुष्टिमार्गीय तत्त्वज्ञानाला काव्यरूप देणाऱ्या नंददासाचे शब्दप्रभुत्व वाखाणण्यासारखे आहे; 'कहा हिय लोन लगावो' सारख्या म्हणींचा समर्पक उपयोग करून त्याने काव्याला गति प्राप्त करून दिली व पुष्टिमार्गीय तत्त्वज्ञान ही माधुर्यपूर्ण व प्रसादमय करून टाकले हे मान्य केले पाहिजे. 'श्रीनंददास आनंद निधी, रसिक सुप्रभुहित रंगमँगे । लीलापर रस रीती ग्रंथ रचना में नागर', हे यांचे वर्णन योग्यच आहे.

नंददासाव्यतिरिक्त कुंभनदासाचे पुत्र चतुर्भजदास हे या अष्टछाप मधले विठ्ठलनाथांचे दुसरे शिष्य. 'द्वादश यश' 'भक्ति प्रताप' व 'हितजू को मंगला' हे यांचे तीन ग्रंथ. शिवाय कित्येक पदांचे संग्रह हि संप्रदायात प्रसिद्ध आहेत. पुष्टिमार्गीय प्रेमपूर्ण भक्तीचे माहात्म्य यानी मोठ्या प्रासादिक भाषेत सांगितेलेले आहे. विठ्ठलनाथांचे तिसरे शिष्य छीतस्वामी (सन १५५५) हे सुरवातीला बिरबलाच्या पदरी पंड्ये होते; नंतर यांना पुष्टिमार्गाची दीक्षा मिळाली. ब्रजभूमीवर यांचे अनन्य प्रेम व जन्मजन्मांतरी येथेच रहाण्याची आकांक्षा यांनी मोठ्या रसपूर्ण व्रजभाषेत व्यक्त केलेली आहे. 'अष्टछाप' मधल्या कवींत यांना आदराचे स्थान होते. दुदैवाने यांचा ग्रंथ उपलब्ध नाही. चौथे शिष्य गोविन्दस्वामी हे गोवर्धन पर्वतावर रहात असत. तेथेच त्यांनी भक्तिपूर्ण पदे लिहून गुणवत्तेच्या जोरावर 'अष्टछाप' मध्ये स्थान मिळविले.

व्रजभाषेत रसपूर्ण कविता करून व्रजभूमीबद्दल व श्रीकृष्णावरचे अनन्यसाधारण प्रेम व्यक्त करणाऱ्या कवीत 'जो खग हौ तो बसेरौ करौं कालिन्दीकूल कदम्ब की डारन' यांसारखी सवैया छंदात नितान्त सुंदर रचना करणाऱ्या मुसलमान कवी रसखानाचा हि समावेश होतो. परंतु पुष्टिमार्गाचा याच्यावर साक्षात् प्रभाव आहे असे म्हणता येणार नाही. पुष्टिमार्गीय प्रभावाखाली येणारे कवी म्हणजे 'अष्टछाप' मधले उपर्युक्त आठ कवी. संप्रदायात हे श्रीकृष्णाचे आठ सखा मानले गेले. या सर्वांनीच संगीताने नटलेल्या व काव्यगुणांनी मण्डित झालेल्या उत्तमोत्तम रचना व्रजभाषेत सादर करून पुष्टिमार्गाला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. नंददासाने तत्त्वज्ञान व काव्य यांचा मनोज्ञ मिलाप घडवून आणला व सूरदासाने तर साहित्यात व्रजभाषेला जे स्थान मिळवून दिले त्याला तोड नाही. काव्यात वात्सल्यरसाची प्रतिष्ठापना करणाऱ्या सूरदासाला भारताच्या चिरंजीव कवीत स्थान आहे. या सर्वांना प्रेरणा देण्याचे श्रेय पुष्टिमार्गाचे संस्थापक महाप्रभु वल्लभाचार्य यांना च दिले पाहिजे. या दृष्टीने हिंदी साहित्यावरील वल्लभाचार्यांचे ऋण कधी हि न फिटणारे आहे.

[ धर्मभास्कर· वर्षारम्भ विशेषाङ्क- जून १९७९ ]

# १७. हिंदी भाषेतील भक्तिवाङ्मयाचे स्वरूप

**भारतवर्षातील** संतांची उज्ज्वल परंपरा लक्षात घेऊन च भारताला सुवर्णभूमी ही पदवी शोभून दिसते असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. स्वातंत्र्योत्तर काळात कलहाचा महान कोलाहल निर्माण झाल्यामुळे राष्ट्रीय एकात्मता रुजविण्याच्या दृष्टीने आज भगीरथ प्रयत्न करावे लागत आहेत हे जरी खरे असले तरी या विशाल देशाच्या मध्यकालीन इतिहासात राष्ट्रीय एकात्मतेची भावना जनमासनात दृढमूल करण्याचे कार्य संतांनी यशस्वीपणाने करून टाकले होते यात शंका नाही. त्याकाळी दळणवळणाची साधने सुलभ नव्हती, राजकीय ऐक्याचा मागमूस नव्हता, राष्ट्रभाषा, राष्ट्रीय एकात्मता वगैरे शब्द हि अस्तित्वात आले नव्हते हे ध्यानात घेतले म्हणजे तर या महान कार्याचे ऐतिहासिक महत्त्व मनावर अधिकच ठसते. हे संत भारतातील सर्व राज्यात किंवा प्रांतात आढळतात हे एक विलोभनीय वैशिष्ट्य. जातिभेद, भाषाभेद इत्यादी संघर्षमूलक गोष्टींना तिलांजली देऊन भागवत धर्माने 'जो हरिको भजै सो हरिका होई' या व्यापक भावभूमीवर सर्व भारतीयांना एकत्र आणले अशी च इतिहासाची साक्ष आहे. महाराष्ट्रात या कार्याचे श्रेय ज्याप्रमाणे ज्ञानेश्वरापासून तुकयापर्यंत किंवा रामदासापर्यंतच्या संतांना प्राप्त आहे, त्याचप्रमाणे दक्षिण भारतात आलवारांना व उत्तर भारतातील किंवा प्राधान्याने हिंदीभाषी जनतेत कबीर, जायसी, सूरदास, तुलसीदास, मीरा यासारख्या संतांना व कविश्रेष्ठांना निर्विवादपणे द्यावे लागेल. या सर्वांनी आपल्या भक्तिभावनेला शब्दरूप देतांना, तिची अभिव्यक्ती करतांना आपापल्या व्यक्तित्वाला अनुसरून जी विविधता दाखविली त्यावरून हिंदी भाषेतील भक्तीचे यथार्थ स्वरूप लक्षात येण्यास मदत व्हावी हे स्वाभाविक च म्हटले पाहिजे.

## निर्गुण व सगुण भक्ती

भक्तिकाळाच्या प्रारंभी म्हणजे चौदाव्या शतकाच्या सुरवातीला उत्तर भारतात मुसलमानांची सत्ता दृढमूल झाली होती. त्यांच्या शक्तीमुळे व धर्मविस्तारामुळे हिंदू जनतेच्या मनात भीतीबरोबर आपल्या स्वतंत्र अस्तित्वाबद्दल हि संदेह निर्माण होणे स्वाभाविक होते. या असहाय्य अवस्थेतून बाहेर पडण्याचा एक मार्ग म्हणजे तत्त्वज्ञानाची कास धरून पारमार्थिक किंवा आध्यात्मिक क्षेत्रात आपली श्रेष्ठता सिद्ध करण्याचा प्रयत्न करणे व दुसरा मार्ग सर्वशक्तिमान ईश्वराची प्रार्थना करून त्याच्या अनुकम्पेला पात्र होण्याचा प्रयत्न करणे. या दोन प्रवृत्तींतूनच शंकराचार्यांच्या अद्वैतावर आधारित निर्गुण, निराकार ब्रह्माची उपासना करणाऱ्या संतांचा व सगुण भगवंताची आराधना करून त्याच्या साहाय्याने सामान्य जनतेला

'मा शुचः' ची हमी देणाऱ्या रामानुजाचार्य, वल्लभाचार्य इत्यादी वैष्णव संतांच्या प्रतिपादनावर आधारलेल्या भगवद्भक्तीची म्हणजे राम व कृष्ण यांच्या भक्तीची जोपासना करणाऱ्या कविश्रेष्ठांचा उद्भव झाला. या दृष्टीने--

भक्ती द्राविड उपजी लाये रामानन्द ।
परगट कियो कबीरने सात द्वीप नौ खंड ।।

या सुप्रसिद्ध ओळीत बराच सत्यांश आहे हे मान्य केले पाहिजे.

## हिंदू मुसलमान ऐक्य करण्याचा प्रयत्न

कबीर, जायसी इत्यादी संतांनी हिंदू व मुसलमान या दोघांना हि ग्राह्य अशा ईश्वराच्या सर्वशक्तिमान स्वरूपाची कास धरली व मुसलमानांच्या 'ला इला इल इल्लाह मुहम्मद रसूल अल्लाह' या मंत्राशी जुळणाऱ्या 'दशरथसुत तिहुं लोग बखाना । राम नाम का मरम है आना' या मताचा प्रचार करून हिंदू व मुसलमान यांमध्ये ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. शासकांना हि काही काळानंतर शासितांशी जुळवून घेण्यातच स्थैर्य वाटते हे लक्षात घेतले म्हणजे कबीरांना मुसलमांनाचे हि पाठबळ कां मिळू शकले याचे मर्म सहज समजते. मुसलमानी समाजात वाढलेल्या परंतु रामानंदासारख्या हिंदु आचार्यांचे शिष्यत्व पत्करणाऱ्या कबीरांसारख्याकडे या धर्मसमन्वयाचे नेतृत्व यावे यात नवल वाटण्याचे कारण नाही. हिंदूंच्या दृष्टीने मुसलमानांशी ऐक्य स्थापन करण्याच्या या प्रयत्नांची दुसरी बाजू मुसलमानांच्या सूफी सम्प्रदायाची दीक्षा घेणाऱ्या व्यक्तींनी हिंदु धर्माशी एकरूप होण्याच्या इच्छेने हिंदूंच्या प्रेमकथांच्या माध्यमातून लिहिलेले साहित्य. सूफी मतात बंदी व खुदा यांचे जे ऐक्य आहे ते हिंदूंच्या भगवान व भक्त यांच्या मूलभूत ऐक्याशी जुळणारे आहे. यात प्रेमभावने (इश्क) ला जे प्राधान्य आहे त्यामुळे या शाखेला प्रेममार्गी शाखा असे सोयीस्कर नाव दिले जाते. राम व रहीम यांच्या तात्त्विक ऐक्यावर जोर देणाऱ्या ज्ञानाश्रयी शाखेचे नेतृत्व हिंदी भक्तिसाहित्यात कबीराने केले; प्रेममार्गी शाखेचे नेतृत्व करण्याचे श्रेय मलिक मुहम्मद जायसी या सूफी संताकडे जाते.

## स्वान्तः सुखाय प्रवृत्तीचे भक्ति काव्य

स्वदेश व स्वजाती यांचे कल्याण भगवंताच्या अनन्य भजनामुळे च होणार आहे या श्रद्धेने इष्ट देवतेच्या आराधनेत मग्न होणाऱ्या व दरबारी ऐश्वर्याबद्दल 'संतन कहाँ सीकरी सौं काम' अशी निरिच्छतेची भावना बाळगणाऱ्या कवींच्या 'स्वान्तःसुखाय' प्रवृत्तीतून काव्याची जी सरिता प्रवाहित झाली त्यात कृष्णभक्तिपर व रामभक्तिपर काव्यांचा अंर्तभाव होतो. यापैकी पहिल्या शाखेचे अध्वर्यू भक्तशिरोमणी सूरदास व दुसरीचे भक्तश्रेष्ठ तुलसीदास.

## सर्व संतांच्या काव्यात भावनिक साम्य

उपर्युक्त चारी शाखांच्या काव्यरचनेचे मूळ पराजित हिंदूची आध्यत्मिक व धार्मिक क्षेत्रातील श्रेष्ठता प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नात होते व त्यामुळे या चारी शाखांच्या विचारात विशिष्ट प्रकारचे भावनिक साम्य दृष्टोत्पत्तीस येते. या साम्याच्या जोरावरच या सर्वांचा अंतर्भाव भक्तिकाळात करणे सयुक्तिक ठरते. हे साम्य चार प्रकारचे आहे. १) संत कबीर व त्याचे अनुयायी, मलिक मुहम्मद जायसी या संतांप्रमाणे कृष्णभक्त व रामभक्त कवींनी भगवंताचा जप, कीर्तन यांना प्राधान्य दिलेले आहे. भक्तशिरोमणी तुलसीदासांनी तर रामापेक्षा रामनामाला श्रेष्ठ मानले व या नामसंकीर्तनात परमात्म्याच्या सगुण व निर्गुण रूपांचा समन्वय करताना --

अगुन सगुन दुइ ब्रह्म सरूपा ।
अकथ अगाथ अनादि अनूपा ।।
मोरे मत बड नाम दुहूँते ।
किये जेहि निज बस निज बूते ।।

असे उद्‌गार काढले. २) गुरूचे माहात्म्य. या चारी प्रकरच्या कवींच्या दृष्टीने अनुपम होते. गुरूशिवाय तरणोपाय नाही; इतकेच नव्हे तर भगवंतापेक्षा हि भगवंताकडे जाण्याची वाट दाखवणारा गुरू श्रेष्ठ अशी यांची धारणा होती. 'गुरू सूआ जेइ पन्थ दिखावा' म्हणणारे कविवर जायसी, गोविंद व गुरू यांपैकी कोणाची वंदना करावी असा प्रश्न विचारला असताना 'बलिहारी गुरू आपने गोविन्द दियो बताय' असे म्हणणारे भगवद्‌भक्त कबीर, रामचरितमानसाच्या प्रारंभीच 'वन्दौं गुरूपद पद्म परागा' असे उद्‌गार काढणारे तुलसीदास व 'वल्लभनखचंद्र छटा बिनु सब जग माँहि अंधेरो' या शब्दांत गुरूची वंदना करणारे सूरदास एकमुखाने गुरूमहिमा च गातात यात शंका नाही. ३) उपर्युक्त चारी शाखांत भक्तीला प्राधान्य आहे. 'सूली उपर सेज पिया की' म्हणणारा कबीर 'हरि भक्ति जाने बिना बूढि मुआ संसार' असे उद्‌गार काढतो ! सूफी कवी बोलून चालून प्रेममार्गी. 'भगवंत भजन बिनु' लोकांना 'खर कूकर' म्हणणारे सूरदास व 'सेव्य-सेवक बिनु भव न तरिय उरगारि' म्हणणारे तुलसीदास भक्तिभावनेला निर्विवादपणे प्राधान्य देणारे आहेत. या भक्त कवींनी ज्ञानाला विरोध केला नाही; भक्तिविरोधी ज्ञानाचे मात्र खंडन केले यात संदेह नाही. ४) भक्तीला इतके प्राधान्य देणाऱ्या या कवींनी अहंकाराचा त्याग करण्यावर जोर द्यावा हे स्वाभाविकच नव्हे का ? खऱ्या विष्णुदासाला अहंकाराचा वारा लागता कामा नये याबद्दल सर्व संतांचे व भक्तांचे एकमत असावे यात नवल नाही. कबीराची नम्रता ठसक्यात व्यक्त होते. जायसीची ऋजुता त्याच्या व्यक्तित्वानुसार मृदु

भाषेत अभिव्यक्त होते. सूरदास व तुलसीदास यांची विनम्रता व्यक्त करणारी पदे तर सुप्रसिद्ध च आहेत.

## मानवनिर्मित कृत्रिम भेद हानिकारक ही कबीराची - घोषणा

'प्राधान्येन व्यपदेशाः' या न्यायाने कबीर, जायसी, सूरदास व तुलसीदास यांचा च उल्लेख करणे योग्य ठरले तरी यांच्या अनुयायांनी व इतर कवींनी ही भक्तिभावनेला काव्याचे रूप देऊन भक्तिकाळाला 'हिंदी काव्याचा सुवर्णकाल' ही पदवी प्राप्त करून दिलेली आहे हे विसरता कामा नये. कबीर खऱ्या अर्थाने धर्मसुधारक होते. 'पोथी पढि पढि जग मुआ' म्हणणाऱ्या कबीराने तत्कालीन पण्डितांच्या केंद्रात अहंमन्य ब्राह्मणांना उद्देशून 'जो तुम ब्राह्मन बाह्मनि जाये, और राह तुम काहे न आये' असा निधडक प्रश्न विचारण्याचे व मौलवींना तुम्ही सकाळी उठून हाक देता, बहुधा तुमचा 'बहिरा हुआ खुदा' इतकेच नव्हे 'प्राति रोजा करत है, राति हनत है गाय' यांतील विसंगती स्पष्ट दाखवून देण्याचे साहस निःस्पृह कबीरावाचून कोण करू शकणार ? 'कोई हिन्दू कोई तुरूक कहावै एक जमीपर रहिए' व तत्कालीन हिंदूंना 'को ब्राह्मण को शूद्रा' असे सरळ सुनावणाऱ्या कबीरांनी पहिल्या प्रथम भारतात मानवनिर्मित कृत्रिम भेद हानिकारक आहेत ही निःसंकोच घोषणा केली. हे त्यांचे ऋण मान्य करण्यावाचून गत्यंतर नाही. या काळातच 'लीन भयो गोविन्द सों ज्यों पानी संग पानी' म्हणणारे नामाचे उपासक व शीखांचे धर्मगुरू नानक, 'धीव दूध में रमि रह्या', व्यापक सब ही ठौर, दादू बकता बहुत है, मथि काढै ते और' असे व्यावहारिक दृष्टांत देऊन तत्त्व विवेचन करणारे दासू पंथाचे प्रवर्तक दादूदयाल व 'पुरूष प्रकृति संयोग जगत उपजत है ऐसे । रवि-दर्पण दृष्टांत अग्नि उपजत है तैसे' असे प्रौढ दृष्टांत देऊन --

वेद थके कहि तंत्र थके कहि, ग्रन्थ थके निस बासर गात ।
सुन्दर मौन गही सिव साधक कौन कहै उसकी मुख बात ।।

असे समर्पक उद्गार काढणारे पण्डित सुंदरदास यासारख्या कवींनी या ज्ञानाश्रयी शाखेच्या काव्यसरितेला सौष्ठव प्राप्त करून दिलेले आहे. रैदासासाराखे चांभार, सेनासारखे न्हावी आदि अशिक्षित व्यक्तींनी हि आपल्या अनुभवाच्या व ऋजुतेच्या जोरावर या शाखेच्या कवींत स्थान मिळविले आहे.

## सूफी संप्रदायाचे काव्य

सूफी संप्रदायातील मुसलमान कवींनी फारसी मसनवीच्या पद्धतीने अवधी भाषेत हिंदूंच्या प्रेमकथांची रचना करून भौतिक प्रेमाच्या माध्यमातून ईश्वरीय प्रेमाचे प्रतिपादन केले. मलिक मुहम्मद जायसींनी आपल्या पद्मावत महाकाव्यात राजा

रतनसेन व सिंहलद्वीपातील राजकुमारी पद्मावती यांच्या प्रेमाची गाथा लिपीबद्ध केली. ही कथा मूलतः आध्यात्मिक आहे हे---

तन चितउर मन राजा कीन्हा
हिय सिंघल बुधि पद्‌मिनी चीन्हा
गुरू सूत्रा जेहि पंथ दिखावा ।
...........................................
नागमती यह दुनियाँ धन्धा
...........................................
राघव दूत सोइ सैतानू
माया अलाउद्दीन सुलतानू ।।

या जायसीच्या च उद्‌गारांवरून स्पष्ट आहे. भौतिक प्रेमाचे माध्यम निवडल्यामुळे या काव्यातील विरह-वर्णन काव्याच्या कसोटीवर ही अनुपम ठरते. किंबहुना रतनसेन व पद्मावती यांच्या शृंगाराचे वर्णन वाचतांना यापाठीमागील आध्यात्मिक संकेत अदृश्य होतो असे वाटल्यावाचून रहात नाही. तथापि धार्मिक सहिष्णुता व काव्यकला या दोन्ही दृष्टींनी 'पद्मावत' हे महाकाव्य म्हणजे सूफी काव्याचा आदर्श व तत्कालीन हिंदी काव्याला ललामभूत ठरणारी कृती आहे यात शंका नाही. या संप्रदायात 'मृगावती'चे लेखक कुतबन, 'मधुमालती' या ग्रंथात निसर्गाचे मधुर चित्रण करणारे मंझन, 'चित्रावली' ही प्रेमगाथा लिहिणारे उसमान यांचा हि अंतर्भाव होतो. या सर्व मुसलमान कवींनी खण्डनमण्डनाच्या व्यापात न पडता मानवाच्या हृदयातील मधुर व कोमल भावनांना आवाहन करून हिंदू व मुसलमान यांच्यात ऐक्य भावना निर्माण करण्याचे कार्य केले. आध्यात्मिक संकेतांमुळे यांच्या काव्यात भावनात्मक रहस्यवादाचे दर्शन होते. राम व कृष्ण यांच्याप्रमाणे या प्रेमगाथांचे विषय लोकप्रिय नसल्यामुळे या प्रेमगाथांना सर्वसाधारण जनमानसात प्रेमाचे स्थान मिळू शकले नाही हे मात्र मान्य करावे लागेल.

## वैष्णव धर्माचा प्रचार

उत्तर भारतात रामभक्तीचा प्रचार करण्याचे श्रेय रामानुजार्यांच्या शिष्यपरंपरेतील पाचव्या पिढीत निर्माण झालेल्या रामानंदांना द्यावे लागेल. रामानंदांनी संस्कृतबरोबर जनभाषेत ज्या वैष्णव धर्माचा प्रचार केला त्यातील रामभक्तीच्या संपूर्ण विकासाचे विलोभनीय रूप तुलसीदासांच्या कृतीत दिसून येते. रामानंदांनी आपल्या रामभक्तिपर ग्रंथात भक्तीच्या सेव्य-सेवक रूपावर जोर दिला व ज्ञान व कर्म यांपेक्षा भक्ती श्रेष्ठ मानली. तुलसीदासांनी आपल्या असाधारण प्रतिभेच्या जोरावर या दोन्ही गोष्टींना उत्तर भारतातील साधारण जनतेच्या जीवनात

चिरस्थायी महत्त्व प्राप्त करून दिले हे सन १९७४ मध्ये मोठ्या प्रमाणात साजऱ्या झालेल्या 'मानस चतुःशती' वरून स्पष्ट झालेले आहे. संस्कृत विद्वान पंडित मधुसूदन सरस्वतींनी --

आनन्दकानने कश्चिज्जङ्गमस्तुलसीतरू : ।
कवितामन्जरी यस्य रामभ्रमरभूषिता ।।

या शब्दांत तुलसी-गौरवाचा शुभारंभ केला व या गौरवाच्या गाथेत ग्रियर्सन, ग्राउज, फरकुहार, आलचिन, आधुनिक रशियन विद्वान वारान्निकोव आदि पण्डित हि सामील झाले आहेत.

## तुलसीदासांचे असाधारण स्थान

तुलसीदासांनी जुन्या काळातली छप्पयशैली रामचरितमानसाच्या युद्धवर्णनांत वापरली, विद्यापती व सूरदास यांच्या गीत-शैलीचा उपयोग करून राम-गीतावली व कृष्ण-गीतावली लिहिली, कवितावलीची रचना करून गंगसारख्या भाटांच्या कवित्त- सवैया शैलीची बूज राखली, कबीराच्या नीतिप्रचुर दोहा-पद्धतीचा वापर करून दोहावलीची रचना केली, जायसीने प्रचलित केलेल्या दोहा-चौपाई पद्धतीचा कुशल प्रयोग आपल्या रामचरित मानसात करून टाकला, आणि रहीमच्या बरवै छन्दाचा आदर बरवै रामायणात करून शैलीच्या क्षेत्रात तर समन्वय केला च परंतु यापेक्षा हि ज्ञानमार्ग व भक्तिमार्ग, शिवभक्ती व विष्णुभक्ती, गृहस्थाश्रम व वैराग्य, पांडित्य व व्यवहार आणि कथा व तत्त्वज्ञान यांचा हि समन्वय करून खऱ्या अर्थाने 'लोक नायक' ही पदवी प्राप्त करून घेतली. 'अगुन सगुन दुई ब्रह्म सरूपा । प्रमाणेच 'ज्ञानहि भगतिहि नहि कछु भेदा । उभय हरहि भवसंभव खेदा' असे म्हणून समन्वय करीत असताना ज्ञानमार्ग सर्वांना सोयीचा नाहीं हे रामचरितमानसात गरूडाला 'ज्ञानके पन्थ कृपान के धारा । परत खगेस होइ नहिं बारा' या शब्दात हिंदीतील पुल्लिंग व स्त्री लिंगाचा उपयोग करून घेऊन भक्ती मुक्तीच्या मोहात सापडत नाही हे दाखविण्यासाठी 'मोहे न नारि नारिके रूपा' असा युक्तिवाद 'न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसङ्गिनाम्' या गीतावचनाला स्मरून केला. रामचरितमानसाची रचना संस्कृत भाषेत न करता जनसाधारण अवधीत करून रामानंदांच्या 'बहुजनहिताय' च्या आदर्शाचे योग्य अनुकरण केले. 'मानसा' च्या चरित्रचित्रणात हि लोकांपुढे आदर्श ठेवण्याची काळजी तुलसीदासांनी घेतली. 'सुन कपि तोहि समान उपकारी । नहि कोउ सुर नर मुनि तन धारी ।' या हनुमंताविषयीच्या उद्गारात स्वामिभक्तीचा, 'जँह लगि नाथ नेह अरू नाते । पिय बिन तरनिहुँ तें ताते' या सीतेच्या शब्दांत पतिप्रेमाचा व 'जासु राज पिय प्रजा दुखारी । सो नृपु अवसि नरक अधिकारी' या रामाच्या उद्गारात प्रजाप्रेमाचा आदर्श व्यक्त झालेला आहे. हे सर्व करीत असताना महाकाव्यात अपेक्षित असणाऱ्या कलागुणांचे मनोज्ञ

मिश्रण करून तुलसीदासांनी लोकहित व काव्य यांच्या समन्वयाचा हि आदर्श उपस्थित केला. शृंगारापासून शान्तरसापर्यंत सर्व रसांचा मनोज्ञ आविष्कार हे रामचरितमानसाचे विलोभनीय वैशिष्ट्य आहे. या महाकाव्याचा जो नायक राम याच्या व्यक्तित्वात सौंदर्य, शक्ति व शील या तीन्ही गुणांचा परिपाक दाखवून 'बरनि न जाइ अनीति' या शब्दांत यथार्थत्वाने सूचित केलेल्या सोळाव्या शतकातील समाजस्थितीत कशा प्रकारच्या नेत्याची जरूरी आहे हे त्यांनी दाखवून दिले. याच शतकात उत्तर भारताप्रमाणे पूर्व भारत (बंगाल), पश्चिम भारत (महाराष्ट्र), व दक्षिण भारत (कर्नाटक) या भागातही रामायणे निर्माण झाली हे लक्षात घेतले म्हणजे भारतीय साहित्याच्या संदर्भात तुलसीदासांचे असाधारण स्थान आहे याची प्रचीती येते. आज उत्तर भारतात प्रचलित असलेली रामलीला हा तुलसीदासांचा वारसा आहे.

## अलंकार - प्रचुर शैलीत रामचरित्र

या नंतर हि प्राणानंद चौहानाचे महारामायण (सन १६१०) हे नाटक, हृदयरामा (सन १६६२) चे हनुमन्नाटक यासारख्या रचना राम चरित्रावर च आधारित आहेत. परंतु ओडछाच्या राजाश्रित केशवदासांची (सन १५५५ ते १६१७) रामचंद्रिका हा ग्रंथ रामकाव्यांत उल्लेखनीय मानावा लागेल. रामचंद्रिकेवर प्रसन्नराघव व हनुमन्नाटक या संस्कृत ग्रंथांचा स्पष्ट प्रभाव दिसून येतो. रामचंद्रिकेत काव्यापेक्षा पाण्डित्याला च महत्त्व प्राप्त झालेले दिसते. साहजिकच भक्ती किंवा तत्त्वज्ञान यांच्याकडे दुर्लक्ष झालेले आहे. एक दरबारी कवि म्हणून केशवदासांच्या संवादात चातुर्य दिसून येते हे खरे परंतु काव्यालंकारांच्या उपयोगावर भर देऊन भावनेकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती आढळून येते. रामचरित्रावर अलंकार-प्रचुर शैलीत लिहिलेल्या ग्रंथांची परंपरा रामचंद्रिकेपासून सुरू झाली व याची परिणती पुढे बरेलीच्या लालदासाने लिहिलेल्या 'अवधविलास' किंवा कलानिधी विरचित 'शृंगाररसमाधुरी' व 'रामायण सूचनिका' सारख्या शृंगारपर व शुष्क रचनांत झाली. सतराव्या व अठराव्या शतकात कृष्णभक्तीच्या प्रभावामुळे रामभक्तीत हि माधुर्य व परकीया प्रेम यांनी प्रवेश केला व या भक्तीला विकृत रूप प्राप्त झाले.

## तुलसीदासांच्या रामचरित्रामुळे हिंदूंचे जीवन श्रध्दामय व संयत बनले

विसाव्या शतकात मात्र तुलसीदासांच्या सेव्य-सेवक रूप म्हणजेच दास्य भक्तीला प्राधान्य देऊन समाजाच्या उद्‌बोधनासाठी रामभक्तीचा उपयोग करणाऱ्या कवीत 'साकेत' ग्रंथाचे कर्ते मैथिलीशरण गुप्तांचा राम 'संदेश यहां मैं नहीं स्वर्गका लाया, इस भूतल को स्वर्ग बनाने आया' असे आधुनिक काळाला अनुरूप उद्‌गार काढतो. 'साकेत' या महाकाव्याचे वैशिष्ट्य मूलतः सत्प्रवृत्त परंतु अविवेकाच्या

भरांत हिमालयाएवढी चूक करून नंतर पश्चात्तापाने दग्ध होणाऱ्या एका आधुनिक मानवाच्या दृष्टिकोणातून कैकयीकडे पहाण्यात व वाल्मीकि-रामायणात उपेक्षिलेल्या उर्मिलेच्या त्यागाची बूज राखण्यात आहे. तात्पर्य, हिंदी रामकाव्याचा दृष्टिकोण मूलतः दास्यभक्तीवर आधारलेला आहे. या काव्याची प्रमुख भाषा अवधी. कृष्णभक्तिपर काव्याच्या प्रभावामुळे रामभक्तिपर काव्याला हि सतराव्या व अठराव्या शतकात शृंगारिक व विकृत रूप प्राप्त झाले परंतु तुलसीदासांच्या प्रभावामुळे व रामचरित्रात मूलतःच विलासप्रियतेला वाव नसल्यामुळे हिंदी भाषेतील रामभक्तिपर काव्याची त्या प्रमाणात अवनती झाली नाही, किंबहुना उत्तर भारतातील हिन्दू जनतेचे जीवन श्रद्धामय व संयत ठेवण्याचे कार्य या काव्याने केले हे इतिहासाला मान्य करावे लागेल.

## भागवत पुराण हीच कृष्णभक्तीची गंगोत्री

कृष्णभक्तीचा उगम मूलतः महाभारतात झालेला असला तरी हिंदी साहित्याच्या दृष्टीने भागवत पुराण हीच कृष्णभक्तिपरक काव्याची गंगोत्री होय. इसवी सनाच्या पंधराव्या शतकात ज्ञानापेक्षा प्रेमावर, आत्मचिंतनापेक्षा आत्मसमर्पणाच्या भावनेवर भर देऊन श्री वल्लभाचार्यांनी तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात शुद्धाद्वैताची व भक्तीच्या क्षेत्रात पुष्टिमार्गाची स्थापना केलो. या पुष्टिसप्रदायात श्रीकृष्णाला ब्रह्म मानून 'पोषणं तदनुग्रहः' वर जोर दिलेला आहे व त्यामुळेच जीवाच्या आनंदमय रूपाची प्रतिष्ठापना केलेली आहे. या पुष्टिसंप्रदायाची ज्या वैष्णवांना दीक्षा दिली त्यात 'अष्ठछाप' मध्येच श्रेष्ठ कवि सूरदास व नंददास यांना समावेश होतो. वल्लभचार्यांनी आपली गादी श्रीकृष्णाच्या जन्मभूमीत म्हणजे वृंदावनात स्थापन केली. याचे नाव व्रज. म्हणूनच श्रीकृष्णभक्तीची भाषा व्रजभाषा ठरली व या भाषेच्या माध्यमातून कृष्णभक्तीचा प्रचार झाला.

## कृष्णभक्तीचा विकास

कृष्णभक्तीच्या विकासात राधेचे स्थान अद्वितीय आहे हे खरे परंतु भागवतपुराणात गोपीचा निर्देश असला तरी राधेचा नाही. भागवत पुराणावर आधारित मध्वसंप्रदायात ही राधा नाही. राधेचा उल्लेख विष्णुस्वामी व निम्बार्क यांनी चालविलेल्या संप्रदायात येतो. निम्बार्क संप्रदायात संस्कृत 'गीतगोविंद चा कर्ता जयदेव (सन ११७०) याने राधेचे काव्यपूर्ण वर्णन केले..याने प्रभावित होऊन मैथिल कोकिल विद्यापतीने राधेला महत्त्व दिले. इकडे विष्णुस्वामीच्या प्रभावामुळे श्रीवल्लभाचार्यांनी राधेच्या उपासनेला आरंभ केला व त्यांच्या प्रभावामुळे सूरदासाने आपल्या काव्यात राधेचे वर्णन केले. सूरदासांपूर्वी विद्यापतीने आपल्या मैथिली पदावलीत राधा व कृष्ण यांच्या शृंगारिक भावनेचा जो आवेग दाखविला त्यात राधा व कृष्ण यांचे देवत्व झाकाळून जाऊन त्याना

प्रेयसी व प्रियकर हेच रूप प्राप्त झाले. परंतु वर सांगितल्याप्रमाणे श्रीवल्लभाचार्यांच्या पुष्टिसिद्धांतात या रूपाला महत्त्व नसून भगवंताच्या अनुग्रहाला आहे. ब्रह्मस्वरूप कृष्ण भक्तांना जी मुक्ती प्रदान करते तीच पुष्टी. म्हणून वल्लभाचार्यांनी गोपींना पुष्टिमार्गावरील गुरू मानले. पुष्टिमार्गीय भक्त व कवी परमात्मस्वरूप श्रीकृष्णचरित्रात गोपीप्रमाणे रममाण होणे हे आपले ध्येय मानतात.

## कृष्णकथेचा 'सूर सागर'

कृष्णाच्या कथेचे गायन किंवा संकीर्तन पुष्टिभावनेच्या आवेगांत करण्याच्या प्रक्रियेतून सूरदासांचा 'सूरसागर' हा पदांचा सागर निर्माण झाला. सूरसागरांत श्रीकृष्णचरित्राचे वर्णन करणाऱ्या भगवंताच्या दशम स्कन्धाला प्राधान्य आहे. गोकुळ व वृन्दावन यांत विहार करणाऱ्या कृष्णाचे बाल चरित्र हा या स्कन्धाच्या पूर्वार्धाचा विषय. यांत माधुर्य व वात्सल्य यांना साहजिकच प्राधान्य. सूरदासाने ३४९४ पदे लिहिली, उत्तरार्धावर फक्त १३८. या उत्तरार्धात द्वारकागमनानंतरचे श्रीकृष्ण चरित्र आहे. यांत सूरदासाला विशेष रुची नाही. कृष्णाच्या ज्या प्रेमपूर्ण जीवनाला सूरदासाने काव्य-विषय बनविले त्यांत सहाजिकच बालजीवनाला, बालक कृष्ण व त्याची आई यशोदा यांच्या हृदयांत उठणाऱ्या स्पन्दनांना महत्त्व प्राप्त झाले. कृष्णाच्या बाल्यावस्थेतील मनोभावांना सार्वजनिक रूप देऊन त्यांचे हृदयंगम चत्रिण करण्यात, पर्यायाने वात्सल्याला रसाची पदवी प्राप्त करून देण्यात सूरदासाच्या काव्याचा खरा गौरव आहे. यामध्ये बालकाच्या जन्माचा उत्सव, त्याचे प्रथम अन्नप्राशन इत्यादि लौकिक आचारांना स्वभावोक्तीची साहित्यिक प्रतिष्ठा सूरदासांनी प्राप्त करून दिली. पुष्टिमार्गीय संप्रदायाला अनुसरून सूरदासांनी श्रीनाथजी समोर जे नामसंकीर्तन व गायन केले त्यांत श्रीकृष्णाच्या दैनिक चर्येचा, भगवंताला भोग-समर्पण करणाऱ्या क्रियेचा ही अंतर्भाव होतो. जयदेव, विद्यापती या कवींनी जी शृंगारिक परंपरा निर्माण केली त्याच्या प्रभावामुळेच रसनिरूपणाला हि सूरदासाने आपल्या काव्यात स्थान दिले. चित्रकाव्याच्या पद्धतीवर साहित्य लहरीतील दृष्टिकूटे हि लिहिली. परंतु आपली मूळची धार्मिक भूमिका दृष्टीआड कधी हि न केल्यामुळे सूरदासांचे राधाकृष्ण आराध्य दैवताच्या स्वरूपात च राहिले व त्यामुळे शृंगाराला ही प्रतिष्ठा मिळून गेली. श्रीकृष्णाची मुरली सूरदासाच्या दृष्टीने 'योगमाया' आहे त्यामुळे रासवर्णनात ही मुरली गोपिका रूपी आत्म्यांना आवाहन करून बाह्याडम्बराचा त्याग करण्यास प्रेरित करते व परमात्म्याच्या अगदी जवळ नेऊन ठेवते. या दृष्टीने 'मुरली अधर सजी बलवीर' बद्दल गोपींना वाटणारी असूया व 'धेनु तृन तजि वत्स मुख ठाडे छीर' चा खरा अर्थ लागू शकतो.

## व्रज भाषेतून उज्ज्वल साहित्यिक परंपरा निर्माण करण्याचे श्रेय सूरदासाकडे

कवित्वाच्या दृष्टीने पाहिले तर धार्मिक क्षेत्रात व्रजभाषेच्या माध्यमातून एक उज्ज्वल साहित्यिक परंपरा निर्माण करण्याचे श्रेय या साहित्यिक कवीला द्यावे लागेल. 'हरि किलकत जसुदा की कनियाँ, 'भीतर तें बाहर लौं आवत', यांसारख्या पदांतील वात्सल्याची प्रतीती सार्वजनिक व सार्वकालिक च राहील. माता व पुत्र यांच्यातील प्रेमाचे विश्वव्यापी स्वरूप सूक्ष्मतेने व्यक्त करणारा सूरदास वाङ्मयात चिरंजीव च राहील यात शंका नाही. वियोग शृंगाराचे वर्णन करताना गोपींच्या भावनांचे भ्रमरगीतांत केलेले वर्णन किंवा 'अति मलीन वृषभानु कुमारी' मधील राधा साहित्यात अमर ठरलेली आहे. कृष्णाला मथुरेला घेऊन जाण्यासाठी आलेला उद्धव काळा, भुंगा हि काळा म्हणून वरवर भुंग्याला परंतु खऱ्या अर्थाने उद्धवाला लिहिलेल्या भ्रमरगीताने ही अशा प्रकारच्या काव्यांची परंपरा निर्माण केली. यात सूरदासाने केलेले सगुणभक्तीचे भावपूर्ण मंडन भक्तांना दिलासा व प्रेरणा देणारे आणि साहित्यिकांना काव्यसौष्ठवामुळे अनुकरणीय ठरले. सूरदासाला 'पुष्टिमार्ग को जहाज' ही पदवी सांप्रदायिकांनी दिली व 'तत्त्व तत्त्व सूरा कहि' ही उक्ती त्याच्या बाबतीत सार्थ ठरलेली आहे. भक्तीच्या क्षेत्रात सूरदासाचा दृष्टिकोण सख्यभक्तीचा असल्यामुळे आत्मीयता जास्त दिसते.

## कवी नन्ददास आणखी एक शब्दसृष्टीचा ईश्वर

अष्ठछाप मधील दुसरा कवी नंददास हा ही शब्दसृष्टीचा ईश्वर आहे. 'यह कथा यथामति भाषा कीन्ही' असे विनयाने म्हणणाऱ्या या कवीने आपल्या शृंगार, करुण व शांत या रसांचा अनमोल खजिना वाचकांना उघडून दिलेला आहे. माधुर्य व प्रसाद हे गुण नंददासाच्या कवितेत पराकोटीला पोचले व हे काव्य वाचताना रसिकांना खरोखर च 'वृंदावन को रीझि मनो पहिराई माला' या कव्युक्तीचा अनुभव येतो. नंददासाचे 'भँवरगीत' 'और सब गढिया नंददास जडिया' याचा उत्कृष्ट अनुभव आणून देणारे काव्य आहे. या अष्टछाप मधले इतर कवी म्हणजे 'सन्तन कहाँ सीकरी सों काम' लिहिणारा कुम्भनदास, कृष्णदास, परमानंददास, चतुर्भुजदास, छीतस्वामी आणि गोविंद स्वामी.

## संत मीराबाई : माधुर्य भक्तीचा अनुपम आदर्श

'जाके सिर मोर मुकुट पति सोई' या भावनेने लोकलाज कुल शृंखला तजि' श्रीकृष्ण म्हणजे गिरिधर-भक्तीत रंगून जाणाऱ्या राजस्थानच्या मीरेने माधुर्य-भक्तीचा अनुपम आदर्श निर्माण केला. विरहिणी मीरेच्या कवितेत

आत्मनिवेदन आहे, अपूर्व तन्मयता आहे, शृंगार हि आहे परंतु वासनेचा स्पर्श नसल्यामुळे--

रैन अंधेरी विरह घेरी, तारा गिणत निस जाता
लै कटारी कंठ चीरूँ करूँगी अपघात ।।

असे लिहून सुद्धा त्यांतली आध्यात्मिकता च पाठकाला खिळवून टाकते. कला-कौशल्याची परवा न करता हि भावनिर्भरता काव्याला परतत्त्वाचा स्पर्श कसा प्राप्त करून देते याचे उत्तम उदाहरण म्हणजे मीरेची कविता.

## मुसलमान कृष्णभक्त रसखान

मीरे प्रमाणेच वैष्णव संप्रदायातील वल्लभ पंथीयात मुसलमान कवि रसखाना याच्या भौतिक प्रेमाची च परिणती आध्यत्मिकतेत झाली परंतु याचा उल्लेख आदराने करावा लागतो. प्रेमाच्या निःस्वार्थी रूपाचे चित्रण अत्यंत शुद्ध व्रजभाषेत च करून कवित्त छंदाबरोबरच सवैया छंदावर या मुसलमान कृष्णभक्ताने आपला कायमचा ठसा उमटवून टाकला. व्रजभूमीच्या निरतिशय प्रेमाने ओथंबलेला रसखानाचा---

मानुष हों तो वही रसखान, बसौं व्रज-गोकुल गाँव के ग्वारन ।
जो पशु हौं तो कहो बसु मेरो, चरौं नित नंदकी धेनु मंझारन ।।
पाहन हौं तो वही गिरिको, जु धर्‍यौं कर छत्र पुरंदर धारन ।
जो खग हौं तो बसेरौ करौं, मिली कालिन्दी कूल कदम्ब की डारन ।।

हा सवैया भक्ति वाङ्मयात फार प्रसिद्ध आहे. 'इन मुसलमान हरिजनन पै कोटिन हिंदू वारिए' हे भारतेन्दूंचे उद्‌गार सार्थ च आहेत.

## स्वामी हरिदास:संगीतमय कृष्णभक्ती

वल्लभीय संप्रदायाप्रमाणे राधावल्लभ संप्रदायाचे प्रवर्तक हितहरिवंश यांनी 'हितचौरासी' या ग्रंथात, गौडिया संप्रदायातील प्रमुख कवि गदाधर भट्ट यांनी आपल्या काव्यांत तसेच प्रथम निम्बार्क संप्रदायात सामील झालेले परंतु नंतर स्वतंत्र अशा टट्टी संप्रदायाचे संस्थापक व तानसेनाचे गुरू स्वामी हरिदास यांनी ही कृष्णभक्तीची अनन्यता मोठ्या प्रभावी, संगीतमय व्रजभाषेत प्रदर्शित केलेली आहे.

## घनानंदांचे काव्य : भाव व भाषा या दृष्टीने सरस

मीरा व रसखान यांच्या तोडीची भावार्द्र कविता लिहिणारे घनानन्द कालानुक्रमाने रीतिकालात मोडत असले तरी वियोगांतील प्रेमाची खरी महती प्रतिपादन करण्याच्या दृष्टीने यांचा अंतर्भाव भक्तिकाळातच करावा लागेल. यांच्या कवितेत 'सुजान' हे नाव अनेक वेळा येते. दंतकथेनुसार या वेश्येवर यांचे प्रेम होते परंतु

तिने झिडकारल्यामुळे हे कृष्णभक्तीकडे वळले. परंतु यानंतर यांनी विरहाचे जे कवित्त व सवैये लिहिले ते भाव व भाषा या दोन्ही दृष्टीनी अत्यंत सरस ठरले. घनानंदाचा मेघदूत 'परकाज हि देह को धारें', फिरत असतो व 'निधी नीर सुधाके समान करौ, सबहि विधी सज्जनता सरसौ' हेच त्याचे व्रत. शुद्ध वज्रभाषा लिहिण्यात रसखाना बरोबर घनानंदाचे नांव घेतले जाते. भक्तांचा यथार्थ गौरव करणाऱ्या कवीत नरोत्तमदासांच्या 'सुदामाचरित्र' व 'ध्रुवचरित्र' या काव्यांचे स्थान हि वरच्या दर्जाचे आहे. 'सुदामाचरित्रा' तील 'सीस पगा न झगा तन में अरू जाने को आहि बसे केहि ग्रामा। धोती फटी-सी लटी दुपटी अरू पांय उपानहुँ के नहिं सामा "असा दीन, दुर्बल सुदामा द्वारकाधीशांकडे आला व त्याच्या प्रेमाची अनन्यता लक्षात घेऊन श्रीकृष्णाने त्याचे 'अँसुवान के जल सों पग धोये" असे वर्णन या रसिक कवीने केले.

या नंतरच्या विलासी प्रवृत्तीने भारलेल्या रीतिकाळातील बिहारी, पद्माकर वगैरे प्रतिभाशाली कवींनी ही कृष्णभक्तिपर कविता लिहिली पण त्यांच्या भक्तीवर शृंगाराचा च पगडा अधिक होता. रीतिकालीन कवितेतील कृष्ण व राधा वस्तुतः प्रियकर व प्रेयसी या रूपांत च वाचकांच्या पुढे येतात. त्यामुळे ही भक्ती नसून हा निव्वळ शृंगार च मानला पाहिजे. रामकाव्यापेक्षा कृष्ण-काव्यात विलासी प्रवृत्तीला अधिक वाव असल्यामुळे आशयाच्या दृष्टीने ही कविता अधिकाअधिक निकृष्ट होत गेली यात नवल नाही. परंतु कबीराच्या काळापासून घनानंदाच्या म्हणजे नादिरशहाच्या काळापर्यंत हिंदी साहित्यातील भक्तिपरक कवितेची विविध रूपे अत्यंत विलोभनीय आहेत व यामुळे काव्याच्या दृष्टीने हिन्दी साहित्यांत हा सुवर्णकाळ ठरावा यात नवल नाही.

[ लोकराज्य - ६ जानेवारी १९७५ ]

# १८. मराठा अमदानीतील संस्कृत सारस्वताची साधना

संस्कृत सारस्वताची व तदनुषङ्गाने संस्कृत विद्यांची निष्ठापूर्वक जोपासना करण्यात महाराष्ट्राला मानाचे स्थान द्यावे लागेल याबद्दल विचारवंतात दुमत होण्याचे कारण नाही. संस्कृत भाषेच्या अध्ययनाला प्रोत्साहन देण्याचे कार्य हि महाराष्ट्राने आजवर सातत्याने केलेले आहे. भर्तृहरीने आपल्या वैराग्यशतकात 'सुभाषितसरसकवयः दाक्षिणात्याः' असे म्हणून दक्षिणभारताला जे श्रेय दिले त्यात महाराष्ट्राचा हि अन्तर्भाव होता यात शंका नाही. चारी वेदांच्या स्वाध्यायाची परम्परा महाराष्ट्राने कायम राखली; इतकेच नव्हे तर आज हि स्वाध्यायात च संपूर्ण जीवनाचा होम करणारे ऋषितुल्य पण्डित महाराष्ट्रात अनेक ठिकाणी आढळतात. श्रौतयज्ञ व गृह्यविधीबरोबर सात होमयज्ञ करणारे शंकर वासुदेव नातु दीक्षितायांसारखे पण्डित म्हणजे महाराष्ट्राच्या या विषयातील आस्थेचा च बिनतोड पुरावा आहे. महाराष्ट्राच्या संस्कृत गद्यरचनेचा प्रारंभ खिस्तोत्तर दुसऱ्या शतकात च झालेला होता हे उषवदाताच्या नाशिक गुंफेतील शिलालेखावरून स्पष्ट होते.

राष्ट्रकूटांच्या काळापासून महाराष्ट्राच्या शासकांकडून संस्कृत विद्यांना प्रोत्साहन मिळत आलेले आहे. महाराष्ट्रात मुसलमानांची सत्ता दृढमूल झाल्यापासून या प्रोत्साहनात खण्ड पडला हे जरी खरे असले तरी सतराव्या शतकात कवीन्द्राचार्य सरस्वती या चतुरस्र महाराष्ट्रीय पंडिताने शहाजहानच्या दरबारात पंडितांचा मोर्चा नेऊन वाराणसी व प्रयागच्या हिन्दू यात्रेकरूंवर बसविलेला अन्याय्य कर रद्द करवून घेतला व तत्कालीन जनतेची वाहवा मिळवली ही गोष्ट प्रसिद्ध आहे. राजकारणात मराठ्यांना महत्त्व मिळू लागल्यानंतर म्हणजे वस्तुतः शहाजी भोसल्यांच्या काळापासूनच संस्कृत विद्यांच्या अध्ययनाला उत्तेजन मिळावे यात आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. स्वतः शहाजीराजे भोसले यांनी संस्कृत विद्वानांना आपल्या दरबारी आश्रय दिला होता. सन् १६७३ मध्ये लिहिल्या गेलेल्या 'पर्णालपर्वतग्रहणाख्यान' या ग्रंथाचा कर्ता जयराम पिण्ड्ये हा शहाजीराजांचा आश्रित. म्हणजे शिवाजीराजांची पन्हाळगडावरून सुटका हा या ग्रंथाचा विषय. 'राखामाधवविलासचम्पू' हा चम्पूवाङ्मयातील लक्षणीय संस्कृत ग्रंथ हि जयराम पिण्ड्येनी लिहिलेला आहे. नेवासेनिवासी कवीन्द्र परमानन्दाने शिवचरित्रावर बत्तीस सर्गांचे 'शिवभारत' हे महाकाव्य लिहून इतिहासाच्या अभ्यासकांना तत्कालीन घटनांवर प्रकाश टाकणारे एक साधन उपलब्ध करून दिलेले आहे.

हरिकवि ऊर्फ भानुभट्टयाने सन् १६८५ त लिहिलेल्या 'शंभुराजचरित' चा

नायक शंभुराज म्हणजे सुप्रसिद्ध शिवाजीमहाराजांचा पुत्र संभाजी च होय हे कै. प. कृ. गोडे यांनी अन्तर्गत पुराव्यावरून सिद्ध केलेले आहे. 'सुभाषितहारावली' व 'शंभुविलासिका' या टीकेसह 'हैहयेन्द्रचरित' हे ग्रंथ हि या हरिकवीने च लिहिले. 'हैहयेन्द्रचरित' व त्यावरील संस्कृत टीका लिहिण्याची प्रेरणा संभाजीकडून मिळाली असे म्हणण्यास बराच पुरावा उपलब्ध आहे. स्वतः संभाजी हा हि 'काव्यसाहित्यपुराणागीतकोदण्डविद्यार्णव पारगामी' म्हणण्याइतपत सुविद्य व रसिक होता हे त्याने लिहिलेल्या 'बुधभूषण' ग्रंथावरून समजण्यासारखे आहे. 'बुधभूषण' मधील उद्धरणांत कविकलश उर्फ कलुषाच्या हि कांही कविता आढळतात. ( संगमेश्वर येथे राहणाऱ्या केशवपण्डिताने आपल्या 'राजारामचरित' या पाच सर्गाच्या काव्यात मराठी राज्य वाचविण्यासाठी राजारामाने केलेल्या महान् प्रयत्नाचा गौरव केलेला आहे. पुरुषोत्तम नावाच्या कवीच्या 'शिवकाव्य' या संस्कृत गंथात शिवाजीपासून बाजीरावापर्यंतची मराठ्यांच्या उदयास्ताची गाथा काव्यबद्ध झालेली दिसते. याच काळात जयपूरच्या पहिल्या रामसिंगाच्या दरबारी असलेल्या विश्वनाथ महादेव रानडे (१३५०-१७८०) या कवीने 'शंभुविलास' हे काव्य लिहिले.

मराठीत पंतकवि म्हणून प्रसिद्ध असलेले वामनपंडित व मोरोपंत या दोघांनी हि संस्कृत ग्रंथांची निर्मिती केलेली आहे. 'अनुभूतिलेश' व 'सिद्धान्तविजय' हे वामनपंडितांचे संस्कृत ग्रंथ प्रसिध्द आहेत. शिवाय भागवतपुराणातील दहाव्या स्कंधाच्या 'वेदस्तुती' नामक प्रकरणावर 'श्रुतिकल्पलता' नावाची सुन्दर टीका हि त्यांनी लिहिलेली आहे. पेशव्यांचे सरदार बाबूजी नाईक बारामतीकर यांच्या आश्रयाला असलेल्या मोरोपंतांनी तर संस्कृतात एकूण ४९१८ श्लोक लिहिले. यांच्या मन्त्ररामायणातील (श्लोक संख्या ३९९२) प्रत्येक काण्डात दर तेरा श्लोकांच्या एकाखाली एक लावलेल्या अक्षरांनी 'श्रीराम जयराम जय जय राम' मंत्र तयार होतो! क्वचित् प्रसंगी मोरोपंतांनी संस्कृतात अभंगासारखी मराठी वृत्ते हि आणलेली आहेत. संस्कृत रचना करणाऱ्या समकालीन मराठी कवीत शाहीर रामजोशींचा हि अन्तर्भाव करणे आवश्यक आहे. यांच्या काही लावण्यात मराठी, हिन्दी व कानडी भाषांबरोबर संस्कृतमध्ये लिहिलेले संपूर्ण चरण आढळतात.

सतराव्या व अठराव्या शतकात तंजावरला हि मराठ्यांनी म्हणजे भोसल्यांनी राज्य स्थापले होते हे प्रसिद्ध आहे. यांपैकी कांही राजे स्वतः लेखक असून त्यांनी संस्कृतात काव्यरचना केली. शहाजी (सन १६७४ - १७११) ने 'चंद्रशेखर विलास' नावाचे नाटक लिहिले तर सरफोजी भोसले (सन १७९८-१८३३) याने 'कुमारसंभवचम्पू', 'मुद्राराक्षस छाया' हे ग्रंथ लिहिले. 'स्मृतिसंग्रह' व 'स्मृतिसारसमुच्चय' यां सारखे ग्रंथ हि याच्या नांवावर आहेत. शहाजी भोसलेचा

भाऊ तुळजेन्द्र (सन १७२९-१७३५) याचा 'संगीतसारामृत' हा संगीतावर लिहिलेल्या ग्रंथात मुकुटमणि मानला जातो. याच्या हि पूर्वी 'वेंकटभारवी'ने 'चतुर्दण्डप्रकाशिका' हा संगीतावरला ग्रंथ लिहिला होता. अशा साहित्यप्रेमी विद्वान राजांच्या आश्रयाला असलेल्या लोकांनी त्यांच्या प्रेरणेने संस्कृतात काव्यरचना करावी हे स्वाभाविक च म्हटले पाहिजे.

वर उल्लेख केलेल्या शहाजीचा अश्रित श्रीधर व्यंकटेश याने 'शाहेन्द्रविलासकाव्य' या ग्रंथात आपल्या आश्रयदात्याच्या गुणांचे गौरवपूर्ण वर्णन केले आहे. 'दयाशतक', 'मातृभूशतक' व 'तारावलीशतक' ही तीन शतके लिहून श्रीधरव्यकंटेशाने 'शतकत्रय' लिहिण्याचा हि मान मिळविला. 'मुद्राराक्षस' या प्रसिद्ध संस्कृत नाटकाचा टीकाकार धुंडिराज (सन १७१३) हा आपल्या 'शाहविलास' या काव्यात या शहाजी भोसलेची च स्तुती करतो. तंजावरचा राजा तुकोजी (सन १७२८-१७३५) याचा अमात्य घनश्याम तर आपल्या काळातील जबर्दस्त लेखक. याच्या नावावर शाकुन्तल, उतररामचरित यांच्यावरच्या संस्कृत टीका, 'गणेशचरित' 'कुमारीविजय' यांसारखी नाटके, 'भागवतपादचरित', 'वेंकटेशचरित' यासारखी काव्ये, मिळून एकूण ६४ संस्कृत ग्रंथ आहेत. भवभूतीचे महावीरचरित याने च पूर्ण केले असे मानले जाते. याचा मुलगा गोवर्धन याने 'रूक्मिणीचम्पू' लिहिला.

शिवकालापूर्वीपासून महाराष्ट्रीयांनी संस्कृतमध्ये निरनिराळ्या शास्त्रीय ग्रंथांची रचना करून संस्कृत सारस्वताची प्रशंसनीय सेवा केलेली आहे. मराठवाड्यातील पैठण हे सोळाव्या शतकापासून च संस्कृत विद्वानांचे आश्रयस्थान होते अशी इतिहासाची साक्ष आहे. पैठणचा भट्ट परिवार धर्मशास्त्राच्या अभ्यासात अग्रेसर होता. 'प्रयोगरत्न', 'विवादरत्न' वगैरे ग्रंथांचा कर्ता नारायण भट्ट (अंदाजे सन १५१३) व 'धर्मद्वितनिर्णय', 'सर्वधर्मप्रकाश' व 'श्राद्धकल्पसार' यांचा लेखक शंकर भट्ट (सन १५४० ते १६००) ही पितापुत्रांची जोडी प्रसिद्ध आहे. रामकृष्ण भट्ट हा नारायण भट्टांचा सगळ्यात मोठा मुलगा. याने 'जीवत्पितृकृत्यनिर्णय' हा ग्रंथ लिहिला. याचे दोन्ही मुलगे दिनकर व कमलाकर हे हि पंडित म्हणून गाजले. कमलाकर भट्टांचा (सुमारे सन १६२५) 'निर्णयसिंधु' हा हिंदु कायदा व धर्मशास्त्र क्षेत्रात प्रमाणभूत ग्रंथ मानला जातो. या कमलाकर भट्टाचा चुलत भाऊ नीलकंठ (सुमारे सन १६१०-१६४५) हा धर्मशास्त्र व कायदा या दोन्ही क्षेत्रातील नामांकित लेखक. 'व्यवहारमयूख' हे याच्या प्रसिद्ध ग्रंथाचे नाव. या ग्रंथाचे हकूण १३ मयूख आहेत. यापैकी 'व्यवहारमयूख' हा मुंबई हायकोर्टाच्या दृष्टीने गुजराथ, मुंबई व उत्तर कोकण या विभागात आज हि प्रमाणभूत मानला जातो. 'आचारप्रदीपिका', 'धर्मशास्त्रसारसर्वस्व' या ग्रंथांबरोबर 'सापिण्डनिर्णय'

व 'सुतकनिर्णय' हे ग्रंथ लिहिणारे भट्टोजी दीक्षित (१५७५ ते १६५०) हे हि मूलतः महाराष्ट्रीय असावे असे वाटते.

शिवराज्यभिषेकाशी संबंध आल्यामुळे गागाभट्टाचे नाव महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. याचे मूळ नाव विश्वेश्वर. याने शिवाजीचा राज्यभिषेक धर्मशास्त्रदृष्ट्या योग्यच होता हे पटवून हिले. निरनिराळ्या विद्रत्परिसंवादांत भाग घ्यावा लागल्यामुळे याचा 'कायस्थधर्मप्रदीप' हा ग्रंथ निर्माण झाला. 'शिवराज्यभिषेकप्रयोग' या आपल्या पुस्तकात गागाभट्टाने राज्यभिषेकाच्या पद्धतीचे वर्णन केलेले आहे. पैठणच्या अनंतदेवाचा 'राजधर्मकौस्तुभ' व रघुनाथ पंडिताचा 'राज्यव्यवहार कोश' हे दोन्ही राजनीती व कायदा या विषयांवरले ग्रंथ हि शिवाजीच्या काळात निर्माण झाले. राज्यव्यवहार कोशाच्या पुष्पिकेत रघुनाथ पंडिताने 'श्रीशिवछत्रपतिप्रियामात्येन नारायणाध्वरिसूनुना रघुनाथपण्डितेन शिवराजनियोगतः कृते राज्यव्यवहारकोशे पण्यवर्गो नाम दशमः (सर्गः)' असे लिहून ठेवले असल्याकारणाने या ग्रंथाला शिवाजीकडून प्रेरणा मिळाली होती हे मान्य करण्यास हरकत नाही. अशा प्रकारचे ग्रंथ लिहवून घेऊन आपल्या भाषा समृद्ध करण्याची शिवाजीमहाराजांची योजना मोठी दूरदर्शी होती. या योजनेचा पाठपुरावा मात्र नंतर होऊ शकला नाही हे दुर्दैव. 'राज्यव्यवहार कोश' हि शिवाजीच्या हयातीत पूर्ण न होता राजारामांच्या काळात प्रकाशित झाला असे दिसते.

संभाजीसाठी केशव पंडिताने 'धर्मकल्पलता' व 'कायस्थपरभूनिर्णय' हे ग्रंथ लिहिले. त्र्यंबक हणमंतेची 'त्र्यंबकी' म्हणजे 'अशौचनिर्णय' हा ग्रंथ हि संभाजीच्या काळात च निर्माण झाला. अठराव्या शतकाच्या सुरवातीला तंजावरच्या एकोजी भोसलेची राणी दीपाबाई हिच्या आश्रयाला असलेल्या रघुनाथाने 'धर्मामृतमहोदधिः' लिहिला तर शाहूच्या आश्रयाने शिवदीक्षिताने 'धर्मतत्त्वप्रकाश' व त्र्यंबक भट्टाने 'प्रतिषेध' हे ग्रंथ लिहिले. तंजावरच्या दुसऱ्या सरफोजी (१८००-१८३२) ने धर्मशास्त्रपर ग्रंथांना उत्तेजन दिले व सरस्वती महाल ग्रंथालय व म्युझियम ची स्थापना केली. धुंडिव्यासकृत 'राज्यव्यवहार कोश' हा शासनव्यवस्थेवरला महत्त्वाचा ग्रंथ हि सरफोजीच्या प्रेरणेची च परिणती होय. बाळकृष्ण पायगुंड याने 'मिताक्षरे'वर आपल्या आईच्या नांवाने लिहिलेली टीका बाळंभट्टी या नावाने प्रसिद्ध आहे. याज्ञवल्क्यस्मृतीचा व्यापक अर्थ लावून कायद्याच्या क्षेत्रात स्त्रियांची उत्तम तरफदारी करण्याचे काम बाळंभट्टीने केले. एकोणीसाव्या शतकाच्या सुरवातीला 'श्राद्धमंजरी' (१८१०) , 'प्रायश्चित्तमंजरी' (१८१४) आणि 'कृत्यमंजरी' (१८१८) हे ग्रंथ बापूभट्ट केळकराने रचले. धर्मशास्त्रावरील ग्रंथांची विपुलता त्या क्षेत्रातील महाराष्ट्रीय विद्वत्तेची जशी

निदर्शक आहे तशीच सामाजिक दृष्टीने वर्णभेदाची चौकट अधिकाअधिक भक्कम होत चालली हे हि सूचित करते हे विसरणे योग्य होणार नाही.

इतर शास्त्रांच्या निर्मितीबाबतीत हि या काळात महाराष्ट्रीयांनी बरीच प्रगती केलेली आहे. पूर्वमीमांसेची थोडक्यात परंतु पद्धतशीर ओळख करून देणारा 'मीमांसा-न्याय प्रकाश' हा आपदेवा (१६०० ते १६५०) चा ग्रंथ या काळातच निर्माण झाला. आपदेव हा अनंतदेवाचा मुलगा व विख्यात मराठी संत एकनाथांचा पणतू पण होता. या आपदेवाच्या मुलाने म्हणजे दुसऱ्या अनंतदेवाने हि 'अग्निहोत्र प्रयोग,' 'आधान पद्धति' 'मीमांसान्यायप्रकाश-टीका' इत्यादि १८ ग्रंथ लिहून शास्त्रीय वाङ्मयात मोलाची भर टाकली. याचा शिष्य रघुनाथ गणेश नवहस्त (नवाथे) हा अहिताग्नी होता व याला श्रीरामदासांनी चाफळच्या देवस्थानचा प्रमुख म्हणून नेमले होते. सन १६८३ त ही जागा सोडून रघुनाथाने वाराणसीची यात्रा केली व नंतर तंजावरला जाऊन राणी दीपांबिकेचा आश्रय घेतला, याने हि 'चातुर्मास्य प्रयोग', 'अतिपवित्रेती प्रयोग' यांसारख्या सुमारे १०-१२ ग्रंथांची रचना केली व नंतर मराठी हि लिहावयास सुरवात केली. महाराष्ट्रातून जाऊन वाराणसीला स्थायिक झालेल्या विद्वन्मान्य महाराष्ट्रीय कुटुंबात भैरव दीक्षित जड्ये, गोपीनाथ दीक्षित (१७३३ ते १७८३) इत्यादि ग्रंथलेखकांचा आदराने उल्लेख करावा लागतो.

न्याय-वैशेषिक दर्शनाचे पंडित व उद्गाते म्हणून महादेव पुणतांबेकर (१६५० ते १७८०) व कृष्णभट्ट आर्डे (१७५०-१८२५) यांची नांवे महाराष्ट्रात प्रसिद्ध आहेत. सतराव्या शतकात भट्टोजी दीक्षितांचे कुटुंब व्याकरणाच्या चिकित्सक अध्ययनासाठी प्रसिद्ध होते. 'बृहत्शब्देन्दुशेखर' व 'परिभाषेन्दुशेखर' यांसारख्या विख्यात ग्रंथांचा लेखक नागेश अथवा नागोजी भट्ट (मूळ आडनाव काळे) हा सांगली जिल्ह्यातील तासगावचा राहणारा; परंतु याचे सर्व आयुष्य वाराणसीत गेले. नागोजी भट्टाचे शिष्य वैद्यनाथ पायगुंडे व त्याचे शिष्य नीळकंठशास्त्री थत्ते यांचे अठराव्या शतकातले व्याकरणावरचे ग्रंथ हे व्याकरणविद्येचे निकष मानले जातात. तंजावरच्या राजा एकोजीने आयुर्वेदाला खूप प्रोत्साहन दिल्यामुळे आनंदराम माखिनकृत 'जीवानंदम्' हे आयुर्वेदावरील रूपकात्मक नाटक लिहिले गेले. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात 'योगरत्नाकर' नांवाचे आयुर्वेदावरील पुस्तक महाराष्ट्रात अत्यंत लोकप्रिय ठरले. दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दीत 'विलासमणिमञ्जरी' हा बुद्धिबळावरला संस्कृत ग्रंथ याचा परिचय स्वतंत्र लेखात करून दिलेला आहे.

तात्पर्य, मराठ्यांच्या अमदानीत निरनिराळ्या शास्त्रांवर संस्कृतमध्ये अनेक

विद्वत्ताप्रचुर पुस्तके लिहिली गेली. महाराष्ट्रात शिवाजी व तंजावरचे शहाजी, एकोजी व सरफोजी या राजांनी संस्कृत विद्यांना फार मोठे प्रोत्साहन दिले. शिवपुत्र संभाजी व तंजावरचे राजे हे स्वतः रसिक, विद्यांचे भोक्ते, कलांचे आश्रयदाते व लेखक हि होते. शिवाजीने समर्थ रामदास स्वामींच्या प्रेरणेने विद्वानांना दक्षिणा देऊन त्यांचा गौरव करण्याचा पायंडा पाडला. ही दक्षिणा देण्याची पद्धत पुढे पेशव्यांनी फारच लोकप्रिय केली व पुणे हे विद्वानांचे माहेरघर व्हावे या दृष्टीने प्रयत्न केले. तत्कालीन भारतातल्या निरनिराळ्या भागांतून संस्कृतचे विद्वान पुण्यात येत असत व त्यांची कसून परीक्षा घेतली जाई. यामुळे पुण्यात व नाशिक, सांगली मिरज सारख्या ठिकाणी परंपरा कायम राहिली. पेशव्यांच्या राजवटीचा शेवट झाल्यानंतर माउंट स्टुअर्ट एलफिस्टनने सन १८२१ मध्ये दक्षिणा फंडातूनच रक्कम काढून पुण्यात संस्कृत कॉलेजची स्थापना केली. संस्कृत विद्यांच्या प्रोत्साहनाचा हा इतिहास लक्षात घेतला तर ही परंपरा स्वतंत्र भारतातील विद्यमान महाराष्ट्र शासनाने कायम ठेवावी ही अपेक्षा करणे रास्तच नव्हे का?

[ 'सुधन्वा' फेब्रुवारी १९७३ ]

# १९. विलास मणिमञ्जिरी बुद्धिबळावरील संस्कृत ग्रंथ

संस्कृत साहित्य म्हटले की वेदांपासून उपनिषदांपर्यंतचे ग्रंथ, कौटिल्याचे अर्थशास्त्र, महाभारत व रामायण ही राष्ट्रीय महाकाव्ये, कालिदास-भवभूती इत्यादिकांची नाटके, रघुवंशापासून नैषधीयचरितापर्यंतची पांच महाकाव्ये, बाण, दंडी, सुबंधु यांनी निर्माण केलेले कथासाहित्य, मनस्मृतीसारखे धर्मशास्त्रावरील ग्रंथ, तत्त्वज्ञानपर ग्रंथात बादरायणाची सूत्रे व त्यावरील आचार्यांची भाष्ये इत्यादींचा बोध होतो. विस्तार व गुणवत्ता या दोन्ही दृष्टीने एवढे साहित्य हि कमी नव्हे; एका व्यक्तीच्या अवलोकनात हे सर्व येऊन जाणे हि कठीण. 'अनन्तपारं किल शब्दशास्त्रं स्वल्पं तथायुर्बहवश्च विघ्नाः' असा च त्याला अनुभव येईल; परंतु संस्कृत साहित्याचा विस्तार व त्याची विविधता इथे संपत नाही हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. पदार्थ-विज्ञान, रसायन, गणित, स्थापत्यशास्त्र, वैद्यकशास्त्र इत्यादि शास्त्रीय विषयांवर हि संस्कृतात बरीच ग्रंभनिर्मिती झाली. इतकेच नव्हे तर संगीत, नृत्य यासारख्या कलांवर हि पुष्कळ चांगले लिहिले गेले. गजपरीक्षा, अश्वपरीक्षा सारख्या विषयांची चर्चा करणारे ग्रंथ हि संस्कृतात रचण्याची अडचण लेखकांना भासली नाही याची माहिती पुष्कळांना नसते. म्हणूनच बुद्धिबळासारख्या आज जगात मोठ्या प्रमाणावर प्रचलित असलेल्या खेळावर अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात लिहिलेया एका संस्कृत ग्रंथाची ओळख करून देणे रंजक ठरेल असे वाटते.

मराठ्यांच्या इतिहासात दुसऱ्या बाजीरावाची प्रतिमा एका रंगेल व विलासी पेशव्याची आहे. विलासातच सोंगट्या, बुद्धिबळे यांसारख्या बैठ्या खेळांचा अंतर्भाव होतो. या बाजीरावाच्या पदरी मूळचा तिरूपतीचा रहाणारा त्रिवेंगडाचार्य नावाचा एक कानडी संस्कृतज्ञ पंडित होता. याचे वर्णन करताना 'कविरष्टावधानादिकलाविलोलः' असे शब्द वापरलेले आहेत. बुद्धिबळातले याचे कौशल्य वाखाणण्यासारखे होते. बाजीरावाच्या सदाशिव (बहुधा सदाशिव माणकेश्वर) या सचिवाचा याच्यावर विश्वास होता. म्हणूनच एके दिवशी बाजीरावाने आपल्या या सचिवाला त्याच्याकडून बुद्धिबळावर एक संस्कृत ग्रंथ लिहवून घेण्याची सूचना केली. हा ग्रंथ 'चातुरंगप्रधान' म्हणजे बुद्धिबळाच्या डावाचा असावा व विद्वान राजसंघांनी हि या ग्रंथाला मान देण्याच्या योग्यतेचा असावा अशी बाजीरावाची अपेक्षा होती हे 'भव्यो ग्रंथो नवीन सकलजनहितश्चातुरंगप्रधानो विद्वांसो राजसंघाः प्रमुदितहृदयाः शेखरे यं वहेयुः'. या प्रस्तावनेतील ओळीवरून स्पष्ट होते. संस्कृतातील इतर अनेक शास्त्रीय

ग्रंथांप्रमाणे हा श्लोकबद्धच असावा ही अपेक्षा 'सुसंस्कृतं कारय पञ्चजालैः' या शब्दांवरून लक्षात येते. हा ग्रंथ इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्या संग्रही होता व धुळ्याच्या राजवाडे संशोधन मंडळाने सन् १९३९ मध्ये हा छापून प्रसिध्द केला.

मणिमञ्जरीत बुद्धिबळाचे एकंदर शंभर डाव त्यांच्या उलगड्यांसह दिलेले आहेत. पहिली चौसष्ट विलासरत्नरूपी पाने या मञ्जरीला शोभा-आणतात. चार दीर्घ विलासरत्ने म्हणजेच या मञ्जरीचा देठ. पुढचे सोळा हो या मञ्जरीची फुले; सोळा विलासरत्ने हीच मञ्जरीची फळे व एक उत्कृष्ट डाव हे मञ्जरीचे अग्र मानले पाहिजे असे या लेखकाचे म्हणणे. म्हणूनच ही मञ्जरी 'शतरत्नौघखचिता' व 'परितः स्फुरतप्रभा' झालेली आहे.

## खेळाच्या पद्धती

या शास्त्रीय ग्रंथाची सुरवात परिभाषेने होते. साहजिकच लेखकाने सुरवातीला च 'हैदुस्थानं च कार्णाटं वैलायतमिति त्रिधा' या शब्दांत हिदुस्थानी, कर्नाटकी व विलायती बुद्धिबळे खेळण्यावच्या तीन पद्धतींचा उल्लेख केलेला आहे व जोराजोरी आणि मारामारी या दोन प्रकारांनी बुद्धिबळे खेळली जातात हे ओळखून त्यांचा निर्देश 'निर्बलं सबलं चेति द्विविधं परिकीर्तितम्' करून टाकला. ग्रंथातील डावात लेखकाने सहाजिकच भारतात प्रचलित असलेल्या पद्धतीचा उपयोग केला; परंतु विरुद्ध राजे एकाच पट्टीत समोरासमोर मांडण्याची विलायती पद्धत सोयीची म्हणून तिचा च अवलंब करण्यात त्याने काही गैर मानले नाही हे विशेष. बुद्धिबळात चांगला खेळणारा कोण हे हि सांगण्यास त्रिवेंगडाचार्य विसरले नाहीत. याशिवाय प्रस्तावनेत बुद्धिबळाच्या काही पद्धतींची वैशिष्ट्ये हि नमूद केलेली आहेत. उदाहरणार्थ बुद्धिबळातील प्यादी प्रतिपक्षाच्या पहिल्या ओळीपर्यंत गेली की त्यांचे वजीर होतात हे कर्नाटकी पद्धतीचे वैशिष्ट्य. बुद्धिबळातील निरनिराळ्या मोहऱ्यांच्या चालीचे वर्णन 'एकशेषे प्रमत्ताः स्युरूष्ट्राश्वगजमंत्रिणः' या शब्दांत करून 'नृपतुल्य भवेन्मंत्री'त वजीराचे महत्त्व सांगितलेले व घोडा अडीच घरे उड्डाण करून जाऊ शकतो हे 'गमने शकटो भटान् । उल्लंघ्य याति सदनद्वयं कोणेन मानवाः' या ओळीत स्पष्ट केले. विलायती पद्धतीत प्यादी ही स्वेच्छेने दोन घरे जातात हे हि लेखकाने स्पष्ट केले. बुद्धिबळातील विजिगीषूंना या क्षेत्रात जगावर विजय मिळवता यावा या हेतूने ग्रंथात दिलेले डाव अभेद्य, दुर्गम, षिषम, विस्मयप्रद व लोकविलक्षण आहेत हे ग्रंथकाराने स्वतः सांगितले; त्याची प्रचीती तज्ज्ञांनी प्रत्यक्ष खेळीवरून करून घेतली पाहिजे.

## खेळाची शास्त्रीय मांडणी

ग्रंथाच्या रचनेत लेखकाने अर्थात् संस्कृत शास्त्रीय वादविवाची भाषा वापरली असल्यामुळे डाव घालणे याला पूर्वपक्ष, आक्षेप, शङ्का, प्रश्न असे शब्द येतात व डाव उलगडण्याला उद्देशून, सिद्धांत, उत्तरपक्ष, समाधान वगैरेंचा उपयोग केलेला दिसतो. पूर्वपक्षाची मांडणी व उत्तरातली खेळी यांची रचना सुंदर श्लोकांत केलेली आहे. पहिले चौसष्ट डाव विलायती व हिंदुस्थानी. ह्या दोन्ही पद्धतीत समान आहेत; नंतरचे सोळा शुद्ध विलायती पद्धतीचे आहेत. त्याच्या पुढचे सोळा नुसती मात देण्याचे आहेत. अखेरचा डाव चार निरनिराळ्या प्रकारे सोडवायचा असल्यामुळे ते खरे चार डाव मिळून शंभर डावाच्या या ४ गटांमुळे ग्रंथाचे दोन्ही स्तबक चार चार खंडांचे आहेत हे हि स्पष्ट करण्याचे लेखक विसरला नाही. उंटासाठी कधी उष्ट्र तर कधी रथ, घोड्यासाठी काही ठिकाणी 'शकट' तर काही ठिकाणी 'व्रीती' असे शब्द वापरल्यामुळे मात्र वाचकाची अडचण होते हे मान्य केले पाहिजे.

या ग्रंथातले पहिले चौसष्ट डाव 'पेदमातु'चे म्हणजे प्यादेमातीचे आहेत हे या ग्रंथाचे विलोभनीय वैशिष्ट्य. प्यादेमात बुद्धिबळात सर्वाधिक कौशल्याची मानली जाते. किती खेळीत डाव संपवायचा याला हि महत्त्व. तरच विजय मिळतो. सन १९५५ मध्ये एलुसु येथे झालेल्या पहिल्या राष्ट्रीय स्पर्धेत नऊ फेऱ्या होईपर्यंत अपराजित असलेले सांगलीचे भालचंद्रपंत म्हैसकर दहाव्या फेरीत चुकीची खेळी केल्यामुळे आंध्रच्या दीक्षित यांच्याकडून पराजित झाले होते. या दृष्टीने या ग्रंथातले ११, १२, १३ हे प्यादेमातीचे डाव फार आश्चर्यकारक आहेत यात शंका नाही. अमुक खेळीत डाव संपवायचा हे या ग्रंथकाराने श्लोकाच्या बाहेर प्रारंभी सांगितले आहे. सुरवातीला विजेत्या पक्षाची मांडणी स्पष्ट करताना लेखकाने 'अथ' किंवा 'तु' हे शब्द वापरलेले आहेत.

## काव्य म्हणून हि सरस

हा शास्त्रीय पद्धतीने लिहिलेला ग्रंथ आहे हे खरे; परंतु श्लोकबद्ध असल्यामुळे या लेखकाचे वृत्तांवरील प्रभुत्व लक्षात आल्यावाचून रहात नाही. 'रथगजौ सचिवादिमषष्ठगौ परनृपो निजव्रीतिचतुर्थगः' यातील भुजंगप्रयात 'परस्यान्यथाचलने चतुर्भिरिव बंधः परिभावनीयः' मधील भुजंगप्रयात, 'अथ नरपतिगेहात् पंचमेऽन्यो मनुष्यः । 'सचिव रथनिकाय्यात्सप्तमे मानवोऽन्यः' यांमधील मालती वगैरे वृत्ते उत्तम जमलेली आहेत. 'पंचचामरा' वर लेखकाचे विशेष प्रेम दिसते. 'मणिमञ्जरी' या नावाचे रूपकात्मक पद्धतीने केलेले विश्लेषण त्रिवेंगडाचार्यांच्या कवित्वशक्तीचे गमक आहे असे म्हणण्यास हरकत

नाही. 'अमात्य-हति-मंदिरे घरेश घोटकालये गजः' यासारखी रचना कवीलाच सुचणार. शास्त्रीय ग्रंथात काटशहाला 'विलंघ्यु' प्यादेमार्तासाठी 'भटबंधनम्' ,शह द्यावा या अर्थी 'वदेत' (वद्-इंग्रजीत to hurl defiance at ) यांसारखे पारिभाषिक 'शब्द' यावेत हे स्वाभाविक च आहे. परंतु वजीरासाठी कधी 'प्रधानं' (नपुं), कधी 'फर्जी' असे शब्द किंवा उंटासाठी 'उष्ट्र', चक्री, 'रथ' हे तीन्ही शब्द आलटून पालटून वापरण्याने लेखकाचे भाषाप्रभुत्व दिसले तरी शास्त्रीय ग्रंथाच्या वाचकाचा थोडा बुद्धिभेद होतो हे कबूल करण्यावाचून गत्यंतर नाही.. मात कधी स्त्रीलिंगी तर कधी नपुंसकलिंगी वापरणे हे हि लेखकाच्या अनवधानाची प्रचीती आणून देणारे आहे. परंतु असे काही दोष असले तरी एकंदर ग्रंथाची रचना कौशल्याने व साक्षेपाने केलेली आहे; शास्त्रीय ग्रंथाला कवित्वशक्तींची जोड मिळाल्याने ग्रंथाच्या वाचनीयतेत वाढ झाली; मधूनमधून रंजकतेची डूब देण्यात लेखक यशस्वी झालेला आहे हे मान्य करावे लागेल. बुद्धिबळासारख्या विश्वविख्यात खेळावर असा रोचक ग्रंथ लिहून ठेवल्याबद्दल त्रिवेंगडाचार्य व त्यांच्याकडून लिहवून घेण्याची काळजी घेऊन गुणाग्राहकतेचे प्रत्यंतर आणून दिल्याबद्दल दुसरा बाजीराव हा पेशवा दोघे हि अभिनंदनास पात्र आहेत असेच म्हटले पाहिजे.

[ साप्ताहिक विवेक २८ मे १९७८ ]

# २०. धर्म आणि शिक्षण

मानवाचे मन खऱ्या अर्थाने विकसित करणे आणि एक सुसंस्कृत नागरिक या नात्याने अंगावर येऊन पडणाऱ्या सर्व कर्तव्यांचे यथायोग्य पालन करण्यास समर्थ बनविणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट आहे असे सर्व शिक्षणशास्त्रज्ञांचे मत आहे. या दृष्टीने आज शाळांतून व महाविद्यालयांतून दिले जाणारे शिक्षण उपयोगी आहे का असा प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर होकारार्थी देणे कठिण आहे हे मान्य करावे लागेल. निरनिराळ्या ज्ञानशास्त्रांची किंवा विज्ञानप्रणालींची ओळख करून देण्यांत मात्र आधुनिक शिक्षण-पद्धतीला थोडे फार यश मिळते हे मान्य करण्यास हरकत नाही. तथापि या सर्वांचा उपयोग व्यक्तिमत्वाच्या विकासासाठी होत नाही ही च विचारवंतांची मोठी व्यथा आहे. यामुळेच स्वतंत्र भारताच्या शिक्षण-पद्धतीत आमूलाग्र बदल केला पाहिजे असे प्रतिपादन आमचे नेते आपल्या व्याख्यानांतून व प्रसंगी परिसंवादांच्या उद्घाटनाच्या भाषणांतून नेहमी करीत असतात.

शिक्षण-पद्धतीत इष्ट तो बदल खरोखर करावयाचा असेल व शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या तरूण पिढीच्या मनाची मशागत करावयाची असेल तर आधुनिक शिक्षणात भारतीय संस्कृतीच्या विचार-धनाची ओळख करून देण्याचा पद्धतशीर प्रयत्न केला पाहिजे यात शंका नाही. राष्ट्रीय एकात्मता दृढमूल करण्याच्या दृष्टीने त्याचे महत्त्व मान्य करण्यास काहीच हरकत नाही. हे उद्दिष्ट साध्य व्हायचे असेल तर आमच्या शिक्षण-पद्धतीत धर्मशिक्षणाचा योजनापूर्वक अन्तर्भाव करणे श्रेयस्कर ठरेल.

धर्मशिक्षणाचे नांव घेताक्षणी च निधर्मी राज्यात विरोधाची वावटळ उठण्याचा व बुरसटलेल्या विचारसारणीचा शिक्का बसण्याचा संभव नाकारता येणार नाही. परंतु या धर्मशिक्षणात जो धर्म अभिप्रेत आहे त्याचा कुठल्या हि देवतेशी संबंध नाही, त्याला परलोकाची आकांक्षा नाही, त्याचा संबंध कुठल्या हि संप्रदायाशी जोडण्याचा प्रश्न च निर्माण होत नाही हे आवर्जून सांगितले पाहिजे. धर्माच्या जुन्या परिभाषा विचारात घेतल्या तर त्याचा जोर 'याचि देहि याचि डोळा' चालणाऱ्या सामाजिक आचरणावर आहे हे उघड होईल. 'आचारप्रभवो धर्मः', 'सर्वस्य तपसो मूलमाचारं जगृहुः परम् ' किंवा 'धारणाद्धर्म इत्याहुः धर्मेण विधृताः प्रजाः । यःस्यात् धारणसंयुक्तःस धर्म इति निश्चयः ।। या सर्व परिभाषांचा भर मनुष्याच्या सामाजिक आचरणावर च आहे. हे आचरण त्याच्या वैयक्तिक दृष्टिकोणावर हि अवलंबून आहे हे अमान्य करून चालणार नाही. म्हणून च धर्मशास्त्रावरील जुन्या ग्रंथात व्यक्ती म्हणून मनुष्याची कर्तव्ये आणि समाजातील त्याच्या आचरणाचे संकेत या दोन्हींचा अन्तर्भाव झालेला दिसतो. खरं पाहिलं तर

मनुष्याचे व्यक्तिगत आचरण आणि त्याची सामाजिक कर्तव्ये ह्यांमध्ये आढळून येणारी विसंगती किंवा विरोध व त्याचे कांहीशा अभिनिवेशाने केले जाणारे समर्थन यांत च आजच्या समाजाच्या अवनतीचे मूळ आहे. त्याबद्दल विचारवंत एकमत आहेत असे म्हणण्यास हरकत नाही.

धर्मासंबंधाने ही निकोप दृष्टी असल्यामुळे आमच्या धर्मशास्त्रात ऋणाच्या कल्पनेला प्राधान्य प्राप्त झाले. 'जायमानो वै ब्राह्मणः त्रिभिः ऋणवा जायते' ह्या वैदिकांच्या घोषणेत देवऋण, पितृऋण व ऋषिऋण प्रत्येक मनुष्याने फेडले पाहिजे यावर कटाक्ष होता. देवांचे ऋण यज्ञ केल्याने, पितरांचे ऋण प्रजोत्पत्तीने किंवा पुत्रोत्पत्तीने व ऋषींचे ऋण स्वाध्यायाची म्हणजे च ज्ञानाची परंपरा अखंडित ठेवल्याने फिटते असे वैदिकांचे मत होते. ही ऋणे न फेडता म्हणजेच सामाजिक कर्तव्यांचे पालन न करता जर एखादी अधिकारा रूढ व्यक्ती मोक्ष मिळविण्याच्या वैयक्तिक साधनेवर जोर देऊं लागेल तर त्या व्यक्तीच्या अनुयायांना हि तसा मोह होणे स्वभाविक आहे आणि 'यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः' या न्यायाने ही संख्या वाढत जाऊन समाज छिन्न-भिन्न होण्याचा संभव जास्त आहे हे लक्षात घेऊन मनुस्मृतीत मनूने

**अनधीत्य द्विजो वेदाननुत्पाद्य तथा सुतान् ।**
**अनिष्ट्वा चैव यज्ञैश्च मोक्षमिच्छन् व्रजत्यधः ।। (३.३७)**

अशी धमकी दिलेली आहे. महाभारताचे प्रणेते महर्षि व्यास यांनी आपल्या तलस्पर्शी प्रतिभेच्या जोरावर या तीन ऋणांना 'मानवाचे ऋण' या चौथ्या ऋणाची जोड दिली व

**ऋणैश्चतुर्भिः संयुक्ता जायन्ते मानवाः भुवि ।**
**पितृदेवर्षिमनुजैर्देयं तेभ्यश्च धर्मतः ।। (१-१२०-१८)**

हा सिद्धान्त मांडला. मानवऋण फेडण्याचा उपाय 'आनृंशस्येन मानवाः' या समर्पक शब्दांत सांगून त्यांनी मावनतेबदलच्या आस्थेचा, कळकळीचा अंतर्भाव ऋणफेडीत केला हे संस्मरणीय आहे. हे पाहिले म्हणजे 'greatest good of greatest number किंवा 'अर्पित हो यह मनुजकाय बहुजनहिताय बहुजनसुखाय' हा आधुनिक काळांतील आदर्श हि तसा प्राचीन च ठरतो.

तात्पर्य, समाजवादाबद्दलच्या मानवाच्या संपूर्ण कर्तव्यांचा समावेश आमच्या प्राचीन धर्मशास्त्रातील ऋणकल्पनेत होतो. अशा धर्माची दीक्षा घेतलेली प्रत्येक व्यक्ती केवळ राष्ट्राच्या च नव्हे तर संपूर्ण मानवतेच्या कल्याणाची मंगल आकांक्षा बाळगणारी ठरेल. नवसमाजाच्या निर्मितीचे ध्येय उराशी बाळगणाऱ्या स्वतंत्र भारताच्या उद्याच्या नागरिकांना हि या धर्माच्या शिक्षणाबद्दल जागरूक रहावयास नको का ?

धर्मशिक्षणाची आवश्यकता मान्य केली तरी देखील वर्तमान शिक्षणपद्धतीत ह्या शिक्षणाचा अंतर्भाव कसा करावा याचे दिग्दर्शन करणे योग्य होईल. उपर्युक्त शिक्षणाचा शुभारंभ शिक्षणाच्या प्राथमिक अवस्थेतच करून त्याला विकसित स्वरूप उच्च माध्यमिक अवस्थेत मिळाले पाहिजे. नंतरच्या महाविद्यालयीन व विद्यापीठाय शिक्षणात हे शिक्षण दृढमूल करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. याचा अर्थ सध्याच्या पाठ्यक्रमातील अनंत विषयांत आणखी एका विषयाची भर टाकावी असा मात्र नाही. इतिहास किंवा सभ्यता व संस्कृती या विषयांच्या अध्यापनांतच धर्मशिक्षणाचा समावेश करणे श्रेयस्कर. भारतीय भाषांच्या अध्यापनाचा एक अंश म्हणून धर्मशिक्षण देण्यास हरकत नाही. समाजांत वैज्ञानिक दृष्टिकोण रुजवूं पहाणाऱ्यांना हि या धर्मशिक्षणाचे वावडे असण्याचे कारण नाही. हा प्रश्न वस्तुतः वैज्ञानिक पाठ्यक्रम राबविण्याचा नसून मुळांत सामाजिक दृष्टिकोण असणाऱ्या विज्ञानशिक्षकांचा आहे. हा विषय शिकविण्यास वेळ देता येणार नाही ही तक्रार ही त्याबद्दलच्या आस्थेच्या अभावातून निर्माण झालेली आहे. नवसमाजाच्या निर्मितीचे स्वप्न साकार करावयाचे नक्की असेल तर अशा लटक्या सबबी पुढे आणण्याऐवजी या बाबतीत पडतील ते कष्ट स्वीकारण्याची तयारी ठेवण्यात च खरा पुरुषार्थ आहे हे समंजस विचारवंताना पटवून देण्याची आवश्यकता नाही.

[ 'स्वामिन् तव शरणम्' फेब्रुवारी १९८५ ]

# २१. प्राचीन भारतातील मंदिर-विद्यापीठे

प्राचीन भारतात ज्ञान हे एक अंतिम मूल्य मानले गेले व त्यामुळे ज्ञानार्जन व ज्ञानवितरण किंवा ज्ञानदान यांची एक उज्वल परंपरा हा भारतवर्षाचा एक महान् वारसा ठरला अशी इतिहासाची साक्ष आहे. आज विद्यादानाचे कार्य विद्यापीठांत, महाविद्यालयांत व शाळांत होते; प्राचीन काळी हे पवित्र कार्य विद्यापीठांप्रमाणे आश्रमांत, परिषदांत, बौद्धांच्या विहारात व चैत्यांत हि चालत असे; इतकेच नव्हे तर निरनिराळे मठ व वेगवेगळी मंदिरे ही विद्यादानाच्या कार्यात अहमहमिकेने सहभागी होत असत हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. इसवी सनाच्या दहाव्या व अकराव्या शतकानंतर जैनांची चैत्ये व बौद्धांचे विहार यांच्यात चालणाऱ्या शैक्षणिक कार्याचे महत्त्व लक्षात घेऊन दक्षिण भारतातल्या वैदिक परंपरेचा अभिमान बाळगणाऱ्या राजांनी मंदिरांना दाने देताना त्यांना जोडून मंडप बांधण्याची व त्या मंडपात शिक्षण देण्याची व्यवस्था करण्याची काळजी घेतली असे ताम्रपटांच्या व शिलालेखांच्या आधारे निश्चितपणे म्हणता येते. मंदिरांचे महत्त्व त्यांतील देवतांच्या मूर्तीप्रमाणे त्यांना जोडून बांधल्या जाणाऱ्या विस्तीर्ण मंडपातील विद्यादानाच्या गुणवत्तेवर ही अवलंबून होते हे विसरून चालणार नाही. वर सांगितल्याप्रमाणे इसवी सनाच्या १० व्या शतकापासून ते १५ व्या शतकाच्या सुरवातीपर्यंत कर्नाटकापासून केरळापर्यंत निरनिराळ्या ठिकाणच्या या मंदिर-विद्यापीठांनी भारतवर्षाच्या विद्यादानाची प्राचीन परंपरा यथाशक्ती चालू ठेवली होती हे खरोखरच लक्षांत ठेवण्यासारखे आहे. यापैकी काही प्रमुख विद्यापीठांचा परिचय मनोरंजक आहे.

विजापूर जिल्ह्यातील सालोटगी (Salotgi)गांवी राष्ट्रकूट राजा तिसरा कृष्ण याच्या नारायण या मंत्र्याने राजाज्ञेवरून त्रयीपुरुषाचे मंदिर बांधले. त्याला जोडूनच एक प्रशस्त मंडप होता व यातच आजच्या परिभाषेत ज्याला महाविद्यालय म्हणू शकू अशी एक संस्था चालत असे. या महाविद्यालयाची कीर्ती त्या काळी दूरवर पसरलेली होती व या संस्थेत शिकण्यासाठी निरनिराळ्या भागातून विद्यार्थी येत असत हे 'अत्र विद्यार्थिनः सन्ति नानाजनपदोद्भवाः' या Ephigraphia Indica (IV 60)तील वर्णनावरून दिसते. हळूहळू या विद्यापीठाचा विस्तार होत गेला असावा कारण या संस्थेला विद्यार्थ्यांच्या राहण्यासाठी २७ निरनिराळ्या जागांची सोय करावी लागली. यासाठी ६० निवर्तनांची (म्हणजे अदमासे ६० एकर जागेच्या उत्पन्नाची) देणगी मिळत होती व २०० विद्यार्थ्यांच्या भोजनासाठी सुमारे ५०० निवर्तनांची देणगी निश्चित केलेली होती असे दिसते. या विद्यापीठाच्या प्राचार्यांचे मानधन स्वतंत्र ५०

निवर्तनांच्या देणगीतून देण्यात येत असे. या शिवाय शाळांतील प्रत्येक रहिवाश्याने आपल्या घरांतील चूडाकरण समारंभाच्या वेळी ५/४ नाणी, मुंजीच्या वेळी २।। नाणी, लग्नाच्या वेळी ५ नाणी द्यावी व या प्रत्येक समारंभाच्या प्रसंगी या संस्थेतील शिक्षक व विद्यार्थी यांना जेवावयास बोलवावे असा संकेत हि ठरवून दिला होता असे उपर्युक्त Ephigraphia Indica वरून दिसते. दूरदूरच्या भागातून मोठ्या संख्येने येणाऱ्या विद्यार्थ्यांना ज्ञान देणाऱ्या येथील शिक्षकांबद्दल मात्र कांहीच माहिती मिळत नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

दक्षिण अर्काट प्रांतातील एण्णायिरम् येथील मंदिर-विद्यापीठ ईसवी सनाच्या अकराव्या शतकाच्या सुमारास भरभराटीला आले असे पहिला राजेंद्र चोळ याच्या सन् १०२३ च्या शिलालेखावरून दिसते. येथील वैदिक महाविद्यालयात ३४० विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय याच खेड्यातील लोकांनी दिलेल्या ४५ वेली म्हणजे सुमारे ३०० एकर जमिनीच्या उत्पन्नातून होत असे. या ३४० विद्यार्थ्यांपैकी ७५ विद्यार्थी ऋग्वेदाचे व ७५ यजुर्वेदाचे अध्ययन करीत होते; सामवेदाच्या छांदोग्य व तलवकार या शाखांबरोबर वाजसनेयि संहितेचे शिक्षण हि प्रत्येकी २० विद्यार्थ्यांना दिले जात होते. अथर्ववेदाच्या विभागात १० विद्यार्थी होते; बौद्धायन गृह्यसूत्र व कल्पसूत्रे यांचे शिक्षण १० विद्यार्थ्यांना व 'रूपावताराचे' चे ४० विद्यार्थ्यांना दिले जात होते, वेदांताला मात्र १० च विद्यार्थी होते असे दिसते. प्राधान्याने वेदांचे अध्यापन करणाऱ्या संस्कृत प्रगताभ्यास केंद्रात इतर विषयांना गौण च मानले जात नाही का ? या विद्यापीठांत नियुक्त झालेल्या शिक्षकांची नावे मिळत नाहीत हे खरे; परंतु त्यांची संख्या १० होती व त्यांपैकी ऋग्वेद व यजुर्वेद यांचे प्रत्येकी तीन अध्यापक, मीमांसेसाठी २ व उरलेल्या विषयांपैकी प्रत्येकाला एक एक अध्यापक नियुक्त होता हे नमूद केलेले आहे. दैनिक भत्ता म्हणून प्रत्येक शिक्षकाला १२ करूणी भात दिला जात असे. त्या काळी एका वेळच्या जेवणाला साधारणपणे ३/४ करूणी खर्च येत असे हे लक्षांत घेतले तर हा दैनिक भत्ता एका जेवणाला येणाऱ्या खर्चाच्या १६ पट होता. याशिवाय प्रत्येक शिक्षकाला १/२ कलंजू सोने अतिरिक्त वेतन म्हणून दिले जात असे; यावरून Bonus ची कल्पना त्यावेळी शिक्षण क्षेत्रात हि होती हे आजच्या शिक्षकाना हेवा करण्यासारखे वाटेल. वेदांताला या विद्यालयात संख्येच्या दृष्टीने गौण स्थान होते हे खरे; परंतु वेदांताच्या शिक्षकाला २५ टक्के ज्यादा भत्ता होता हे विसरता येणार नाही. अष्टाध्यायीतल्या प्रत्येक अध्यायाच्या अध्यापनासाठी व्याकरणाच्या शिक्षकाला १ कळंजू सोने देण्याचा प्रघात होता असे हि शिलालेखांतील उल्लेखांवरून म्हणता येते. एका शिलालेखात या मंदिराला जोडून असलेले एक वसतिगृह हि होते व त्यांत ५०६ ब्राह्मणांच्या भोजनाची सोय होती असा हि

उल्लेख सापडतो. तात्पर्य, हे मंदिर-विद्यापीठ आजच्या सुस्थित शिक्षण संस्थेप्रमाणे च सुखसोयीनी सुसज्ज होते असे म्हणण्यास हरकत नाही.

या दोन विद्यापीठांच्या तुलनेने लहान असलेले विद्यापीठ म्हणजे चिंगलपेठ परगण्यात तिरूमुक्कुडल या गावातल्या वेङ्कटेश पेरूमाल मंदिरातले. यात फक्त ६० विद्यार्थ्यांची सोय होती. अकराव्या शतकात चिंगलपेठ हा परगणा च मंदिर-विद्यापीठांनी गजबजलेला होता व हे गांव हि तीर्थस्थान किंवा व्यापाराचे केंद्र नव्हते. परंतु या लहान मंदिरात हि ऋग्वेद शिकणारे विद्यार्थी १० होते व व्याकरणाचा अभ्यास करणारांची संख्या २० होती. सर्व विद्यार्थी निःशुल्क च शिक्षण घेत होते. त्यांचा सर्व खर्च मंदिराला मिळणाऱ्या सरकारी अनुदानातून व रहिवाश्यांच्या देणग्यांतून केला जात होता. सांपत्तिक स्थिती चांगली नसल्यामुळे या विद्यापीठातल्या कांही शिक्षकांना येथे रहाता येणे शक्य नव्हते. या सगळ्यांचा परिणाम हे विद्यापीठ भरभराटीला न येण्यात झाला यात नवल नाही.

गुन्तूर परगण्यांतील मर्कापुरम् किंवा मलकापुरम् या गावाच्या मंदिरातील विद्यापीठासंबंधाची माहिती सन् १२६८ च्या या गांवाच्या शिलालेखावरून मिळते. त्यावरून या मंदिराला लागून एक रुग्णालय हि होते व यात विद्यार्थ्यांच्या आरोग्याकडे लक्ष देण्यासाठी स्वतंत्र वैद्य हि नेमला गेल्याचे दिसते. या विद्यापीठातल्या नियुक्त शिक्षकांना वेद, वाङ्मय, व्याकरण व न्याय या विषयांच्या अध्यापनाचे काम दिलेले होते. विद्यार्थ्यांची संख्या १५० होती; म्हणजे प्रत्येक शिक्षकावर साधारणपणे २० विद्यार्थ्यांची जबाबदारी होती. विद्यार्थी इतर विद्यापीठांप्रमाणे निःशुल्क शिक्षण घेत होते. या विद्यापीठातील मुख्याध्यापकाचा पगार १०० निकष होता; यांतच आजच्या पद्धतीप्रमाणे प्रशासकीय व्यवस्थेबद्दलच्या भत्त्याचा हि अंतर्भाव होता.

तेराव्या शतकात व्याकरणाच्या अभ्यासाकरिता प्रसिद्ध असलेल्या चिंगलपेठ विभागातील 'तिरूवोरिऊर मंदिर विद्यापीठाचा उल्लेख करणे या संदर्भात आवश्यक च आहे. सन् १९१२ च्या Ephigraphia Report मध्ये याबद्दलची माहिती मिळते. या विद्यापीठाची स्थापना शिवमंदिरात च करण्यात आली होती. विद्यार्थ्यांच्या रहाण्याची सोय मंदिरातल्या निरनिराळ्या भागांत व एका मंडपात करण्यात आलेली होती. या विद्यापीठाच्या खर्चाकरता ६० वेली म्हणजे ४१० एकर जमीन दिली होती व याला जोडून 'व्याकरणदान व्याख्यान मण्डप' हि बांधलेला होता हे लक्षात घेतले म्हणजे या विद्यापीठाच्या व्यापाची कल्पना येते. या मंडपात पाणिनीच्या व्याकरणाची दीक्षा दिली जात असे. 'व्याकरणदान-पेरूमाल' म्हणजे च शिव किंवा शंकर याची पूजा या मंदिरात

व्हावी हे स्वाभाविक च आहे. व्याकरण हा इथला प्रधान विषय असला तरी न्याय, मीमांसा हे हि विषय शिकवले जात. यांतल्या विद्यार्थ्यांची संख्या सुमारे ४५० असावी असे अनुमान करण्यास हरकत नाही. निरनिराळ्या शिलालेखांत या मंदिराला अनुदाने दिल्याचा उल्लेख सांपडतो. त्यावरून या मंदिर-विद्यापीठाने आपले कार्य सातत्याने जवळ जवळ एक शतकभर चालू ठेवले होते असे दिसते.

या प्रमुख मंदिर-विद्यापीठांशिवाय दक्षिण भारतातील शिलालेखांत 'पुन्नवएल' गांवातल्या व्याकरणाच्या पाठशाळेत शिकणाऱ्या ५०० विद्यार्थ्यांचा; शिकारपुर जिल्ह्यातील ताळगुंड शहरातल्या प्राणेश्वर मंदिरात दिल्या जाणाऱ्या वेद, वेदांत व मीमासा यांच्या शिक्षणाचा उल्लेख सापडतो. सन् ११५८ च्या शिलालेखात बेलगामीच्या शिक्षण-संस्थेचा हि उल्लेख आहे. मंदिर-विद्यापीठाच्या या परंपरेत माळव्याचा प्रसिद्ध राजा भोज (ईसवी सन् १०१८-६०) याच्या 'धारा' या राजधानीतल्या वाग्देवी मंदिरात वसलेल्या विद्यापीठाचा अंतर्भाव करायला हवा. वाग्देवीच्या स्तंभावरील शिलालेखात 'भोजनरेन्द्रचंद्रा' प्रमाणे संवत् १०९१ म्हणजे सन् १०३४ मधल्या शिवदेव या लेखकाचा उल्लेख आहे

ईसवी सनाच्या १०व्या शतकापासून ते जवळ जवळ १४ व्या, १५ व्या शतकापर्यंत या मंदिर-विद्यापीठांनी वैदिक परंपरेच्या शिक्षणाचे काम जोमाने चालू ठेवले होते. यातल्या विषयांची व्याप्ती मोठी नव्हती व यांना खऱ्या अर्थाने सार्वजनिक विद्यापीठ म्हणता येणार नाही हे जरी मान्य केले तरी यांतील अध्यापनाचा दर्जा मात्र बराच उंचावलेला होता व शिक्षण घेणारे विद्यार्थी व देणारे शिक्षक पोटभरू नव्हते हे निर्विवाद. यांची सांपत्तिक स्थिती चांगली होती. कारण तत्कालीन जनतेचा हि याला सक्रिय पाठिंबा होता. यामुळेच विद्यादानाचे पवित्र कार्य सातत्याने होऊ शकले. यावरून आज हि बोध घेण्यासारखा आहे.

[ धर्मभास्कर फेब्रुवारी १९७१ ]

# २२. प्राचीन भारतातील स्त्री-शिक्षण

प्राचीन भारताने अगदी सुरूवातीपासून म्हणजे वैदिक काळातच ज्ञान हे एक अंतिम मूल्य मानले होते व निष्ठेने निरलपणाने ज्ञानाची उपासना करून जगात नाव मिळवले होते अशी इतिहासाची साक्ष आहे. ज्या समाजातले भौतिक किंवा आध्यात्मिक वैभव विशिष्ट सामाजिक गटातच अडकून पडते तो समाज किती हि पुढारलेला असला तरी रोगट समजावा असे समाजशास्त्रज्ञ म्हणतात. या दृष्टीने वैदिक काळी सामाजिक जीवन निरोगी व संपन्न होते असेच म्हटले पाहिजे कारण ऋग्वेदातील सूक्तकर्त्यांत ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य या तीन्ही व्यवसायांतले लोक आढळतात इतकेच नव्हे तर तत्कालीन यज्ञसंस्थेत शूद्रांना हि महत्त्वाचे स्थान होते. ऋग्वेदात तर २६ सूक्ते स्त्रियांनी हि लिहिलेली आहेत.

**स्त्रियांचे कौशल्य**

अपाला, घोषासुर्या यांची सूक्ते वाचनीय आहेत. श्रद्धा, वैवस्वती यमी व अंभृण ऋषींची कन्या वाक् यांनी लिहिलेल्या सूक्तात तत्त्वज्ञान व काव्य यांचा मधुर मिलाप झालेला दिसतो. वाग्देवीच्या कन्येने वापरलेली आत्मविश्वासपूर्ण भाषा आजच्या लोकशाहीच्या युगात हि लक्षात ठेवण्यासारखी आहे. 'मनुष्यजातीला आनंदी मी करते. ब्रह्मद्वेष्ट्या खाष्ट शत्रूंना ठार मारण्याकरिता रुद्राचे धनुष्य मी सज्ज करून देते. स्वर्ग आणि पृथ्वी यांत माझा प्रवेश आहे', असे थाटात म्हणणारी वाग्देवी आजच्या परिभाषेत 'विद्याविभूषित' असली पाहिजे हे मान्य करण्यावाचून गत्यंतर नाही.

वेदानंतरच्या म्हणजे उपनिषदांच्या काळात तर याज्ञवल्क्यासारख्या पंडितांशी भरसभेत वाद घालणाऱ्या गार्गीसारख्या स्त्रिया आढळतात. प्राचीन ग्रीसमध्ये तत्वचिंतनाच्या क्षेत्रात प्रवेश केलेली स्त्री नव्हती. प्लेटोच्या संवादांत तत्त्वचर्चेत भाग घेणारी एक हि स्त्री आढळत नाही हे या संदर्भात लक्षात ठेवण्यासारखे आहे. यज्ञसंस्थेचा त्या काळी पूर्ण विकास झालेला होता आणि यज्ञात स्त्री व पुरूष या दोघांनी हि मंत्र म्हणावयाचे असत, इतकेच नव्हे तर गृहाग्नीला आहुती एकटी गृहिणी च देत असे. मंत्र म्हणावयाचे म्हणजे वेदांचे शिक्षण पाहिजे व हे शिक्षण उपनयन-विधीनंतर सुरू होत असे हे लक्षात घेतले म्हणजे त्या काळी स्त्रियांची हि मुंज होत असे हे मान्य करावे लागते. रामायण-महाभारताच्या काळातल्या सीता, तारा, मंदोदरी, कुंती, द्रौपदी या स्त्रियांनी यज्ञ केल्याचे उल्लेख आहेत. 'गोदावरीं प्राप्ता संध्यार्थे वरवर्णिनी', असे सीतेबद्दल रामायणात म्हटलेले आहे. यांना वेदविद्येबरोबर गायन, नर्तन, चित्रकला यांचेच नव्हे तर लष्करी विद्येचे हि शिक्षण दिले जात होते असे दिसते. रामायणात कैकयीने युद्धात राजा दशरथाला

मदत केल्याचा उल्लेख सापडतो. महाभारतातील द्रौपदी तर खऱ्या अर्थाने 'पंडिता' आहे. तिने भरसभेत प्रश्न विचारून भीष्मासारख्या धर्मवेत्त्यांना हि विचार करायला लावले हे विसरता येणार नाही. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात सशस्त्र स्त्रियांचा उल्लेख आहे.

**स्त्री-शिक्षणाचे अनुमान**

मनुस्मृतीतील 'पिता रक्षति कौमार्ये भर्ता रक्षति यौवने । पुत्राः रक्षन्ति वार्धक्ये न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ।। ह्या श्लोकाचे आज जे भांडवल केले जाते ते जरी सर्वार्थाने खरे नसले तरी त्या काळी समाजातील स्त्रीचे स्थान खालच्या पातळीवर आले होते हे मान्य केले पाहिजे. तरी हि मनू स्त्रियांचा उपनयनविधी वेदमंत्रांशिवाय व्हावा असे सांगतो व त्यांच्या विवाहविधीत उपनयन म्हणजे मुंजीचा सस्कार आला च हे मान्य करतो.

यावरून धार्मिक क्षेत्रात स्त्रीची पीछेहाट होत चालल्याचे दिसते. परंतु 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता;' असे म्हणणारा मनु स्त्रियांना सामाजिक दृष्ट्या अगदी तुच्छ लेखतो असे कसे म्हणता येईल ?

स्मृतिकाळात हि स्त्रीशिक्षण मात्र चालू च होते. हे शिक्षण साधारणपणे घरच्या घरीच होत असे. 'उपाध्याया' या शब्दावरून मात्र स्त्रीशिक्षिकांचे आश्रम असावेत असे अनुमान करणे शक्य आहे. 'छात्री शाळा' या शब्दप्रयोगावरून विद्यार्थिनींची वसतिगृहे हि असावीत असे दिसते.

विद्यार्थिनीचे दोन वर्ग होते. 'सद्योवधू' म्हणजे लग्न होईपर्यंत [सातआठ वर्षे] मिळेल तितकी वेदविद्या शिकणाऱ्या व 'ब्रह्मवादिनी' म्हणजे विद्याभ्यास पूर्ण होईपर्यंत लग्न न करणाऱ्या यांपैकी 'सद्योवधू' यापुढे 'सद्योद्वाहा' म्हटल्या जात. 'ब्रह्मवादिनीं' पैकी कांही आयुष्यभर विद्यार्जन करून पुरुषांच्या बरोबरीने नांव मिळवीत. महाभारतातल्या सुलभा-जनक संवादातली 'सुलभा' ही अशा प्रकारची ब्रह्मवादिनी. अशी स्त्रीशिक्षणाची परंपरा असल्यामुळे पाणिनीने अष्टाध्यायीत निरनिराळ्या वैदिक शाखांचा अभ्यास करणाऱ्या स्त्रियांचा व कात्यायनाने आपल्या वार्तिकांत स्त्री-शिक्षिकांचा उल्लेख करावा हे स्वाभाविक आहे.

वैदिक काळापासून खिस्तशतकाच्या सुरुवातीपर्यंत स्त्री-शिक्षणाची परंपरा चालू होती, इतकेच नव्हे तर जैन आणि बौद्ध धर्माच्या प्रसाराच्या काळात या परंपरेला अधिकाअधिक उजाळा मिळाला. गौतम बुद्धाने भिक्षुसंघात स्त्रियांना प्रवेश करू दिल्यानंतर स्त्री-शिक्षणाला जोराची चालना मिळाली. बौद्ध भिक्षुणींनी आमरण ब्रह्मचारिणी रहावयाचे असल्यामुळे त्यांनी आपला वेळ तत्त्वज्ञानाच्या अभ्यासात आणि विद्यांच्या उपासनेत घालावयाचे ठरविले. बौद्ध भिक्षुणी किंवा

उपासिका, जैन श्राविका व साध्वी पंडिता च होत्या. शुभा, अनुपमा, सुगंधा या तर मोठ्या प्रसिद्ध घराण्यातल्या स्त्रिया. विद्यार्जनात यामुळे विविधता हि आली.

**स्त्रीशिक्षणातील विविधता**

**स्त्री**शिक्षणातल्या या विविधतेचे उत्तम प्रतीक म्हणजे इसवी सनापूर्वीच्या सहाव्या शतकातच राजगृह नगरीत स्थापन झालेले गुणशीला विद्यापीठ. या विद्यापीठातील जैन व बौद्ध आचार्यांनी सहशिक्षणाची त्या काळी सुरवात करून दिली असे ऐतिहासिक उल्लेखांवरून निश्चितपणे म्हणता येते. येथे शिक्षण घेतलेल्या स्त्रियांत राजा बिम्बिसाराची पत्नी राणी नंदा व भुवमा यांचा प्राधान्याने उल्लेख करावा लागेल.

भगवान महावीराने राणी नंदाला या विद्यापीठात प्रवेश देवविला यावरून याचे तत्कालीन महत्त्व लक्षात यावयास हरकत नाही. या काळात विविध प्रकारचे शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांत बिम्बिसाराची दुसरी राणी खेमा, त्याची मुलगी थेरीसामा, धम्मदिन्ना, अनुपमा, सुजाता वगैरेंचा उल्लेख करावा लागेल. याबद्दलची विशेष माहिती श्री. एस. व्ही. वेंकटेश्वर यांच्या 'इंडियन कल्चर थ्रू दी एजेस्' या पुस्तकात मिळते.

स्त्रियांना किती विषय शिकविले जात असत याची यादी मात्र या विद्यापीठांबद्दलच्या उपलब्ध माहितीवरून व कामसूत्र, कादंबरी, शुक्रनीतिसार अशा ग्रंथांच्या आधारे तयार करावी लागते. प्राचीन काळच्या सर्व विद्यापीठांत थोड्या फार फरकाने स्त्रियांना ६४ विषय शिकविले जात असावेत असे दिसते. ही यादी श्री. तवकर यांनी आपल्या 'प्राचीन भारतीय विद्यापीठ' या पुस्तकात [पृष्ठ ११३-११४] दिलेली आहे ती पुढील प्रमाणे :-

१] गीत, २] वाद्य, ३] नृत्य, ४] नाट्य, ५] आलेख्य [म्हणजेच चित्रकला], ६] विशेषकच्छेद्य, ७] तंडुल-कुसुम-बलि-विकार, ८] पुष्पास्तरण, ९] दशनवसनाङ्गराग, १०] मणिभूमिकाकर्म [घरातील जमीन शोभून दिसावी म्हणून त्यात खोदून रत्ने बसविणे, ११] शयन-रचना, १२] उदकवाद्य, [आजच्या शब्दात जलतरंग], १३] उदकघाट [निरनिराळ्या कारंजांची रचना करून बागेची शोभा वाढविणे], १४] माल्य-ग्रथन-विकल्प, १५] शेखरापीड-योजन, १६] नेपथ्य-प्रयोग, १७] कर्णपत्रभङ्ग, १८]गन्धयुक्ति, १९] भूषणयोजना, २०] इंद्रजाल, २१] कुचमारयोग, २२] हस्तलाघव, २३] विचित्रशाककूपभक्षविकारक्रिया, २४] पाणकरसरागासव-योजन, २५ सूचिवाय-कर्म [शिवण्याची कला], २६] सूत्रक्रीडा, २७] वीडा [डमरूकवाद्य], २८] प्रहेलिका, २९] प्रतिमाला [विशिष्ट अक्षर देऊन त्याने काव्याची सुरूवात

करणे], ३०] दुर्वाचक्रयोग - निरनिराळ्या प्राण्यांच्या व इतरांच्या आवाजाचे अनुकरण करणे], ३१] पुस्तकवाचन, ३२] नाटकाख्यायिकादर्शन [मूकाभिनय], ३३] काव्यसमस्यापूरण, ३४] पट्टिकावेश्यान-विकल्प, ३५] तर्ककर्म [सूत कातण्याची कला] , ३६] तक्षण-कला [कोरीव काम], ३७] वास्तुविद्या, ३८] सुवर्णरौप्य परीक्षा; ३९] धातुवाद [अशुद्ध धातू शुद्ध करण्याची कला], ४०] मणिरागज्ञान, ४१] आकरज्ञान, ४२] वृक्षायुर्वेद योग, ४३] मेषकुक्कुटलावकयुद्धविधी, ४४] शुकसारिकालपन, ४५] उत्सादन अंगमर्दन, ४६] केशमार्जनकौशल, ४७] अक्षरमुष्टिकाकथन [मनातील अक्षर, मुठीतील वस्तू ओळखणे], ४८] म्लेच्छितविकल्प [गुप्त लिपी किंवा भाषा यांचे प्रयोग], ४९] देशभाषाज्ञान, ५०] निमित्तज्ञान, ५१] यंत्रमातृका [ठसे किंवा ब्लॉक्स तयार करणे], ५२] धारणमातृका [मनातील अर्थ गुप्त रीतीने व्यक्त करणारे काव्य रचणे], ५३] संपाठ्य [गाण्यासाठी नोटेशन देणे], ५४] मानसी काव्यक्रिया [शीघ्रकवित्व], ५५] अभिधानकोश, ५६] छंदोज्ञान, ५७] क्रियाविकल्प, ५८] छलितकयोग [हातचलाखी], ५९] वस्त्रगोपन [साध्या वस्त्रांना रेशमाची चमक देणे], ६०] अक्षक्रीडा, ६१] बालक्रीडनक [मुलांकरिता खेळणी तयार करणे, ६२] वैनायिकीज्ञान, ६३] वैजयिकी ज्ञान अणि ६४] व्यायामिकीज्ञान

ही यादी वाचून आजच्या अगदी हुशार गणल्या जाणाऱ्या विद्यार्थिनींना धडकी भरेल. यातील विशेषकच्छेद्य म्हणजे सौंदर्यप्रसाधनासाठी मुखावर करण्यात येणारी रंगरचना, पुष्पास्तरण, दशनवसगाङ्गराग म्हणजे दातांना रंग लावणे, वस्त्रांना रंग देणे किंवा शरीराचे अवयव चित्रित करणे, शेखरापीडयोजन म्हणजे डोक्यावर फुलांची किंवा रत्नांची भूषणे घालणे, कर्णपत्रभङ्ग म्हणजे कानांवरील फुलांचे भाग रंगविणे, कुचमारयोग म्हणजे स्त्रियांचे उरोज टवटवीत ठेवण्याची कला, भूषणयोजन म्हणजे शरीरावर निरनिराळे अलंकार घालणे, केशमार्जनकौशल यांसारखे विषय बघितले म्हणजे सौंदर्यप्रसाधनाकडे त्या काळी कसे लक्ष दिले जात असे याचा बोध होतो. आजच्या ब्यूटी पार्लरमध्ये अर्थात च याचे आधुनिक शास्त्र झालेले आहे. त्यात सौंदर्यप्रसाधनाची जोपासना करण्याची वैज्ञानिक पद्धत वापरली जाते, त्यावर शास्त्रीय पद्धतीने लिहिणाऱ्या महिला आहेत हे मान्य परंतु यातली कल्पना जुनी च आहे, हे कबूल करण्यावाचून गत्यंतर नाही. माल्यग्रथनविकल्प म्हणजे माळा, गजरे तयार करणे. यात स्वप्नवासवदत्त नाटकाची नायिका वासवदत्ता अत्यंत प्रवीण होती हा उल्लेख आकस्मिकपणे आला नसून त्या विषयाचे पूर्वी शिक्षण दिले जात असे. विचित्र शाककूपभक्षविकारक्रिया किंवा पाणकसरागासवयोजन ही नावे लांबलचक खरी,

परंतु हे विषय म्हणजे स्वयंपाक करण्याच्या कलेची, सुगरणपणाच्या शास्त्राची सुरवात नव्हे का ? तपस्या करून कृश झालेल्या पार्वतीला पूर्वी आपल्या बहुमूल्य शय्येवर परसलेली सुकुमार फुले हि टोचत असत असे म्हणणारा कविकुलगुरू कालिदास तत्कालीन शयनरचनेच्या शास्त्राकडे संकेत करतो असेच म्हणणे योग्य. तंडुलकुसुमबलिविकारात तांदुळापासून निरनिराळे खाद्यपदार्थ तयार करण्याच्या कलेचा अंतर्भाव होतो.

**ग्रंथांचे नुकसान**

वर उल्लेख केलेल्या ६४ विषयांतल्या कित्येकांचे रूपांतर आज स्वतंत्र कलांत व शास्त्रांत झालेले आहे हे सहज लक्षात येईल. या स्त्री-शिक्षणात बहुश्रुतपणा व व्यवहारकौशल्य यांचा मनोज्ञ संगम झालेला दिसतो हे हि लक्षात ठेवण्यासारखे आहे. आता उपर्युक्त ६४ विषय सगळ्या विद्यापीठांत सारख्या प्रमाणात शिकविले जात असत किंवा शेंकडो विद्यार्थिनी हे विषय शिकत असत असे शिक्षण सार्वत्रिक नसलेल्या त्या काळात म्हणणे अतिशयोक्ती होईल हे खरे, परंतु हे विषय थोड्याफार प्रमाणात शिकविले जात असत हे दाखविणारे शेंकडो उतारे रामायण, महाभारत, भागवत, कालिदासाची काव्ये व नाटके, बाणाची कादंबरी, दण्डीचे 'दशकुमारचरित' यांसारख्या ललित-कलाकृतींत च नव्हे, तर पतञ्जलीचे व्याकरणमहाभाष्य, वात्स्यायनाचे 'कामसूत्र', 'ललितविस्तरा' सारखे बौद्ध व 'समराइच्चकहा' राख्या जैन कथांतून हि दाखविता येतात याबद्दल शंका नाही. स्त्री-शिक्षणाची परंपरा ईसवी सनाच्या नवव्या दहाव्या शतकापर्यंत चालू होती. यामुळेच प्राचीन काळी वाकाटक राणी प्रभावतीगुप्ता, सातवाहन राणी नायनिका, राजकुमारी विजयभट्टारिका यांसारख्या राजकार्यधुरंधर स्त्रिया, विजयांका, विद्या, शीलभट्टारिका यांसारख्या कवयित्री, सुलभा, सुजाता, धम्मदिन्ना यांसारख्या पंडित महिला निर्माण होऊ शकल्या. म्हणूनच चंद्रगुप्त मौर्याच्या स्त्री-रक्षकाचा व पाण्ड्य देशावर सत्ता गाजविणाऱ्या महिलांचा मेग्यास्थिनीजने केलेला उल्लेख काल्पनिक मानण्याचे कारण नाही व 'भारहूत' येथील शिल्पात सुसज्ज घोड्यावर स्वार झालेली स्त्री व अजिंठ्याच्या चित्रांत 'सुवसनालंकृता नारी' दिसते याबद्दल आश्चर्य करण्याचे प्रयोजन उरत नाही. उपर्युक्त ६४ विषयांचे अध्यापन करण्यासाठी या विषयांवरचे ग्रंथ हि असले पाहिजेत हे अनुमान सयुक्तिक च आहे. विद्यापीठाच्या विध्वंसात हे ग्रंथ जाळले गेले हे आमचे मोठे च नुकसान झाले हे खेदाने मान्य करणे भाग आहे.

ईसवी सनाच्या ११ व्या व १२ व्या शतकानंतर मात्र स्त्री-शिक्षणाची ही परंपरा खंडित झाली. हळू हळू स्त्री घरात कोंडली गेली व 'रांधा, वाढा व उष्टी काढा' हे तिच्या नशिबी आले ही दुर्दैवाची गोष्ट आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मात्र या

परिस्थितीत पूर्णपणे नसला तरी थोडा-फार बदल झाला व आज वैद्यकीय शास्त्र, वकिलांचा व्यवसाय, वृत्तपत्रसंपादन यांसारख्या निरनिराळ्या क्षेत्रांत महिला चमकू लागल्या आहेत, शिकारीसारख्या साहसी क्षेत्रात हि स्त्रिया वावरत आहेत व आपले अनुभव लोकांपुढे मोकळेपणाने ठेवत आहेत व त्यांना तशी संधी हि मिळते हे शुभ चिह्न आहे. स्त्रीशिक्षणाच्या प्राचीन परंपरेची जाणीव निरनिराळ्या क्षेत्रात धडाडीने उतरणाऱ्या आजच्या महिलांना स्फूर्तिदायक ठरेल असा विश्वास वाटतो.

[ लोकप्रभा दिवाळी अंक २१ ऑक्टोबर १९७९ ]

३४५८
२४५१८ निबंध

# २३. संस्कृत आणि विज्ञान

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपल्या या खंडप्राय देशाच्या पुनर्रचनेचा प्रश्न प्रामुख्याने पुढे यावा हे स्वाभाविक आहे. पुनर्रचनेचा हा प्रश्न संपूर्ण समाज संस्कार-संपन्न व सुसमृद्ध होण्याने च सुटेल हे स्पष्ट आहे. आपण स्वीकारलेल्या लोकशाहीला खरा अर्थ प्राप्त करून देण्यासाठी शिक्षणाचे दरवाजे सर्व थरांतील लोकांना उघडून देणे आवश्यक असल्यामुळे १५-२० वर्षांत शाळा व महाविद्यालये यांच्या संख्येत वाढ झाली हे योग्य च झाले. आजचे युग विज्ञानाचे आहे व आमच्या आधुनिक सभ्यतेचा पाया वैज्ञानिक उन्नतीवर आधारलेला असल्यामुळे पदार्थ-विज्ञान, रसायन, जीवशास्त्र यांसारख्या भौतिक शास्त्रांच्या अध्ययन - अध्यापना वर जोर देणे आवश्यक आहे हे कोणी हि समंजस माणूस मान्य करेल. परंतु उपर्युक्त विषय शिकविण्याची सक्ती केल्याने वैज्ञानिक दृष्टिकोण निर्माण होईल ही खात्री बाळगणे आणि त्या जोरावर भारतासारख्या बहुभाषिक देशात भाषाशिक्षणाची संपूर्ण हेळसांड करणे हे मात्र परिणामी अत्यंत घातक ठरेल असा इशारा देणे योग्य. वैज्ञानिक दृष्टिकोण आणि भाषाशिक्षण, विज्ञान आणि संस्कृतचे अध्ययन, अध्यापन यांमध्ये काही मूलभूत विरोध आहे असे डॉ. जयवंतराव नारळीकर यांच्यासारख्या भाषाप्रभु वैज्ञानिकांच्या उदाहणांवरून मुळीच दिसत नाही. वैज्ञानिकाला आपले विचार व्यक्त करण्यासाठी व समाजाला विज्ञानाची उपयुक्तता पटविण्यासाठी देखील भाषेचा च उपयोग करावा लागेल हे उघड आहे व भाषारूपी साधन जर नव्या वैज्ञानिकांना परिणामकारक पद्धतीने वापरता आले नाही तर समाजापासून त्यांची फारकत होणे अपरिहार्य ठरेल व त्यातून एक नवा उच्चभ्रू वैज्ञनिकांचा वर्ग निर्माण होईल असे म्हणण्यावाचून गत्यंतर नाही. आणि वस्तुतः वैज्ञानिक दृष्टिकोण निर्माण करणे विषयावर अवलंबून नसून तो विषय शिकवणाऱ्या शिक्षकावर म्हणजेच त्याच्या समृद्ध, संस्कारसंपन्न आणि विचक्षण व्यक्तित्वावर अवलंबून आहे हे अमान्य करता येईल का ?

समृद्ध, संस्कार, संपन्न व विचक्षण नागरिक निर्माण करण्याची जर आकांक्षा असेल तर मात्र संस्कृतच्या अध्ययनाची आज होणारी उपेक्षा परिणामी अनिष्ट च ठरेल. संस्कृत हा शब्द च संस्काराचा द्योतक आहे. तसे नसते तर संकर च निर्माण झाला असता. 'संपरिभ्यां करोतौ भूषणे' ह्या पाणिनीच्या सूत्राचे मर्म ध्यानात ठेवणे भाग च आहे. खरं पाहिले तर संस्कृत ही केवळ भाषा नाही. तर भाषा-शिक्षणाची एक शिस्त आहे.परिवर्धित विचारांची तर्कशुद्ध सरणी आहे. ही गोष्ट संस्कार-संपन्नतेचे ध्येय बाळगणाऱ्या नवसमाज निर्मितीच्या पुरस्कर्त्यांनी तर मुळीच विसरता कामा नये. संस्कृत भाषेतील आत्मनेपदी, परस्मैपदी व

उभयपदी धातूंचे उदाहरण घ्या. मुद्, शुभ्, लभ् वगैरे धातूंचे अर्थ प्राधान्याने स्वतःशी संबद्ध असल्यामुळे ते आत्मनेपदी व कृष्, युध्, कुप्, भृ या धातूंचे अर्थ प्राधान्याने दुसऱ्यासाठी असल्यामुळे परस्मैपदी आहेत. कथ्, गण्, मंत्र् यांचे अर्थ केवळ स्वतःसाठी च नाहीत, त्यांचा दुसऱ्यासाठी हि उपयोग होतो हा अनुभव असल्यामुळे ते उभयपदी. नमस्कार दुसऱ्यासाठी पर्यायाने शिष्टाचारासाठी म्हणून नम् परस्मैपदी परंतु वंदन मात्र 'प्रणमति उन्नतिहेतोः' या न्यायाने स्वतःसाठी म्हणून वन्द् आत्मनेपदी ही सर्व विचारांची शिस्त च नव्हे का ? याचा आपण दैनंदिन व्यवहारात याच पद्धतीने उपयोग करतो ना ? याचे विज्ञानाशी वैर तर नाहीच, किंबहुना हे विशिष्ट ज्ञानच आहे हे अमान्य करून कसे चालेल ? संस्कृत शिकताना हे कळत नसेल तर मग 'नैष स्थाणोरपराधः यदि एनमन्धः न पश्यति' असे च म्हटले पाहिजे.

संस्कृत शिकणे म्हणजे 'रामः रामौ रामाः' घोकत बसणे किंवा 'शक्लृपच्मुच्रिचवच्विच्सिच्प्रच्छित्यज्निजिर्भजः' यासारख्या व्याकरणाच्या कारिका पाठ करणे नव्हे किंवा 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' या तत्त्वज्ञानात्मक सिद्धांताची घटपटादिकांच्या न्यायसिद्ध भाषेत चर्चा करण्याचा बौद्धिक आनंद उपभोगणे नव्हे हे समजावून देण्याची आज गरज आहे. संस्कृतचा अभ्यास करणे म्हणजे निव्वळ कल्पनाप्रचुर नाट्य किंवा काव्य यांची ओळख करून घेणे हा ही एक गोड गैरसमज आहे. संस्कृतात वर उल्लेखिलेल्या वेदांतातील अद्वैत सिद्धान्ता प्रमाणे 'ऋणं कृत्वां घृतं पिबेत्', 'भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः' अशा निखळ सुखवादाचा पुरस्कार करणारी चार्वाक विचारसरणी हि आहे. राजनीतिशास्त्राची सांगोपांग चर्चा करून राजाला अखंड सावधानतेचा व्यावहारिक इशारा देणारा अर्थशास्त्रासारखा 'प्रदीपः सर्वविद्यानाम्' या पदवीला आज हि पात्र ठरणारा ग्रंथ कौटिल्याने संस्कृतात च लिहिला. चरक व सुश्रुत यांच्यासारख्या शल्यकर्म-विशारद चिकित्सकांना आपले वैद्यकशास्त्रावरील ग्रंथ लिहिताना या भाषेची अडचण भासली नाही; माणसांना निरोगी राहणे शक्य आहे. 'सर्वथा सुशक्या एव नीरोगता' रोग त्यांच्या शरीरात प्रवेश करतात हे खरे परंतु त्याला तेच जबाबदार - 'यद्रोगाः अस्मच्छरीरेषु प्रवेशं कुर्वते तत्र वयमेव दोषाभाजः' यासारखा वैद्यकशास्त्राला मान्य असणारा सिद्धांत या भाषेत प्रासादिक पद्धतीने मांडला गेला. गणितशास्त्रातली शुल्वसूत्रे या भाषेत गणितज्ञांनी ग्रथित केली. स्थापत्यशास्त्रावरचे 'मानसार' किंवा 'समराङ्गणसूत्रधार' यासारखे ग्रंथ लिहिताना प्राचीन लेखकांनी या भाषेचा आश्रय घेतला. 'नलपाकदर्पण' किंवा 'पाकमार्तण्ड' यांसारखे पाकशास्त्रावरचे ग्रंथ या भाषेत लिहिले गेले; मृगयेच्या तीन्ही प्रकारांचे स्थलमृगया, जलमृगया

आणि अन्तरिक्षमृगया यांचे वर्णन नीलकंठाने संस्कृतात साक्षेपाने केले आणि हत्तीसारख्या ज्या प्राण्यांना जाळ्यात पकडले जाते त्यांच्या सवयीचे वर्णन करणारे 'मानसोल्लास', 'गजग्रहशिक्षा', 'मातंङ्गलीला' यांसारखे ग्रंथ हि ज्या भाषेत निर्माण झाले त्या भाषेला विज्ञानाचे किंवा वैज्ञानिक दृष्टिकोणाचे वावडे नव्हते आणि आज असण्याचे कारण नाही हे स्पष्ट आहे. किंबहुना उपर्युक्त शास्त्रांचे प्रमाणभूत इतिहास लिहावयाचे झाले तर जाणकारांना संस्कृतातील जुन्या संस्कृत ग्रंथातील विचारसरणीचा उपयोग करून घ्यावा लागेल ही वस्तुस्थिती आहे.

ऐतिहासिक महत्त्वाचा भाग सोडून दिला व भविष्यकाळाची चाहूल लागण्याच्या दृष्टीने विचार केला तर संस्कृत आणि विज्ञान लोकभाषांत म्हणजेच मराठी, गुजराथी, बंगाली, कानडी, हिंदी या भाषांत उपलब्ध करून देण्याची फार मोठी गरज आहे; तशी भाषा आज अनेक वेळा ऐकू येते. अशा वेळी नवीन अन्वर्थक शब्द निर्माण करण्याची उल्लेखनीय शक्ती असलेल्या संस्कृत भाषेची उपेक्षा करणे म्हणजे आमच्या सर्व भाषांचा मूलाधार नाहींसा करणे. रसायनशास्त्रांत Bath या नावाने प्रसिद्ध असलेल्या साधनाला संस्कृतच्या साहाय्याने 'मज्जनी' हा शब्द तयार केला म्हणजे Cold bath ला शीत-मज्जनी, Hot bath ला उष्ण-मज्जनी, Sand bath ला वालु-मज्जनी असे अनेक अन्वर्थक व सुटसुटीत शब्द तयार करता येतात असा परिभाषा-समितीच्या सदस्यांचा अनुभव आहे. 'दूरध्वनी' हा शब्द समजला की त्यापासून दूरध्वनित, दूरध्वनक, दूरध्वनना असे शास्त्रीय शब्द सहज तयार होतात आणि त्यांचा वापर करणे सुलभ होते. आज हि प्रचलित असलेले विधान, निधान, समाधान, परिधान, आधान, व्यवधान, संधान या सारखे निरनिराळ्या अर्थांचे शब्द एका 'धा' धातूला निरनिराळे उपसर्ग लावून तयार झाले हे संस्कृत भाषेचे वरदान च नव्हे का ? प्रहार, आहार, संहार, परिहार या शब्दांची निर्मिती करून संस्कृतने आमच्या भाषा समृद्ध केल्याच ना ? इंग्रजीतील ab, sub वगैरेंसाठी योग्य प्रतिशब्द निर्माण करताना संस्कृतातील अधि, उप, अव, अध या उपसर्गांना शरण जाण्यावाचून गत्यंतर नाही. संस्कृतच्या या संजीवनी शक्तीकडे पाठ फिरवून आमच्या प्रचलित भाषांचा वैज्ञानिक विश्वात समावेश होणे शक्य नाही हे कोण अमान्य करील ?

तात्पर्य, संस्कृत आणि विज्ञान यामध्ये मूलभूत विरोध नव्हता व नाही; किंबहुना विज्ञान हे जर संस्कारित ज्ञान असेल तर त्याच्याशी संस्कृतची सांगड घालण्याचा सहेतुक व भरीव प्रयत्न करण्याची आज विशेष गरज आहे. हा प्रयत्न शालेय व महाविद्यालयीन पातळीवर करणे नवीन पिढीच्या मनोविकासाच्या दृष्टीने अधिक इष्ट. वैज्ञानिकांना हि वाग्वैभवाची उपासना करण्याच्या बाबतीत

संस्कृतचा अतिशय उपयोग होईल. कारण मराठी, गुजराथी, हिंदी, कानडी इत्यादि भाषांवर प्रभुत्व संस्कृतच्या साहाय्याने सहज मिळवता येते, हा सार्वत्रिक अनुभव आहे. विज्ञानाचा किंवा वैज्ञानिक दृष्टिकोणाचा प्रभावी प्रसार करण्याच्या व्यावहारिक बाबतीत ही 'गौरवं प्राप्यते दानान्नतु वित्तस्य संचयात्' या सारख्या समर्पक सुभाषितांनी संपन्न असणाऱ्या संस्कृतचा उपयोग अगदी वादातीत आहे. तत्त्व व व्यवहार या दोन्ही क्षेत्रात संस्कृत आणि विज्ञान यांचा समन्वय निःसंशयपणे कल्याणकारक ठरेल.

(मुंबई आकाशवाणीच्या सौजन्याने)

[ सन्मार्गमित्र दिपावली १९८४ ]

# २४. वैज्ञानिक युगांत संस्कृतची उपयुक्तता

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपल्या या खंडप्राय देशाच्या पुनर्रचनेचा प्रश्न प्रामुख्याने पुढे यावा यांत नवल नाही. देशाची पुनर्रचना करण्यासाठी संपूर्ण समाज सुसमृद्ध व संस्कारसंपन्न होणे आवश्यक असते; आपण स्वीकारलेल्या लोकशाहीला खरा अर्थ प्राप्त करून द्यावयाचा असेल तर ही एक मूलभूत गरज आहे व या दृष्टीने समाजाच्या सर्व थरांतील लोकांना शिक्षणाचे दरवाजे उघडून देणे अत्यावश्यक ठरले. त्या दृष्टीने गेल्या १०-१५ वर्षांत शाळा व महाविद्यालयें यांच्या संख्येत वाढ झाली हे योग्यच झाले. आजचे युग विज्ञानाचे आहे व या आमच्या सभ्यतेचा पाया वैज्ञानिक उन्नतीवर आधारलेला असल्यामुळे पदार्थ-विज्ञान, रसायन, जीवशास्त्र यांसारख्या भौतिक शास्त्रांचा अध्ययन-अध्यापनावर जोर देणे हि आवश्यक आहे यांत शंका नाही; परंतु हे विषय शिकण्याची सक्ती केली म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोण निर्माण होईल अशी खात्री बाळगणे व या जोरावर भारतासारख्या बहुभाषिक देशांत भाषाशिक्षणाची संपूर्ण हेळसांड करणे हे मात्र परिणामी घातक ठरेल असे म्हटल्यावाचून गत्यंतर नाही. वैज्ञानिक दृष्टिकोण व भाषाशिक्षण यांत कांही मूलभूत विरोध आहे असे हि म्हणता येणार नाही. डॉ. जयंत नारळीकर हे भाषाप्रभु वैज्ञानिकांचे नेत्रदीपक उदाहरण होय. वैज्ञानिकाला आपले विचार व्यक्त करण्यासाठी, समाजाला विज्ञानाची उपयुक्तता पटवून देण्यासाठी भाषेचा च उपयोग करावा लागेल व हे साधन वैज्ञानिकांना परिणामकारक पद्धतीने वापरता न आले तर समाजापासून त्यांची फारकत होऊन त्यांचा हि निराळा म्हणजेच नवा उच्चभ्रू वर्ग निर्माण होण्याचा संभव दृष्टीआड करता येणार नाही. वस्तुतः दृष्टिकोण निर्माण करणे हे विषयावर अवलंबून नसून तो विषय शिकविणाऱ्या शिक्षकावर म्हणजेच त्याच्या समृद्ध, संस्कारसंपन्न व्यक्तिमत्वावर अवलंबून आहे हे मान्य च केले पाहिजे.

समृद्ध व संस्कारसंपन्न व्यक्तिमत्व असणारे शिक्षक व नागरिक निर्माण करण्याची आकांक्षा जर असेल तर मात्र संस्कृतच्या अध्ययनाची हेळसांड करून मुळीच चालणार नाही. 'संस्कृत' हा शब्द च संस्काराचा द्योतक आहे; तसे नसते तर संकर च निर्माण झाला असता. खरं पाहिले तर संस्कृत ही केवळ भाषा नाही, ती एक भाषाशिक्षणाची शिस्त आहे; परिवर्धित विचारांची तर्कशुद्ध सरणी आहे. संस्कृतचे आत्मनेपदी, परस्मैपदी व उभयपदी धातु आहेत. याचा जीवनाशी, जीवनापाठीमागे असणाऱ्या तत्त्वज्ञानाशी जवळचा संबंध आहे. मुद्, शुभ्, लभ् वगैरे धातूंचे अर्थ प्राधान्याने स्वतःशी संबद्ध असल्यामुळे ते आत्मनेपदी व कृष्, युध्, भृ यांचे अर्थ प्राधान्याने दुसऱ्यासाठी असल्यामुळे परस्मैपदी आहेत. कथ्,

गण्, यांचे अर्थ केवळ स्वतःसाठी च नव्हे तर दुसऱ्यांसाठी हि. असल्यामुळे ते उभयपदी आहेत. वन्द् हा स्वतःसाठी मानला गेल्यामुळे आत्मनेपदी तर त्याच अर्थाचा नम् हा धातु प्राधान्याने दुसऱ्यासाठी म्हणजे आजच्या परिभाषेत केवळ शिष्टाचारासाठी असल्यामुळे परस्मैपदी आहे ही सर्व विचारांची एक शिस्त नव्हे का ? याचा आपण दैनंदिन व्यवहारात सतत उपयोग करीत नाही का ? संस्कृत शिकताना हे कळत नसेल तर तो संस्कृतचा दोष नव्हे; शिकविणाऱ्यांचा व शिकणाऱ्यांचा आहे. संस्कृत परिभाषेत सांगायचे म्हणजे 'नैष स्थाणोपराधः यद्येनमन्धः न पश्यति'.

संस्कृत भाषेत अनुस्यूत असलेला हा तात्त्विक परंतु जीवनाला उपयोगी असणारा विचार सोडून दिला व भारतातल्या विद्यमान समस्येचा विचार केला तरी संस्कृतचे अध्ययन वास्तवात लाभदायक ठरेल. राष्ट्रीय एकात्मतेचे च उदाहरण घ्या. सर्व भारतवासीयांना आसेतुहिमाचल संस्कृतीच्या रेशमी धाग्यांनी बांधून ठेवण्याचे कार्य भूतकाळात संस्कृतने च केले, व भाषिक दुरभिमानाने झांकाळून गेलेल्या आजच्या भारतात उत्तर भारत द दक्षिण भारत असे कृत्रिम, एकमेकांपासून वेगळे निघू इच्छिणारे समाज निर्माण व्हावे असे मनोमन वाटत नसेल तर संस्कृतचा च अवलंब करणे श्रेयस्कर ठरेल. भारतीयांत एकात्मता रुजविण्याचे काम महाभारत व रामायण या संस्कृत महाकाव्यांनी केलेले आहे व ही संस्कृत भाषा च आज धुमसणाऱ्या भाषिक संघर्षाचा अग्नि विझविण्याच्या कामी उपयोगी ठरेल. राष्ट्रीय एकात्मतेसाठी संस्कृतचा किती उपयोग होऊ शकतो याचे प्रात्यक्षिक सन् १९५६-५७ साली प्रकाशित झालेल्या संस्कृत कमिशनच्या अहवालात नमूद झालेले आहे. हे लक्षात घेऊन च भारताला वैज्ञानिक दृष्टिकोण देणारे भारताचे पहिले दिवंगत पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी "If I was asked what was the greatest treasure that India possesses and what is her finest heritage, I would answer unhesitatingly--it is the Sanskrit Language and Literature and all that it ळजपवअयपसृ--"भारताजवळ असलेले सर्वात महान धन कोणते व वारसाहक्काने (परंपरेने) लाभलेली भारताजवळची सर्वोत्कृष्ट संपत्ति कोणती असे जर मला कोणी विचारले तर मी असंदिग्धपणे उत्तर देईन की संस्कृत भाषा, संस्कृत वाङ्मय आणि त्यात जे काही आहे तेच हे धन वा ही संपत्ती होय"-- असे गौरवोद्गार काढले व हा अनमोल ठेवा जोपर्यंत आपण जतन करून ठेवू शकते तोपर्यंत भारत एकसंध च राहील ही ग्वाही दिलेली आहे. F. W. Thomas सारख्या निःपक्षपाती पाश्चात्य पंडिताने तर भारतासारख्या

बहुभाषिक देशांत संस्कृतला संपूर्ण राष्ट्राची अस्मिता व्यक्त करणारी भाषा म्हणून गौरवाचे स्थान देणे योग्य होईल असे मत व्यक्त केले. या सर्वांचा प्रभाव म्हणून की काय केंद्र सरकारने सन् १९६९ पासून नारळी पौर्णिमेच्या दिवशी रक्षाबंधनाचे प्रतीक म्हणून संस्कृत दिवस साजरा करण्याची प्रथा पाडली व तसा आदेश राज्य सरकारांना हि दिला. विद्यमान केंद्रीय शिक्षणमंत्री प्रो. नुरूल हसन यांनी एका वर्षी संस्कृत दिन (२१ ऑगस्ट १९७५ रोजी) दिल्लीत साजरा करण्याच्या वेळी पूज्य बापूजींच्या शब्दांचा निर्वाळा देताना "What is that keeps us firm to the ground ?"-- "सुदृढ आधारावर दृढतेने टिकवून राहणे आपल्याला कशामुळे जमते ? " असा प्रशन विचारून त्याचे चोख उत्तर "Probably nothing other than Sanskrit helps us stick to the ground"--बहुधा संस्कृत सोडून दुसरे असे काहीच नाही जे इतक्या दृढतेने आपल्याला सुदृढ आधारावर टिकवून ठेवते" या शब्दांत दिले व म्हणून विज्ञान व तांत्रिकी या विषयांतील प्रगतीबरोबरच संस्कृत टिकवण्याचा, रुजविण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे हे ठासून सांगितले. आपण च निवडून दिलेल्या उपर्युक्त नेत्यांच्या विचारांचे महत्त्व ओळखून सर्व राज्यांनी आपल्या शिक्षणक्रमाची उभारणी करणे च योग्य ठरेल. नवशिक्षित समाजाला राष्ट्रीय एकात्मतेची आवश्यकता नाही का ? जर असेल तर संस्कृतच्या उपयुक्ततेबद्दल वाद करण्याचे कारण च उरत नाही. किंबहुना ती आजची गरज आहे यात शंका नाही.

संस्कृत म्हणजे व्याकरणाची रूपे पाठ करणे, 'रामः रामौः रामाः' घोकत बसणे असे आज समीकरण होऊन बसलेले आहे. संस्कृतात फक्त काव्ये नाटके आहेत किंवा निव्वळ धार्मिक ग्रंथ आहेत हा हि एक गैरसमज आहे. शंकराचार्यांसारख्या अद्वैतवादी, मध्वाचार्यांसारख्या द्वैतवादी तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करणाऱ्यांबरोबर 'ऋणं कृत्वा घृत पिबेत्', 'भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः' सारखा सुखवादाचा मूल-मंत्र चार्वाकाने संस्कृतात च सांगितला. कौटिल्याने राजनीतिशास्त्रावरला आपला ग्रंथ लिहिण्यासाठी याच भाषेचा वापर केला; 'मानसार', 'समराङ्गणसूत्रधार हे ग्रंथ या भाषेतले. नलपाकदर्पण किंवा पाकमार्तण्ड हे पाकशास्त्रावरील ग्रंथ लिहिताना या भाषेची अडचण त्या ग्रंथकर्त्यांना भासली नाही. थोडक्यात शास्त्रीय भाषेचे संस्कृतला वावडे आहे असे म्हणणे अन्यायाचे व असत्यपूर्ण आहे.

इतकेच नव्हे, तर आम्ही जगांतील सर्व ज्ञान व विज्ञान आमच्या मराठी, हिंदी, बंगाली, कानडी वगैरे लोकभाषांत सामावून घेण्याची व विज्ञान खऱ्या अर्थाने सामान्य जनतेला उपलब्ध करून देण्याची भाषा बोलत आहोत. अशा

वेळी संस्कृतचा उपयोग नाही असे म्हणणे म्हणजे वस्तुस्थितीचे संपूर्ण अज्ञान दाखविण्यासारखे आहे. नवीन अन्वर्थक शब्द निर्माण करण्याची संस्कृत भाषेची शक्ति हा तर आमच्या सर्व विकसनशील भाषांचा मूळ आधार आहे. रसायनशास्त्रांतील Bath या पारिभाषिक शब्दाला संस्कृतच्या साहाय्याने 'मज्जनी' असा शब्द तयार केला तर शीतमज्जनी (Cold Bath), वालुमज्जनी (Sand Bath), उष्णमज्जनी (Hot Bath) यांसारखे अनेक अन्वर्थक शब्द सहज निर्माण होतात. 'दूरध्वनी' या शब्दामागली संकल्पना समजली तर दूरध्वनित, दूरध्वनन, दूरध्वनक, यांसारखे संबंधित शास्त्रांतले अनेक शब्द सहजपणे वापरता येतील. आज हि प्रचलित असलेले व्यवधान, संधान यांसारखे निरनिराळ्या अर्थांचे शब्द एका'धा' या धातूला निरनिराळे उपसर्ग लावून तयार झालेले आहेत हे सुद्धा संस्कृतमधल्या उपसर्गांचे च वरदान नव्हे का ? इंग्रजीमधल्या ab, sub वगैरेसाठी योग्य प्रतिशब्द निर्माण करताना अधि, उप, अव वगैरे उपसर्गांना च शरण जावे लागेल. संस्कृतच्या या संजीवनी शक्तीकडे पाठ फिरवून आमच्या प्रचलित भाषांचा ईप्सित विकास होईल असे मानणे मृगजळापाठीमागे धावण्यासारखे आहे.

असे शब्द निर्माण केले तर आमच्या भाषा क्लिष्ट होतील, दुर्बोध होतील हा आक्षेप टिकण्यासारखा नाही. क्लिष्ट व दुर्बोध हे मुळात सापेक्ष शब्द आहेत. क्लिष्ट व दुर्बोध कोणाला हा प्रश्न आहे; शास्त्र शिकणाऱ्याला नवीन शब्द शिकल्याशिवाय प्रगती कशी करता येईल ? दैनंदिन व्यवहारांतली भाषा सोपी असावी हे रास्त, परंतु रसायनशास्त्र किंवा पदार्थविज्ञान ही शास्त्रे शिकू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याला सोप्या भाषेवर समाधान बाळगून कसे चालेल ? त्याने संपन्न किंवा प्रगल्भ भाषेवर प्रभुत्व मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे; कष्टाची त्याला काय तमा ? मिले ग़म यहाँ हमको तो क्या ग़म ?

बहुजनसमाजाला संस्कृतमध्ये पारिभाषिक शब्द कळणार नाहीत असे म्हणणे म्हणजे वस्तुतः बहुजनसमाजावर अन्याय करण्यासारखे, त्याच्यावर उगीच अविश्वास दाखवण्यासारखे आहे. सातां समुद्रांपलीकडील इंग्रजी भाषा हस्तगत करण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या भारतातील बहुजनसमाजाला मुळात भारतीय असलेली, आमच्या संस्कृतीचे मूल्य आजपावेतो सुरक्षित राखणारी महारभारत-रामायणाची भाषा समजू शकणार नाही असे समजणे म्हणजे बहुजन-समाजाचा नाहक अधिक्षेप करण्यासारखे आहे; त्यांना सतत अज्ञानात ठेवण्याचा सहेतुक प्रयत्न करण्याचे हे पाप लोकांच्या खऱ्या कैवाऱ्यांनी करू नये हे उत्तम.

संस्कृतच्या संपन्नतेचे, संजीवनी शक्तीचे मुद्दे जरी सोडून दिले व लोकशाहीला

अत्यावश्यक असणाऱ्या वाणीच्या सामर्थ्याचा म्हणजेच वाग्वैभवाचा विचार केला तरी संस्कृतची उपासना करणे आवश्यक ठरते. लोकशाहीत तर वाग्वैभवाशिवाय उत्कर्षाची कल्पना च करता येत नाही; प्रभावीपणे बोलणाऱ्यांचे चुरमुरे खपतात व न बोलणाऱ्या मोतीचूर पडून राहतो ही वस्तुस्थिती आहे. मराठी, हिंदी, बंगाली, कानडी वगैरे भाषांवर प्रभुत्व मिळविण्यासाठी संस्कृतचा उपयोग होतो हा सार्वत्रिक अनुभव आहे. I knew Kannada well because I knew my Sanskrit well ''मला कानडी भाषा चांगली येते याचे कारण हे की मला संस्कृत चांगले येते'' असे म्हणणारे रूइया महाविद्यालयाचे कानडीभाषी प्राचार्य व 'आम्हाला उच्चस्तरावरील मराठी शिकवण्यासाठी आमच्या तुटपुंज्या संस्कृतचा च उपयोग होतो' असे प्रामाणिकपणाने सांगणारी सामान्य मराठी-भाषी शिक्षिका यांचा अनुभव एका च दिशेकडे बोट दाखवतो.

दैनंदिन व्यवहारात आपला विषय पटवून देतांना संस्कृतच्या समर्पक सुभाषितांचा उपयोग होतो हे प्रामाणिक माणूस अमान्य करील असे वाटत नाही. द्रव्याच्या संचयापेक्षा वितरणाला सामाजिक दृष्टीने महत्त्व आहे हे जरी सांगायचे झाले तरी 'गौरवं प्राप्यते दानात् न तु वित्तस्य संचयात्' या सुभाषिताचा उपयोग करता येईल. बरं उदाहरण पाहिजे असले तर 'स्थितिरुच्चैः पयोदानां पयोधीनां अधःस्थितिः '-- पाण्याचे वाटप करणारे मेघ वर व पाण्याचा संचय करणारा समुद्र खाली ' हे सुटसुटीत साधे उदाहरण देता येते. 'अतिस्नेहः पापशङ्की' 'रिक्तः सर्वो भवति हि लघुः पूर्णता गौरवाय', 'याञ्चा मोघा वरमधिगुणे नाधमे लब्धकामा' सारखी शेकडो संस्कृत सुभाषिते म्हणजे आमच्या भारतीय भाषांना देऊन टाकलेली बहुमोल देणगी आहे. याचा जर आम्हाला उपयोग करता येत नसेल तर तो आमचा करंटेपणा ठरेल.

वर दिलेली शेंकडो समर्पक सुभाषिते ज्या भाषेने बहाल केली त्या संस्कृत भाषेचा परिचय वस्तुतः लहान वयांत च म्हणजे शिक्षणाच्या प्राथमिक व माध्यमिक अवस्थेत च करून दिला तर ती शिदोरी त्यांना पुढील जीवनांत हि उपयोगी पडेल. राजकीय व्यवहारात भारताला महत्त्वाचे स्थान मिळवून देणारे लोकमान्य टिळक व स्वदेशासाठी आपल्या जीवनाचे होम करणारे व हंसत हंसत मृत्यूला सामोरे जाणारे भगतसिंहासारखे क्रांतिकारक यांना संस्कृतमध्ये लिहिलेल्या गीतेनेच प्रेरणा दिली ही इतिहासाची ग्वाही असताना संस्कृतचा व्यवहारात उपयोग होत नाही असे कसे म्हणता येईल ?

तात्पर्य, तत्त्व व व्यवहार या दोन्ही क्षेत्रात संस्कृतची उपयुक्तता वादातीत आहे. भूतकाळ व वर्तमानकाळ तर संस्कृतने घडविलेलाच आहे; भविष्यकाळ

उज्वल करण्याची हि शक्ति संस्कृत भाषेत आहे. हे सर्व विसरून आम्ही नवीन पिढीला संस्कृत शिक्षणापासून वंचित करण्याचे धोरण स्वीकारले तर भविष्यकाळाने आम्हाला क्षमा करावी अशी अपेक्षा बाळगणे अयोग्य ठरेल.

[ जीवन-विकास जुलै १९७६ ]

# २५. संस्कृतच्या अध्ययनाची आवश्यकता

वर्तमान युग विज्ञानाचे आहे व या दृष्टीने आमच्या शिक्षणक्रमात वैज्ञानिक विषयांना प्राधान्य देण्याची प्रवृत्ती कालपरत्वे योग्यच आहे. परंतु वैज्ञानिक युगात भाषांचे अध्ययन करण्याची जरूरी नाही किंवा भाषांचे अध्ययन निरुपयोगी म्हणून त्याज्य असा एक गैरसमज सध्या निर्माण झालेला दिसतो. पदार्थ, विज्ञान, रसायन, जीवशास्त्र वगैरे विषयांचे अध्ययन शालेय अभ्यासक्रमात अनिवार्य केले म्हणजे समाजात वैज्ञानिक दृष्टिकोण निर्माण होईल हाही एक गैरसमजच आहे. वैज्ञानिक दृष्टिकोण निर्माण करणे विषय शिकवणाऱ्या शिक्षकांवर अवलंबून आहे व त्यांच्याजवळ जर तो नसेल तर त्यांनी पदार्थ, विज्ञान किंवा रसायन यांसारखे शास्त्रीय विषय गतानुगतिक पद्धतीने शिकविले तरी उद्देश साध्य होणार नाही हे आपणास जितके लवकर उमगेल तितके श्रेयस्कर असे म्हणण्याची पाळी आलेली आहे. शिवाय वैज्ञानिकांजवळ आपले ज्ञान लोकांपर्यंत पोचविण्यासाठी आवश्यक असलेले भाषारूपी साधन नसेल तर अशा वैज्ञानिकांचा एक नवा उच्चभ्रू वर्ग निर्माण होऊन त्यांची समाजापासून फारकत होईल व अशा रीतीने समाजात नवे वैषम्य निर्माण करण्याचे पातक च पदरी पडेल याकडे खऱ्या समाजहितैषी व्यक्तींनी दुर्लक्ष करू नये हे उत्तम.

### अन्धः न पश्यति

भारतासारख्या बहुभाषिक देशात तर भाषाशिक्षणाकडे दुर्लक्ष करून नुकसानच होईल. या भाषाशिक्षणात जोम व शिस्त निर्माण करण्याच्या दृष्टीने तर संस्कृतच्या अध्ययनाची उपेक्षा करणे म्हणजे कविवर्य मोरोपंतांच्या शब्दांत 'स्वशिर फोडाया हाणणे जसे दगडा' ठरेल असे वाटते. संस्कृत हा शब्द च मुळी संस्काराचा, प्रगल्भतेचा द्योतक आहे. अशा भाषेची तूर्त चालू असलेली उपेक्षा म्हणजे संकराला, गोंधळाला निमंत्रण. वस्तुतः संस्कृत ही केवळ भाषा नाही, ती एक विचारांची शिस्त आहे; परिवर्धित विचारांची तर्कशुद्ध सरणी आहे. प्रगल्भ विचारांचा सुसंस्कारित समाज निर्माण करू इच्छिणाऱ्या व्यक्तींनी 'शाळात यापुढे संस्कृत ठेवणे म्हणजे काळाविरूद्ध पोहणे' असे म्हणावे हा खरोखर दैवदुर्विलास आहे ! संस्कृतमधल्या धातूंचे च उदाहरण घेतले तर भाषेतील शिस्त सहज लक्षात येईल. कांही धातू आत्मनेपदी, काही परस्मैपदी, तर कांही उभयपदी आहेत हे शिकविताना संस्कृतचे शिक्षक या मागील शिस्त 'वेळ नाही' या सबबीवर शिकवत नसतील तर तो संस्कृतचा दोष असे म्हणणे अन्यायाचे आहे. मुद्, लभ्, शुभ् या धातूंचे अर्थ प्राधान्याने स्वतःसाठी असल्यामुळे ते आत्मनेपदी ठरले; कृष्, कुप् वगैरे धातूंचे अर्थ प्राधान्याने इतरांसाठी म्हणजे दुसऱ्यासाठी

असल्यामुळे ते परस्मैपदी मानले गेले; व कथ्, गण् यांसारख्या धातूंचे अर्थ स्वतःप्रमाणेच इतरांसाठी हि असल्यामुळे त्यांना उभयपदी ठरविण्यात आले आहे. हा निश्चितच अपघात नव्हे; यात एक निश्चित योजना आहे, शिस्त आहे. वन्द् व नम् हे धातू एकाच अर्थाचे असतील, परंतु 'वन्द्' मधील नमस्कार स्वतःच्या उन्नतीसाठी आहे तर 'नम्' मधील नमस्कार प्राधान्याने शिष्टाचारासाठी म्हणजेच दुसऱ्यासाठी किंवा प्रचलित परिपाटीनुसार खुर्चीसाठी आहे; म्हणून पहिला आत्मनेपदी तर दुसरा परस्मैपदी ठरवला गेला. परमात्म्याला, वडील माणसांना, ज्ञानवृद्धांना वंदन व इतरांना केवळ नमस्कार ही एक शिस्त नव्हे का ? हे संस्कृतमुळे समजत नसेल तर तो संस्कृतचा दोष कसा होऊ शकतो ?

## सांस्कृतिक व भाषिक दुवा

संस्कृतच्या अभ्यासात सुरवातीला येणारा हा शिस्तबद्ध विचार सोडून दिला व सध्या ज्या सांस्कृतिक एकात्मतेचा उद्घोष निरनिराळ्या रूपाने चालू आहे त्या एकात्मतेचा विचार केला तरी संस्कृतचा खरा उपयोग लक्षात आल्यावाचून रहाणार नाही. कृत्रिम भाषाभेदांच्या कोलाहलाने व राष्ट्रभाषेच्या प्रश्नावरून निर्माण झालेल्या सध्याच्या काळात तर वणवा विझविण्याचे कायम संस्कृत भाषा च करू शकेल असा विश्वास वाटतो. प्राचीन काळी महाभारत व रामायण या संस्कृतमध्ये लिहिलेल्या महाकाव्यांनी भारतीय एकात्मता आमच्या या खण्डप्राय देशात खऱ्या अर्थाने 'आसेतु हिमाचल' निर्माण केली हे समंजस विचारवंतांना अमान्य होईल असे वाटत नाही. आज हि आमच्या प्रत्यही बोलल्या जाणाऱ्या भारतीय भाषांत संस्कृतने निर्माण केलेल्या एकात्मतेच्या खुणा स्पष्ट दिसतात. उत्तरेकडील भारत व दक्षिणेकडील भारत या निरनिराळ्या पडू पहाणाऱ्या तुकड्यांना सांस्कृतिक व भाषिक क्षेत्रांत सांधणाऱ्या दुव्याचे काम आज ही भाषा च करू शकेल, यात शंका नाही.

सांस्कृतिक क्षेत्रात एकसंधता निर्माण करणाऱ्या संस्कृत भाषेला वैज्ञानिक विषयांचे वावडे आहे हा देखील एक भ्रमच आहे व तो शाळा व महाविद्यालये यांत नियुक्त असलेल्या संस्कृत विषयांतील पाठ्यक्रमावरून च निर्माण झालेला दिसतो. वस्तुतः संस्कृतमध्ये केवळ नाटके किंवा काव्ये च लिहिली गेली असे नव्हे, तर उत्तम दर्जाचे वैचारिक साहित्य हि या भाषेत उत्पन्न झाले ही वस्तुस्थिती आहे. संस्कृत भाषेत लिहिलेल्या भगवद्गीतेने प्राचीन काळापासून विसाव्या शतकातील टिळक, अरविंद, महात्मा गांधी, आचार्य विनोबा या सर्व विचारवंतांबरोबर भगतसिंगासासारख्या क्रांतिकारकांना हि प्रेरणा दिलेली आहे यात शंका नाही. शंकराचार्यांनी आपले अद्वैत तत्त्वज्ञान जसे या भाषेत प्रभावीपणाने पटवून दिले तसेच या मध्वाचार्यांनी आपले द्वैतमत हि या भाषेच्या

आश्रयाने सांगितले; इतकेच नव्हे तर स्वर्ग, नरक, वेदप्रामाण्य वगैरैंना धुडकावून लावून 'ऋणं दृत्वा धृतं पिबेत् । भस्मीभूतस्य देहस्य पुनरामगनं कुतः' हा सुखवादाचा मूलमंत्र या भाषेतच सांगितला गेला. तत्त्वज्ञान हा विषय सोडून दिला तरी व्यावहारिक उत्कर्ष व ऐहिक अभ्युदय यांची कांस धरणाऱ्या राजाला राजनीतीचा उपदेश देणारा 'अर्थशास्त्र' हा कौटिल्याचा ग्रंथ या भाषेत लिहिला गेला हे सर्वांना माहितच आहे. चरक, सुश्रुत व नागार्जुन यांना आपले वैद्यकशास्त्रावरील ग्रंथ लिहिताना संस्कृतची अडचण वाटली नाही; भास्कराचार्यांनी 'लीलावती' व श्रीधराचार्यांनी 'गणितसार' हे गणितावरील ग्रंथ लिहिताना या भाषेचा च उपयोग केला इतकेच नव्हे तर 'मनुष्याल' 'चन्द्रिकाय', 'शिल्परत्न' यांसारखे स्थापत्य - शास्त्रांवरील ग्रंथ, समराङ्गणासूत्रधारासारखा इमारत-रचना शास्त्रावरला ग्रंथ, 'पालकाप्य' सारखे हत्ती, अश्व वगैरे प्राण्यांच्या जातींचे व संवयीचे वर्णन करणारे ग्रंथ किंवा 'नलपाकदर्पणा' सारखे पाकशास्त्रावरील ग्रंथ हि संस्कृत भाषेत रचले गेले हे लक्षात घेतले म्हणजे वैज्ञानिक किंवा शास्त्रीय विषय व्यक्त करण्याची या भाषेची क्षमता हा विवाद्य विषय होऊ शकत नाही हे सहज लक्षात येण्यासारखे आहे. किंबहुना अशा शास्त्रीय ग्रंथातील 'संख्यात्यक' 'शिञ्जनी' यांसारखे काही अन्वर्थक शब्द मोकळेपणाने स्वीकारून ते आपल्या प्रादेशिक भाषांत त्या त्या शास्त्रांत रूढ करणे भाषासमृद्धीला सहायक ठरेल.

## संस्कृत धातूंचे सामर्थ्य

यामधून आधुनिक काळात संस्कृतच्या उपयोगाची आणखी एक दिशा समजते. भाषावार प्रांतरचना अंमलात आली; इतकेच नव्हे तर ती आता स्थिरपद झालेली आहे. परंतु अद्यापि मराठी, गुजराथी, हिंदी, बंगाली, तामिळ, तेलगू, कानडी वगैरे भाषांत खऱ्या अर्थाने प्रशासन व इतर भौतिक शास्त्रांचे अध्यापन शिक्षणातील सर्व थरांत होऊ शकलेले नाही. तसे झाल्याशिवाय या भाषा समृद्ध होणार नाहीत व इंग्रजीचा च पगडा अनंत काळ चालू रहाण्याचा धोका समूळ नाहीसा होणार नाही. लोकभाषांत सर्व ज्ञान घेण्याची व देण्याची संधी जोपर्यंत लोकांना मिळत नाही तोपर्यंत आपली लोकशाही बेगडीच रहाणार हे लक्षात ठेवून नवसमाजाची निर्मिती करू इच्छिणाऱ्यांनी आमच्या मराठी, गुजराथी, हिंदी आदि भाषांत पारिभाषिक शब्दावली तयार करून त्या समृद्ध करण्याचे कंकण बांधले पाहिजे. हो करायचे असेल तर संस्कृतचे साहाय्य घेण्यावाचून गत्यंतर नाही. संस्कृतमध्ये एका 'हृ' या धातूला निरनिराळे उपसर्ग लावले म्हणजे प्रहार, आहार, संहार, विहार, परिहार असे निरनिराळे शब्द तयार होतात; इतकेच नव्हे तर 'धा' धातूला उपसर्गाच्या साहाय्याने निधान, विधान, प्रधान, परिधान,

तिरोधान, आधान यांबरोबरच संविधान किंवा संधान अशी वेगवेगळ्या संदर्भात वापरली जाणारी रूपे देता येतात हे लक्षात घेतले म्हणजे संस्कृत भाषेच्या नवनिर्मितिक्षमतेचा यथार्थ प्रत्यय येतो. या संजीवन शक्तीकडे दुर्लक्ष करून आमच्या प्रचलित भाषांना स्वतःचा संसार शास्त्रीय दृष्टीने समृद्ध करता येणार नाही. रसायन शास्त्रातील Bath या शब्दाला संस्कृतच्या मदतीने 'मज्जनी' हा सुटसुटीत, अन्वर्थक शब्द तयार केला तर शीतमज्जनी (Cold Bath), उष्णमज्जनी (Hot Bath), वालुमज्जनी (Sand Bath) वगैरे अनेक शब्द सुलभतेने निर्माण होऊ शकतील. संस्कृत भाषेच्या ह्या अपूर्व शक्तीकडे लक्ष न देणे म्हणजे पर्यायाने संभाव्य प्रगती अवरुद्ध करण्यासारखे नव्हे का ?

## शास्त्रात सोपेपणा नसतो

असे शब्द तयार केल्यामुळे भाषा क्लिष्ट किंवा बोजड होईल व जनतेला ती पेलता येणार नाही हा आक्षेप अगदी च ठिसूळ आहे. क्लिष्ट किंवा बोजड हे शब्द मुळात सापेक्ष आहेत; क्लिष्ट कोणाला हा महत्त्वाचा प्रश्न आहे. सामान्य जनतेचा शास्त्रीय परिभाषेशी संबंध येतो केव्हा ? उष्णमज्जनी, वायुमज्जनी वगैरे शब्द रसायनशास्त्र शिकू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यासाठी आहेत; सामान्य माणसाशी बोलताना यांचा उपयोग करण्याचा प्रश्न च निर्माण होत नाही. त्याच्याशी बोलताना Telephone या शब्दाचा च वापर केला पाहिजे; परंतु या यंत्रावरील पुस्तकात मात्र संस्कृतमधला थोडासा कठिण वाटणारा 'दूरध्वनी' या शब्दाचा उपयोग श्रेयस्कर कारण या शब्दापासून 'दूरध्वनक' 'दूरध्वनित,' 'दूरध्वनना' सारखे इतर शब्द तयार करता येतात; ही किमया Telephone ला साधणार नाही. दुसरा महत्त्वाचा मुद्दा. समृद्ध होण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या भाषेने सोपे होण्याचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून कसे चालेल ? रसायन शास्त्रात वापरली जाणारी इंग्रजी आज हि सोपी नाही; त्यातले पारिभाषिक शब्द सामान्य जनतेला समजतात का ? ते मुळात लॅटीन किंवा ग्रीक असले तर चालतात; मग आमच्या भाषांतले मुळात संस्कृत असले तर काय हरकत आहे ? उत्तर भारताला किंवा महाराष्ट्राला बोजड वाटणारे संस्कृत शब्द दक्षिण भारतात दैनिक व्यवहारात रूळलेले आहेत हे विसरून हि चालणार नाही. मराठीच्या दैनंदिन व्यवहारातला 'देरी' हा शब्द मद्रासच्या दक्षिणेला लोकांना समजू शकत नाही; त्यांना 'बिलम्ब' सोपा वाटतो. ही वस्तुस्थिती असताना संस्कृतप्रचुरतेला विरोध करून कसे चालेल ? याचा अर्थ आज रोजच्या व्यवहारात प्रचलित असलेले उर्दू शब्द काढून टाकावे असा मात्र नाही; परंतु नवीन शब्द तयार करताना आज ते संस्कृत प्रचुरतेमुळे कठिण वाटले तरी व्यापक भारतीय हिताच्या दृष्टीने त्यांचा स्वीकार करण्याची दृष्टी ठेवली पाहिजे; मग मिले गम यहाँ हमको तो क्या गम ?

## भाषेला जोम व वजन येईल

संस्कृतच्या अभ्यासाचे वर सांगितलेले दूरगामी इष्ट परिणाम सोडून दिले व लोकशाहीतील वाणीच्या किंवा भाषेच्या प्रभावीपणाचा व्यावहारिक विचार केला तरी सुद्धा संस्कृतच्या अभ्यासाची शालेय अभ्यासक्रमात आवश्यकता आहे हे मान्य करावे लागेल. सुटसुटीत व अन्वर्थक सुभाषिते हा संस्कृतचा अनमोल ठेवा आहे व त्यांचा योग्य ठिकाणी उपयोग करून आपण आपल्या भाषांना एक आगळा तजेला किंवा आकर्षकपणा प्राप्त करून देऊ शकतो हे विसरणे उगवत्या पिढीच्या हिताचे नाही. लोकशाहीत प्रभावीपणे बोलणाऱ्याचे चुरमुरे खपतात व तसे न करणाऱ्याचा मोतीचूर पडून राहतो याचा अनुभव येत नाही का ? हे होऊ द्यायचे नसेल तर भाषेच्या सामर्थ्याची उपासना करणे भाग आहे व या बाबतीत आम्हाला 'अतिस्नेहः पापशङ्की', 'कामी स्वतां पश्यती', 'याञ्चा मोघा वरमधिगुणे नाधमे लब्धकामा' वगैरे सुभाषिते शाळांतून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या डोळ्यापुढे ठेवून त्यांचा वापर करणे शिकवले पाहिजे. संपत्तीचा नुसता संचय न करता तिचे योग्य वाटप केले पाहिजे हा समाजवादाचा धडा शिकवायचा झाला तर 'गौरवं प्राप्यते दानात् न तु वित्तस्य संचयात्' या सुभाषितवजा ओळीचा उपयोग करणे सोयीचे नाही का ? वक्तृत्वाला व लेखनाला हि समर्पक सुभाषितांच्या उपयोगाने धार येते इतकेच नव्हे तर बहुश्रुतपणाची झळाळी हि प्राप्त होते यात शंका नाही. सार्वजनिक जीवनात प्रभाव पाडू इच्छिणाऱ्या व्यक्तींना तर आपल्या शब्दांना वजन किंवा भरीवपणा आणून देण्यासाठी समर्पक संस्कृत सुभाषितांचा वापर करणे सोयीचे ठरेल. अर्थात यासाठी संस्कृत अनिवार्य करणे हा उपाय नाही; संस्कृतबद्दलची आस्था समाजात सुरवातीपासून निर्माण करणे आवश्यक आहे. हा प्रयत्न शालेय अवस्थेपासूनच सुरू करावा लागेल व समाजातल्या काही लोकांना संस्कृतचा अभ्यास करण्यासाठी बुद्धिपुरःसर प्रोत्साहन द्यावे लागेल. यातूनच पुढे संस्कृतचे अध्ययन व संवर्धन यांची अविच्छिन्न परंपरा निर्माण होणे अत्यंत हितावह ठरेल.

## उत्तम प्रशासकांची वाण

ही परंपरा निर्माण करण्याचा महाराष्ट्राने आतापर्यंत प्रयत्न केला नाही याचे दुष्परिणाम वस्तुतः आज हि विचारवंतांना दिसू लागलेले आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांनी एका भाषणात महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचा दर्जा घसरत चाललेला असल्याबद्दल खंत व्यक्त केली होती. शैक्षणिक दर्जा घसरण्याचे एक मुख्य कारण साहित्याच्या अभ्यासाची संपूर्ण उपेक्षा हे होय. यामुळे भविष्यकाळात उत्तम प्रशासक निर्माण होणे कठिण होऊन बसणार. एका

प्रख्यात इतिहासकाराने British Association पुढे दिलेल्या भाषणात Ignoring the study of classics results into a paucity of efficient and just administrators अशा आशयाचे उद्‌गार काढले हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. इंग्लंडमधील चर्चिल, पिट आदि यशस्वी प्रशासकांच्या बाबतीत इतिहासकाराचे हे म्हणणे पूर्णपणे खरे आहे. आपल्याकडील कै. राजगोपालाचारी, कै. कैलासनाथ काटजू, कै. पु. म. लाड किंवा कै. डॉ. चिं. द्वा. देशमुख यांसारख्या अत्यंत यशस्वी ठरलेल्या प्रशासकांच्या यशस्वितेचे व कार्यकुशलतेचे गमक त्यांच्या अभिजात साहित्याच्या व्यासङ्गात आहे हे सहज लक्षात येईल. या सगळ्या व्यक्तींनी संस्कृत हा विषय व्यावहारिक अर्थाने घेतला नव्हता; परंतु संस्कृतविषयीच्या आस्थेने त्या भाषेतील साहित्याचा सूक्ष्म अभ्यास केला होता. त्यावर त्यांनी पुस्तके हि लिहिली. या सर्वांचा परिणाम प्रशासक या दृष्टीने त्यांचा आवाका वाढविण्यात व झेप उंचावण्यात झाला हे नाकारता येणार नाही. शालेय अवस्थेत संस्कृतच्या अध्ययनाला सार्वत्रिक वाव न ठेवण्यात आपण भविष्यकाळात अशा दर्जाच्या उत्तम प्रशासकांना मुकत आहोत याची जाणीव आपल्याला दिसत नाही याबद्दल खंत वाटल्यावाचून रहात नाही.

## भविष्यकाळाची संजीवनी

तात्त्विक दृष्टीने आजच्या वैज्ञानिक युगात संस्कृतच्या अभ्यासाची आवश्यकता मान्य केली तरी दैनंदिन व्यवहारात त्याचा काय उपयोग हा प्रश्न नेहमी विचारला जातो. दैनंदिन व्यवहाराचा प्रश्न असेल तर वस्तुतः ज्ञानाची हि आवश्यकता नाही. अशिक्षित व्यक्ती हि अनुभवाच्या जोरावर व्यवहार च नव्हे तर लाखो रुपयांच्या उलाढाली हि यशस्वीपणे करताना दिसतात. या दृष्टीने शिक्षण हि अनावश्यक ठरेल. याला आपण तयार आहोत का ? शिवाय नागरिकांचा दैनंदिन व्यवहार हि सुधारावा, त्याला विचारांची जोड लाभावी, त्या पाठीमागे एका विशिष्ट दृष्टिकोणाची बैठक असावी ही अपेक्षा वैज्ञानिक युगात असतेच ना ? किंबहुना यासाठीच शिक्षणाची सोय सार्वत्रिक असावी, त्यासाठी नव्या योजना आखाव्या व अंमलात आणाव्या अशीच अपेक्षा केली जाते. असे असताना भारतातील प्राचीन संस्कृतीच्या शाश्वत मूल्यांची जपणूक करणाऱ्या संस्कृत शिक्षणापासून उगवत्या पिढीला वंचित करण्याचे धोरण स्वीकारणे नवसमाज निर्मितीच्या ध्येयाला विघातक ठरेल यात शंका नाही.

तात्पर्य, संस्कृतने या देशाच्या भूतकाळात भरीव कामगिरी केलेली आहे व वर्तमानकाळ निर्माण केलेला आहे. भविष्यकाळ घडविण्याचे कार्य हि ही संजीवनी भाषा करू शकेल असा विश्वास वाटतो. म्हणूनच या भाषेची तूर्त चालू असलेली

उपेक्षा थांबवून संस्कृतच्या अध्ययनाला योग्य ते प्रोत्साहन दिले जावे व योगिराज अरविंदांची संस्कृतच्या उज्ज्वल भवितव्याची भविष्यवाणी खरी ठरावी ही इच्छा.

[ 'साप्ताहिक विवेक' १८ जानेवारी १९७६ ]

# २६. संस्कृत नाट्यनिर्मितीच्या प्रयत्नाचे शैक्षणिक व सांस्कृतिक मूल्यमापन

संस्कृत नाटके साधारणपणे काव्य या सदरात येतात; त्यांचा रंगभूमीशी च संबंध होता ही वस्तुस्थिती नाटकांच्या प्राचीनतेमुळे व संस्कृत भाषेचा व्यवहाराशी काहीच संबंध न राहिल्यामुळे पुष्कळदा लक्षांत हि घेतली जात नाही. खरे पाहिले तर 'The proof of the pudding lies in it's eating' या म्हणीनुसार संस्कृत नाटकाची रचना रंगभूमीसाठी च केली गेली याबद्दल शंका बाळगण्याचे कारण नाही. संस्कृत नाटकांचे प्रत्यक्ष प्रयोग जर होत नसते तर नाट्यगृह व त्याचे प्रकार, रंगभूमीची सजावट, पात्रांची वेषभूषा वगैरे गोष्टींची चर्चा संस्कृत नाट्यशास्त्रांत आली नसती. नाट्यप्रयोगासाठी नाट्यमंडळ आवश्यक आहे असे भरताने आपल्या नाट्यशास्त्रात म्हटलेले आहे, इतकेच नव्हे तर त्याने विकृष्ट म्हणजे लंब चौरस, चतुरस्त्र म्हणजे चौरस व त्र्यस्र म्हणजे त्रिकोणी अशा तीन प्रकारच्या नाट्यगृहांचे व त्यांच्या उपभेदांचे वर्णन करून रंगभूमीच्या पुढच्या भागाला रंगपीठ व मागच्या भागाला रंगशीर्ष (रगंपीठापेक्षा थोडेसे उंच) अशी नांवे दिलेली आहेत. रंगशीर्षापासून बारा हातांनर म्हणजे रंगपीठापासून चार हातांवर प्रेक्षकांच्या म्हणजे बसणाऱ्यांच्या जागेची सुरवात होत असे हे हि भरताच्या उद्गारांवरून स्पष्ट होते. 'आदौ निम्ना ततोऽप्युन्नता क्रमेण रंगपीठात् प्रभृति द्वारपर्यंतं यावत् रंगपीठोत्सेधतुल्योत्सेधा भवति' या शब्दांवरून रंगपीठापासून प्रेक्षकांच्या प्रवशेद्वारापर्यंत एकंदर उंची दीड हात होईल इतकी चढती ठेवण्याची काळजी घेतली जात होती व यामुळे प्रेक्षक एकमेकांच्या आड येत नसत हे सहज समजण्यासारखे आहे.

तात्पर्य, संस्कृत रंगभूमीचा वारसा अभिमान वाळगण्यासारखा आहे; पण हे स्पष्ट करण्यासाठी आधुनिक संस्कृत नाटकांचे प्रत्यक्ष प्रयोग होण्याची आवश्यकता होती. कुठले हि नाटक रंगभूमीवर सादर करणे हे अत्यंत कष्टांचे, जिकिरीचे व जबाबदारीचे काम असते. त्यातल्या त्यांत संस्कृत नाट्यनिर्मिती ही जास्तच कठीण. भाषा प्रचारात नसल्यामुळे चांगल्या उच्चारणापासून, आरोहावरोहांपासून तालमीला सुरवात करणे भाग पडते. पाठांतराचे महत्त्व ही फार मोठे, कारण पडद्याआडून योग्य त्या सूचना मिळून त्यांचा तत्क्षणी योग्य वापर करणे किंवा प्रसंगानुरूप रचना करून केवळ वेळ मारून नेणे हे कुणाला हि सहज जमण्यासारखे नव्हे; शिवाय नाटक प्राचीन काळाशी संबंधित असल्यामुळे त्याला अनुरूप वेषभूषा व रंगभूषा मुद्दाम तयार करून घेणे आवश्यक. नाही तर शाकुंतलातील शकुंतला किंवा उत्तररामचरितातील सीता अत्याधुनिक वाटून

रंगाचा बेरंग होण्याची शक्यता जास्त ! नाटक अयशस्वी झाले तर सादर करणाऱ्या संस्थेबरोबर संस्कृत नाट्यसृष्टी हास्यास्पद ठरण्याचा व पर्यायाने भारतीय संस्कृतीच्या एका विभागाला हि काळिमा लागण्याचा संभव. या सर्व अडचणी विचारात घेतल्या तर संस्कृत नाटक रंगभूमीवर सादर करणे म्हणजे एक साहस, नव्हे एक आव्हान होते असे म्हणण्यात अतिशयोक्ती होण्याचा मुळीच संभव नाही. परंतु भारतरत्न महामहापोध्याय डॉ. पां. वा. काणे व विख्यात संस्कृततज्ञ ह. दा. वेलणकर यांच्या प्रोत्साहनाच्या जोरावर गिरगावातील ब्राह्मणसभेने सन १९५२ मध्ये हे आव्हान स्वीकारले व जिद्दीने त्यात नेत्रदीपक यश मिळवले, इतकेच नव्हे तर आजपर्यंत (सन १९७१) म्हणजे गेली २० वर्षे या प्रयत्नात सातत्य राखले, १७ नाटके सादर केली व या संस्थेतर्फे संस्कृत नाट्य-साजरा केला ही गोष्ट निःसंशय अभिमानास्पद आहे.

अभिज्ञानशांकुतल, मृच्छकटिक, मालविकाग्निमित्र, मुद्राराक्षस यांसारखी संस्कृत नाटके रंगभूमीवर सादर झाल्यामुळे संस्कृत भाषेचा प्रभावीपणाने प्रचार झाला हे मान्य करण्यास हरकत नाही. संस्कृत दुर्बोध आहे, सहज समजू शकत नाही असा एक भ्रम मराठी, हिंदी, गुजराती वगैरे आधुनिक भाषा बोलणाऱ्यांच्या मनात होता हे मी स्वानुभववावरून सांगतो. हा समज या नाटकांच्या प्रयोगामुळे नाहीसा झाला. सहाजिकच संस्कृतबद्दलची आस्था काही प्रमाणात वाढली, त्या भाषेबद्दल जवळीक वाटू लागली व संस्कृतीबद्दलच्या अभिमानाला वस्तुस्थितीचा आधार लाभला. सौभद्र, संशयकल्लोळ, शारदा यासारख्या सुप्रसिद्ध मराठी नाटकांना संस्कृत पेहराव चढवल्यामुळे संस्कृत रंगभूमीकडे नाट्यप्रेमी मराठीभाषी जनतेचे हि लक्ष वेधले व तुलनेने आधुनिक वाटणारे विषय हि संस्कृत भाषेच्या साहाय्याने रंगवता येतात हे सप्रमाण सिद्ध झाले. या नाटकांतील गाणी मराठी भाषिकांच्या कानांत आज हि गुणगुणत असतात, त्यांना संस्कृतमध्ये हि त्याच चाली दिल्यामुळे कांही ठिकाणी संस्कृतमध्ये ती गाणी जास्त मधुर वाटतात याचा हि सर्वांना प्रत्यय आला. कै. कन्हैयालाल मुन्शींच्या 'पृथ्वीवल्लभ' या नाटकाला 'पृथिवीवल्लभम्' चे रूप लाभल्यामुळे गुजरातीभाषिकांना हि संस्कृतबद्दल जास्त प्रेम वाटू लागले असल्यास नवल नाही. एकेकाळी संपूर्ण भारताला एकात्मतेच्या सूत्रांत गोवणाऱ्या संस्कृत भाषेच्या साहाय्याने भाषिक तेढ वाढत असणाऱ्या आधुनिक काळांत हि ऐक्य-भावना निर्माण होते हे या प्रयत्नामुळे अप्रत्यक्षपणे सिद्ध झाले व या दृष्टीने राष्ट्रीय एकात्मतेला हि या संस्कृत नाटकांच्या प्रयोगांनी हातभार लावला हे मान्य केले पाहिजे.

उपर्युक्त सांस्कृतिक कार्याबरोबरच या नाट्य-निर्मितीचे शैक्षणिक मूल्य हि उपेक्षणीय नाही. शाळांतून व महाविद्यालयांतून शिक्षण घेणाऱ्या पाठ्यक्रमाच्या

निमित्ताने संस्कृत नाटके वाचणाऱ्या विद्यार्थ्यांबरोबर ती नाटके समजण्याच्या कामी या प्रयोगांचा अधिक उपयोग झालेला आहे हे निर्विवाद. ही नाटके सादर करताना ज्या अडचणी निर्माण झाल्या त्यांच्यावर मात करण्याच्या दृष्टीने ब्राह्मण सभेच्या सांस्कृतिक समितीने जे संघटित प्रयत्न केले त्यामधून त्यांची हि नाटकाकडे बघण्याची दृष्टी अधिक निकोप झाली; इतकेच नव्हे तर नाट्यनिर्मितीत परस्पर सहकार्याची व भारताच्या भाषेत जितश्रमत्वाची हि किती आश्यकता असते हे पटले असणार व याचा हि शैक्षणिक मूल्यात च अंतर्भाव करणे योग्य ठरेल. शेवटी ही नाटके सादर करण्याच्या निमित्ताने सांस्कृतिक समितीच्या संचालकांना संस्कृत रंगभूमीच्या व संस्कृत नाट्य-साहित्याच्या डोळस अध्ययनाला हि भरीव प्रोत्साहन मिळाले यात शंका नाही.

थोडक्यात ब्राह्मणसभेने संस्कृत नाट्य निर्मितीचा जो संघटित प्रयत्न सन् १९५२ पासून सुरू केला त्याचेच मूर्तफळ म्हणजे सध्या चालू असलेला (सन् १९७१) संस्कृत नाट्य महोत्सव. या प्रयत्नांमुळे संस्कृतच्या प्रसाराला व प्रचाराला बहुमोल पाठिंबा मिळाला, संस्कृतच्या डोळस अध्ययनाला गति मिळाली, भारतीयांच्या प्राचीन रंगभूमीला नव्याने उजाळा मिळाला व राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रसाराचे कार्य हि थोड्याफार प्रमाणात साध्य झाले. हे सर्व लक्षात घेऊन महाराष्ट्राच्या नाट्यप्रेमी जनतेला ब्राह्मण सभेने केलेल्या कार्याचे कधी हि विस्मरण होणार नाही; किंबहुना ती सतत ब्राह्मण सभेची ऋणी राहील असा विश्वास वाटतो. या महोत्सवाच्या निमित्ताने ब्राह्मणसभेच्या सांस्कृतिक यशाची कमान उत्तरोत्तर उंचावत जावो हीच शुभेच्छा व्यक्त करणे हे मुंबईतील समंजस नागरिकांचे कर्तव्य आहे.

[ गिरगांवातील ब्राह्मणसभेने सन् १९७१ मध्ये नाट्यमहोत्सवाच्या निमित्ताने काढलेली स्मरणिका ]

# २७. महान वैयाकरणी कै. म. म. काशीनाथशास्त्री अभ्यंकर

**[ म. म. काशीनाथशास्त्री यांच्या निर्घृण हत्येने १ डिसेंबर १९७६ उभ्या देशाला धक्का बसला. कै. अभ्यंकर यांच्या कार्यकर्तृत्वाचा आलेख या श्रद्धांजली लेखात घेतला आहे. ]**

पंचतंत्रातील एका श्लोकाची सुरवात 'सिंहो व्याकरणस्य कर्तुरहरत् प्राणान् प्रियान्पाणिनेः' या ओळीने होते. या श्लोकात संस्कृत व्याकरणकार पाणिनी, मीमांसाकार जैमिनी व छंदशास्त्राचा प्रणेता पिङ्गल यांचा मृत्यू अनुक्रमे सिंह, हत्ती व मगर या ज्ञानाचे मूल्य न जाणणाऱ्या प्राण्यांनी घडवून आणल्याचे सांगितले आहे. हे सांगणारा श्लोक 'निव्वळ दंतकथामूलक असावा' असे सांगणाऱ्या आधुनिक पाणिनीचा शेवट मात्र एका अज्ञात नरपशूने या महिन्याच्या पहिल्या दिवशी गळफास लावून करावा, ही केवढी शोचनीय घटना ! शास्त्रीबुवांच्या ३ कुटुंबियांचे ही प्राण घेतले जावे हे तर अधिक च हृदयद्रावक

## जन्म व शिक्षण

राष्ट्रीय पंडित काशिनाथशास्त्री अभ्यंकर यांच्या या अपघाती निधनामुळे गेली ६५ वर्षे अविरत चालू असलेल्या ज्ञानयज्ञाचा विध्वंस झालेला आहे. काशीनाथशास्त्री अभ्यंकर हे सुविख्यात महामहोपाध्याय वासुदेवशास्त्री महादेवशास्त्री अभ्यंकर यांचे चिरंजीव. महादेवशास्त्री व त्यांचे बंधू बैजनाथ उर्फ भाऊशास्त्री हे दोघे हि उत्तम वैदिक म्हणून श्रीमंत पेशवे यांच्याकडून दरवर्षी श्रावणमासात दक्षिणा मिळवणारे विद्वान. यांचे वडील भास्करशास्त्री हे तर सुविख्यात रामशास्त्री गोडबोले यांचे गुरू.

अशी कैक पिढ्यांची विद्वत्तेची उज्ज्वल परंपरा असणाऱ्या घराण्यात काशीनाथशास्त्री यांचा जन्म १८९० साली झाला. त्यांचे सर्व शिक्षण पुण्यात च झाले. उपनयनापूर्वीच रूपावली, अमरकोश व काव्ये यांचा परिचय वासुदेशास्त्री यांच्या शिष्यवर्गाकडून व्हावा व अंकगणित, भाषा वगैरेचे शिक्षण घरीच शास्त्रीबुवांकडून सहजगत्या मिळावे यात नवल कसले ? उपनयनानंतर व्याकरणाचा पहिला धडा मात्र विद्वद्रत्न रामशास्त्री गोडबोले यांनी तोंडीच सिद्धांतकौमुदीतील काही भाग पढवून दिला. पुस्तकाशिवाय खऱ्या पारंपरिक पद्धतीप्रमाणे व्याकरणशास्त्राचा पहिला धडा शिकावयास मिळण्याच्या या अहोभाग्याची आठवण काशीनाथशास्त्री मोठ्या कृतज्ञतेने काढीत असत.

यानंतर सन १९०६ पर्यंत संस्कृत पाठशाळेत त्यांनी सिद्धांतकौमुदी, मनोरमा 'शब्दरत्न' चा काही भाग व संस्कृत काव्ये यांचे अध्ययन केले. मॅट्रीकपर्यंचे शिक्षण

न्यू इंग्लिश स्कूल, पुणे येथे करून एम. ए. ही पदवी त्यांनी १९१२ साली घेतली. त्यांचे सर्व महाविद्यालयीन शिक्षण फर्ग्युसन महाविद्यालयात च झाले. एम. ए. पर्यंतच्या विद्यापीठीय परीक्षांत संस्कृत विषयात त्यांनी पहिला क्रमांक मिळवला व संस्कृतकरता असलेल्या सर्व शिष्यवृत्त्या व पारितोषिके पटकावली.

## शास्त्रांचे अध्ययन

उपर्युक्त महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षण चालू असताना च घरी गुरुवर्य वासुदेव शास्त्री यांच्याजवळ व्याकरण, न्याय, धर्मशास्त्र, पूर्व मीमांसा व उत्तर मीमांसा (वेदांत) या शास्त्रांतील त्यांचे उच्च अध्ययन चालू होते. व्याकरण ग्रंथात महाभाष्य व परिभाषेन्दुशेखर यांचा अंतर्भाव होता. हे ग्रंथ मुखोद्गत करण्याचा च प्रघात होता. इतर शास्त्रातील मुख्य ग्रंथात आपोदेवीन्यायप्रकाश, श्रीभाष्य, सिद्धांतबिंदु, काव्यप्रकाश, मिताक्षरा यांच्या पाङ्क्त अध्ययनाचा समावेश होता. पाङ्क्त अध्ययन म्हणजे प्रत्येक पङ्क्तीचा किंवा ओळीचा अर्थ सांगून टीकेतील मुद्दे सांगायचे व प्रतिपाद्य विषयाचे निरूपण करावयाचे. काव्यप्रकाश शिकवताना माघ व नैषध यातील दोन चार श्लोक विद्यार्थ्यांना देऊन टीकेची मदत न घेता शास्त्रीय व्युत्पत्तीच्या जोरावर त्यांचा अर्थ कसा लावावा हे समजावून देण्याची वासुदेवशास्त्री यांची पद्धत 'प्रभवति शुचिर्बिम्बग्राहे मणिर्न मृदां चयः' या न्यायाने काशिनाथशास्त्रींना उत्तरायुष्यात अत्यंत उपयोगी पडली. पाठशाळेतील पारंपरिक चतुरस्र अध्ययनाबरोबर उच्च विद्यापीठीय शिक्षणाचा हि लाभ झाल्यामुळे कठीण ग्रंथांची फोड करण्याबद्दलचे आकर्षण व प्रतिपाद्य विषयाचे ऐतिहासिक व तौलनिक म्हणजे चिकित्सक विवेचन या दोन्हीचा अपूर्व संगम काशीनाथ शास्त्री यांच्या ठिकाणी झाला.

## अध्यापन कार्य

'गुणाः कुर्वन्ति दूतत्वं दूरेऽपि वसतां सतां' या न्यायाने सन १९१२ साली म्हणजे एम. ए. परीक्षा उत्तीर्ण होण्यापूर्वीच गुजरात कॉलेज, अहमदाबाद येथे संस्कृताध्यापक म्हणून काशीनाथपंतांची नेमणूक झाली. तेथील संस्कृत विभागाचे प्रमुख श्री. आनंदशंकर ध्रुव यांनी 'न धर्मवृद्धेषु वयः समीक्ष्यते' याचे मर्म ओळखून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना 'तरूण शास्त्री तुम्हास शिकवायला मिळाला आहे. त्याच्या विद्वत्तेचा पूर्ण लाभ घ्या' असा उपदेश केला. आचार्य ध्रुव हे सन १९१९ साली काशी हिन्दु विश्वविद्यालयात उपकुलगुरू झाल्यानंतर मुख्याध्यापकपदाची माळ या युवक शास्त्रांच्या च गळ्यात पडावी हे स्वाभाविक च होते. प्रा. काशिनाथपंतांनी आपली जबाबदारी मोठ्या कौशल्याने पार पाडली. मुंबई विद्यापीठाने अर्धमागधी विषयाच्या शिक्षणाचा उपक्रम करून सन १९२३ मध्ये या विषयात एम. ए. ची परीक्षा चालू केली. त्यावेळी त्याची हि जबाबदारी

ओघानेच प्रा. काशिनाथपंतांकडे आली. त्यामुळे त्यांच्या जैन आगमग्रथांच्या अध्ययनाला व अध्यापनाला सुरवात झाली. टिप्पण्या, भाषांतरे न वाचता मूळ ग्रंथ वाचून ज्ञान वाढवायचे व आत्मविश्वासाने अध्यापन करायचे या वडिलांच्या गुरूकिल्लीचा उपयोग त्यांनी अध्यापनात सतत केला. व्याख्यानाची टांचणे करून किंवा टिप्पण्या लिहून आणून त्या विद्यार्थ्यांना देण्याची पद्धत प्रा. काशिनाथपंतांनी कधी हि स्वीकारली नाही. त्यामुळे विषय प्रतिपादन करताना स्वयंस्फूर्तीने योजिलेली उपयुक्त स्पष्टीकरणे व विवेचने त्यांच्या अध्यापनात येत असत. यामुळे त्यांची व्याख्याने म्हणजे पर्वणी वाटत असे व 'अध्यापक हा जन्मतःच अध्यापक असावा लागतो, तो तयार करून होत नसतो' या त्यांच्या उद्‌गारांतील मर्म लक्षात येत असे. अशा रीतीने २६ वर्षे गुजरात कॉलेजमध्ये अध्याप्न करून सन १९४५ मध्ये गुजरात विद्यासभेच्या अध्यापन संस्थेत सन्मान्य प्राध्यापक म्हणून संस्कृत विषयाच्या एम. ए. व पीएच. डी. या उच्च पदवीकरता अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अध्यापनाचे व मार्गदर्शनाचे काम हि त्यांनी एका तपाहून अधिक काळ केले. त्यांच्यापाशी शास्त्रांचे अध्ययन केलेल्या विद्यार्थ्यांत प्राध्यापक डॉ. प्रतापराय मोदी (भावनगर), प्रा. कमलाशंकर त्रिवेदी, प्रा. विष्णुप्रसाद त्रिवेदी, प्रा. जसवंत पारीख (सुरत), प्रा. अनूपराम भट्ट, प्रा. डॉ. वामनराव कुळकर्णी, विष्णुदेव पंडित, जयदेव शुक्ल यांसारख्या ख्यातनाम विद्वानांचा समावेश आहे. गुजरात कॉलेजमध्ये प्रदीर्घ काल झालेल्या त्यांच्या अध्यापन कार्याचा गौरव करून विद्यार्थ्यांनी सेवानिवृत्तीच्या वेळी त्यांना मानपत्र अर्पण केले. त्यांची आठवण रहावी म्हणून कॉलेजच्या सभागृहात त्यांचे तैलचित्र हि ठेवलेले आहे.

व्याकरणाच्या अध्ययनाने निर्माण होणाऱ्या त्यांच्या बुद्धीच्या कुशाग्रतेचा अनुभव आल्यामुळे गुजरात कॉलेजच्या प्राचार्यांनी च त्यांना 'पाणिनी' ही पदवी दिली होती. अहमदाबादच्या गुजरात विद्यासभेच्या संस्कृत विद्यामंडळाचे ते अध्यक्ष होते. सेवानिवृत्तीनंतर हि यांचे अध्ययन-अध्यापनाचे कार्य चालू राहिले. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ संस्कृत मंडळाचे ते अध्यक्ष होते. वैदिक संशोधन मंडळाशी त्यांचा निकटचा संबंध होता. गोवर्धन विद्यापीठाचे श्रीमच्छंकराचार्य (योगेश्वरानंद) यांनी त्यांना 'महामहोपाध्याय' ही पदवी देऊन त्यांच्या विद्वत्तेचा यथार्थ गौरव केला. भांडारकर प्राच्य विद्या संशोधन मंदिराच्या अध्यक्षपदाची हि माळ यांच्या गळ्यात पडली. त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ व्याकरणावर संशोधन करणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांना मिळाला त्यात भारतीय विद्यार्थ्यांबरोबर ब्राँकहर्स्टसारख्या परदेशीय विद्यार्थ्यांचा हि अंतर्भाव होतो. विख्यात संस्कृत पण्डित प्रा. एम. व्ही. पटवर्धन, मुंबई विद्यापीठाच्या संस्कृत विभागाचे माजी

प्रमुख डॉ. त्र्यं. गो. माईणकर, डॉ. गो. वि. देवस्थळी वगैरे विद्वान त्यांचे ऋण आनंदाने मान्य करतात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रबंध लिहून जोगळेकर नावाच्या इंजिनीयरनी हि पीएच. डी. ही पदवी मिळवली. या जोगळेकरांचे वय ७२ ! तात्पर्य, ८६ वर्षांचे युवक गुरु व ७२ वर्षांचे तरुण शिष्य अशी ही अप्रतिम जोडी म्हणजे भारतीयांच्या प्राचीन गुरूशिष्यपरंपरेचे अनुपम उदाहरण, 'विद्यायां व्यसनम्' चे मूर्तिमंत प्रतीक च नव्हे का ?

## ग्रंथनिर्मिती

अध्ययन व अध्यापन यांची परिणती लेखनात व्हावी हे स्वाभाविक च आहे. काशिनाथशास्त्री यांच्या लेखनाची सुरवात विद्यार्थ्यांना उपयुक्त अशा उत्तररामचरित, मुद्राराक्षस व स्वप्नवासवदत्त या नाटकांच्या संपादित आवृत्त्यांनी झाली. पण त्यांचे गुरू प्रा. पानसे यांनी 'विषयाचे पूर्ण अध्ययन झाल्याशिवाय पुस्तके लिहिणे योग्य नव्हे' असे सांगून त्यांना या उपक्रमापासून परावृत्त केले. यावेळी त्यांनी जैन आगम ग्रंथांचे अध्ययन सुरू केले होते. गुरूंचे म्हणणे मान्य करून त्यांनी 'कुम्मापुत्तचरिय' 'दसवेयालियसुत्त' व 'विंशतिविंशतिका' या तीन अर्धमागधी दुर्मिळ पुस्तकांचे संशोधनपूर्वक संपादन केले. त्यानंतर काही वर्षानी एका जैन मित्राच्या आग्रहाखातर जैन मंत्रशास्त्रावरील 'भैरवपद्मावतीकल्प' या पुस्तकाचे सटीक संपादन करून जैन साधूंना हि एक अनुकरणीय आदर्श घालून दिला. या पुस्तकाचे एक च त्रुटित हस्तलिखित होते. तेही अशुद्ध असल्यामुळे नष्ट झालेली अक्षरे जोडण्यात शास्त्रीबोवांचे बुद्धिवैभव दिसून आले. यानंतर काही वर्षांनी एका फलज्योतिषाच्या अभ्यासू मित्राने सुचविल्यावरून जैमिनीच्या 'उपदेशसूत्र' नांवाच्या फलज्योतिषाच्या ग्रंथावर त्यांनी स्वतः संस्कृत टीका लिहिली व एक विवेचक प्रस्तावना जोडून हा ग्रंथ त्यांनी संपादित केला. याशिवाय 'कौटिलीय अर्थशास्त्राचा काल', 'ज्योतिषविषयक पुराव्यांवरून महाभारताचा कालनिर्णय', 'वैदिक नक्षत्र चक्रारम्भस्थान', वगैरे संस्कृतवरील संशोधनात्मक लेखांप्रमाणे 'जैनपर्वतिथिविचार', 'आचाराङ्ग सूत्रांतील वैतालीय वृत्त' हे शास्त्रीबुवांचे लेखन गाजले. शिवाय गुरुवर्य वासुदेवशास्त्री यांनी संपादित केलेल्या 'सिद्धांतबिंदु' व 'श्रीभाष्य' या वेदांतपर ग्रंथांना आपल्या विवेचक प्रस्तावना जोडल्या, 'सर्व-दर्शन-संग्रहा' ला सूच्या तयार केल्या व बृहच्छब्दरत्न यांविषयी विवेचनात्मक लेख लिहून वडिलांच्या विविध शास्त्र-प्रावीण्याची परंपरा मोठ्या इतमामाने चालविली. 'सर्वदर्शनसंग्रहा' ला त्यांनी लिहिलेली संस्कृत प्रस्तावना पाश्चात्य पाण्डितांना हि मूलमागी वाटते.

हे सर्व खरे असले तरी महामहोपाध्याय काशीनाथशास्त्री अभ्यंकर हे 'अधीतसर्वशास्त्रोऽप्ययं मुख्यतया वैयाकरणः' या कोटीतले. त्यांना आंतरराष्ट्रीय

विद्वानांत प्रसिद्धी मिळवून देण्याचे कार्य व्याकरणशास्त्रांतील त्यांच्या प्रावीण्याने केले हे निर्विवाद. व्याकरणशास्त्राचे चिंतन व मनन हे त्यांचे जीवित-कार्य होते. व्याकरणशास्त्रांत पतंजलीचे महाभाष्य हा मोठा विद्वत्तापूर्ण ग्रंथ प्रासादिक भाषेत लिहिलेला आहे व त्याचे स्थान तर असाधारण च आहे. परंतु प्रतिपाद्य विषयाच्या अर्थगांभीर्यामुळे व व्याख्येची प्राचीन परंपरा लक्षात घेऊन महाराष्ट्रातील अभ्यासू व्यक्तींच्या आटोक्यात तो ग्रंथ आणून देण्यासाठी वासुदेवशास्त्री अभ्यंकर यांनी या ग्रंथाचा मराठीत अनुवाद करण्याचे कार्य सुरू केले. त्यांच्या ७५ व्या वर्षी सन १९३८ मध्ये या भाषांतराचा पहिला भाग प्रसिद्ध झाला व दुसरा सन १९४१ मध्ये बाहेर पडला. सन १९४२ मध्ये पण्डित वासुदेवशास्त्री दिवंगत झाल्याने हे काम खण्डित झाले व ते पूर्ण करण्याची जबाबदारी निःस्वार्थीपणे पण्डित काशीनाथशास्त्री यांनी डेक्कन एज्यूकेशन सोसायटीसाठी स्वीकारली. त्यांनी ग्रंथसंपादनाचे काम तर पितृकर्तव्य म्हणून सहा खंडात यशस्वितेने पार पाडलेच; परंतु सातवा प्रस्तावना खंड लिहून त्यात पाणिनीय व्याकरणशास्त्राच्या परंपरेचा, या शास्त्रावरील उलपब्ध ग्रंथांचा ऐतिहासिक व चिकित्सक पद्धतीने परामर्श घेतला व गुरुऋण यथार्थत्वाने फेडले असेच म्हटले पाहिजे. या खण्डात व्याकरणशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या आधुनिक काळातील शास्त्री-परंपरेच्या वैशिष्ट्यांचे हि मनोज्ञ दर्शन घडते. १०० पानांच्या या विद्वत्तापूर्ण प्रस्तावनेत डॉ. कीलहॉर्न व डॉ. भांडारकर यांच्या व्याकरण सेवेचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात पं. काशीनाथ शास्त्री यांनी दाखवलेले औचित्य त्यांच्या निष्पक्ष विद्वत्तेला शोभण्यासारखे च आहे.

व्याकरणभाष्याचे संपूर्ण भाषांतर युरोपातील भाषेत होणे हि आवश्यक आहे हे लक्षात घेऊन महामहोपाध्याय काशीनाथशास्त्री यांनी तीन खंडात या विद्वत्तापूर्ण ग्रंथाचे इंग्रजी भाषांतर करून तर युरोपातील विद्वानांना कायमचे उपकृत करून ठेवलेले आहे. यापेक्षा हि अधिक महत्त्वाचे त्यांचे कार्य म्हणजे त्यांनी लिहिलेला संस्कृत व्याकरणाचा त्रिखंडात्मक इतिहास. यामुळे जिज्ञासू वाचकाला व्याकरणाशास्त्राच्या प्रचंड इमारतीची यथार्थ कल्पना येते. याशिवाय भर्तृहरीच्या वाक्यपदीयाची सटीक प्रत संपादित करून भर्तृहरीच्या व्याकरणविषयक कार्याची यथार्थ कल्पना आणून देण्याचे श्रेय हि पंडित काशिनाथ शास्त्री यांना च द्यावे लागेल. त्यांनी तयार केलेला संस्कृत व्याकरणाचा शब्दकोश म्हणजे एक अमोल संदर्भग्रंथ आहे. ऋग्वेदाच्या घनपाठावर आधारलेले व्याकरण लिहिण्याच्या कार्यात ते तूर्त मग्न झाले होते. कांही ऋचांवरील काम पूर्ण हि झाले होते. भीषण हत्याकांडाचे बळी होण्यापूर्वी चार तास ते प्राच्य विद्या संशोधन मंदिरात प्रा. वि. म. बेडेकर व डॉ. कै. गो. वि. देवस्थळी यांच्याशी व्याकरणशास्त्राविषयी चर्चा

करीत होते. विद्यार्थीदशेपासून ज्या व्याकरणरूपी विद्याशाखेच्या अध्ययनाला त्यांनी सुरवात केली त्या शाखेच्या अध्ययनात सतत ५० वर्षे निरलसपणे कार्य करीत रहाणाऱ्या या संस्कृत पंडिताचा भारत सरकारने 'राष्ट्रीय पंडित' म्हणून गौरव केला हे योग्यच झाले.

आन्तरराष्ट्रीय कीर्तीच्या या पंडिताला प्रत्यक्ष चर्चेत निर्माण होणाऱ्या विनोदाचे वावडे नव्हते, किंबहुना हंसतखेळत चर्चा करणे, विवाद करता करता आपला मुद्दा खेळकरपणाने पटवून देणे हे त्यांचे विलोभनीय वैशिष्ट्य होते याचा अनुभव पुण्यातील अनेक विद्वानांप्रमाणे प्रस्तुत लेखकाला हि आलेला आहे. संस्कृतच्या पारंपरिक अध्ययनामुळे 'अमुष्य विद्या रसनाग्रनर्तकी' याचा प्रत्यक्ष अनुभव करून देणाऱ्या व आधुनिक उच्च शिक्षणामुळे प्राप्त होणाऱ्या चिकित्सकतेची जोड देऊन ग्रंथरूपाने श्रद्धा व बुद्धी यांच्या मनोज्ञ संगमाचे चित्र उपस्थित करणाऱ्या या त्रिकाण्डपण्डिताला, 'आधुनिक पाणिनी'ला संस्कृत विद्येच्या उपासकांतर्फे ही भावपूर्ण श्रद्धांजली !

[ 'विवेक' वर्ष २९ अंक १० - १२ डिसेंबर १९७६ ]

## २८. एक तत्त्वज्ञ राष्ट्रपती : डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन्

सन् १९२९ सालची गोष्ट. ऑक्सफर्डला हिबर्ट व्याख्यानमाला चालू होती. दररोज अफाट गर्दी होत होती खरी; परंतु श्वासोच्छ्वासदेखील ऐकू यावा इतकी गाढ शांतता होती. वक्त्याचे दर्शन मोठे प्रसन्न होते. उंच सडसडीत शरीरयष्टी, आवाज बोजेदार व मधुर डोळे मोठे पाणीदार आणि भाषेचा अस्खलित प्रवाह. मधूनमधून संस्कृतमधील वेचक उदाहरणे पेरलेली. विचारांचा जिवंतपणा वाखाणण्यासारखा. संपूर्ण व्याख्यानमाला झाल्यानंतर लंडन विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. एफ्. ई. बेस यांनी सार्थ उद्‌गार काढले 'Today we have sat again at the feet of a great Indian teacher.' हे महान भारतीय शिक्षक म्हणजेच भारताचे राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन्.

या आदर्श शिक्षकाचा जन्म ५ सप्टेंबर १८८८ रोजी एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. मद्रासपासून ४० मैलावर असलेले तिरूतणी हे त्यांचे गांव. त्यांचे वडील एका जमीनदाराच्या पदरी तहसीलदार होते. साहजिकच सांपत्तिक स्थिती बेताची. मनाची श्रीमंती मात्र त्यांच्याजवळ भरपूर होती. ते स्वतः एक श्रद्धाळू, भाविक व कोणाच्या अध्यामध्यात न पडणारे कष्टाळू ब्राह्मण होते. स्वाभाविकपणे त्यांनी बालपणीच आपल्या या दुसऱ्या मुलावर उत्तम संस्कार करून ठेवले. तिरूतणी हे लहान गाव असले तरी एक धर्मक्षेत्र होते. त्यातील धार्मिक वातावरणाचा श्री. राधाकृष्णन् यांच्या जीवनावर परिणाम झाला. त्यांना अध्यात्माची गोडी लागली. पुढे याबद्दल बोलताना श्री. राधाकृष्णन् एकदा म्हणाले, 'या विश्वातील विविध व्यवहारांमागे एखादी अदृश्य, गूढ शक्ती वास करीत असावी असा माझा दृढ विश्वास बालपणापासून आहे. आपल्या इंद्रियांना सहजपणे आकलन होणार नाही असे केवळ मनाने जाणण्यायोग्य एखादे विश्व असावे अशी माझी श्रद्धा झाली.

तिरूतणीसारख्या लहान गावात शिक्षणाची सोय कशी असणार ? मुलाला चांगले शिकवावे, मोठे करावे ही आईबापांची इच्छा. तेव्हा त्यांनी प्राथमिक शिक्षणासाठी छोट्या राधाकृष्णन्‌ला जवळ असलेल्या तिरूपतीला पाठवले. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर तिरूतणी येथेच लूथरन मिशनरी हायस्कूलमध्ये त्यांनी आपले नांव दाखल केले. त्या काळी ख्रिस्ती धर्मप्रचारकांचा सर्वत्र सुळसुळाट झाला होता. त्यांच्याच तडाख्यात राधाकृष्णन् सापडले होते. परंतु 'केला जरी पोत बळेचि खाले, ज्वाला तरी ते वरती उफाळे' या न्यायानुसार

प्रतिकूल वातावरणातदेखील त्यांची हिंदु धर्मावरील निष्ठा अभंग राहिली. शाळेतले परधर्मीय वातावरण यांच्या विरोधातूनच त्यांच्या चिंतनशील वृत्तीला उठाव मिळाला. स्वभाव संकोची बनाला. एकांत आवडू लागला. सोबती गोळा करून हसावे, गप्पा माराव्या असे वाटण्याऐवजी विरंगुळा म्हणून ग्रंथ वाचावे, चिंतन करावे या कडेच त्यांचा कल फार. पंधराव्या वर्षी म्हणजे १९०३ मध्ये ते प्रवेश परीक्षा शिक्षणासाठी वेलोर या शहरी जाऊन त्यांनी व्हूरीस कॉलेजात आपले नाव नोंदविले. हे हि कॉलेज अमेरिकन मिशनचे च होते. कॉलेजच्या पहिल्या वर्षाच्या परीक्षेत ही त्यांनी पहिला वर्ग मिळवला. याच वेळी मद्रासच्या सुप्रसिद्ध ख्रिश्चन कॉलेजचे नांव त्यांच्या कानावर आले व पदवी घेण्यासाठी त्यांनी त्या कॉलेजात प्रवेश केला. अशा रीतीने सन १९०५ पासून पदवी परीक्षेच्या अभ्यासाला सुरवात झाली. त्या वेळी त्या परीक्षेला पांच विषयांपैकी एक विषय निवडायचा असे. राधाकृष्णन् यांना निर्णय लवकर घेता येईना. याच सुमारास त्यांनी 'तत्त्वज्ञाना' वरील काही पुस्तके वाचली होती. शिवाय त्यांच्या चुलत भावाने ही त्यांना तत्त्वज्ञानाचे काही ग्रंथ भेट म्हणून पाठवले होते, ते हि याच सुमारास त्यांना मिळाले. मग त्यांनी 'तत्त्वज्ञान' हाच विषय घेण्याचे ठरविले. वाचनाचे वेड मुळात होतेच. मग काय विचारता ? बुद्ध, शंकराचार्य, कणाद व मध्व यांच्या जोडीला त्यांनी प्लेटो-अरिस्टॉटल, कांट-हेगेल यांचा ही अभ्यास केला. बी. ए.ची परीक्षा झाली व राधाकृष्णन् यांचे नांव अग्रभागी झळकले (सन १९०७). तत्त्वज्ञान विषय घेऊन पहिल्या वर्गात उत्तीर्ण होणारे ते एकमेव विद्यार्थी होते. त्यांच्या मेहनतीचे चीज झाले होते. 'क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते' चा त्यांना अनुभव आला.

तत्त्वज्ञान हा विषय घेऊन एक प्रबंध लिहावयाचा व मद्रास विद्यापीठाची एम्. ए. ही पदवी मिळवायची असा त्यांनी निर्धार केला. सुदैवाने प्राध्यापक हॉग यांसारखे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे मार्गदर्शक लाभले. 'वेदान्तातील नीतिशास्त्र' हा विषय त्यांनी निवडला व व्यासंगाला जोरात सुरवात केली. सन १९०९ मध्ये या निबंधाला मद्रास विद्यापीठाने मान्यता व प्रथम श्रेणी हि दिली. स्वतः हॉग या निबंधाबद्दल म्हणाले ,' हा निबंध वाचल्यानंतर सादर करणाऱ्या विद्यार्थ्याच्या सखोल ज्ञानाची यथार्थ प्रचीती येते. तत्त्वज्ञानातील बारीकसारीक गोष्टीबरोबरच संभ्रमात टाकणाऱ्या समस्यांची उत्तरे हा विद्यार्थी सहजपणे देऊन टाकतो. इंग्रजी भाषेवरचे याचे प्रभुत्व तर विस्मयजनक आहे.' हा निबंध लिहिण्याच्या वेळी त्यांचे वय अवघे वीस वर्षांचे होते हे लक्षात ठेवण्यासारखे आहे.

मद्रास विद्यापीठाने ताबडतोब प्रेसिडेन्सी कॉलेजात या हुशार विद्यार्थ्याची प्राध्यापक म्हणून नेमणूक केली व राधाकृष्णन् यांच्या अध्यापकीय पेशाची सुरवात

झाली. ज्या भूमीत अध्ययन केले त्याच भूमीत अध्यापनाची संधी मिळालेली पाहून प्रा. राधाकृष्णन् यांनी अधिक च जोमाने व्यासंग चालू ठेवला. हळूहळू ते निरनिराळ्या नियतकालिकातून हिंदुधर्माच्या तत्त्वज्ञानावर लेख हि लिहू लागले. अध्यापनशास्त्राची संपूर्ण माहिती करून घेण्यासाठी सन १९१० मध्ये त्यांनी एल. टी. परीक्षा देऊन टाकली. कुशाग्र बुद्धी, मोहक वक्तृत्व, शिकवण्याची हौस आणि वाचनाचे जबरदस्त वेड या गुणांच्या जोरावर त्यानी थोड्याच वेळात उत्कृष्ट शिक्षक म्हणून नांव कमावले. त्यांची वाणी व लेखणी दोन्हींचा सुगंध आसमंतात पसरू लागला. लवकरच म्हणजे १९१६ साली ते प्रांतिक Qkgl(Provincial Grade)चे प्राध्यापक झाले व नंतर त्यांचा साम्राज्यश्रेणी (Imperial Grade) त प्रवेश झाला. 'तत्त्वज्ञानासारखा दुर्गम विषय सरळ रसाळ भाषेत उलगडून दाखवणारा व्यासंगी शिक्षक' म्हणून त्यांचा लौकिक वाढत च होता.

सन् १९१८ मध्ये म्हैसूर विद्यापीठाने तत्त्वज्ञान विषयाचे प्रमुख होण्यासाठी त्यांना बोलाविले व त्यांनी हि ते स्वीकारले. तिसाव्या वर्षी एका विद्यापीठाच्या विभागाचे प्रमुख पाहुणे होणे ही काही लहानसहान गोष्ट नव्हती. हे जबाबदारीचे पद त्यांनी चार वर्षे सांभाळले व त्याला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. त्यांच्या 'हिस्टरी ऑफ इंडियन फिलॉसफी' चे दोन्ही खंड याच काळात प्रकाशित झाले. 'द रेन ऑफ रिलीजन इन कॉन्टेंपररी फिलॉसफी' हा ग्रंथ हि याच सुमारास म्हणजे १९२० साली इंग्लडमध्ये प्रकाशित झाला. सन १९२१ मध्ये कलकत्ता विद्यापीठाचे कुलगुरू सर आशुतोष मुकर्जी यांनी प्रा. राधाकृष्णन् यांना आपल्या विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान विभागाचे प्रमुख म्हणून बोलविले व राधाकृष्णन् यांनी या संधीचा ताबडतोब स्वीकार केला. म्हैसूरमध्ये विद्यार्थ्यांनी त्यांचा निरोपसमारंभ साजरा केला व त्यांची गाडी स्वयंस्फूर्तीने स्टेशनपर्यंत ओढत नेली. विद्यार्थ्यांचे असे प्रेम फारच थोड्या शिक्षकांना लाभते.

कलकत्ता विद्यापीठातील नियुक्तीपासून डॉ. राधाकृष्णन् यांच्या जीवनाचे नवे पर्व सुरू झाले. पंचम जॉर्जच्या नावाने आयोजित केल्या जाणाऱ्या व्याख्यानमालेत व्याख्याते म्हणून नियुक्त होण्याचा मान त्यांना मिळाला. भारतीय संस्कृती व हिंदुधर्म यांवर अधिकारवाणीने बोलणारे वक्ते म्हणून त्यांना ही भारतीय मान्यता मिळाली होती.

आतापावेतो त्यांना विदेशी जाण्याची संधी मिळाली नव्हती. ती हि लवकर च चालून आली. सन १९२६ मध्ये इंग्लंडात भरणाऱ्या आंतरराष्ट्रीय तत्त्वज्ञान परिषदेत भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी त्यांची निवड करणात आली.

सर्वांच्या अपेक्षेप्रमाणे सर्वपल्ली राधाकृष्णन् यांनी ही परिषद गाजवली. सर्व विद्वानांना त्यांनी आपल्या अमोघ वक्तृत्वाने मोहून टाकले. मँचेस्टर महाविद्यालयाचे प्राचार्य जॅक्स यांनी ऑक्सफर्डच्या सुप्रसिद्ध ऑप्टन व्याख्यानमालेत व्याख्यान देण्याचे आमंत्रण तेथे च देऊन टाकले. सन १९२६ च्या परिषदेत भारताची मान उंचावणाऱ्या या सुपुत्राचा मद्रास विद्यापीठात भव्य सत्कार करण्यात आला. त्यांना 'डी. लिट.' ही पदवी देण्यात आली. सन् १९२७ साली भारतीय तत्त्वज्ञान परिषदेचे अध्यक्ष म्हणून त्यांची नियुक्ती होणे क्रमप्राप्त च होते.

सन १९३१ मध्ये आक्सफर्ड विश्वविद्यालयाने तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापकाची कायमची जागा डॉ. राधाकृष्णन् यांना देऊ केली होती, पण त्यांनीच ती नाकारून हंगामी प्राध्यापकाची जागा स्वीकारली. धर्मांचा तुलनात्मक अभ्यास विद्यार्थ्यांकडून करून घेण्याचे काम त्यांना देण्यात आले होते. ब्रिटीश ज्ञानकोशकारांनी त्यांना आपल्यासाठी एक लेख लिहिण्याची विनंती केली. परकीय देशाच्या ज्ञानकोशासाठी हा लेख लिहून डॉ. राधाकृष्णन् यांनी भारतीय पांडित्याला जागतिक प्रतिष्ठा च प्राप्त करून दिली आहे, यात शंका नाही. ऑक्सफर्डमधील प्राध्यापकाचे काम संभाळत असताना निरनिराळे दौरे काढून त्यांनी विदेशीयांना भारतीय संस्कृतीचा यथार्थ परिचय करून दिला व त्यांच्या मनातील भारतासंबंधीचा द्वेषमूलक भाव काढून टाकला. ही भारताची फार मोठी सेवा आहे.

सन् १९३६ साली ऑक्सफर्डच्य स्पाल्डिंग व्याख्यानमालेत 'जीवनाचा ध्येयवादी दृष्टिकोण' ही त्यांची व्याख्याने जागतिक विद्वानांच्या उपस्थितीमुळे फार गाजली. फॅरडे व्याख्यानमालेत व्याख्याने देण्याचा मान त्यांना मिळाला. मध्यंतरी (म्हणजे सन १९३१ ते १९३८) त्यांनी आंध्र विद्यापीठाचे उपकुलगुरू हे पद विभूषित केले होते. सन् १९३९ मध्ये बनारस हिंदु विश्वविद्यालयाचे उपकुलगुरू म्हणून त्यांची नेमणूक झाली. सन् १९५० मध्ये युनेस्कोला गेलेल्या शिष्टमंडळाचे नेते म्हणून त्यांनी भरीव कामगिरी केली.

सन् १९४९ ते ५२ या काळात रशियातील भारताचे वकील म्हणून त्यांची नेमणूक झाली. स्टॅलीनसारख्या रूक्ष व कठोर नेत्यावर त्यांनी आपली छाप पाडली व रशियातील वकिलातीला व पर्यायाने भारताला प्रतिष्ठा मिळवून दिली. त्याचा च परिणाम म्हणून की काय सन् १९५२ मध्ये भारताचे 'उपराष्ट्रपती' म्हणून निवड झाली. या पदावर असताना सन १९५३ साली त्यांनी अमेरिकेचा दौरा केला. हार्वर्ड विद्यापीठाने त्यांचा सत्कार करून 'डॉक्टर ऑफ लॉज' ही सन्मान्य

पदवी त्यांना अर्पण केली. सन् १९५४ मध्ये 'भारत-रत्न' हा सर्वोच्च मान त्यांना देण्यात आला. सन् १९५६ मधील सदिच्छा दौऱ्यात मॉस्को विद्यापीठात सन्मानीय प्राध्यापक म्हणून नेमणूक होत असताना त्यांनी जे भाषण केले ते त्यांच्या स्वतंत्र विचारसरणीला व बाणेदारपणाला साजेसे होते. त्यावेळी ते म्हणाले, 'नुसत्या भव्य इमारतींनी विश्वविद्यालयाची भव्यता सिद्ध होत नाही. हे विद्यालय म्हणजे ज्ञानाचे मंदिर आहे. आणि व्यक्तींचे स्वातंत्र्य हा ज्ञानाचा पाया आहे. या स्वातंत्र्याचा घात करून बौद्धिक दृष्ट्या राष्ट्रातील साऱ्या स्त्री-पुरूषांना सरकारमान्य विचारसरणीच्या एका ठराविक सांच्यात घालून तयार करू पाहणे यासारखी दुसरी भयप्रद गोष्ट नाही. विचारस्वातंत्र्य, उच्चारस्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य या सर्वोच्च मोलाच्या गोष्टींचे रक्षण इतर कोठे होवो अगर न होवो, तुमच्या या विश्वविद्यालयात झाले च पाहिजे. विद्यार्थी जे मागतो ते त्याला देणे हे गुरूचे कर्तव्य नसून जे विद्यार्थ्याला देण्याची आपली इच्छा आहे हे ते त्याला मागावयास लावणे हेच खऱ्या गुरूचे काम आहे.' या व्याख्यानात उपराष्ट्रपतींचा पिंड आदर्श शिक्षकाचा आहे ही गोष्ट प्रभावीपणाने व्यक्त झालेली आहे.

सन् १९५७ मध्ये आंतरराष्ट्रीय तत्त्वज्ञान परिषदेला भारताचे प्रतिनिधी म्हणून साहजिकच त्यांची निवड झाली व शेवटी १२ मे १९६२ रोजी 'भारताचे राष्ट्रपती' म्हणून सर्वानुमते त्यांची नेमणूक होऊन त्यांच्या कर्तबगारीवर कळस चढवला गेला, हे योग्यच झाले.

वक्ते म्हणून डॉ. राधाकृष्णन् यांची आंतरराष्ट्रीय ख्याती तर आहेच परंतु पट्टीचे लेखक म्हणून ही त्यांना अमाप कीर्ती लाभलेली आहे. 'हिस्टरी ऑफ इडियन फिलॉसफी' चे त्यांचे दोन्ही खंड भाषेच्या अनुपम सौंदर्याने नटलेले आहेत. गीतेत ज्ञान, कर्म व भक्ती यांचा सुंदर समन्वय झालेला आहे. हा विचार व्यक्त करताना डॉ. राधाकृष्णन् सहज लिहून जातात.

'The ideal of the devotee of the Gita is one in whom love is lighted up by knowledge and bursts forth into a fierce desire to suffer for mankind.' प्रचलित धर्मकल्पनांचा पगडा तत्त्वज्ञानावर कसा बसला हे पौरस्त्य व पाश्चात्य उदाहरणांवरून दाखवून देऊन 'उपनिषदातील केवलाद्वैतवादा' चे सुंदर मंडन करणारा त्यांचा ग्रंथ सन् १९२० मध्ये इंग्लडात च प्रकाशित झाला. ऑक्सफर्ड, केंब्रीज वगैरे विद्यापीठांनी तत्त्वज्ञानाच्या आपल्या अभ्यासक्रमात या पुस्तकाचा अंतर्भाव केलेला आहे. सन् १९२६ मध्ये त्यांनी अॅप्टन व्याख्यानमालेत जी व्याख्याने दिली ती 'द हिंदु व्ह्यु ऑफ लाईफ' या पुस्तकात संग्रहीत झालेली आहेत. पाश्चात्य शास्त्रांच्या संघर्षातून

नव्याने निर्माण होणाऱ्या हिंदु धर्माच्या स्वरूपाचे या ग्रंथात सुंदर वर्णन केलेले आहे. या ग्रंथाच्या आवृत्ती प्रकाशित झालेल्या आहेत व त्याला भाषांतराचा हि मान मिळालेला आहे. हिबर्ट व्याख्यानमालेच्या निमित्ताने प्रकाशित झालेल्या 'ॲन आयडियालिस्ट व्ह्यू ऑफ लाईफ' या आपल्या ग्रंथात, बुद्धीच्या पलीकडे जाणाऱ्या अंतःस्फूर्त आत्मज्ञानाचे त्यांनी मर्मग्राही विवेचन केलेले आहे. 'Kalki or the Future of Civilisation' हा सार-ग्रंथ ९० पृष्ठात राधाकृष्णन् यांचे तत्त्वज्ञान उत्कृष्टपणे मांडतो. लोकशाही यशस्वी कशी होईल, युद्धाचा संभव कसा टळेल व सर्व जगांत बंधुभाव कसा निर्माण होईल, या ज्वलंत प्रश्नांचा उलगडा या पुस्तकात केलेला आहे. सन् १९३१ मध्ये मद्रासच्या नटेशन आणि कंपनीने 'द हार्ट ऑफ हिंदुस्थान' हा त्यांचा ग्रंथ प्रकाशित केला. यात हिंदुधर्माच्या विशालतेचे व सहिष्णुतेचे वर्णन असून चातुर्वर्ण्य व चार आश्रम यांचे रहस्य उलगडून दाखवलेले आहे. इतर धर्मांशी या कल्पनांची सांगड घालण्याचा प्रयत्न हे या पुस्तकाचे विलोभनीय वैशिष्ट्य आहे.

लोकशाहीत वाणी व लेखणी यांच्यावर प्रभुत्व असणारी व्यक्ती भारताच्या राष्ट्रपतीपदी असावी, हे फार अर्थपूर्ण आहे. ती व्यक्ती शिक्षक असावी, यातल्या औचित्याला खरोखर तोड नाही. यातच भारताची उगवती पिढी निर्माण करणाऱ्या शिल्पकारांना खरा मानाच मुजरा दिला गेलेला आहे, असे म्हणणे योग्य ठरेल. या तत्वज्ञ शिक्षकाने राष्ट्रपतीच्या पदावरून उतरल्यानंतर राजकारणाबद्दल अवाक्षर हि काढले नाही हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. म्हणून त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने प्रतिवर्षी ५ सप्टेंबर ला 'शिक्षक दिन' साजरा केला जातो.

[ 'अमृत' सप्टेंबर १९६६ ]

[ टीप - या तेजस्वी शिक्षकाचा मृत्यू १७ एप्रिल १९७५ ला टेम्पलटन या प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळाल्यानंतर झाला. ]

# २९. आजच्या संदर्भात वानप्रस्थाश्रम

भारतीय संस्कृतीचे मूळ वैदिकांच्या संस्कृतीत सापडते; किंबहुना 'वेदोऽखिलो धर्ममूलम्' हे पूर्वीप्रमाणे आज हि खरेच आहे. 'शतायुर्वे पुरुषः' या वचनानुसार मनुष्याचे सामान्य आयुष्य १०० वर्षांचे आहे असे मानणाऱ्या या संस्कृतीत अकाली वार्धक्याला स्थान च नाही. महाभारतातील युद्धाच्या वेळी ८० च्या आसपास वय असलेल्या भीष्माने ६० च्या पुढे वय असणाऱ्या युधिष्ठिर, भीम, अर्जुन यांना 'युवक' असे संबोधून १० दिवस कौरवांच्या बाजूने भीषण युद्ध करून पांडव सैन्याला 'त्राहि भगवन्' असे म्हणण्यास भाग पाडले ही वस्तुस्थिती आहे. हे लुटुपुटीचे युद्ध होते असे मानणाऱ्या पंडितांचा प्रतिवाद करणे अर्थात च कठिण आहे. वयाच्या पन्नासाव्या वर्षानंतर औंधजवळचे आपले सर्व लेखन आणि ग्रंथभांडार जाळपोळीत भस्म झालेले बघून नव्या उमेदीने पारडीला स्थलांतर करून वेद-संशोधनाचे आपले कार्य पुढे ४८ वर्षे सातत्याने करीत रहाणारे स्व. पंडित सातवळेकर हे या युयुत्सू आणि जयिष्णू वैदिक संस्कृतीचे आधुनिक काळातले खरे वारसदार यात शंका नाही.

माणसाने १०० वर्षे जगावे अशी अपेक्षा बाळगणारी ही वैदिक संस्कृती कण्हत कुंथत जगावे असे मात्र म्हणत नाही; 'अदीनाः स्याम शरदः शतम्' याबद्दलचा वैदिकांचा आग्रह लक्षात ठेवण्यासारखा आहे. १०० वर्षे आमच्या बाहूत बळ असावे, मांड्यात ताकद असावी, आमची सर्व इंद्रिये कार्यक्षम असावी आणि आम्ही पराक्रमाच्या जोरावर सर्व जग पादाक्रांत करण्याची आकांक्षा बाळगावी असा वैदिक ऋषींचा सल्ला आहे.

माणसाला असा सल्ला देणाऱ्या या सनातन संस्कृतीने त्याच्या जीवनाचा मानसशास्त्र व शरीरशास्त्र या दोन्ही दृष्टींनी विचार करून त्याची विभागणी ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि संन्यासाश्रम या चार टप्प्यांत केलेली आहे. ब्रह्मचर्याश्रमात ज्ञानार्जन करून जीवनाला आवश्यक असणारी भूमिका तयार करावयाची व नंतर गृहस्थाश्रम स्वीकारून सर्व सुखांचा उपभोग घ्यावयाचा हि कल्पना. या उपभोगांवर ही शरीरधर्म व मनाची प्रौढता दोन्ही दृष्टींनी अंकुश ठेवणे योग्य. इतके च नव्हे तर नवीन पिढीच्या भवितव्याच्या दृष्टीने आवश्यक च आहे हे ओळखून वैदिक संस्कृतीने गृहस्थाश्रमानंतर वानप्रस्थाश्रमाचा उपदेश केला व या आश्रमात पुढील आश्रमाची म्हणजे संन्यासाश्रमाची तयारी करून मनुष्याच्या वैयक्तिक मोक्षसाधनेचा मार्ग प्रशस्त केला.

वानप्रस्थाश्रमाचा विषय प्रस्तुत असल्यामुळे या लेखात प्राधान्याने या आश्रमाची च चर्चा करीत आहे. मनुस्मृतीत वानप्रस्थाश्रम केव्हा स्वीकारावा या संबंधी मनु म्हणतो -

गृहस्थस्तु यदा पश्येत् वलीपलितमात्मनः
अपत्यस्यैव चापत्यं तदारण्यं समाश्रयेत् ।।

म्हणजे गृहस्थाने आपले केस पांढरे झाल्यावर म्हणजे आपल्या मुलाला मुलगा झाल्यावर अरण्याचा आश्रय घ्यावा म्हणजेच गृहस्थाश्रमाचा त्याग करून वानप्रस्थाश्रम स्वीकारावा. मुलाला मुलगा झाल्यावर म्हणजे मुलामध्ये आपल्या संपूर्ण कुटुंबाचे पालन करण्याची पात्रता निर्माण झाल्यावर असा अर्थ करणे योग्य. 'अरण्य' शब्दाचा अर्थ हि लक्षात घेतला पाहिजे. 'वनात' जावे असे न म्हणता 'अरण्यात' जावे हा शब्द वापरण्यात औचित्य आहे. रण म्हणजे युद्ध किंवा संघर्ष, त्याचा अभाव असलेली जागा 'अरण्य' या शद्बाने सूचित होते. मुळात वानप्रस्थाश्रम हा पिढ्यांमधला अनिवार्य संघर्ष टाळण्यासाठी होता असे दिसते. नवीन पिढीवर संसाराची म्हणजे गृहस्थाश्रमाची सर्व जबाबदारी सोपवून अरण्यात निघून जाण्याची कल्पना यात स्पष्ट आहे. अर्थात त्या काळी अशी संघर्षापासून दूर, मनःशांतीला पोषक असणारी अरण्ये अस्तित्वात होती आणि अरण्यात येऊन रहाणाऱ्या वानप्रस्थांच्या योगक्षेमाची काळजी तत्कालीन राजे वाहत असत. कविकुलगुरू कालिदासाने रघुवंशातल्या राजांबद्दल सुरवातीला 'वार्धके मुनिवृत्तीनाम्' असे शब्द या अर्थाने वापरले व 'गलितवयसामिक्ष्वाकूणामिदं हि कुलव्रतम्' असे म्हणून योग्य वेळी इक्ष्वाकु वंशातील राजे वानप्रस्थाश्रम स्वीकारण्याचे व्रत कुळाचार म्हणून पाळीत असत असे सांगितले.

अरण्यात जाऊन रहाण्याची ही पद्धत स्वीकारण्यात नवीन पिढीला आवश्यक भासेल तेव्हा अनुभवी पिढीचा सल्ला मिळावा ही कल्पना समाविष्ट होती. गृहस्थाला आवश्यक असणाऱ्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडताना अनेक वेळा तटस्थ (म्हणजे त्रयस्थ) वृत्तीने दिल्या जाणाऱ्या सल्ल्याची आवश्यकता भासावी यात नवल नाही. हा सल्ला अनुभवाने समृद्ध झालेल्या वानप्रस्थाकडून सहज मिळण्यासारखा होता. त्यासाठी सल्ला मागणाऱ्याने दैनंदिन कोलाहलापासून व संघर्षापासून मनाने व शरीराने बुद्धिपुरस्सर दूर रहाणाऱ्या मागील पिढीच्या अनुभवी प्रतिनिधीकडे जावे हे मात्र अभिप्रेत होते कारण 'विचारल्याशिवाय सल्ला कधी देऊ नये' (अनापृष्टः न ब्रूयात्) हा नियम पूर्वकाळी पाळला जात असे. यामुळे नवीन पिढीला जुन्या पिढीच्या अनाहूत सल्ल्याचा जाच हि होत नसे.

आजच्या संदर्भात तर पूर्वीच्या वाप्रस्थाश्रमाच्या मूलभूत प्रवृत्तीचे अनुकरण

करणे अधिक कल्याणकारक ठरेल. पूर्वीप्रमाणे अरण्यात जाऊन रहाणे आज शक्य नाही परंतु नवीन पिढीने सल्ला मागितल्याशिवाय आपणहून तो न देण्याची काळजी घेणे सहज शक्य आहे, नव्हे ते हितावह. 'अनापृष्टः न ब्रूयात्' हा तर जुन्या पिढीचा आज मंत्र झाला पाहिजे. दैनंदिन कोलाहलापासून, देवाणघेवाणीच्या व्यवहारापासून शरीराने दूर जाणे शक्य नसेल, परंतु मनाने या सर्वापासून दूर, निर्लेप वृत्तीने रहाणे का जमू नये ? मुलांच्या व लेकीसुनांच्या आवडी-निवडी आपल्या सारख्या च असाव्या, त्यांनी दैनंदिन कारभारात आपल्या सल्ल्याने वागावे, आपल्याला साध्य न झालेल्या गोष्टी त्यांनी मिळविल्याच पाहिजेत असा आग्रह बाळगणाऱ्या पति-पत्नींना 'वानप्रस्थ' कसे म्हणता येईल ? असे असले तर आजच्या बहुचर्चित Generation Gap चा त्यांना पदोपदी अनुभव आल्यावाचून कसा राहील ? मग घराचे परिवर्तन रणात होणे स्वाभाविक च नव्हे का ?

हे टाळण्यासाठी मनूने वानप्रस्थाचे गुण सांगितले असावे. तो म्हणतो.

स्वाध्याये नित्ययुक्तः स्याद्दान्तो मैत्रः समाहित :।
दाता नित्यमदाता च सर्वभूतानुकम्पकः ॥

आजच्या संदर्भात तर हे गुण अंगी असणे अत्यावश्यक होऊन बसलेले आहे. यासाठी वानप्रस्थ याची युमानुकूल परिभाषा 'वने नाम अनसमूहे यः प्रकर्षेण तिष्ठति स वानप्रस्थः' अशी करावी लागेल. वानप्रस्थाच्या अवस्थेला पोचलेली आजची व्यक्ती साधारणपणे स्वतःच्या कुटुंबाच्या बाबतीत कृतकृत्य असते. मुलांची लग्ने होऊन घरांत सुना आलेल्या असतात, मुलींचे विवाह अनुरूप वरांशी झालेले असतात आणि त्या आपापल्या घरी नांदत असतात. अशा वेळी स्वतःवर ताबा ठेवणे (दान्त), सर्वांशीच ज्येष्ठ मित्र या नात्याने वागणे (मैत्र), मन शांत असणे (समाहितः), सतत कांहीतरी देत असणे (नित्यं दाता), घेण्याची म्हणजे फायद्याची अपेक्षा न बाळगणे (अदाता) आणि सर्व समाजावर च प्रेम करणे. संपूर्ण समाजाबद्दल सहानुभूति बाळगणे (सर्वाभूतानुकम्पकः) वस्तुतः त्याला शक्य झाले पाहिजे. तसे होण्याचा प्रामाणिक प्रयत्न तरी त्याच्याकडून झाला पाहिजे. तसा तो करीत नसेल तर नवीन पिढीशी संघर्ष अटळ च ठरणार. मुलींना नेहमीच झुकते माप देऊन सुनांच्या भावना न जपणारी सासू किंवा सासरा स्वाभाविकपणे डोळ्यांसमोर नकोसा वाटणार आणि कर्तव्यापेक्षा अधिकाराबद्दल जागरूक असणाऱ्या आजच्या समाजात नवी पिढी जुन्या पिढीला उपद्रवकारक भासणार हे हि अटळ म्हटले पाहिजे.

मनूच्या श्लोकातील सुरवातीचा गुण 'स्वाध्याये नित्ययुक्तः स्यात्' म्हणजे

'स्वतःच्या आवडीच्या विषयाचे अध्ययन करण्यात मग्न राहणे' अंगी असणे तर आधुनिक काळात स्पृहणीय च ठरेल. वैद्यकीय दृष्ट्या प्रगत युगात आपण रहात असल्यामुळे सामान्य आयुर्मान पुष्कळच वाढलेले आहे. त्यामुळे सेवानिवृत्त झाल्यानंतर १५-२० वर्षे जगण्यात अडचण येण्याचे कारण नाही. मग या काळात च आवडीच्या विषयाचे निरपेक्ष अध्ययन व चिंतन स्वस्थपणे होऊ शकते. त्यात मन गुंतवू शकणाऱ्या सेवानिवृत्त व्यक्तीला मुलाबाळांच्या दैनंदिन जीवनात व व्यवहारात लक्ष घालण्याचे कारण उरणार नाही. पण लक्षात कोण घेतो ? परंतु यासाठी तयारी मात्र सेवानिवृत्तीपूर्वीच्या आयुष्यातच करायला हवी, तरूणपणीच छंदांची जोपासना करण्याकडे लक्ष द्यायला हवे. वस्तुतः शालेय जीवनात च छंदाची सुरवात केली पाहिजे. याकडे आमच्या शैक्षणिक विचारवंतांचे हि हवे तितके लक्ष नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. यामुळेच व्यावहारिक सेवेच्या व्यापातून मुक्त झालेला आजचा माणूस मनाने संपतो, त्याची उमेद च नाहीशी होते. मग त्याचे जगणे त्याच्या दृष्टीने अर्थशून्य व त्याच्या कुटुंबातील व्यक्तींच्या दृष्टीने तापदायक व जाचक होते.

हे टाळावयाचे असेल तर सेवानिवृत्त होणाऱ्या आजच्या प्रौढ नागरिकाने 'आता उरलो उपकारापुरता' या भावनेने समाजाच्या कल्याणाचे कंकण बांधले पाहिजे, आपल्याच मुलाबाळांच्या चौकटीत न वावरता नवीन पिढीचे मित्रभावाने शक्य तेवढे हित करण्याची आकांक्षा बाळगून त्यासाठी झटण्याची तत्परता दाखविली पाहिजे. ही तत्परता कृतीत उतरविणे आणि त्याबद्दल भोवतालच्या समाजाची खात्री पटविणे आवश्यक ! या दोन्ही गोष्टी 'स्व'चा अत्यावश्यक संकोच जितक्या प्रमाणात करता येईल किंवा 'स्व'ला जितक्या प्रमाणात व्यापक करता येईल तितक्या प्रमाणात ती व्यक्ती खऱ्या अर्थाने स्थिर राहून समाजासाठी निःस्वार्थ बुद्धीने काम करणारी अशी व्यक्ती तिच्या कुटुंबालाच नव्हे तर सर्व समाजाला हवी हवीशी वाटेल याबद्दल शंका बाळगण्याचे कारण नाही. महाभारतात महर्षि व्यासांनी एके ठिकाणी 'मानुष्यान्न श्रेष्ठतरं हि किञ्चित्' असे म्हणून मनुष्याला सर्वश्रेष्ठ मानलेले आहे. या मनुष्याला पर्यायाने माणुसकीला उपयोगी पडण्यासाठी जीवनात अनुकूल आश्रम म्हणजेच वानप्रस्थाश्रम. ऋषिऋण, देवऋण आणि पितृऋण ही तीन ऋणे आधीच्या दोन आश्रमात (ब्रह्मचर्याश्रम आणि गृहस्थाश्रम) यांत फेडल्यानंतर मानवतेचे चौथे ऋण फेडण्यासाठी सर्व मानवांशी दयाळूपणाने व समत्वाने वागण्याचे कार्य पूर्ण करण्यासाठी या वानप्रस्थाश्रमाची योजना करून संन्यासाश्रमात 'शेवटचा दिस गोड व्हावा' याची संपूर्ण तयारी वैदिक संस्कृतीने करून ठेवलेली आहे. गीतेतील आदर्शाचे वर्णन करताना भारताचे राष्ट्रपती स्व. डॉ. राधाकृष्णन् यांनी

The ideal of the devotee is one in whom love is lighted by knowledge and bursts forth into a fierce dsire to suffer for mankind असे लिहून ठेवले. हे खऱ्या वानप्रस्थाचे वर्णन. अशा वानप्रस्थांची 'मांदियाळी' निर्माण करणे ही आजची गरज च आहे असे म्हणण्यात हरकत नाही. कारण ही 'मांदियाळी' समाजाचे कल्याण करेल हे निर्विवाद.

[ भारतीय शिक्षण एप्रिल १९९० ]

# ३०. प्राचीन भारतीय संस्कृती व जीवन-समन्वय

अखिल भारतीय प्राच्य विद्या परिषदेचे अधिवेशन नेहमीप्रमाणे पार पडले. पौर्वात्य विद्यांच्या सर्व क्षेत्रांतील विकासाचा आढावा घेणाऱ्या ज्या काही संस्था आहेत त्यात अखिल भारतीय प्राच्य परिषदेने आपले महत्त्वपूर्ण स्थान निर्माण केलेले आहे यात शंका नाही. या परिषदेच्या अंगभूत विभागांकडे नुसती ओझरती नजर टाकली तरी हिच्या अध्ययनाचा आंवाका किती मोठा आहे याची सहज कल्पना येते. इराणी, अरेबिक, पर्शियन व इस्लामी विभागांच्या साहाय्याने ही परिषद मध्यपूर्वेकडे लक्ष पुरविते व पाली जाणि बौद्ध धर्मा सारख्या विभागांच्या जोरावर पूर्वेकडील व दक्षिणेकडील देशांशी जवळीक साधते. भारतीय सभ्यतेने पूर्वकाळी मध्य आशिया, चीन व इराक या देशांत हि संचार केला होता हे तर सर्वांना माहितच आहे. नालंदा व विक्रमशिला या भारतीय विद्यापीठांत पूर्वकाळी युरोपातील विद्धानांचे सहर्ष स्वागत केले जात होते. या दृष्टीने आज युरोपातील व अमेरिकेतील विद्यापीठांत भारतीय व आशिया खंडातील संस्कृतीच्या पद्धतशीर अभ्यासाची सोय केली जात आहे हे औचित्यपूर्ण च नव्हे का ? एके काळी पश्चिमीय पंडितांचा ओढा आमच्याकडील प्राचीन भाषा व साहित्य यांच्या अध्ययनापर्यंतच मर्यादित होता; आज युगधर्मानुसार त्याना आधुनिक भारताच्या सांस्कृतिक अध्ययनाची हि गरज भासू लागावी हे स्वाभाविक च आहे. प्राच्य विद्या परिषदेचे तर स्वरूपच समन्वयात्मक असल्यामुळे या परिषदेच्या समर्थकांना पूर्वेकडील व पश्चिमेकडील आमच्या शेजाऱ्यांच्या प्राचीन व मध्ययुगीन सभ्यतेकडे लक्ष पुरविणे आवश्यक होऊन बसते. याबरोबरच मोहेंजोदाडो व हडाप्पा या काळापासून आमच्याकडे ज्या उज्वल संस्कृतीचा वारसा चालत आलेला आहे त्याकडे अभिमानास्पद दृष्टिक्षेप करून त्यापासून आवश्यक प्रेरणा घेणे हे हि आमचे कर्तव्य च आहे.

भौगोलिक दृष्टीने भारताच्या सीमांसंबधी वादविवाद झाले असतील किंवा होतील हि; परंतु भारताच्या सांस्कृतिक एकात्मतेला कधी हि फारसा तडा गेला नाही हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. वस्तुतः भारतामध्ये आढळणारी विविधता ही अत्यंत विस्मयजनक आहे. भारतात निरनिराळ्या धर्मांचे लोक आहेत, काहींची धर्मपद्धती अत्यंत स्थूल व ओबडधोबड आहे तर काहींच्या धार्मिक आचार-विचारांनी आध्यात्मिकतेचे शिखर गाठलेले आहे. भाषांच्या दृष्टीने पाहिले तर आमचा देश म्हणजे विभिन्न भाषांचे अजब प्रदर्शन च आहे असे म्हणण्यास हरकत नाही. कांही केवळ बोलीच्या स्वरूपात आहेत तर काहींनी साहित्याच्या गुणवत्तेच्या जोरावर जागतिक स्थान मिळवलेले आहे. आमच्यातील सामाजिक

संस्थांचे व कलांचे स्वरूप हि वैविध्याने नटलेले आहे. स्थापत्य कलेचे नमूने च घ्या :- मदुरेचे मीनाक्षी देऊळ, वेरूळ येथील विस्मयावह गुंफा, श्रवण बेळगोळा येथील बाहुबलीची मूर्ति, विजापुरातील गोलघुमट, पुरीचे स्तूप, आग्र्याचा ताजमहल, दिल्लीचा लाल किल्ला किंवा कलकत्त्याचे व्हिक्टोरिया स्मारक या सर्वांचे वैशिष्ट्य निरनिराळे आहे हे खरे, परंतु या सर्वांवर भारतीयत्वाची छाप आहे व हा एकसूत्रतेचा धागा सर्व ठिकाणी न चुकता दिसतो हे मोठे आश्चर्यकारक सत्य आहे यात शंका नाही.

या मूलभूत एकतेच्या जोरावर च विविधता आधारलेली आहे. आत्यंतिक ईश्वरवादाबरोबरच कट्टर अनीश्वरवाद हि भारतात आढळतो. याचे कारण म्हणजे भारतीय सस्कृतीची सहिष्णुता व सर्वसंग्राहकता. सत्यावर एकाधिकार कोणाचा हि असू शकत नाही ही भावना येथे दृढमूल झालेली असल्यामुळे मतभेदांना वाव मिळतो. एकाच सत्याकडे जाणाऱ्या निरनिराळ्या मार्गांची योग्य बूज राखली जाते. धार्मिक क्षेत्रांत प्रत्येकाला आपापल्या मताप्रमाणे व विश्वासानुसार वागण्याची जी मुभा दिली आहे त्याच्या मुळाशी लोकशाहीतील मूलभूत व्यक्तिस्वातंत्र्याचे तत्त्व आहे असेच म्हटले पाहिजे. या सहिष्णुतेला गालबोट लावणाऱ्या काही घटना आमच्या इतिहासांतून हि दाखवून देता येतील परंतु त्या अपवादभूत च होत व त्यामुळे नियम सिद्ध होतो असेच म्हणणे योग्य. व्यक्तीबद्दल आदराची भावना अनुस्यूत असली तर त्यांतूनच अहिंसा, दया व मैत्रीची तत्त्वे निर्माण होतात आणि एकत्वाचे बंधन सर्वांना लागू होते. परकीयांच्या आक्रमणाचा अनुभव आम्हाला नुकताच येऊन गेला; त्यावेळी एकसंघपणा प्रकर्षाने दिसला व त्यामुळेच आमच्या शत्रूंची वाताहत झाली हे कोणी हि कबूल करील.

धर्म हा वस्तुतः मानवांतील दैवी अंशावर भर देतो व त्याला जीवनांतील स्थायी मूल्यांची कदर ठेवण्यात साहाय्य करतो. या दृष्टीने भौतिक उत्कर्षाची चिंता वहाणाऱ्या विज्ञानाशी धर्माचा संघर्ष होण्याचे कारण नाही; किंबहुना विज्ञान व धर्म यांच्या डोळस समन्वय यावर च माणसाची खरी प्रगती अवलंबून आहे. मानवामानवांत जर दुही माजली असेल तर ती धर्मामुळे नसून धर्माच्या उपदेशकांमुळे व राजकारणाला जवळ असणाऱ्या त्यांच्या कार्यामुळे. खरे पाहता सामाजिक अन्यायाचा किंवा विषमतेचा वास असणारी कुठली हि वस्तु धर्मात बसू शकत नाही. प्राचीन भारतीयांनी धर्माला प्राधान्याने नीतिशास्त्र च मानलेले आहे व नीतिशास्त्रात अभिनिवेशाला स्थान असू शकत नाही. याच अर्थाने भारताला निधर्मी राज्य म्हणता येईल असे वाटते.

निसर्गावर मात करीत जाण्यातच कलेचे स्वारस्य आहे व प्रत्येक पिढी या

बाबतीतील आपल्या विजयाचा रास्त अभिमान बाळगीत असते. विद्युत्कणांच्या विघटनांच्या साहाय्याने आज आपण विश्लेषणाच्या पराकोटीला पोहोचलो आहोत व चंद्रावर उतरण्याची भाषा बोलत आहोत हे खरे. परंतु अजून हि आपल्याला शक्तिशाली निसर्गाचे कप्पे अज्ञात आहेत. यासाठी आपल्या प्रयत्न सतत चालू राहिला पाहिजे. मनुष्याच्या आकलनशक्तीच्या व विज्ञानाच्या मर्यादेच्या पलीकडे काही तरी अज्ञात असे राहणार च. वास्तविक या अनुभवातून मानवाने विनम्र होऊन स्थायी मूल्यांचा विचार करावयास हवा. विज्ञानाची ही प्रगती खरे पहाता मानवाचे या पृथ्वीवरील जीवन सुखकर व सुसह्य करण्यासाठीच चाललेली आहे ना ? परंतु आज आमचे विज्ञान, आमचे यांत्रिक कौशल्य, श्रम करण्याचे आमचे सामर्थ्य या सर्वांचा वापर मोठ्या प्रमाणावर मानवाचा घात करणाऱ्या शस्त्रांच्या निर्मितीसाठी होत आहे हे विसंगत नव्हे का ? जी राष्ट्रे अशा प्राणघातक शस्त्रांची निर्मिती केवळ स्वसंरक्षणा ऐवजी विक्रीच्या हेतूने करीत आहेत त्यांनी वाटल्यास सामर्थ्याच्या समतोलपणाचा उदो उदो करावा परंतु त्यांना शांतीची भाषा बोलण्याचा नैतिक अधिकार च नाही. शास्त्रीय प्रगति काय किंवा औद्योगिक उन्नति काय दोघांचे हि ध्येय मानवाचे कल्याण करणे हेच असले पाहिजे. या दृष्टीने शास्त्रीय व तांत्रिक प्रगतीने समाजात नीतीची व कल्याणाची दृष्टि रुजविण्याच्या कामी हातभार लावला पाहिजे. वैज्ञानिक प्रगतीमुळे जग लहान होत चाललेले आहे. यामुळेच समन्वयाची, शांतीची व एकोप्याची भावना वाढवून तिला खतपाणी घालण्याची पराकाष्ठा केली पाहिजे. या बाबतीत अणुयुगाचे पुरस्कर्ते व अहिंसेचे पाईक या दोघांनी हि हातात हात घालून पुढे येणे व मानवजातीच्या कल्याणासाठी अहर्निश झटण्याचे कंकण बांधणे अत्यावश्यक आहे.

भारतीय संस्कृतीचा संदेश अशा तऱ्हेच्या कल्याणकारी कार्याला निरंतर पोषक च ठरलेला आहे प्राचीन भारतीय धर्माचार्यांनी सर्व भारतात संचार करून एकात्मतेच्या भावनेची जपणूक केलेली आहे. संस्कृत भाषेने समन्वयात्मक विचारांचा साज चढवलेला आहे. सम्राट अशोकाने आपला संदेश निरनिराळ्या प्राकृत भाषांच्या समन्वयात्मक रूपाच्या साहाय्याने घरोघर पोचविला. प्राकृत भाषांनी द्राविड भाषांच्या विकासाला हि मदत केलेली आहे. संस्कृत बरोबरच प्राकृत, अपभ्रंश, पाली व द्राविड भाषांनी भारताच्या भाषिक समृद्धतेची जपणूक केलेली आहे. या भाषांतूनच आधुनिक भाषांचा जन्म झालेला असल्यामुळे समन्वयाचा हा धागा खंडित होण्याचे कारण नाही. भारतात लिपी देखील अनेक आहेत परंतु त्या सर्वांचा उगम ब्राह्मीतून झालेला असल्यामुळे समान धर्म शोधणे सहज शक्य आहे.

हे सर्व खरे असले तरी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आमच्यांत फुटीर वृत्ती बळवत

जाण्याचा धोका निर्माण झालेला आहे हे नाकबूल करता येणार नाही. भाषिक वाद प्रकोपाला जातील असा रंग दिसते. प्रांतिक स्वायत्ततेच्या अनिर्बंध कल्पनेमुळे उच्च शिक्षणात एकवाक्यता आणण्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. प्रादेशिक इतिहास, प्रादेशिक संस्कृती वगैरेंवर अतिरिक्त भर देण्याची प्रवृत्ती वाढत आहे. आमच्याकडील विद्यापीठांच्या शिक्षणक्रमांत भारताच्या प्राचीन संस्कृतीकडे लक्ष पुरविणे अधिकाधिक अनावश्यक मानले जात आहे. मराठी, गुजराती, बंगालीसारख्या आमच्या आधुनिक भाषांची जननी व जीवनदात्री म्हणजे संस्कृत; तिचे हि महत्त्व दिवसेदिवस कमी होत जाणार अशी साधार भीति वाटत आहे. अशा परिस्थितीत आधुनिक भाषांच्या जडणघडणीच्या दृष्टीने आवश्यक अशा प्राकृत भाषांच्या शिक्षणक्रमांत या भाषांच्या पूर्वेतिहासाला थोडे देखील स्थान असू नये असे म्हणणाऱ्यांचा पक्ष बळावत आहे. विज्ञान, वैद्यकीयशास्त्र या शाखांचे अध्ययन करणाऱ्या नवयुवकांना आमच्या संस्कृतीची कल्पना असण्याचे कारण नाही असे उघडपणे बोलले जात आहे. यामुळे आमचे बुद्धिमान विद्यार्थी संस्कृतीला पारखे होत चाललेले आहेत; त्यांच्या मनांत भारतीयत्वाबद्दलचे आकर्षण उरत नाही, ही वस्तुस्थिती नवभारताच्या निर्मितीच्या दृष्टीने शोचनीयच नव्हे तर भयानक आहे असे म्हटल्यावाचून रहावत नाही. सांपत्तिक सुस्थिति, संशोधनाची अनुकूलता वगैरे कारणामुळे परदेशी जाणारे आमचे वैज्ञानिक तिकडे च राहिले तर त्यांच्या ज्ञानाचा फायदा भारताला कसा मिळणार ? म्हणून त्यांच्या गुणांना वाव देणे व त्यांच्या मनात भारताबद्दल अनिवार आकर्षण निर्माण करणे हाच खात्रीचा उपाय आहे

भारताबद्दल व भारतीयत्वाबद्दल नितांत आस्था बाळगणारा विद्यार्थी वर्ग तयार करणे आज अत्यंत आवश्यक आहे. संस्कृती व संस्कृत यांची फारकत करणे म्हणजे मुळावर घाव घालण्यासारखे आहे. इतिहास शिकण्याच्या पद्धतीत हि बदल करणे श्रेयस्कर ठरेल. इतिहास म्हणजे राजधान्यांची उलथापालथ व सनावळी नव्हे; त्यांतून समाजाचे जिवंत चित्र काढता आले पाहिजे. भारतवर्षाच्या इतिहासात विविधतेच्या मुळाशी असणाऱ्या एकतेवर, एकात्मतेवर भर देणारी सोनेरी पाने अनेक आहेत. त्यांवर भर देऊन श्रद्धेचे कवच घालण्यात उदीयमान विद्यार्थ्यांना अनमोल मदत देण्याचा प्रयत्न कसोशीने करावयास हवा. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आमच्या जीवनाला नैतिकपणा च राहिला नाही अशी विचारवंतांची तक्रार पूर्णपणे अस्थानी आहे असे म्हणता येणार नाही. खाजगी जीवन व सार्वजनिक जीवन यात आकाशपाताळा इतके अंतर असणे हेच व्यवहारकुशलतेचे गमक मानण्याची बळावणारी प्रवृत्ति अंती घातक होणार हे ओळखून वागले पाहिजे. निधर्मी राज्यातील आजचे विद्यार्थी उद्याचे शिल्पकार

आहेत हे लक्षांत ठेवून त्यांच्या मनाची मशागत करण्याची योग्य व्यवस्था करणे हिताचे ठरणार आहे. या दृष्टीने शिक्षण घेणाऱ्या संस्कारक्षम युवक युवतींसमोर सतत महाभारत, नीतिशतक व तिरूक्कुरल यांतील वेचे ठेवणे हितावह होईल. वैज्ञानिक प्रगति व सांस्कृतिक मूल्ये यांतील सुसंवाद विद्यार्थ्यांच्या नजरेसमोर ठेवण्याचा सहेतुक प्रयत्न केल्याशिवाय आजची शैक्षणिक समस्या सुटणार नाही.

भारतीय संस्कृती आध्यात्मिक आहे व पाश्चात्य संस्कृति आधिभौतिक आहे व यामुळेच या दोन्ही संस्कृतीचा समन्वय करणे शक्य नाही हा एक मोठा भ्रम आहे. याचे निरसन करणे आवश्यक आहे. वेदकालीन आर्य हे तर 'याचि देहि याचि डोळां' स्वर्ग निर्माण करण्याच्या आकांक्षेने प्रेरित झालेले होते, त्यांनी त्या काळी उपलब्ध असलेल्या सर्व विद्यांची निष्ठेने जोपासना केली व विजयशाली जीवनाचा हिरीरीने पुरस्कार केला. वैदिकांनी समृद्धीचे जे सुवर्णयुग निर्माण केले त्याच्या पार्श्वभूमीवरच उपनिषदांच्या जयिष्णु तत्त्वज्ञानाची उपपत्ति लागते. नंतरच्या काळात विकसित झालेल्या धर्मशास्त्रांत देखील धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चतुर्विध पुरुषार्थाची कल्पना रूढ झालेली आहे. अर्थ व काम यांना पुरुषार्थ मानून धर्मशास्त्रकारांनी सामान्य माणसाला आवश्यक असणाऱ्या गोष्टींची तरतूद केलेली आहे. पंचतंत्र, अर्थशास्त्र, कामशास्त्र, अश्वपरीक्षा, द्रव्यपरीक्षा, मानसार वगैरे ग्रंथातून भौतिक दृष्टिकोण च स्पष्टपणे मांडलेला आहे. परंतु अर्थ व काम यांनाच अवास्तव महत्त्व दिल्यास मानव स्वेच्छाचारी बनून समाजाला विघातक ठरण्याचा संभव असतो. म्हणून धर्माच्या साहाय्याने स्वेच्छाचारावर नियंत्रण घालण्याचा प्रयत्न केला आहे. व्यक्तिस्वातंत्र्य समाजहिताला विघातक ठरू नये म्हणून अर्थ व काम यांच्याबरोबर च धर्माचे हि महत्त्व प्राचीन आर्यांनी सांगितले. मोक्ष या पुरुषार्थाचा संबंध व्यक्तीशी आहे, त्याचा विचार धर्म, अर्थ व काम यांची प्राप्ति झाल्यानंतर च करावयाचा असतो असे धर्मशास्त्राचे सांगणे आहे. या पुरुषार्थाला अनुकूल अशी ऋणाची कल्पना हि हिंदूधर्मशास्त्रांत आढळते. तात्पर्य ऐहिक सुखाकडे पाठ फिरवावी असे भारतीय परंपरेत कोठे हि म्हटलेले नाही. आमच्याकडे विलासी राजे हि खूप होऊन गेले; परंतु आम्ही अशा राजांपेक्षा राजर्षींना च मानले, राजा व साधुसंत यांमध्ये निवड करण्याचा प्रश्न आला तर साधुसंतांची जास्त कदर ठेवली हे मात्र खरे आणि या दृष्टीने आमचा आध्यात्मिक संपत्तीवर भर आहे; आदर्शाकडे ओढा आहे असे म्हणता येईल. पण त्यांत वाईट वाटण्यासारखे काही च नाही. संपत्ति मिळवावी पण मिळवल्यानंतर तिचा उपभोग सत्कार्यासाठी व्हावा; सामर्थ्याची उपासना करावी पण संचय केल्यानंतर त्याचा विनियोग ' जे का रंजले गांजले' त्यांच्यासाठी करावा हा च आमच्या संस्कृतीचा संदेश आहे. यांत भौतिक उत्कर्ष व आध्यात्मिक उन्नति यांचा

समन्वय आहे. कविकुलगुरू कालिदासाने रघुवंशात दिलीपाचे वर्णन करतांना -
बलमार्तभयोपशान्तये विदुषां सत्कृतये बहु श्रुतम् ।
वसु तस्य विभोर्न केवल गुणवत्तापि परप्रयोजना ।।
असे म्हणून हा संदेश च वाचकांच्या मनांवर बिंबविण्याचा जो प्रयत्न केलेला आहे त्यापासून आम्ही प्रेरणा घेऊ शकणार नाही काय ?

[ 'महाराष्ट्र दर्शन' दिवाळी १९६६ ]

REFBK-0026519



**सम्पूर्ण नांव**
मोरेश्वर दिनकर पराडकर
**जन्म**
परभणी, १७ नोव्हेम्बर १९२५
कविवर्य मोरोपंतांची सातवी पिढी
**शिक्षण**
एम. ए. (१९४७) पी. एच्. डी. (१९५४), साहित्य रत्न (१९५१)
**अनुभव**
मुंबईतील अनेक महाविद्यालयांत व मुंबई विद्यापीठ संस्कृत विभागात संस्कृत अध्यापन (अर्धमागधी) १९४७-६६
सोनोपंत दांडेकर कॉलेज पालघर, प्राचार्य
पेंढरकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, प्राचार्य, } (१९७०-८५)
बम्बई हिन्दी विद्यापीठ माहीम-मानद अधिकारी १९५७-७०, कुलपति १९७० नंतर
**प्रमुख रचना - इंग्रजी**
Similies in Manusmriti
Malavikagnimitram - A Critical study
Ed. Studies in the Geeta
**मराठी**
शाकुन्तल (कथा), मालविकाग्निमित्र (कथा) (१९७८)
भारतातील प्राचीन विद्यापीठे - दुसरी आवृत्ती (१९९०)
संपादित-आर्याभारत ६ खण्ड, हरिवंश वगैरे (१९६४)
चतुराख्यान (१९८०), वाडेश्वर माहात्म्य (१९८१)
**हिन्दी अनुवादित ग्रंथ**
वैदिक संस्कृतिका विकास (१९५७) रवीन्द्रनाथ जीवनगाथा (१९६५) ऋक्सूक्तवैजयंती (१९६७), विवेकानन्दांची पत्रे (१९७०)
**सम्पादित**
रजत जयंती ग्रंथ (१९६३), हिन्दी भाषा साहित्य और संस्कृती (१९८८)
**विदेश प्रवास**
जागतिक संस्कृत परिषद - फिलाडेल्फिया १९८४
जागतिक संस्कृत परिषद - नैदर्लैण्ड १९८७
**स्थायी पत्ता**
४/११ शाह बिल्डिंग, भगत पथ, माहीम, मुंबई ४०० ०१६ दूरध्वनी ४३० १९ ६४